।। श्री ।।

''ठाणे आणि रायगड जिल्ह्यांतील समाजात परिवर्तन घडविण्याच्या कार्यात डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या कार्याचे योगदान' : एक अभ्यास

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीकरिता विषयातील आंतरशास्त्रीय इतिहास विद्याशाखांतर्गत सादर केलेल्या संशोधन प्रबंधाचा गोषवारा

संशोधिका
सौ. नेहा मिलिंद वैद्य

मार्गदर्शक
डॉ. विजया वाड

जानेवारी २०१५

DECLARATION

I hereby declare that the thesis entitled ''ठाणे आणि रायगड जिल्ह्यांतील जनमानसावर डॉ. नानासाहेब धर्माधिकारी ह्यांच्या कार्याचा होणारा परिणाम'' एक अभ्यास. completed and written by me has not previously formed the basis for the award of any Degree or other similar title upon me of this or any other vidyapeeth or examining body.

NEHA MILIND VAIDYA
Research Student

Place : Thane
Date : January 2015

CERTIFICATE

This is to Certify that the thesis entitled ''ठाणे आणि रायगड जिल्ह्यांतील जनमानसावर डॉ. नानासाहेब धर्माधिकारी ह्यांच्या कार्याचा होणारा परिणाम'' एक अभ्यास which is being submitted herewith for the award of the Degree of Vidyavachaspati (Ph.D.) in Interdisciplinary History of Tilak Maharashtra Vidyapeeth, Pune is the result of original research work completed by Mrs. VAIDYA NEHA MILIND under my supervision and guidance. To the best of my knowledge and belief the work incorporated in this thesis has not formed the basis for the award of any Degree or Similar title of this or any other University or examining body upon her.

DR. VIJAYA WAD

Research Guide

Place : Thane

Date : January 2015

ऋणनिर्देश

या प्रबंधाच्या माझ्या मार्गदर्शक आदरणीय डॉ. विजया वाड मॅडम यांनी केलेल्या बहुमोल मार्गदर्शनामुळेच माझे हे संशोधन कार्य साकार झाले. त्याबद्दल संशोधिका त्यांची सदैव ऋणी आहे.

या संशोधनाच्या कार्यासाठी लागणारी माहिती ही विविध ग्रंथालयांमधून मिळविली. जवाहरलाल नेहरू ग्रंथालय (मुंबई विद्यापीठ) पुणे विद्यापीठाचे ग्रंथालय, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथालय (पुणे), ठाणे मराठी ग्रंथसंग्रहालय (ठाणे), दादर सार्वजनिक वाचनालय (दादर) या सर्व ग्रंथालयांचे ग्रंथपाल, व्यवस्थापक व अन्य सहकारी यांची मी मनःपूर्वक आभारी आहे. प्राचीन संतकाव्य आणि मराठी विश्वकोशाचे खंड उपलब्ध करून देणाऱ्या मौज प्रकाशन गृह (मुंबई) यांचे तसेच प्रा. नीला कोर्डे यांचे मनापासून आभार. तथा डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या सामाजिक परिवर्तन कार्याचे योगदान, मूल्यमापन आणि त्याचा जनमानसावरील टिकून राहिलेला प्रभाव याबाबतच्या या प्रबंध विषयाला सातत्याने मोलाचे मार्गदर्शन करणारे, कै. नानासाहेब यांचे ज्येष्ठ सुपुत्र श्री. दत्तात्रेय ऊर्फ अप्पासाहेब आणि नातू श्री. सचिनदादा धर्माधिकारी यांचे ऋण मानण्यास माझ्याकडे शब्दच नाहीत. प्रबंधाच्या क्षेत्र– अभ्यासासाठी सहकार्य करणारे श्री. संदीप पाटील व सौ. स्मिता तपस्वी यांचे मनःपूर्वक आभार!

संशोधन–प्रबंध मुद्रित स्वरूपात आणण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करणारे 'ऑलरीच एण्टरप्राइज'चे श्री. अतुल जोशी आणि त्यांचे सहकारी, तसेच मुद्रितशोधनाचे काम करणाऱ्या श्रीमती शकुंतला मुळ्ये यांचे हार्दिक आभार मानते.

कै. डॉ. नानासाहेब यांच्या कार्यप्रभावामुळे अधिक उन्नत मार्गाकडे वाटचाल करणाऱ्या विविध क्षेत्रांतील व्यक्तींच्या मुलाखती घेताना, मला स्वतःला त्या प्रश्नावलीपलीकडे असलेल्या त्यांच्या भावना–पर्यायाने–धर्माधिकारी यांच्या कार्याचा प्रभाव जाणवत गेला. तसेच रायगड व ठाणे जिल्ह्यांच्या क्षेत्र अभ्यासाच्या निमित्ताने मी विविध गावांतील, विविध स्तरांतील स्त्री–पुरुषांकडून कै. डॉ. नानासाहेब यांच्याबद्दलची बहुस्तरीय माहिती मिळवून संकलित केली. त्या सर्व मंडळींना मनापासून धन्यवाद!

घर–संसार आणि व्यवसाय सांभाळून हे काम करीत असताना विविध प्रकारच्या अडचणी

आल्या. परंतु या संशोधनकार्यात मला सतत प्रेरणा देणारी माझी दोन्ही मुलं– सानिका आणि तेजस; माझ्या पाठिशी खंबीरपणे उभी राहिली सतत प्रोत्साहित करण्याचे काम माझी ती. आई आणि सासूबाई यांनी प्रेमाने केले. मला संसाराच्या कामात न अडकवता वेळ दिला. सर्वाधिक आधार मिळाला तो मला न कंटाळता उत्तेजन देणाऱ्या आणि पाठिंबा देणाऱ्या माझ्या पतीचा– श्री. मिलिंद वैद्य यांचा. या सर्वांचे ऋण शब्दांत न मावणारे.

माझ्या या संशोधन कार्यात अनेक परिचितांचा काही ना काही सहभाग आहेच. त्या सर्व हितचिंतकांची मी कृतज्ञ आहे.

मी डॉक्टर व्हावे अशी माझे वडील कै. ती. पद्माकर शांडिल्य यांची फार इच्छा होती. परंतु अगदी थोड्या मार्कांनी मेडिकलची ॲडमिशन हुकली. म्हणून शिक्षणक्षेत्रातील ही डॉक्टरेट मिळविण्यासाठी आणि माझ्या नावाआधी 'डॉक्टर' ही उपाधी लागावी, या वडिलांच्या इच्छेची पूर्तता करण्यासाठी प्रयत्न करण्याचे समाधान, मला या प्रबंधामुळे लाभले. माझ्या दिवंगत प्रिय पित्याला वाहिलेली ही श्रद्धासुमने आहेत.

सौ. नेहा मिलिंद वैद्य

संशोधक

प्रास्ताविक

जगाच्या कल्याणा, संतांच्या विभूती।

देह कष्टविती, उपकारे!

या उक्तीप्रमाणे ज्या कै. डॉ. नानासाहेब (नारायण विष्णू) धर्माधिकारी यांनी जे लोकोत्तर कार्य केले, त्यांच्या त्या समाजपरिवर्तनाच्या कार्याचा शोध घ्यावा, त्यामागच्या प्रेरणा तपासाव्यात अशा ऊर्मीने संशोधिकेने प्रबंधाकरिता हा विषय निवडला.

समाजपरिवर्तनाचे कार्य आजवर अनेक संतांनी केले आहे. त्याचा थोडासा आढावा घेणे या विषयाच्या संदर्भात उचित ठरेल. कै. नानासाहेब हे संतांच्या मांदियाळीत समाविष्ट करावे असे अलौकिक व्यक्तिमत्त्व. संतसज्जन समाजपुरुषासाठी नेमके काय आणि कां करतात, याचा थोडक्यात आढावा घेण्यासाठी इतिहासाची पाने उलटावी लागतात; पाने उलटावी लागतात असे म्हणण्यापेक्षाही संतकार्याचा आपल्या जीवनावर जो अमीट ठसा आहे, त्याची पार्श्वभूमी पाहणे इष्ट ठरावे.

१. महाराष्ट्रातील संत–परंपरेची पार्श्वभूमी :

१.१ : संतप्रवृत्तीचा उदय होण्याची कारणे आणि तत्कालीन समाज –

यादव काळ हा मराठी साहित्याचा प्रारंभकाळ मानला जातो. रामदेवराव यादवाच्या वैभवशाली राज्यात सर्वसाधारणपणे प्रजा सुखी होती. यादवराजांचा काळ म्हणजे १२वे व १३वे शतक. या राजवटीत साहित्य शिल्पकलादी अनेक कलांना उत्तेजन मिळाले. मुकुंदराजाचा विवेकसिंधू व श्रीचक्रधर स्वामींचे लीळाचरित्र (श्री महानुभाव पंथ) हे दोन अध्यात्मविषयक ग्रंथ ही १२व्या शतकाची देणगी होय. नंतर ज्ञानेश्वरीसारखा अलौकिक ग्रंथ ज्ञानेश्वरांनी रचला. श्री ज्ञानेश्वरांचा जन्मसन इ. स. १२७५ तर नामदेवांचा जन्म इसवी सन १२७०. तेराव्या शतकाच्या शेवटी. दोघेही समकालीन. मात्र नामदेवांनी नामस्मरण आणि भजनकीर्तनातून समाज–प्रबोधनासाठी, आध्यात्मिक उन्नतीसाठी पार पंजाब प्रांतापर्यंत धडक मारली.

बाराव्या–तेराव्या शतकातील सामाजिक स्थितीचा अंदाज यादव काळाच्या इतिहासावरून घेता येतो. उच्चवर्णीयांची स्थिती चांगली असल्याने त्यांना शिल्पकलादी कलांमध्ये अभिरुची घेणे

शक्य होते. मात्र त्याचवेळी जे पददलित होते, गावकुसाबाहेरच ज्यांना स्थान होते अशांच्या दुःखाला कोणी त्राता नव्हता. तेव्हाच्या संस्कृत भाषेचा गंधही नव्हता. आपली दुःखे ते कोणाला सांगणार? (ऋग्वेदकालीन आर्यांमध्ये जन्माधिष्ठित चातुर्वर्ण्य नव्हता. तो फार पुढच्या काळात आला.) त्यामुळे दुःखी झालेले मूल जसे आईकडे जाते, आईच्या मायेच्या कुशीत त्यात शांत, आश्वस्त वाटते, त्याप्रमाणे हा गांजलेला वर्ग– ज्याला आपण बहुजन समाज म्हणू शकू– आपल्याला असा आश्वस्त आधार शोधू पाहत होता. त्यातूनच लोकदेवता निर्माण झाल्या. आदिवासी, जंगली रानटी जातिजमातींपासून ते बहुजनांपर्यंत अनेक देवदेवता या असुरक्षिततेच्या भावनेतून आणि दुःखात विसाव्याचा आधार म्हणून आल्या. मानवी कल्पनेतूनच त्यांचे सगुण रूप साकार झाले. वड, पिंपळादी वृक्ष, काष्ठ, पाषाण या नैसर्गिकरीत्या उपलब्ध साधनांतून या मूर्ती तयार झाल्या. त्याबद्दल खूप सांगता येईल. मात्र विषयाच्या अनुषंगाने सांगायचे झाले तर विठ्ठल तथा विठोबा ही बहुजनसमाजाची देवता. विठ्ठलाची काष्ठ अथवा पाषाणापासूनच घडवलेली मूर्ती असते. आपले दुःख देवापाशी सांगावे, त्याच्याकडेच सुखाच्या मागणीची इच्छा धरावी, तो जगन्नियंता आणि आपला त्राता आहे, ही यामागची लोकभावना होती आणि आहे.

म्हणून तर विठ्ठलाला सर्रास 'विठूमाउली' म्हटले जाते. या माउलीपाशी गांजलेल्यांनी आपले दुःख मांडले. चोखामेळ्यासारखा महार समाजातील तत्कालीन संत म्हणतो–

धांव घाली विठू आतां चालू नको मंद।

बडवे मज मारिति ऐसा कांहीं नाहि अपराध।।

(प्राचीन गीतभांडार, पृ. ४३)

हा विठूराया नामदेवाचा नैवेद्य खातो, चोखामेळ्याची गुरे राखतो, पुंडलिक आणि विठ्ठल हे तर अभिन्नच मानले जातात. दासी जनीची वेणीफणी करतो. तिला दळणकांडणात मदत करतो. गोरा कुंभार या विठ्ठलाच्या परमभक्ताला, माती मळायला विठ्ठलच साहाय्य करतो. संत सावता माळ्याचा मळा फुलवायला मदत करतो.

'कांदा मुळा भाजी। अवघी विठाबाई माझी,' असे सावता म्हणतो, ते उगीच नव्हे. तात्पर्य, यादव काळ किंवा यादवानंतरचा काळ असो. लोकजीवनाला धर्माचा मुख्य आधार होता. धर्माचरणावरच समाजाची सारी भिस्त होती. मात्र जपजाप्य, यज्ञ–याग आणि कर्मठपणा यामुळे ही धर्मभावना किंवा धर्माचरणाचे क्षेत्र संकुचित झाले होते.

१.२ संत–परंपरा : काही वैशिष्ट्ये

बदलत्या सामाजिक परिस्थितीनुसार समाजाला नवीन प्रेरणा देण्याचे सामर्थ्य धर्मसंस्थेत उरले नव्हते. फक्त कर्मकांडे आणि परंपरा आंधळेपणाने जोपासल्या जात होत्या. अज्ञ बहुजनसमाजाला खऱ्या अर्थाने मुखर केले ते संत मंडळींनी. सरत्या तेराव्या शतकात 'ज्ञानेश्वरी' हा प्राकृत भाषेतला ग्रंथ ज्ञानदेवांनी रचला आणि ज्ञानेश्वरीद्वारे स्वचिंतनाचा कणा वारकरी पंथाला दिला.

पूर्वापार चालत आलेला वारकरी पंथ आणि त्याला ज्ञानेश्वरांनी दिलेला चिंतनाचा कणा, नामदेवांनी अभंगनिर्मितीतून आणि नामस्मरण व भजनकीर्तनातून सर्वसामान्यांपर्यंत पोचविलेला भक्तिविचार, तेव्हापासून समाजमनात झिरपत राहिला. आपल्या उत्स्फूर्त अभंगवाणीतून, ओव्यांमधून बहुजनसमाजातील जनाबाई, सेना न्हावी, गोरा कुंभार, सांवता माळी, नरहरि सोनार, चोखामेळा आणि स्त्री–संतामध्ये कान्होपात्रा, सोयराबाई, निर्मळा अशा अनेकांनी स्वतःच्या अनुभूतींना मोकळी वाट करून दिली. त्यामुळे आध्यात्मिक पातळीवर समाज संघटित होऊ लागला. या पुढील काळात संत एकनाथ, तुकाराम आणि रामदास यांनी लोकशाहीचे मूल्य असलेल्या विचारांना आणि समाजधारणांना अधिक व्यापक स्वरूप दिले.

मात्र यात प्रामुख्याने विचार होता तो मोक्षाचा आणि जीवनमुक्तीचा सुलभ सोपा मार्ग आणि त्या शुभंकर मार्गाने समाज वाटचाल करीत राहिला. ऐहिक (भौतिक) जीवनातील संकटांना आणि परकीय आक्रमकांना परतून लावण्याची क्षमता आणि आत्मविश्वास समाजात निर्माण झाला. ज्येष्ठत्वाचा मान असणारे संत नामदेव हे दक्षिण भारतातील आंध्र–तेलंगणापासून ते पंजाबपर्यंतच्या भागात भक्तिमार्गाचे प्रवर्तक, प्रचारक आणि प्रसारक होते. इस्लामी आक्रमणाच्या काळात त्यांनी समतेचा आणि भक्तीचा संदेश संपूर्ण भारतभर पसरवला. बहुजन समाजाला आत्माविष्काराचे आणि आत्मसन्मानाचे एक व्यासपीठ मिळवून दिले. त्यामुळे संक्रमणकाळात समाजाची अखंडता जोपासण्याचे आंतरभारती कार्य नामदेवांनी केले.

'नामा तो केशव। केशव तोचि नामा' किंवा 'देव माझा, मी देवाचा' अशी एकरूप भक्तीची तल्लीनता त्यांच्यात होती. 'देव विठ्ठल, तीर्थ विठ्ठल' 'विठ्ठल विठ्ठल गजरी अवघी दुमदुमली पंढरी' हा त्यांच्या सगुण भक्तीचा विशेष. आपल्या अनेक संतशिष्यांची चरित्रे अभंग, ओव्या, रूपके, भजने अशी विविध प्रकारची साहित्य नोंद नामदेवांच्या नावावर आहे. भारतीय संतमनाचे पहिले उद्‌गाते आणि उद्‌बोधक असणाऱ्या नामदेवांनी ज्ञानेश्वरांच्या अद्वैत भक्तीच्या विचार नामस्मरणाची

आणि भक्तिविचाराची भर घातली. लोकजीवन आणि लोकसंस्कृतीशी एकरूप होऊन त्यांनी समाज प्रबोधन केले.

एकनाथ (जन्म : १५३८ किंवा १५४८, मृत्यू : १५९९)[१]

लोकशिक्षक किंवा लोकसाहित्यकार म्हणून संत एकनाथांची ओळख आहे. एकनाथांचे वाङ्मय बरेच असले तरी 'भारुडकार' म्हणून त्यांना ओळखले जाते ते विशिष्ट लक्ष्यार्थ, रूपकार्थ आणि गूढार्थ असणाऱ्या द्व्यर्थी भारुडांमुळे. 'विंचू चावला' 'दादला नको ग बाई' यांसारख्या भारुडांमुळे ते जनसामान्यांपर्यंत पोचले. बहुजनांना आत्मबोध आणि परमार्थबोध करणारी ही भारुडे हा स्वतंत्र काव्यप्रकार असून लोकरंजनाद्वारा लोकशिक्षण हा त्याचा प्रमुख हेतू होता. तेव्हा यवनी सत्तेच्या अमलाखाली असलेल्या महाराष्ट्रातील लोकांना, या माध्यमाद्वारे सजग आणि डोळस बनविणे आवश्यक होते. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात परिवर्तन घडवण्याचा प्रयत्न एकनाथांनी केला. हिंदू समाजातील वर्णभेद, सामाजिक विषमता आणि बहुजनांचे अज्ञान, त्यातून मोगलाई राजवट– या सर्व कारणांमुळे जनसामान्यांपर्यंत पोचण्यासाठी या समन्वयशील संताने प्रामुख्याने 'भारूड' या गेय व नाट्यमय काव्यप्रकाराचा प्रभावी प्रयोग केला. बहुजनांची, शूद्र–दलितांची स्थिती शोचनीय होती. अज्ञानामुळे ते नवससायास, अंगारेधुपारे उतारे, चेटूक तसेच विविध देवतांची पूजा करीत. त्याचे विदारक चित्र भारुडांद्वारा त्यांनी उभे केले. श्राद्धविधीनंतरच्या भोजनासाठी त्यांनी महारांना बोलावून समाजापुढे आदर्श ठेवला. सामाजिक विषमता, जातिभेद, श्रेष्ठ–कनिष्ठत्व नाहीसे होऊन समता, एकता आणि विश्वबंधुत्वाची भावना निर्माण झाली पाहिजे याची आस या संताला होती. ज्ञानेश्वरानंतर तीनशे वर्षांनी जन्मलेल्या या संताने संत तुकारामाप्रमाणे रोखठोक कोरडे ओढले नाहीत; मात्र समन्वयशील मार्गाने विषमतेवर प्रहार केले.

संत तुकाराम (जन्म : इ.स. १५९८ किंवा १६०८, मृत्यू : १६४९)[२]

मध्ययुगीन संतांनी इहलोकाऐवजी पारमार्थिक मोक्षावर जास्त भर दिला. आपल्या परखड लेखनाबद्दल प्रसिद्ध असलेले संत तुकाराम म्हणजे त्यांच्याच शब्दांत सांगायचं तर –

'भले तरी देऊ कासेची लंगोटी

नाठाळाचे माथा देऊ काठी'

---

१. प्राचीन गीतभांडार, संपादक : ना. ग. जोशी, मौज प्रकाशन गृह, दु.आ. २०१३, पृ. २३०–२३१.
२. तत्रैव, पृ. ३३.

समाजातील सोंगाढोंगावर, सामाजिक विसंगतीवर किंवा अन्यायावर आपल्या रोखठोक भाषेत त्यांनी कोरडे ओढले आहेत. पिढीजात असलेला वाणसामानाचा व्यवसाय आणि देहू गावातील 'महाजनकी इ.स. १६३०च्या प्रदीर्घ दुष्काळात प्रथम पत्नी, मुलगा गेला, व्यापार घटला. या अन्नान्नदशेच्या व्यथा वेदनांच्या चटक्यांनी 'विटले हे चित्त प्रपंचापासुनी' अशी अवस्था होऊन 'सर्वत्र ओस झाल्या दिशा' अशी तुकारामांची स्थिती झाली.

'वारियाने कुंडल हाले। डोळे मोडित राधिका चाले' (प्राचीन गीतभांडार, पृ. ५८)

किंवा

'असा कसा देवाचा देव बाई ठकडा। देव एका पायानें लंगडा ग बाई।। (तत्रैव, पृ. ५६)

या सर्वांतून तावून सुलाखून निघालेले तुकाराम म्हणजे एक अद्‌भुत रसायन. तत्कालीन लोकभाषेचा स्वीकार करून, आचार–विचारांची एकरूपता असल्याचे त्यांच्या गाथेतील अभंगांवरून दिसते. समाजातील अनाचार, अत्याचार, भ्रष्टाचार आणि वामाचार या सर्वांवर त्यांनी प्रखर प्रकाश टाकून दांभिकतेवर कोरडे ओढले आहेत. 'उजळावया आलो वाटा। खरा खोटा निवाडा' असे सांगत सत्यभाषण, पर स्त्री मातेसमान, मद्यपान निषेध अशा असंख्य गोष्टींबाबत त्यांचे परखड विचार त्यांनी प्रकट केले आहेत. तुकारामांनी ग्राह्य आणि त्याज्य अशा गोष्टी एकाच वेळी सांगितल्या. ज्ञानाची पहाट उजाडण्यासाठी, कितीही उत्तम संस्कार केले तरी जनमानस सुधारत नाही यांचे त्यांना आश्चर्य वाटते. ते म्हणतात–

'वाटे या जनांचे। थोर बा आश्चर्य।

न करिती विचार। का हिताचा!'

समाजप्रबोधन करणाराची तळमळ ही अज्ञ जनांस बहुधा उमगतच नाही. सामाजिक भान पूर्णत्वाने जागृत असणाऱ्या तुकारामांना कर्मठ, कर्मकांडे करणाऱ्यांकडून प्रचंड छळ सोसावा लागला. परंतु 'जग जालिया वन्ही। संतसुखे व्हावे पाणी' या न्यायाने त्यांनी ते सर्व एका विठ्ठलाच्या नामस्मरणावर सोसले. संतांना जग सुधारण्याच्या कामासाठी असा छळ कायमच सोसावा लागलेला आहे. मात्र संतांचा दृष्टिकोन सकारात्मक होता. त्यामुळे त्यांचा जो छळ झाला तो त्यांना छळ वाटला नाही. 'जगाच्या कल्याणा' असे ध्येय असणाऱ्या साऱ्या संतांनी तो आनंदाने सोसला.

संत रामदास (जन्म १६०८, मृत्यू : १६८१)[१]

तुकारामचे समकालीन असणारे संत रामदास हे संतांच्या मांदियाळीतील लोकशिक्षक आणि तत्त्वचिंतक विभूती म्हणून ओळखले जातात. प्रयत्नशील व गतिशील असणारे रामदास सदैव आणि सर्वत्र संचार करीत राहिले. आदर्श राज्याची रचना करून ते उत्तमप्रकारे चालविणारे प्रभू श्रीरामचंद्र यांच्यावर रामदासांची प्रखर निष्ठा होती. लोकदेव श्रीविठ्ठलावर अन्य संतांची श्रद्धा होती. मात्र अध्यात्म आणि व्यवहार यांची उत्तम सांगड घालणारे आणि पारलौकिक जीवनाइतकेच इहलौकिक जीवनही महत्त्वाचे आहे, हे समर्थ रामदासांनी समाजाला पटवून दिले.

प्रबोधन, प्रतिकार, संघर्ष आणि समन्वय या चतुःसूत्रीतून रामदासांनी समाजाची बांधणी केली. वैयक्तिक आणि सामाजिक मनोवृत्तींचा त्यांचा गाढा अभ्यास होता. त्यामुळे प्रपंचाचे आणि व्यवहाराचे त्यांनी त्यांच्या साहित्यातून साकल्याने आणि सूक्ष्मतेने विवेचन केले आहे. साडेतीनशे वर्षांपूर्वी 'दासबोध' या ग्रंथातून व्यवहारशास्त्राची समर्थांनी मांडलेली निरीक्षणे, भाष्ये आणि सोप्या शब्दांत समजावलेले व्यवहारशास्त्र आजच्या संगणकयुगातही ताजेतवाने आहे. त्यामुळेच रामदासांच्या दासबोधातील व्यवस्थापन–शास्त्राचा उपयोग आजच्या अनेक कॉर्पोरेट कंपन्या करताना दिसतात.

धर्मकारण, राजकारण, समाजकारण, अर्थकारण, साहित्य, वाङ्मय, व्यवस्थापन, कलाशिक्षण, अशा सर्व विषयांवर 'दासबोध' या ग्रंथात मार्मिक भाष्य आहे. मूर्खांच्या लक्षणापासून प्रारंभ करून ते थेट परमार्थ, प्रपंच यांच्यातील गुंतागुंतीच्या समस्यांची उकल त्यात केली आहे.

नका करू खटपट। पाहा माझा ग्रंथ नीट

तेणे सायुज्याची वाट। ठाई पडे।।

असे ते उगाच म्हणत नाहीत.

तुकारामांचे समकालीन असणाऱ्या रामदासांनी संपूर्ण भारतभर हिंडून, फिरून त्याकाळातील समाजाची रचना, चालीरीती, लोकस्थिती आणि देशस्थिती प्रत्यक्ष पाहिली. धर्मभक्तीपेक्षा, आंधळेपणाने केलेल्या कर्मकांडांपेक्षा धर्मशक्तीच देशाला तारील हे त्यांनी तरुणांना पटवून दिले. बलदंडतेचा आदर्श असणारा आणि श्रीरामांचा एकनिष्ठ भक्त म्हणजे मारुती. अनेक मारुती मंदिरे,

---

१. प्राचीन गीत भांडार, संपादक : ना. ग. जोशी, मौज प्रकाशन गृह, दु.आ. २०१३, पृ. ३७.

अकराशे मठ, आणि व्यायामशाळा त्यांनी स्थापन केल्या आणि लोकांना बलशाली केले. विखुरलेल्या, मरगळलेल्या, निराश समाजाला जागृत करण्याचे महत्त्वाचे कार्य त्यांनी केले. या कामी त्यांना हजारो समाजकार्यकर्ते मिळाले ते उगीच नव्हे! त्यावेळी यवनी आक्रमणाविरुद्ध शिवराय असंख्य तरुण मावळ्यांसह स्वराज्य स्थापनेचा लढा देतच होते. मठांची दैनंदिन कार्यवाही सुरळीत व सुसूत्रपणे चालावी म्हणून सक्षम महंत (व्यवस्थापक) नेमले. कार्यक्षम, निष्ठावान, चारित्र्यसंपन्न व कर्तृत्वान महंत (व्यवस्थापक) म्हणजे जणू त्या काळातली 'व्यवस्थापन संस्था'च होती.

आत्मकल्याणाचा मार्ग दाखविणारी आणि जनसामान्यांपर्यंत पोचणारी रामदासांची दुसरी अद्‌भुत काव्यकृती म्हणजे '२०५ मनाचे श्लोक'. मनाचे सामर्थ्य कसे शोधावे, ते सामर्थ्य कारणी कसे लावावे, दुबळेपण कसे घालवावे आणि नित्य व्यवहारात कसे वागावे याचा बोध या श्लोकांमधून होतो. साधी, स्वच्छ परंतु रोखठोक भाषा हे श्लोकांचे वैशिष्ट्य आहे. 'दासबोध आणि 'मनाचे श्लोक' यांच्यातील विचारांनुसार वागले तर खरोखर भौतिक आणि आध्यात्मिक प्रगती होईल यात शंकाच नाही.

येथे 'व्यवस्थापन' या शब्दाला फार महत्त्व आहे. ते मनाचे शिस्तबद्ध व्यवस्थापन आहे आणि कोणत्याही कामाच्या यशस्वितेसाठी लागणारे व्यवस्थापनही आहे, इतका त्याचा परिघ व्यापक आहे.

'यत्न तो देव जाणावा' हे सांगताना रामदास म्हणतात,

नदीचे उदक वाहत गेले। तो ते निरर्थक चालले

जरी बांधोनि काढले। नाना तीरी कालवे।।

उदक निगेने वळविले। नाना जीनसी पीक काढिले।

पुढे उदकची झाले। पीक सुवर्ण।।

व्यक्तिगत आणि सामाजिक जीवनात सर्व थरांवर पद्धतशीर प्रयत्न व नियोजन हवे. आधुनिक काळात माणसांना विविध प्रकारचे ताणतणाव सोसावे लागतात. तणावमुक्त जीवनासाठी रामदास मार्गदर्शन करतात :

तन मने झिजावे। तेणे भले म्हणोनी घ्यावे।

उगेचि कल्पिता सिणावे। लागेल पुढे।। (दशक–१४, समास–६, ओवी–२)

म्हणोनी दुसऱ्यास सुखी करावे। तेणे आपण सुखी व्हावे।

दुसऱ्यासी कष्टविता, कष्टावे। लागेल पुढे।। (दशक–१४, समास–६, ओवी–२)

शिवाय –

जो दुसऱ्यांचे अंतःकरण जाणे।

देशकाळ प्रसंगे जाणे।

तया पुरुषा काय उणे। भूमंडळी।।

असे सांगून, मानवी मनाचा विचार व व्यवस्थापन नेतृत्व करण्याबाबत रामदास म्हणतात–

बोलण्यासारिखे चालणे। स्वयेकरून बोलणे।

तयाची वचने प्रमाणे। मानिती जनी।। (दशक–१२, समास–१०, ओवी–३९)

व्यवसाय म्हणजे आजच्या काळात सामाजिक प्रक्रियाच झाली आहे. व्यवस्थापकीय नीतिमत्ता आणि साधनशुचिता यांची जपणूक केलीच पाहिजे.

आचारभ्रष्ट होऊ नये। दिल्या द्रव्या घेऊ नये।

उणा शब्द येऊ नये। आपणावरी।। (दशक–१४, समास–१, ओवी–७)

अशी व्यवस्थापन संदर्भातली शेकडो उदाहरणे सांगता येतील. रामदास हे केवळ संतच नव्हे तर उत्तम संघटक, मानवतावादाचे पुरस्कर्ते होते. कर्मपूजा हीच खरी ईश्वरपूजा अहे. प्रयत्नांतीच माणसाला सर्व काही प्राप्त होते. त्यासाठी त्याने सतत सत्कर्म केले पाहिजे.

'आधी प्रपंच करावा नेटका। मग साधावे परमार्थ विवेका' असे इहवादी तत्त्वज्ञान सांगणारे समर्थ,

---

या पृष्ठावरील सर्व संदर्भ : श्रीमत् दासबोध – संपादक श्री. नारायण विष्णू धर्माधिकारी, प्रथम प्रकाशन–नोव्हेंबर १९९४, मुद्रक–पद्मा क्वालिटी प्रिंटर्स, ठाणे.

सत्कर्मयोगे वय घालवावे। सर्वांमुखी मंगल बोलवावे।। (मनाचे श्लोक)

असे प्रापंचिक माणसांना सांगतात.

रामदासांच्या या तत्त्वज्ञानाचा, विचारांचा प्रभाव डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्यावर लहान वयातच पडला आणि त्यांनी समर्थविचार विसाव्या शतकाच्या शेवटच्या काही दशकांत लोकांच्या मनीं उतरविला.

संत परंपरेत बहुजन समाजातील चोखामेळा, सावता माळी, नरहरी सोनार, इत्यादीप्रमाणेच काही संत–कवयित्रींचाही अंतर्भाव आहे. नाम्याची जनी, मुक्ताई, सोयराबाई, वेणाबाई, बहिणाबाई, गोणाई यांनीही आपल्या मौलिक विचारांनी त्यांच्या उत्स्फूर्त पद्यरचनांमधून भर घातलेली आहे हे त्यांचे योगदान विसरता येणार नाही.

१.२.२ संतांच्या कार्याचे महत्त्व :

महाराष्ट्रातील संतांची ही परंपरा इ.स.च्या १३व्या शतकापासून सुरू झाली. यादव काळ, इस्लामी आक्रमण ते १९व्या शतकात झालेला ब्रिटिशांचा अंमल; या सर्व काळात समाज गांजलेला होता. त्याची अर्थात अनेक कारणे आहेत. मात्र गेल्या चारशे वर्षांचा काळ सोडला तर धर्मकल्पना, कर्मकांडे यामुळे समाजमानस असुरक्षिततेची भावना, परकीय अंमल, वर्णवर्चस्व या साऱ्यांत भरडून निघाले होते. संत म्हणजे जीवनातील श्रेयस आणि प्रेयस काय यांच्या साकल्याने विचार करून, समाजाला आदर्शवत वळण देणाऱ्या अलौकिक व्यक्ती. त्यांनी प्रसंगी समाजातील कर्मठांचा, काही विघातक प्रवृत्तींचा छळ सोसूनही आपला सन्मार्ग सोडला नाही. संतांनी कालानुरूप कार्य केले. काही काळात सहनशीलता वाढवायची होती. तर काही वेळा नुसतीच भक्ती करून चालणार नाही, तर लढासुद्धा देता आला पाहिजे. शिवाजी महाराजांच्या समकालीन असणाऱ्या समर्थांनी सैनिकी शिक्षणाबरोबरच मनोबल वाढवणे, वैचारिक पातळी उंचावणे, आपसातील वैमनस्य दूर करणे अशा प्रकारची शिकवणही दिली.

संतसाहित्य : प्रकार आणि वैशिष्ट्ये :

संत साहित्यात प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल तो बहुजनांना समजेल अशा प्राकृत भाषेत लिहिली गेलेली ज्ञानेश्वरी. (१३ वे शतक) त्याखेरीज संत नामदेवांनी, ज्ञानेश्वरादी चारही भावंडांची

नोंदवलेली चरित्रे, सत तुकारामांची गाथा, समर्थ रामदासांचा दासबोध, मनाचे श्लोक, चोखामेळा, सावता माळी, संत एकनाथ, सेना न्हावी, नामदेव शिंपी इत्यादींचे अभंग, संतकवयित्रींच्या ओव्या आणि अभंग– अशा सर्व लिखित आणि अलिखित साहित्याखेरीज भजन, कथा कीर्तन, भारूड इत्यादींच्या माध्यामांतून संतांनी आपले विचार जनसामान्यापर्यंत पोचविले. या दृक्श्राव्य माध्यमांखेरीज नाथसंप्रदाय, भागवत संप्रदाय, वारी, दिंड्या अशा माध्यमांतूनही लोक समुदाय संघटित झाला. पैकी 'वारी' हा आजतागायत चालू असलेला आणि लोकांना परस्परसंबधांत सलोखा ठेवण्यास मदत करणारा प्रकार आहे. अक्षरशः लाखो लोक वारीत एकत्र येतात. विचारांचे आदानप्रदान होते. समानता, समता निर्माण करणारी ही वारी हेही प्रबोधनाचे मोठे साधन आहे. लोकदेव असणारा जनसामान्यांना आपलासा वाटणारा पंढरपूरचा विठ्ठल तथा विठुमाउलीच्या चरणी भक्तिभावाने लीन होणारा फार मोठा जनसमुदाय आहे.

तेराव्या शतकापासून सतराव्या शतकापर्यंत साडेतीनशे वर्षे संतांनी 'वारी'द्वारा सामाजिक अभिसरणाचा जो अभिनव प्रयोग केला, त्यामुळे समाजात नवचैतन्य आले. सामाजिक समतेच्या दृष्टीने महाराष्ट्राला पुढील काळात पुरोगामीत्वाकडे नेणारी ही वारी आजही 'समतेचा' आविष्कार घडवणारी आहे.

या संतांनी सामाजिक मानस ओळखून माणसाच्या आत्मिक आणि पारलौकिक उन्नतीसाठी वरीलप्रमाणे विविध ज्ञानसाधनांची माध्यमे वापरली.

हिंदुस्थानच्या इतिहासातील १६०० ते १९४७ हा सुमारे ३५० वर्षांचा काळ म्हणजे इंग्रजांच्या आगमनाचा आणि सत्ता संपादनाचा. पहिला कालखंड : ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना ते लॉर्ड क्लाइव्हच्या कारकिर्दीपर्यंतचा (१६००–१७७२) दुसरा कालखंड : वॉरन हेस्टिंग्जच्या कारकिर्दीपासून (१७७२) ते १८५७च्या उठावापर्यंत आणि तिसरी कालखंड : १८५८ ते १९४७. इंग्रज सुरुवातीला व्यापाराच्या निमित्ताने हिंदुस्थानात आले. व्यापारात प्रचंड लाभ उठवून ईस्ट इंडिया कंपनी स्थापन करून त्यांनी हिंदुस्थानात पाय रोवले. मात्र खऱ्या अर्थाने त्यांचा राजकीय अंमल सुमारे दीडशे वर्षे होता.[१]

ब्रिटिश राजवटीच्या या काळातही समाजप्रबोधनाची अत्यंत निकड निर्माण झाली.

---

१. मराठी विश्वकोश : खंड २, म.रा.सा.सं. मंडळ, १९७६, प्रमुख संपादक : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, पृ. ३९३.

१.२.३ आधुनिक महाराष्ट्रातील समाजसुधारक व द्रष्टे (१९वे व २०वे शतक)

ब्रिटिश राजवटीमुळे, व्यापारउदीमामुळे आपले वैभव लयाला गेले. या राजवटीच्या गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी विविध क्षेत्रांतील व्यक्तींनी वेगवेगळ्या मार्गाने लढे दिले. अखिल भारतीय स्तरांवर कार्य असणाऱ्यांपैकी महात्मा गांधी, विनोबा भावे इत्यादी थोरांचे कार्य आपल्याला परिचित आहेच. मात्र या दोन शतकांत 'शब्द' माध्यमाद्वारा लोकजागृती होत होती. ब्रिटिशांनी स्वतःच्या सोईकरता का होईना, शिक्षणसंस्था काढल्या. दळणवळणाची साधने वाढली. परिणामी या राजसत्तेविरुद्ध जशा विविध चळवळी, आंदोलने झाली; तशीच सामाजिक मानसिकतेसाठी. समाजसुधारकांमध्ये स्त्री शिक्षणासाठी खडतर जगणे सोसणाऱ्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, सरकारदरबारी शेतकऱ्यांचे प्रश्न धसास लावणारे महात्मा जोतिबा फुले यांच्याप्रमाणे राजकारण व समाजकारण यांसाठी स्वतःचे आयुष्य पणाला लावणारे स्वा. सावरकर, वर्तमानपत्रांसारखे प्रभावी माध्यम वापरून प्रबोधन करणारे आगरकर, लोकमान्य टिळक, गुरुदेव रानडे, लोकहितवादी चिपळूणकर... कितीतरी नावे घेता येतील. प्रत्येकाचे साधन वेगळे, मार्ग मात्र समाजोन्नतीचा.

ब्रिटिशांमुळे शैक्षणिक संस्था सुरू झाल्या. त्यामुळे जागतिक वाङ्मयाशी एतद्देशीय हिंदूंचा परिचय झाला. त्यातूनच जे वाङ्मय निर्माण झाले. त्यातून समाजमन प्रकट होत राहिले. कृ. प्र. खाडिलकर, गो. ब. देवल, इत्यादी नाटककारांनी पौराणिक कथांप्रमाणे सामाजिक प्रश्नांवरही नाटके लिहिली. उदा. कीचकवध, मानापमान, शारदा इत्यादी. इंग्रजांविरुद्ध लिहिले तर तुरुंगात जावे लागे, म्हणून ह्या कलाकृती रूपकात्मक पद्धतीने लिहिल्या गेल्या. लोकमान्य टिळकांनीही जनजागृतीसाठी सुमारे १२२ वर्षांपूर्वी (इ.स. १८९३ मध्ये) सार्वजनिक गणेशात्सव सुरू केला. या निमित्ताने लोक एकत्र येत. मेळे, नाटुकली, व्याख्याने यातून स्फूर्तिप्रद आणि चैतन्यदी विचार रुजविण्याचा प्रयत्न असे.

डॉ. आंबेडकर यांनी तर बॅरिस्टर होऊन पूर्वाश्रमीच्या महार बांधवांचा बौद्ध धर्मात प्रवेश करवून जुनाट रूढींविरुद्ध बंड पुकारले. अर्थात येथे सर्वच नेते मंडळींचा उल्लेख स्थळाअभावी करता येणार नाही. मात्र या सर्वच द्रष्ट्या मंडळींनी समाजाच्या कल्याणासाठी आपले आयुष्य वेचले. इतिहासात त्यांची नोंद अर्थातच आहे.

विसाव्या शतकात दोन महत्त्वाच्या घटना घडल्या. इ.स. १९१४ व इ.स. १९३९ अशी दोन जागतिक महायुद्धे आणि सन १९४७च्या ऑगस्टमध्ये भारताला इंग्रजी राजवटीपासून मिळालेले स्वातंत्र्य. या दोन्ही घटनांचे प्रभाव आणि परिणाम सर्व क्षेत्रांवर झाले. त्यात अर्थातच बऱ्या आणि वाईट अशा दोन्ही प्रकारच्या प्रभावांचा विचार अंतर्भूत आहे.

आधुनिक महाराष्ट्रातील सत्पुरुष

इंग्रजांना एतद्देशीय (म्हणजे हिंदू) माणसे आपल्या राज्यकारभाराच्या सोईकरिता पाहिजे होती म्हणून त्यांनी शाळा सुरू केल्या. आजचा शिक्षणाचा प्रसार पाहता, ही केवळ ब्रिटिशांचीच देणगी म्हणावी लागेल. मात्र उच्च–नीच, श्रेष्ठ–कनिष्ठ ही भावना टिकून असल्याने जातिभेद तीव्र होता. कालबाह्य झालेल्या अनिष्ट रूढी, परंपरा, कर्मकांडे, चालीरिती यांच्यात गुरफटलेल्या समाजाची अधोगती जाणून, महात्मा फुले यांच्यासारख्या माणसाने उच्चवर्णीय स्त्रियांमधील केशवपनाची चाल बंद केली. 'सारडा' कायद्यानुसार बालविवाहविरोधात कायदा मंजूर झाला. पददलित, शूद्र व इतर मागासजातींना शिक्षणाचे दरवाजे बंद होते, ते भारतीय स्वातंत्र्यानंतर खुले झाले. दोन जागतिक महायुद्धांमुळे महागाईचा भस्मासूर वाढला होता. समाजात नैराश्य, मरगळ होती. औद्योगिक क्रांती होण्याआधी जनताच किंकर्तव्यमूढ झाली होती.

समर्थ रामदास हे संतांच्या मांदियाळीतले काहीसे वेगळे व्यक्तिमत्त्व होते. आचार, विचार आणि उच्चार यांची एकरूपता असणाऱ्या संत रामदासांनी ऐहिक जीवनातील सुखाचा शोध घेण्यासाठी सद्‌विचार व सदाचार यासाठी मानसिक आणि शारीरिक बळ आवश्यक आहे हे जाणले होते. २०५ मनाच्या श्लोकांतून 'कसे जगावे' याचे सोप्या भाषेत विवेचन त्यांनी केले. भारतभर हिंडून, चैतन्यतत्त्वाचा, विवेकाने, विचाराने आणि नियोजनबद्ध शिस्तीने जगण्याचा उत्तम मार्ग दाखवला. सतराव्या शतकातल्या रामदासांच्या विचारांची गरज आजच्या वैज्ञानिक युगातही आहे. भारत बलशाली व्हावा यासाठी, रामदासांनी स्थापलेल्या व्यायामशाळा, मारुती मंदिरे, मठ यांमुळे तर त्यांच्या जगण्याची विचारांची एकरूपता अधिक ठसते. त्यांचे प्रेरक कार्य डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांनी चालवले.

एकविसावे शतक हे मानसिक रोगांचे शतक म्हणून ओळखले जाईल असा समाजशास्त्रज्ञांचा दावा आहे. स्वातंत्र्यानंतर जी औद्योगिक क्रांती झाली, शिक्षणाचा प्रसार झाला त्याचे परिणाम भौतिक सुखसोई वाढण्यात झाले. सन १९९०पासून भारतात संगणक क्रांती आली. खऱ्या अर्थाने

जागतिकीकरण (Globaliation) झाले. वैज्ञानिक क्रांतीमुळे प्रगती झाली, होत आहे, ही खरी गोष्ट असली, तरी त्यामुळेच काही भीषण प्रश्नही निर्माण झाले. मोहाला बळी पडणे ही माणसाची वृत्ती आहेच. पण आजच्या गतिमान जगात, तीव्र स्पर्धेच्या युगात दुसऱ्याला मागे सारून पुढे जाण्याची अवस्था आहे. अधिकाधिक सुखाची लालसा, हव्यास त्याच्यातून निर्माण झालेला भ्रष्टाचार, असुरक्षितता, कॉर्पोरेट जगातील ताणतणाव यांनी माणसाचे जीवन ग्रासलेले आहे. अशावेळी खरे सुख, शांती–समाधान यांना माणूस पारखा होत चालला. अशा मानसिक ऱ्हासाच्या समस्येवर आत्मिक विकास किंवा चैतन्ययुक्त मन, निसर्गाशी जवळीक, कर्मकांडाच्या जंजाळातून सुटका आणि खऱ्या सुखाचा शोध कसा घ्यावा, याचे उत्तम विवेचन आणि मार्गदर्शन असलेला 'दासबोध' ज्यांनी स्वतः जगला; आणि इतरेजनांच्या जीवनात सन्मार्गाचा प्रकाश यावा म्हणून त्यातील तत्त्वे अत्यंत सोप्या भाषेत निरूपणाच्या द्वारे बहुजन समाजाला सांगितली; ते डॉ. ना. वि. उपाख्य नानासाहेब धर्माधिकारी हे संशोधिकेलाही व्यक्तिशः आदर्शभूत वाटले. विसाव्या शतकातील या श्रेष्ठ व्यक्तिमत्त्वाने आपल्या रसाळ वाणीने आणि 'आधी केले मग सांगितले' या आचरणाने स्वबळावर अक्षरशः लाखो अनुयायी निर्माण केले, केवळ देशातच नव्हे, तर परदेशातही त्यांचे अनुयायी आहेत. या त्यांच्या व्यक्तिमत्त्वामागच्या धारणा आणि प्रेरणा नेमक्या काय होत्या याचा शोध घेण्याची उत्कंठा वाटली. इतिहासात ज्यांच्या समाजकार्याची नोंद झाली आहे, ज्यांना असंख्यांच्या जीवनात, हृदयात स्थान मिळाले आहे, त्यासाठीच संशोधिकेने प्रबंधाकरिता हा विषय निवडला. अशा डोळस आणि समाजशिक्षक असलेल्या व्यक्तीचा शोध घ्यावा, शिवाय आपल्या पुढच्या पिढीतही कै. नानासाहेबांचा हा वसा कसा झिरपला आहे, याचंही कुतूहल वाटलं त्यामुळे हा विषय भावला.

सारांश :

कोणताही धर्म, मानवता आणि करुणा या दोन मूल्यविचारांवर ठामपणे आधारलेला आहे. धर्म म्हणजे तरी काय? कोणत्या मूल्यात्मक विचारसरणीचे विवेकाने आचरण करायचे आणि 'जीवो जीवस्य जीवनम्' हे खरे असले तरी (उत्तम) 'जगा आणि (दुसऱ्यांनाही) जगू द्या.' हे तत्त्व अमलात आणणे म्हणजेच धर्म. दुसऱ्याचे अंतःकरण जाणून त्याला सुखी करण्याचे वर्तन असणारा धर्म शिकविणारे नानासाहेब, म्हणूनच या शतकातले सत्पुरुष आहेत असे म्हणावेसे वाटते.

अनुक्रमणिका

शीर्षक पृष्ठ	I
प्रतिज्ञापत्र	II
मार्गदर्शकांचे प्रमाणपत्र	III
ऋणनिर्देश	IV
प्रास्ताविक	VI
अनुक्रमणिका	XIX
आलेख सूची	XXIII
छायाचित्र सूची	XXIII

प्रकरण	शीर्षक	पृष्ठ क्रमांक
पहिले	विषय–प्रवेश	१–३१
१.१	प्रस्तावना	२
१.१.२	ठाणे आणि रायगड जिल्ह्याची भौगोलिक पार्श्वभूमी तसेच त्यांचे सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक जीवन	७
१.२	संशोधनाचा आराखडा	१६–३१
१.२.१	प्रस्तावना	१६
१.२.२	गृहीतके	१८
१.२.३	संशोधनाची व्याप्ती	१९
१.२.४	सैद्धान्तिक पार्श्वभूमी	२६
१.२.५	संशोधनासाठी अवलंबिण्यात येणारे पद्धतीशास्त्र आणि रचनातंत्रे प्रणाली	२८

प्रकरण	शीर्षक	पृष्ठ क्रमांक
दुसरे	डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी यांचे चरित्र आणि कार्य (जन्म ते मृत्यू)	३३–७३
२.१	कौटुंबिक पार्श्वभूमी	३३
२.१.१	जन्म	३३
२.१.२.	व्यक्तिमत्त्वाची जडणघडण : पिंड, ध्येय आणि कारकीर्द	३४
२.१.३	व्यक्तिमत्त्वाचे पैलू	३७
२.२	आध्यात्मिक जडणघडण	४४
२.३	ज्योतिषी	४६
२.४	कार्याचे प्रत्यक्ष योगदान	४८
२.४.१	समाजसुधारक ते सत्पुरुष	४८
२.४.२	पर्यावरण	५०
२.४.३	प्रौढ साक्षरता	५३
२.४.४	समाजात जागृत केलेली एकात्मता	५४
२.४.५	अंधश्रद्धा आणि अज्ञान निर्मूलन	५५
२.४.६	स्त्रियांना आत्मसन्मान	५६
२.४.७	हुंडा निर्मूलनाचे कार्य	५६
२.४.८	एड्स निर्मूलन	५७
२.४.९	बाल संस्कार केंद्र	५७
२.४.१०	स्त्री–पुरुष समानतेचा अधिकार	५९
२.५	मानवी धर्माचा उद्धार करून उन्नतीप्रत नेणारे शिल्पकार	६४
२.६	मनन–चिंतन मीमांसा : डॉ. नानासाहेबांनी केलेलं विवेचन	६६
२.७	अस्मितेच्या नवोन्मेषा! मानवतेच्या नीलाकांक्षा। त्रिवार वंदन तुला।।	६८
२.७.१	धर्मसंकल्पना	७०
२.८	समकालीन समाजसुधारक	७१

प्रकरण	शीर्षक	पृष्ठ क्रमांक
तिसरे	समाजपरिवर्तनाचे कार्य	७५–८८
३.१	संत बहिणाबाई पुरस्काराच्या निमित्ताने केलेले प्रवचन व साधलेला सुसंवाद	७५
३.२	प्रवचनकार – एक प्रातिनिधिक प्रवचन	८३
चौथे	प्रबोधनासाठी प्रवास	९०–९९
४.१	श्रीक्षेत्र जांब, सज्जनगड, पैठण, चाफळ, गाणगापूर तीर्थयात्रा	९०
४.२	'श्री क्षेत्र नागपूर, जबलपूर – अलाहाबाद – वाराणसी यात्रा'	९५
पाचवे	सामाजिक प्रबोधन व परिवर्तन	१०१–२६१
५	सामाजिक प्रबोधन आणि परिवर्तन	१०१
५.१	मुलाखती–प्रश्नावली आणि विश्लेषण– डॉ. नानासाहेबांच्या घरातील काही व्यक्तींच्या मुलाखती	१०५
५.२	अनुयायी आणि भक्त त्यांच्या नजरेतून त्यांचे व्यक्तिमत्त्व	११९
५.२.१	काही निरूपणकारांच्या मुलाखती	१२१
५.३	सीमापार	१३७
५.४	ठाणे आणि रायगड जिल्ह्यातील श्रवणाला जाणाऱ्या काही व्यक्तींच्या मुलाखती	१६४
५.५	बालसंस्कार केंद्र– सहभागी मुलांच्या प्रातिनिधिक मुलाखती	१८९
५.६	प्रश्नावली (संख्याशास्त्राच्या आधारे)	२१५
सहावे	गृहीतकांचे प्रमाणीकरण आणि निष्कर्ष	२६३–२७१
६.१	गृहीतकांचे प्रमाणीकरण आणि निष्कर्ष	२६३
६.२	संकलित साहित्याचे विश्लेषण	२६७
६.३	संदर्भ साहित्याचा सारांश	२७०
सातवे	समारोप	२७२–२७९
७.१	पुढील संशोधनाची व्याप्ती	२७२

संदर्भग्रंथ यादी

अनु. क्र.	शीर्षक	पृष्ठ क्रमांक
१	प्राथमिक साधने (प्रकाशित)	२८०
२	प्राथमिक साधने (प्रकाशित मासिके)	२८०
३	प्राथमिक साधने (वृत्तपत्रे)	२८१
४	मानपत्र	२८१
५	दुय्यम साधने (प्रकाशित)	२८१
६	दुय्यम साधने (अप्रकाशित)	२८३
७	दृकश्राव्य साधने	२८३
८	WEBSITES	२८४

परिशिष्ट

अनु.क्र.	शीर्षक	पृष्ठ क्रमांक
	परिशिष्ट अ – मुलाखतीसाठी प्रश्नावली प्राथमिक साधने (अप्रकाशित)	२८५–२९२
१	डॉ. नानासाहेबांच्या कुटुंबातील काही व्यक्तींच्या मुलाखतींसाठी प्रश्नावली	२८५
२	निरूपणकारांच्या मुलाखतींसाठी प्रश्नावली	२८६
३)	संशोधन क्षेत्राच्या पलीकडच्या काही व्यक्तींच्या मुलाखतींसाठी प्रश्नावली	२८७
४)	ठाणे आणि रायगड जिल्ह्यातील श्रवणाला जाणाऱ्या काही व्यक्तींच्या मुलाखतींसाठी प्रश्नावली (शहर विभाग)	२८८
५)	ठाणे आणि रायगड जिल्ह्यातील श्रवणाला जाणाऱ्या काही व्यक्तींच्या मुलाखतींसाठी प्रश्नावली (ग्रामीण विभाग)	२८९
६)	बालसंस्कार केंद्र : सहभागी मुलांच्या प्रातिनिधिक मुलाखतींसाठी प्रश्नावली	२९०
	परिशिष्ट ब (१) प्रश्नावली	२९१

आलेख सूची

अनु.क्र.	शीर्षक	पृष्ठ क्रमांक
१	रायगड जिल्हा आदिवासी विभाग (स्त्रिया व पुरुष)	२१७–२२५
२	रायगड जिल्हा शहर विभाग (स्त्रिया व पुरुष)	२२६–२३४
३	रायगड जिल्हा ग्रामीण विभाग (स्त्रिया व पुरुष)	२३५–२४२
४	ठाणे जिल्हा ग्रामीण विभाग (स्त्रिया व पुरुष)	२४३–२४७
५	ठाणे जिल्हा आदिवासी विभाग (स्त्रिया व पुरुष)	२४८–२५६
६	ठाणे जिल्हा शहर विभाग (स्त्रिया व पुरुष)	२५७–२६१

छायाचित्र सूची

अनु.क्र.	शीर्षक	पृष्ठ क्रमांक
१.२.५	संशोधन साधने	३०
२.१.१	श्री. विष्णुपंत धर्माधिकारी	३३
२.१.२	श्री. नारायण विष्णु धर्माधिकारी	३३
२.१.३	डॉ. नानासाहेब धर्माधिकारी आणि कुटुंबीय	३४
२.१.४	महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक पुरस्कार	४०
२.१.५	टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे तर्फे डी.लिट. पदवी	४१
२.१.६	टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे सन्मानपत्र	४१
२.१.७	टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे, पदवी प्रदान	४२
२.१.८	टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे, स्मृतिचिन्ह	४२
२.१.९	महाराष्ट्र शासन पुरस्कार प्रदान	४३
२.४.२	वृक्षारोपण व संवर्धन अभियान	५१
२.४.३	प्रौढ साक्षरता वर्ग (महिला)	५३
२.४.४	प्रौढ साक्षरता वर्ग (पुरुष)	५४
२.४.९	बालसंस्कार वर्ग	५८
४.१.१ ४.१.२	श्रीक्षेत्र जांब, सज्जनगड, पैठण, चाफळ, गाणगापूर तीर्थयात्रा	९४
४.२.१ ४.२.२.	श्रीक्षेत्र नागपूर, जबलपूर, अलाहाबाद–वाराणसी यात्रा	९९

प्रकरण पहिले

विषय प्रवेश

प्रकरण पहिले	विषय प्रवेश	१–३१

विभाग	शीर्षक	पृष्ठ क्रमांक
१.१	प्रस्तावना	२
१.१.२	ठाणे आणि रायगड जिल्ह्याची भौगोलिक पार्श्वभूमी तसेच त्यांचे सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक जीवन	७
१.२	संशोधनाचा आराखडा	१६–३१
१.२.१	प्रस्तावना	१६
१.२.२	गृहीतके	१८
१.२.३	संशोधनाची व्याप्ती	१९
१.२.४	सैद्धान्तिक पार्श्वभूमी	२६
१.२.५	संशोधनासाठी अवलंबिण्यात येणारे पद्धतीशास्त्र आणि रचनातंत्रे प्रणाली	२८

प्रकरण पहिले

विषय–प्रवेश

१.१ : प्रस्तावना

मानव हा समाजाचा केंद्रबिंदू आहे. कर्तव्यनिष्ठ समाज हा राष्ट्राचा प्राण आहे. चतुःसीमांनी मर्यादित भूखंड म्हणजे राष्ट्र नव्हे, त्यातील समाजाचे मूल्यमापन केले जाते. म्हणून समाजाचा पाया भक्कम हवा. आपल्या वैदिक ग्रंथात जे धर्मशास्त्र, नीतीशास्त्र, न्यायशास्त्र, राज्यशास्त्र यांचा ऊहापोह आहे, त्या सर्वांचा केंद्रबिंदू माणूस हाच आहे. शेवटी प्रत्येक व्यक्तीचे कल्याण होणे म्हणजे तेवढा समाज सशक्त होणे, होय.

प्रत्येक समाज हा संस्कृतीचा एक आविष्कार असतो, सामूहिक लोकजीवन जेव्हा एकरूप होऊन जाते, तेव्हा तो समाज बनतो.

माणूस म्हटले की त्याच्याबरोबर त्याचा व्यवसाय, वास्तव्य, साथ–संगत, राहणीमान, त्याचे कुटुंबीय, रोजच्या जीवनाशी निगडित वस्तू अशा अनेक गोष्टींचा विचार येतो. त्यावरून समाजातील तो उच्चवर्गीय, मध्यमवर्गीय किंवा अगदी सामान्य थरातला आहे हे ठरविले जाते. साधारणपणे पूर्वापार चालत आलेल्या रूढी–परंपरा, समान असलेले, वैचारिक भावबंध जुळणारे, नीतिनियम समान असणारे लोक एकत्र येतात व त्यांचा समाज बनतो. उदा. शेतकरी, वडार, कोळी, कारखानदार... इत्यादी. प्रत्येक समाजातील प्रत्येक माणूस सुखी व्हावा यासाठी, त्या त्या समाजाची धडपड चालू असते, नीती–न्यायाची बैठक त्यासाठी आवश्यक आहे, नाहीतर दंगेधोपे होतात.

''सामर्थ्य आहे चळवळीचे, जो जो करील तयाचे...'' हे समर्थवचन प्रसिद्धच आहे.

समाज हा परिवर्तनशील आहे. तो असायलाच हवा. ते समाज जिवंत असण्याचे लक्षण आहे. मृतवत् झालेल्या समाजाला जिवंत करण्यासाठी समर्थांना कष्ट पडले. आपण देवळांचे, मंदिरांचे जीर्णोद्धार करतो. पण दगड झालेल्या माणसाला घडविण्याचे काम आपल्या संतांनी केले. वाहणे हा नदीचा स्वभाव आहे. अडथळा ओलांडून पुढे जाण्याची तिला ओढ असते. जाताना तीरावरचे बरे–वाईट सर्व सामावून ती गतिमान राहते. म्हणून ती पवित्र आहे. नाहीतर तिचे डबके होईल. तसे समाजाने काळाबरोबर राहिले पाहिजे.

आजचे हे विज्ञानयुग आहे. मोबाइल–कॉम्प्युटर हे आज आपल्या जीवनाचा भाग होऊन राहिले आहेत. हे आपले घर नसून कॉम्प्युटरचे घर आहे असे वाटते. त्याच्या तंत्रज्ञानातही रोज नवे शोध, सुधारणा येत आहेत. जगाबरोबर राहायचे म्हणजे या सर्वांचे ज्ञान आत्मसात करणे अपरिहार्य आहे, आज सर्व विश्व सतत बदलत आहे. साध्या आपल्या शरीराचेच बघा ना, आपले शरीर विविध पेशींनी बनलेले आहे. जुन्या पेशी हळूहळू मरतात, त्यांची जागा नव्या पेशी घेतात. त्यामुळे शरीर कार्यक्षम होते. पाण्यात राहून माशाशी वैर नको म्हणून जगाबरोबर राहायचे म्हणजे परिवर्तन झालेच पाहिजे. म्हणजेच समाजजीवन समृद्ध होईल.

प्रत्येक सुधारणा विधायक किंवा विघातक असते. सुधारणा म्हणजे एखादे तंत्र. पूर्वीपेक्षा सुरक्षित, चांगले उपयोगी, वेळ वाचविणारे, आनंद देणारे. ते धोरण करणे, त्याचा अंगीकार करणे. आज आपण तेच करत आहोत. त्यानुरूप कपडे, वाहन, शिक्षण, अन्न, हत्यारे यांचा आपण वापर आहोत. ही सुधारणाच आहे. सुरीचा धर्म 'कापणे' हा आहे. काय कापायचं हे विवेकातून आपल्याला कळले पाहिजे. कोणती व किती सुधारणा आपण घ्यायची हे आपल्या हातात आहे. जसे अणूचा शोध सर्वनाश करणाऱ्या बॉम्बमध्येही होतो, तसा नव्या तंत्रज्ञानातही होतो.

म्हणजेच शाश्वत आनंद देणारी, सुधारणा घेतली पाहिजे. जुने ते सोने असले तरी नवीनही खूप घेण्यासारखे, आनंद देणारे आहे, ते स्वीकारायला हरकत नाही.

गायन, वादन, फोटोग्राफी, ट्रॅव्हलिंग यांतील सुधारणांचा निसर्गाच्या सान्निध्यात राहून आपण आनंद लुटू शकतो.

समाजातील जुने सण, उत्सव जाऊन आता त्याची जागा सर्व 'डे' (विशेष दिवस) नी घेतली आहे. ते तरुणांचे विचार आहेत, त्यांना आनंद घेऊ द्यावा. पण आपण आपले धर्माचे, नीतीमूल्यांचे अधिष्ठान विसरून चालणार नाही, ही समज त्यांना हवी.

समाज परिवर्तन हे विकसित जीवनाचे लक्षण आहे. साधे गणेशविसर्जन घेऊ. पर्यावरणाचा विचार करता बदल आवश्यक आहे. चुलीवरचा भात–भाकरी कितीही चवदार लागली तरी आजची छोटी घरे, वेळ, स्वच्छता याचा विचार करता गॅसला पर्याय नाही.

शेवटी समाजसुधारणा म्हणजे परिवर्तन घडवणारा हवा; गुरू, आचार्य त्या योग्यतेचे हवेत. योग्य दिशा, प्रेरणा व चैतन्य हवे. समाज सुधारणा मानवी जीवन प्रगल्भ करणारी हवी. फक्त

भौतिक सुधारणा नको. कारण त्यातून अस्थिरता, भष्टाचार यांना वाव मिळतो. अंतरंगातील शाश्वत सुधारणाही तेवढीच महत्त्वाची आहे.

लोकमान्य टिळकांचा गणेशोत्सव ही एक सामाजिक चळवळच होती. गणेशोत्सव सुरू करणे ह्यामागे संघटनेची गरज, एकजूट, सर्व जातिभेद, धर्मभेद विसरून एकविचाराने वागणे गरजेचे होते. देशाच्या स्वातंत्र्याकरता त्याची आवश्यकता होती. आणि त्याचे मूळ संतपरंपरेनेच घालून दिलेले आहे. महात्मा फुले, आगरकर, आंबेडकर इत्यादी प्रागतिक विचारांच्या लोकांनी देशाचा विचार समाजसुधारणेपासूनच केला. आपले सर्व संत भौतिक सुखापेक्षा आंतरिक सुखाला महत्त्व देत होते.

बदल म्हणजे सुधारणा नव्हे. अर्थपूर्ण प्रगती म्हणजे सुधारणा. प्रगतीच्या मार्गाने घेऊन जाणारी ती सुधारणा. जीवघेणी स्पर्धा कमी करून अर्थपूर्ण जीवन जगणे, जुन्याला जोडून घेत नव्याचा स्वीकार करणे ही लवचीकता हवी. त्यासाठी आंतरिक बदल व स्वतःला ओळखून विश्वासाने करण्याचे बदल म्हणजे सुधारणा. हल्लीचे अतिशय गतिमान आयुष्य धोकादायक वाटते. समाजातील नात्यांची वीण सैल पडत आहे. माणूस माणसापासून नव्हे तर, स्वतःपासून दूर चालला आहे.

काही सुधारणा समाजापुरत्या मर्यादित न राहता विश्वातील अखिल मानव जातीवर परिणाम करतात. त्याचे मूळ आर्थिक, सामाजिक, राजकीय भौगोलिक स्तरांवर अवलंबून असते.

गणेशोत्सव सुरू करणे ह्यामागे संघटनेची गरज, एकजूट, सर्व जातिभेद, धर्मभेद विसरून एकविचाराने वागणे गरजेचे होते. देशाच्या स्वातंत्र्याकरता त्याची आवश्यकता होती आणि ह्यांचे मूळ संतपरंपरेनेच घालून दिलेले आहे.

समाज[१] : समूहात राहणाऱ्या व्यक्तींमध्ये असणारी संबंधांची व्यवस्था म्हणजे समाज. मानव हा समाजप्रिय प्राणी आहे. या उक्तीनुसार दैनंदिन व्यवहारात समाज हा शब्द धर्म, जात, वंश, वर्ग, लिंग आदी भेदांतील स्त्री–पुरुषांचा जनसमुदाय या अर्थी वापरला जातो. अर्थात तो अगदी सैलपणे, ढोबळ व प्रसंगानुरूप बदलणाऱ्या संकुचित व मर्यादित अर्थाने वापरला जातो.

---

१. मराठी विश्वकोश खंड १८ (पृष्ठ ३९२), प्रथम प्रकाशन–ऑगस्ट २००९, प्रमुख संपादक : डॉ. विजया वाड.

परिवर्तन : स्त्रियांच्या केशवपनापासून ते आजची विधवा स्त्री आता कुंकू–मंगळसूत्र घालून वावरते, हे परिवर्तन. विरोध करत करत का होईना, समाजाने ते मान्य केले.

उदा. : भारतीय समाज, आर्य समाज, हिंदू समाज इत्यादी.

केवळ लाकांचा समूह म्हणजे समाज नव्हे. व्यक्तीहून निराळे असे स्वतंत्र अस्तित्व समाजाला असते. व्यक्ती व्यक्तींत, व्यक्ती–समूहात आणि समूह–समूहांत स्थिरस्वरूपी सामाजिक संबंध निर्माण होऊन त्याची एक व्यवस्था अस्तित्वात आल्यानंतरच त्याला 'समाज' म्हटले जाते. समाजाला स्वतःची अशी संरचना असते. त्याला सातत्य असते.

हिंदूच्या चालीरीतींचा बराचसा भाग हा धार्मिक विधींशी निगडित असतो; त्यांना संस्कार म्हणतात.

एखादा वृक्ष आकाशात डौलाने उभा राहतो, यामागे एक प्राकृतिक क्रम असतो. प्रथम बीज मातीत पडावे लागते. वृक्षाच्या वाढीसाठी आणि जोपासनेसाठी ऊन, वारा, पाऊस अशा योग्य गोष्टी मिळाव्या लागतात. माणसांची निगराणी लागते. तसे पर्यावरणही लागते. 'ग्रंथ' निर्मितीमागेही असेच एक सूत्र असते.

आणि म्हणूनच ह्या संशोधनाद्वारे समाज आणि संस्कार यांना एक सूत्रात आणण्याचा हा प्रयत्न.

परशुरामाच्या आईचे–रेणुकेचे नाव 'कोंकणा' असे होते. त्यावरून कोकण नाव पडले असे उल्लेख पुराणातून येतात. कोकणचे दुसरे नाव 'अपरान्ता' आहे. अपर या शब्दाचा अर्थ पश्चिम असाही आहे. त्यावरून पश्चिमेच्या शेवटच्या टोकाचा प्रदेश (अन्त) असाही अर्थ आहे.

कोकण किनाऱ्यावरील सागरी संपदा : कोकणची ही संपूर्ण किनारपट्टी सागरीसंपदेने अगदी समृद्ध आहे. या संपदेत सागरतळावरील खनिजे, किनाऱ्यावरील वाळू व त्यातील इलेमनाइट, मॅगनेटाइट ही खनिजे आणि मुख्यतः उथळ समुद्रातील अनेक जलजीव, जलशैव, मासे यांचा समावेश होतो.

कोकणात बहुतांश माशांची पैदास ही खाड्यांमधून होते. आज नदीखोऱ्यांत सुरू असलेली अनियंत्रित वृक्षतोड, वाढती बांधकामे व रस्तेनिर्मिती यामुळे जमिनीची धूप वाढते आहे. तयार

होणारा धूपजन्य गाळ नदीपात्रात येऊन पडतो आहे. परिणामी नदीपात्रे उथळ होत आहेत. या गाळामुळे खाड्यांतील माशांच्या पुनरुत्पादनचक्रावर परिणाम होऊन माशांची संख्या कमी होऊ लागल्याचे लक्षात येऊ लागले आहे.

धर्म : हा शब्द 'धृ' (धारण करणे, आधार देणे, अथवा पोषण करणे) ह्या धातूपासून बनलेला आहे. म्हणून समाजाची धारणा ज्याने होते, समाजाचे सातत्य ज्याने अबाधित राहते तो धर्म होय, धर्म ह्या शब्दाचा हाच व्यापक अर्थ समाजशास्त्राला अभिप्रेत आहे. समाजशास्त्राच्या दृष्टीने धर्म ही एक सामाजिक संस्था आहे.

जेथे माणसाचे आकलन अपुरे पडते तेथे माणसाला अलौकिक शक्तीचा आणि देवबाधांचा आधार मानावा लागतो. मानव आणि अलौकिक शक्ती ह्यांच्या परस्पर–संबंधाची कल्पना म्हणजे धर्म–संकल्पना होय. ह्यातूनच देव, देवता, देवदूत इत्यादी अलौकिक शक्तींची प्रतीके मानली जातात. ही प्रतीके, अलौकिक शक्तीबद्दलची अतूट श्रद्धा आणि दैववाद ह्यांच्या संमिश्रणातून मानवाचे असे धार्मिक भावविश्व निर्माण होते.

संस्कृती : म्हणजे एक विशिष्ट सामाजिक समूहातील सर्वमान्य विचार व व्यवहार नीती ह्यांचे संक्रमण एका पिढीतून दुसऱ्या पिढीकडे होणे. ह्या जीवन पद्धतीमध्ये ज्ञान, श्रद्धा, रूढी व कौशल्यांचा समावेश होतो. प्रत्येक व्यक्ती समाजात जन्मतः व त्या समाजातील विशिष्ट संस्कृती आत्मसात करते. सांस्कृतिक नीतिनियमन व ज्ञानाचे संक्रमण हे शिक्षण व सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेतून होते. डॉ. इरावती कर्वे ह्यांच्यामते संस्कारपूर्ण व संस्कारमय जीवन जगण्याची देशकालानुसार असलेली रीत व जीवनमूल्य म्हणजे संस्कृती होय.

एडवर्ड टेलर म्हणतात, की संस्कृती म्हणजे अशी सामाजिक व्यवस्था, जिच्यामध्ये ज्ञान, श्रद्धा, कला, नीतिमत्ता, कायदा, प्रथा व समाजाचा सदस्य म्हणून मनुष्याचे प्राप्त करून घेतलेल्या इतर कोणत्याही क्षमता व सवयी यांचा समावेश होतो.

कोणत्या परिस्थितीत आपण कसे वागावे हे संस्कृतीमुळे समजते. आपल्या खाण्या–पिण्याच्या, वेशभूषेच्या पद्धती संस्कृतीच ठरवते. आपले दृष्टिकोन संस्कृतीनुसारच ठरतात. उद्दिष्टेही संस्कृतीनुसारच ठरतात.

उदा : हिंदू संस्कृतीतील व्यक्तीपुढे आत्म्याची मुक्ती, देशप्रेम ह्यांसारखी उद्दिष्टे ठेवली जातात. तसेच सांस्कृतिक चौकटीत राहूनच आपल्याला आपल्या आयुष्याचा मार्ग ठरवावा लागतो.

समाजाचे वेगळेपण संस्कृतीमुळे टिकून राहते. संस्कृतीच्या घटकांद्वारे वेगळेपण टिकविण्याची प्रक्रिया चालू असते. पूर्वजांकडून पुढील पिढीला मिळणारे ज्ञान, संस्कार म्हणजे सामाजिक, सांस्कृतिक वारसा होय. आणि परंपरेमुळे त्या त्या समाजाची एकता, विशिष्टता व सातत्य टिकून राहते. समाजातील रूढीपरंपरेद्वारे व्यक्तीवर्तनावर नियंत्रण ठेवले जाते. थोडक्यात, संस्कृती हा शब्द विविध अर्थानी वापरला जातो.

समाज विज्ञान कोश, सांस्कृतिक कोश आवृत्ती २००८ पृष्ठ क्र. ५६–५७

१.१.२ : ठाणे आणि रायगड जिल्ह्याची भौगोलिक पार्श्वभूमी तसेच त्यांचे सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक जीवन

१.१.२ : ठाणे आणि रायगड जिल्हा अभ्यासाकरिता निवडण्याचे कारण म्हणजे येथे आदिवासी, ग्रामीण आणि शहरी ह्या तीन विभागांत वर्गीकरण होते. काही ठिकाणी अति दुर्गम आदिवासी भागही आहे. आणि डॉ. नानासाहेब स्वतः रायगड जिल्ह्यातील असल्यामुळे त्यांच्या कार्याची सुरुवात तिथूनच झाली आणि ठाणे जिल्हा त्याला जवळ असल्यामुळे ह्या दोन जिल्ह्यांचा अभ्यास करायचे संशोधिकेने ठरवले.

महाराष्ट्र राज्यात ठाणे जिल्ह्याचे स्थान हे साधारणतः वायव्य दिशेस असून ठाणे जिल्ह्याच्या दक्षिणेस रायगड जिल्हा आहे. ठाणे जिल्ह्याचे क्षेत्रफळ ९५५८ चौ. किमी. असून ते महाराष्ट्र राज्याच्या ३.११ टक्के आहे. ठाणे जिल्ह्याची लोकसंख्या ८१,३१,८४९ (२००६ सालापर्यंतच्या सेन्ससप्रमाणे) एवढी आहे. ठाणे जिल्ह्यात विविध भूरूपे आहेत. जिल्ह्याचा पश्चिम भाग मैदानी आहे. पूर्वसीमेवर सह्याद्री पर्वत आहे. ईशान्य भागात जव्हार–मोखाड्याचे पठार आहे.

प्राकृतिक रचनेनुसार ठाणे जिल्ह्याचे तीन भाग पडतात.

१) सह्याद्रीचा डोंगराळ प्रदेश : या भागात मुरबाड, शहापूर, जव्हार, मोखाडा व विक्रमगड या तालुक्यांचा भाग येतो.

२) नद्यांच्या खोऱ्याचा प्रदेश : ठाणे जिल्ह्याचा मध्यभाग बराचसा सखल आहे. यात उल्हासनगर, कल्याण, भिवंडी, वाडा, डहाणू, अंबरनाथ व तलासरी या तालुक्यांचा भाग येतो. वैतरणा व उल्हास या ठाणे जिल्ह्यातील दोन मुख्य नद्या आहेत.

३) किनारी प्रदेश : यात डहाणू, पालघर, वसई व ठाणे या तालुक्यांचा भाग येतो.

ठाणे जिल्ह्यात एकूण १५ तालुके आहेत.

ठाणे आणि रायगड जिल्ह्याचा एकूण भौगोलिक आराखडा बघता, येथे आगरी, कोळी, भंडारी, चौकळशी, माळी, आदिवासी–कातकरी आणि ठाकूर समाज आढळतो. यांचे मूळ व्यवसाय कंदमुळे गोळा करणे, शिकार करणे आणि मधमाशा–पालन ह्यावर त्यांचा उदरनिर्वाह होता. सागरी किनाऱ्यामुळे रायगड आणि ठाणे जिल्ह्यांत मिठागरे हा व्यवसाय आहे. तसेच औद्योगिकीकरणामुळे इतरही सर्व जातींचे लोक आहेत.

महाराष्ट्र राज्याला लाभलेल्या सुमारे ७२० कि.मी. लांबीचा समुद्र किनाऱ्यापैकी रायगड जिल्ह्याला सुमारे २८० कि.मी. लांबीचा किनारा लाभलेला आहे. रायगड जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्रफळ ७१५२ चौ.कि.मी. आहे. येथील हवामान उष्ण व दमट असून सरासरी पर्जन्यमान २९३४.११ मि.मी. इतके आहे.

सन २०११च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्या ९६,३५,३९४ इतकी असून त्यातील पुरुष १३,४८,०८२ आणि महिला १२,८६,३०५ इतक्या आहेत.

भरपूर पर्जन्यमान, डोंगराळ भाग, हंगामी वाहणाऱ्या नद्या, विपुल जंगले असणाऱ्या या दोन्ही जिल्ह्यांत उपरोल्लेखित/वर निर्देश केल्यानुसार कंदमुळे गोळा करणे, शिकार करणे आणि मधमाश्यापालन हे परंपरागत व्यवसाय होते. कालानुसार त्यात जे बदल झाले आणि प्रगती झाली त्यामुळे जिल्ह्याची अर्थव्यवस्था शेती, मच्छीमारी, व इतर प्राथमिक व्यवसायांवरच अवलंबून आहे. तथापि झपाट्याने औद्योगिकरण होत असल्याने मोठ्या, मध्यम व लघुउद्योगांबरोबरच कुटीर–उद्योगांची संख्या वाढत आहेत. पनवेल, खोपोली, उरण, रोहा व महाड ही विकसित होत असलेली औद्योगिक केंद्रे व सार्वजनिक क्षेत्रातील मोठ्या उद्योगांमुळे विकास पावलेली रसायनी ता. पनवेल, थळ–वायशेत येथील आर.सी.एफ. खताचा कारखाना, नागोठणे येथील रिलायन्स

इंडस्ट्रिज, उरण येथील बॉम्बे हाय, जे. एन. पी.टी., पेण येथील इस्पात इंडस्ट्रिज, अशा अनेक औद्योगिक केंद्रांमुळे जिल्ह्यातील लोकांना वाढता रोजगार पुरविला जात आहे.

रायगडचे पूर्वीचे नाव होते कुलाबा. या कुलाबा जिल्ह्याची निर्मिती १८६९मध्ये करण्यात आली. बॅ. अ. र. अंतुले मुख्यमंत्री असताना त्यांनी १ जानेवारी १९८१ रोजी जिल्ह्याचे मूळ कुलाबा हे नाव बदलून 'रायगड' हे नवं नाव जिल्ह्याला दिले. यापूर्वी ज्या राजवटी होऊन गेल्या, त्यांचा थोडक्यात परामर्श घेणे अनाठायी होणार नाही. कारण या प्रसिद्ध राजवटींच्या कालावधीत साहित्य, शास्त्र, कला, स्थापत्यकला इत्यादींना उत्तेजन मिळाले.

मौर्यवंश[1]

इ.स. पूर्व चौथ्या शतकाच्या अखेरीस प्राचीन मगध देशात मौर्यवंश उदयाला आला. इ.स.पू. ३२१ ते १८५ या दरम्यान भारत खंडाच्या बहुतेक भागावर मौर्यवंशातील राजांनी एकछत्री अंमल प्रस्थापित केला होता. इतिहासप्रसिद्ध राजा चंद्रगुप्त याने राज्याचा विस्तार करून तो बव्हंशी भारतभर पसरविण्याचे कार्य केले.

मौर्य साम्राज्याला आणि शासनयंत्रणेला काही उच्च जीवनमूल्ये व नैतिक अधिष्ठान देण्याचे कार्य चंद्रगुप्ताचा नातू – सम्राट अशोक याने केले. यामुळे मौर्य साम्राज्याला एकूण भारतीय जीवनात विशिष्ट स्थान प्राप्त झाले. 'अर्थशास्त्र' या राजनीतिशास्त्रावरील ग्रंथाचा लेखक कौटिल्य म्हणजेच चंद्रगुप्ताचा गुरू चाणक्य असे अभ्यासकांचे मत आहे. ग्रीक सम्राटाच्या आक्रमणाने मौर्यसत्ता लयाला गेली. मौर्यसत्तेतही शासनव्यवस्था उत्तम होती. कलाकौशल्यांना उत्तेजन मिळत होते. खुद्द सम्राट अशोकाने बौद्ध धर्म स्वीकारला होता. शिल्पे/शिलालेख इत्यादी साधनांवरून मौर्यकालाचा अभ्यास करता येतो. ग्रीक स्वारीमुळे मौर्यसत्ता लयाला गेली.

सातवाहन वंश[2]

प्राचीन भारतातील एक बलाढ्य व सुप्रसिद्ध राजवंश. या वंशातील राजांनी इ.स.पूर्व सुमारे दुसऱ्या शतकापासून ते तिसऱ्या शतकादरम्यान मुख्यत्वे महाराष्ट्रात अधिसत्ता गाजवली. या वंशाविषयीची माहिती मुख्यत्वे त्यांची नाणी, शिलालेख, पुराणे, जैन धर्मग्रंथ इत्यादींवरून कळते. सातवाहन राजांनी सुमारे ४५० वर्षे राज्य केले असे मानण्यास हरकत नाही.

---

१. मराठी विश्वकोश – खंड १९, पृ. १६९ ते १७६, प्रथम प्रकाशन – २०१२, प्रमुख संपादक : डॉ. विजया वाड

२. मराठी विश्वकोश – खंड १३, पृ. १२९९ ते १३०३, प्रथम प्रकाशन – १९८७, प्रमुख संपादक : तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी

चालुक्य घराणे[१]

दक्षिणेत विशेषतः कर्नाटक व महाराष्ट्र यांत पाचव्या शतकात उदयास आलेला प्रसिद्ध वंश म्हणजे चालुक्य घराणे. बदामीचे व कल्याणीचे चालुक्य राजे विशेष प्रसिद्ध होते. या दोन्ही राजवंशांतील पुलकेशी (बदामी) विक्रमादित्य इत्यादी अनेक पराक्रमी राजे होऊन गेले. त्यांची दुसरी शाखा कल्याणीचे चालुक्य. यांच्यातील शेवटचा राजा कीर्तिवर्मा (द्वितीय) याचे साम्राज्य इ.स. ७५८ पर्यंत टिकले. चालुक्यांच्या राज्यात विद्येला व कलांना उदार आश्रय होता. संस्कृतप्रमाणेच अनेक कन्नड ग्रंथही या काळात रचले गेले. या राजवटीत वैदिक, बौद्ध व जैनधर्म भरभराटीत होते. अनेक उत्कृष्ट देवालयेही चालुक्य राजांनी बांधली.

राष्ट्रकूट वंश[२]

बदामीच्या चालुक्यांनंतर मान्य खेडच्या राष्टकूटांचे साम्राज्य महाराष्ट्र व कर्नाटक प्रदेशात स्थापन झाले. राष्ट्रकूट हे भारतातील प्राचीन, इतिहास प्रसिद्ध राजघराणे. प्रामुख्याने महाराष्ट्र व त्या लगतचा प्रदेश यांवर या राजवंशांची अधिसत्ता होती. (इ.स. ७५३ ते ९७५) राज्याच्या मोठ्या विभागाला 'राष्ट्र' म्हणत. राष्ट्रकूट हे एक प्राचीन अधिकारपद होते. अशा राष्ट्रकूटांची अनेक घराणी प्राचीन काळी महाराष्ट्रात राज्य करीत होती. राष्ट्रकूटांनीही धर्म, विद्या आणि कला यांना उदार आश्रय दिला. अनेक विद्वानांना आश्रय दिला आणि अनेक साहित्यकृती निर्माण केल्या. स्थापत्य आणि शिल्प या कलांनाही या काळात उत्तेजन मिळाले. अठरा शिवमंदिरे बांधली. कान्हेरी व घारापुरी (बौद्धलेणी) आणि वेरूळ (हिंदू व जैन) येथील लेणी विशेष प्रसिद्ध आहेत.

राष्ट्रकूटांची कीर्ती, धर्म, विद्या, साहित्य आणि कला यांना त्यांनी दिलेल्या आश्रयामुळे अजरामर झाली आहे.

---

१. मराठी विश्वकोश – खंड ५, पृ. ७८१ ते ७८६, प्रथम प्रकाशन – १९७७, प्रमुख संपादक : तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी.

२. मराठी विश्वकोश – खंड १४, पृ. ८५३, ८५५ ते ८५७, प्रथम प्रकाशन – १९७९, प्रमुख संपादक : तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी.

यादव राजवट[1]

महाराष्ट्रातील मध्ययुगातील एक इतिहासप्रसिद्ध राजघराणे (इ.स. ११८५ ते १३१८) महाराष्ट्र व त्या लगतच्या प्रदेशावर पाचवा भिल्लम (इ.स. ११८५–९३) या यादव घराण्याची अधिसत्ता होती. इ.स. १३१८ मध्ये यादव घराण्याचा ऱ्हास झाला. तोपर्यंत यादव घराण्यातील काही बलाढ्य राजांनी आपली सत्ता गाजवली. यादव राजांपैकी सुप्रसिद्ध राजा रामदेवराय यादव आणि त्याच्या पदरी असलेला हेमाद्रि पंडित – तथा हेमाडपंत – इतिहासप्रसिद्ध आहे. यांच्या काळात साहित्य, शिल्प इत्यादी विविध कलांना उत्तेजन मिळाले. यांच्या शासनव्यवस्थेत प्रजा सुखी होती.

शिलाहार घराणे[2]

एक मध्ययुगीन राजघराणे म्हणून शिलाहार राजवंश प्रसिद्ध आहे. पश्चिम महाराष्ट्रात शिलाहारांची तीन घराणी उदयास आली. या तीन घराण्यांपैकी एक उत्तर कोकणात, ठाणे व कुलाबा (आताचा रायगड) या जिल्ह्यांवर राज्य करीत होते. राष्ट्रकूटांचे पतन झाले ते इ.स. ९७४ मध्ये. मात्र शिलाहार राजवट (इ.स. ८०० ते १२६५) सुमारे साडेचारशे वर्षे होती. इतर प्राचीन राजांप्रमाणेच शिलाहारांनी सुद्धा धर्म, विद्या व कला यांना आश्रय दिला होता.

या सात इतिहासप्रसिद्ध राजवटींचा थोडक्यात उल्लेख येथे करणे आवश्यक होते. कारण या सर्व राजवटींच्या काळातील साहित्य, कला, स्थापत्य, शिल्प, लेणी इत्यादी इतिहाससाधने त्या त्या राजवटीतील कलागुणांना मिळालेल्या उदार आश्रयाची प्रतीके आहेत. मंदिरे, लेणी, शिलालेख इत्यादींवरून त्या त्या काळातील राजवटींचे गुणविशेष प्रकर्षाने जाणवतात.

श्री. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या पूर्वजांना सरखेल कान्होजीराव आंग्रे यांनी 'धर्माधिकारी' ही पदवी दिली. विविध राजवटींत धर्माचरण, विद्वानांना आश्रय आणि त्यांच्या गुणांची कदर कशी असे याचे हे द्योतक आहे.

---

१. मराठी विश्वकोश – खंड १४, पृ. ६४ ते ६६, प्रथम प्रकाशन – १९८९, प्रमुख संपादक : तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी.

२. मराठी विश्वकोश – खंड १७, पृ. ७८९, प्रथम प्रकाशन – २००७, प्रमुख संपादक : डॉ. विजया वाड.

आदिलशाही, मोगल, पोर्तुगीज, हबशी, इंग्रज या राजवटींचा अनुभवही या भूप्रदेशाने घेतला. मराठ्यांची असामान्य मर्दुमकीही या जिल्ह्यातील जनतेने पाहिली. इंग्रजांनी या भूप्रदेशावर १७५६ पासून अंमल प्रस्थापित केला. तो देशाला स्वातंत्र्य मिळेपर्यंत अबाधित होता. साधारण १९८५ साली औद्योगिकीकरणास सुरुवात झाली. सात भागांत विकास केंद्राची विभागणी करण्यात आली. आधी फक्त भातशेती व मच्छीमारीवर अवलंबून असलेली जनता, औद्योगिकीकरणामुळे रोजगार व स्वयंरोजगार मिळवू लागली. समाज चंगळवादाकडे वळला. समाजामध्ये व्यसनाधीनता, समाजविघातक कृत्ये, नीतिमूल्यांच्या विरोधात वर्तन वाढायला लागले. औद्योगिकीकरणामुळे प्रदूषण वाढलं. शेतीवर तसेच आरोग्यावर परिणाम व्हायला लागला. सामाजिक जडणघडणीस अनेक जातिजमातींचा हातभार लागलेला आहे. ठाणे आणि रायगडच्या डोंगराळ भागात कातकरी, वारली, कोकणे व तुरळक प्रमाणात ठाकरांची वस्ती दिसून येते. वन्य प्राण्यांची शिकार व मासेमारी आणि शक्य झाल्यास नागली–वरीची लागवड हे त्यांच्या उपजीविकेचे साधन होते. या भागात नागरीकरण पोहोचल्यामुळे रोजंदारीवर मजुरीची कामे करणे, दगड फोडणे असेही व्यवसाय ते करतात.

आदिवासींबरोबर ठाणे व रायगडमधील अतिशय संपन्न जमाती, म्हणजे आगरी व कोळी लोक होते. शुद्ध आगरी, दास आगरी व वरप आगरी या त्यांच्या पोटजाती आहेत. आगरी समाजाच्या उत्पत्तीबद्दल अनेक दंतकथा आहेत. रामायण काळात आगरी लोक रावणाचे गायक–वादक होते. ते उत्तम वाद्ये वाजवत. त्यामुळे रावणाने प्रसन्न होऊन कोकण किनारपट्टीवर हल्लीच्या ठाणे–रायगड जिल्ह्यांत त्यांना लागवडीसाठी जमिनी दिल्या. त्यांना ढोल आगरी असेही म्हणतात. या समाजाचा भुताखेतांवर व भगत तसेच तांत्रिकावर मोठा विश्वास असतो. तसेच आगरी समाजातील बहुतेक लोकांना दारूचे व्यसन असते. हे लोक दारूच्या दुकानाला 'टाऊर' म्हणतात, आणि ते दुकान चालवणारे ते 'टाऊरी'. ह्यांचे स्वभाव वैशिष्ट्य म्हणाल तर अतिशय स्वाभिमानी असल्यामुळे दरोडे घालणे, चोऱ्या करणे, लोकांना लुटून त्यावर जगणे ह्यातील ही जात नव्हे. जे गुन्हे होतात ते आपापसातल्या वैमनस्यामुळे. त्यामुळे एकमेकांचे खून व्हायचे, पण गुन्ह्याची प्रवृत्ती म्हणून नव्हे.

तसेच ह्या कोळी समाजातील लोक स्वभावाने थोडेसे तापट पण मनाने दिलदार.

एकूण काय, मनुष्य मुळात वाईट नसतो, पण त्याची भौगोलिक परिस्थिती, आजूबाजूचे वातावरण यामुळे तो विकारांच्या अधीन होतो. आणि मग व्यसनाधीनता, जातीव्यवस्था, स्त्रियांवर

अत्याचार असे दोष निर्माण होतात. आणि म्हणून समाज सुधारणेची (परिवर्तनाची) गरज निर्माण होते. हेच परिवर्तनाचे कार्य डॉ. नानासाहेबांनी हाती घेतले.

सरकारने ह्या लोकांकरिता अनेक योजना आखलेल्या आहेत, परंतु कितीही पैसा टाकला तरी बदल होतीलच असे नाही.

डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांनी प्रथम समाजातील, तळागाळातील माणसांचे आत्मबल वाढवले. राष्ट्राचा उत्तम नागरिक घडवणे हा मूळ उद्देश. शिक्षणाचे महत्त्व जोपर्यंत अंतरातून पटत नाही तोपर्यंत त्या व्यक्तीला शिकण्याची इच्छा होणारच नाही. आंतरिक भूमिका बदलणे अत्यंत गरजेचे आहे.

डॉ. नानासाहेबांनी कधीच कुणाला उपदेश केले नाहीत; फक्त चांगले विचार मांडण्याचे काम केले. मनुष्याची नीतिमत्ता बदलली. (नीती आणि अनीति ह्यातला फरक दाखवला, त्यातून काय घ्यायचे हे आपल्याला कळले पाहिजे.) नीतिमूल्यांची जोपासना कशाप्रकारे करायची ह्याचे मार्गदर्शन केले.

नुसता रस्ता दाखवला नाही, तर त्या रस्त्यावरचे विविध प्रकारचे खाच–खळगे, स्पीड ब्रेकर, ट्रॅफिक जाम आहे ते दाखवले.

डॉ. नानासाहेब, श्री. आप्पासाहेब, श्री. सचिनदादा (सर्व धर्माधिकारी कुटुंबीय) यांच्या अथक प्रयत्नांमुळे व मार्गदर्शनामुळे कातकरी, आदिवासी समाज व तळागाळातील इतर समाजातील माणसे व्यसनापासून मुक्त झाली.

अधंश्रद्धा, भानामाती, मूठ मारणे अशा अनेक अरिष्ट प्रथांपासून माणसे दूर झाली. अंधश्रद्धा म्हणजे माणूस डोळस असूनसुद्धा अज्ञानाने वागतो. म्हणून खरं तर तो शब्द अंधश्रद्धापेक्षा अज्ञानश्रद्धा असायला हवा. कारण त्यांचे वर्तन चुकीच्या विचारांशी निगडित असते. उदा.– लिंबू–मिरची, चप्पल बांधणे... इत्यादी. म्हणजे कोणते विचार आपले संरक्षण करतात हेच माणसाला कळत नाही.

ज्या अवगुणांसाठी मनुष्य आपली आर्थिक, मानसिक व कायिकशक्ती खर्च करत होता, ते डॉ. नानासाहेबांनी लावून दिलेल्या बैठकीच्या माध्यमातून थांबले. माणूस वासनेच्या आहारी

जाऊन घरात भांडणतंटे, मारझोड करणे ही कर्मे करणे म्हणजे अवगुण यांच्या आहारी गेला होता. आणि ह्या अवगुणांमुळे कुटुंबावर येणारी संकटे, हालअपेष्टा, आर्थिक चणचण, मानसिक त्रास, शारीरिक त्रास होतात आणि स्वतः व्यसनाधीन व्यक्तीला सुद्धा शारीरिक त्रास तर होतोच ना! ह्यालाच आपल्या कर्माचे फळ म्हणतात. ह्यावर उपाय म्हणजे व्यसनाधीनता सोडवली तर सगळ्यांनाच स्थैर्य प्राप्त होईल. डॉ. नानासाहेबांच्या निरूपणामुळे गावेच्या गावे तंटामुक्त झाली. माणसा–माणसांमध्ये दुरावा कां निर्माण होतो, तर एकमेकांबद्दल समज–गैरसमज, हेवेदावे, द्वेष–मत्सर असतो. त्याकरता अंगी नम्रता बाणली पाहिजे. कौटुंबिक सुधारणा झाली तर गाव आपोआप सुधारतो.

आपण मानवजातीत जन्माला आलो म्हणजे, हिंस्रप्राणी आणि मनुष्यप्राणी ह्यात फरक आहे ना! हिंस्रप्राण्याला नाती–गोती नसतात, ते अन्नासाठी कुणाचाही जीव घेतात; पण मनुष्यप्राण्याचे तसे नाही, त्याला नाती–गोती जपायची असतात.

ती. नानांनी वयाच्या पंधराव्या वर्षापासून वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनाचे अत्यंत महत्त्वाचे राष्ट्रीय स्तरावरील कार्य सुरू केले. त्याचे महत्त्व लोकांना समजावून सांगितले. वृक्षाच्या प्रत्येक भागाचा माणसाला उपयोग होतो. (उदा. आपल्याला ऑक्सिजन मिळतो, थकलेल्या–भागलेल्यांना सावली मिळते, प्रदूषण कमी होते, जमिनीची धूप कमी होते, पाण्याचा निचरा होतो. शेवटपर्यत (जाळण्याकरिता) त्याचा आपल्याला उपयोग होतो.) वृक्षाचे नुसतेच रोपण नाही तर त्यांच्या जोपासनेने व संवर्धनाने हरितक्रांती होईल. डॉ. नानासाहेबांच्या ह्या कार्याची दखल सरकारने घेतली आहे.

डॉ. नानासाहेबांनी गावेच्या गावे दारूमुक्त केली. दारू पिऊ नये, दारू प्यायल्याने काय नुकसान होते हे समजावून सांगितले, ते नेहमी सांगत, 'आता तुझं तू ठरवायचं, प्यायची की नाही ते.' (म्हणजेच आंतरिक बदल) असे अनेक उपक्रम ती. नानांनी सुरू केले.

यत्र नार्यस्तु पूज्यन्ते। रमन्ते तत्र देवताः।।

ज्या घरात–गावात स्त्रीचा आदरभाव केला जातो, त्या घराचा–गावाचा उद्धार होतो. स्त्री ही त्यागाची मूर्ती असते. पत्नीचा आदरभाव कसा करावा ही शिकवण ती. नानांनी दिली. साक्षरता

वर्ग सुरू केले. गरजू मुलांना शैक्षणिक वस्तूंचे वाटप, व्यवसाय मार्गदर्शन केले जाते. आदिवासी शाळांमध्ये ताट–वाटी–ग्लास ह्यांचे वाटप केले जाते.

लोकांमध्ये श्री. नानासाहेबांनी आरोग्यविषयक जागरूकता निर्माण केली. नुसतेच उपदेश करून किंवा भाषणे करून नव्हे तर, प्रत्यक्ष विनामूल्य आरोग्य तपासणी, रक्तदान शिबिरे, यांसारख्या योजना राबवल्या. ज्याने रोगराईचे प्रमाण कमी होते ते ग्रामस्वच्छता अभियान होय. गावातील विहिरी साफ करून, झरे मोकळे करणे. गावकऱ्यांना पाणपोई बांधून देणे व पाण्याच्या योग्य वापराबद्दल महत्त्व समजावून देणे, मार्गदर्शन करणे; हे सर्व उपक्रम नुसते कागदावर न राबवता प्रत्यक्ष अमलात आणले. आणि त्यांना खऱ्या समाजकार्याचा धडा घालून दिला.

१) कोकणचा सांस्कृतिक इतिहास– (पृष्ठ ८२) – डॉ. भालचंद्र आकलेकर

२) मराठी विश्वकोश खंड १८ (पृष्ठ ६९२) – प्रमुख संपादक – डॉ. विजया वाड

संदर्भ :

१) असे घडले ठाणे – लेखक : डॉ. दाऊद दळवी.

२) असा हा रायगड – लेखक : एस. एम. देशमुख

१.२ संशोधनाचा आराखडा

१.२.१ : प्रस्तावना

व्याख्या : एफ. एन. केरलिंगर यांच्यामते, संशोधन आराखडा, संशोधनाची एक योजना, संरचना आणि एक अशी रणनीती आहे, ज्याद्वारे संशोधन प्रश्नाची उत्तरे प्राप्त केली जातात आणि भिन्नत्व प्रसरणावर नियंत्रण ठेवले जाते.

वरील व्याख्येवरून हे स्पष्ट होते की, संशोधन आराखडा ही एक अशी योजना किंवा रूपरेषा आहे की, जी समस्येच्या निर्धारणापासून तर संशोधन अहवालाच्या शेवटच्या पायरीपर्यंतच्या विषयाबाबत योग्य प्रकारे विचारविनिमय करून, उपलब्ध पर्यायांवर लक्ष देऊन अशाप्रकारे निर्णय घेण्यात येतात की, प्रयत्न, वेळ व पैसा कमीत कमी खर्च करून जास्तीत जास्त प्रमाणात संशोधन उद्दिष्टांची प्राप्ती करता येईल.

विषय निवड : ठाणे आणि रायगड जिल्ह्यांतील समाज परिवर्तन घडविण्याच्या कार्यात डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या कार्याचे योगदान, एक अभ्यास

संशोधन विषय निवडीचा उद्देश : समाजात अनेक व्यक्ती मोहाला बळी पडतात, त्यांना प्रलोभनापासून दूर कसे राहता येईल तसेच समाजातल्या वाढत्या दुष्प्रवृत्त लोकांना सत्प्रवृत्त करण्याकरिता डॉ. नानासाहेबांनी जे कार्य केले, ते जास्तीत जास्त वस्तुनिष्ठरीतीने कोठेही अंधश्रद्धा न होता, भावना, धारणा आणि प्रेरणा ह्या सत्प्रवृत्तीने हे विचार संशोधनाच्या माध्यमातून जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचावे, हा ह्या संशोधनाचा हेतू आहे.

विषयाचे महत्त्व व आवश्यकता :

ह्या प्रभावाचा शास्त्रीय अभ्यास करण्याचा प्रयत्न कुणीही केलेला नाही. डॉ. नानासाहेबांनी सुरू केलेल्या समाजप्रबोधनाच्या कार्याचा फायदा अनेक लोकांना झाला आहे. (प्रयत्न–प्रबोध–प्रचिती योग्य प्रयत्नाने यथार्थ ज्ञान प्राप्त होते, त्यातूनच प्रबोधन हा शब्द तयार झाला. सारासार विचार करण्याची शक्ती माणसाला प्राप्त करून देते, ते प्रबोधन.)

आता बदल म्हणजे काही जादूटोणा, चमत्कार नाही किंवा लोकांच्या परिस्थितीत एकदम बदल झाला असे नाही, (म्हणजे दोनाच्या चार खोल्या, दोन चाकांची गाडी ते चारचाकी गाडी)

तर त्यांची मानसिकता बदलली. पैशांनी सगळी सुखं विकत घेता येतात, पण समाधान मात्र विकत घेता येत नाही अणि बैठकीतून निरूपणाद्वारे हीच समाधानी वृत्ती जागृत केली जाते.

घरातल्या स्त्रीवर संपूर्ण घराची स्थिती, मानसिकता अवलंबून असते. घरातली स्त्री जर शांत असेल तर संपूर्ण घर गुण्यागोविंदाने नांदत असते. स्त्रियाच कुटुंबाला घडवत असतात.

श्रवणामुळे (नुसते ऐकणे आणि श्रवण ह्यात फरक आहे. ऐकलेले कधी कधी फक्त कानांपर्यंतच राहते. पण श्रवण 'परे'पर्यंत जाते आणि त्याचा परिणाम मनापर्यंत पोहोचतो.) स्त्रियांच्या आचारा–विचारांमध्ये आमूलाग्र बदल घडायला लागला. भांड्याला भांडी लागायची थांबली. सासू–सुनांमध्ये जो ३६चा आकडा होता, तो ६३चा व्हायला लागला. डॉ. नानासाहेबांच्या शिकवणीतून हे कळायला लागलं की, समोरची व्यक्ती काय बोलली ह्यापेक्षा तिच्यातले कोण बोलले? (काम, क्रोध, मद, मत्सर...) हे लक्षात आल्यानंतर भांडणं आपोआप कमी व्हायला लागली.

आपण नेहमी पाहतो, ह्या कलियुगात अनेक प्रलोभने माणसाला खुणावत असतात, आणि पुरुषांना ह्यात वाहवत जायला वेळ लागत नाही. पुरुष हे संपूर्ण घराचे आधारस्तंभ असतात. तोच आधार डुगडुगायला लागला तर संपूर्ण घर हलायला लागते. परंतु प्रबोधनपर विचारांच्या श्रवणामुळे, संध्याकाळी थकूनभागून कामावरून घरी निघाल्यानंतर घरचा रस्ता विसरणारे पुरुष आता सरळ घराकडे वळायला लागले. तरुण पिढी असो अथवा लहान मुलं असोत, प्रत्येकाच्या आचारविचारांमध्ये बदल दिसायला लागला.

संशोधिका प्रत्यक्षात ह्या परमार्थात असली तरी त्याची व्यापकता शास्त्रीय पद्धतीने पडताळून पाहणे आणि तेही तटस्थ राहून, निःपक्षपातीपणे करणे, ह्या सगळ्या बदलांचा डोळसपणे अभ्यास करणे, ही ह्या संशोधन विषयामागील प्रेरणा आणि पार्श्वभूमी आहे. ठाणे व रायगड या दोन्ही जिल्ह्यांतील शहरी तसेच ग्रामीण विभागांत, अतिदुर्गम नसलेल्या आदिवासी भागात निरूपण, बैठका या कार्यक्रमांना उपस्थित राहणे. तसेच या क्षेत्रपरिसरातील अनेक लोकांशी प्रत्यक्ष संपर्क साधला व त्यांच्याकडून प्रतिक्रिया घेतल्या.

१.२.२ : गृहीतके

१) डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या कार्यामुळे समाजात सकारात्मक दृष्टिकोन वाढला. सत्प्रवृत्त आणि आनंददायी जीवनासाठी त्यांनी श्रीदासबोधाच्या अनुषंगाने केलेल्या प्रवचन, निरूपणादी माध्यमांतून सामाजिक परिवर्तन घडून आले.

२) डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांनी तळमळीने आणि निःस्पृह वृत्तीने केलेल्या या कार्यामुळे अनेक व्यक्ती व्यसनमुक्त झाल्या.

३) डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांनी केलेल्या प्रबोधनामुळे खालील प्रमाणे बदल घडले – अ) मोहाला बळी न पडणे ब) प्रलोभनांपासून दूर राहणे; त्यासाठी मनावर संयम ठेवणे क) माणसातील वाढत्या दुष्प्रवृत्त वृत्तींना सत्प्रवृत्त करणे ड) अंधश्रद्धा न ठेवणे, अनावश्यक कर्मकांडे टाळणे इ) श्रेयस्कर भावना, धारणा आणि प्रेरणा या गुणांमध्ये वाढ करणे.

४) समाजात त्यागभावना आणि परोपकारी वृत्ती ही मूल्ये रुजविणे हे डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांचे जीवनध्येय होते.

५) स्त्रियांच्या मानसिक व शारीरिक आरोग्य संवर्धनासाठी, तसेच आदर्श कुटुंब व्यवस्थेसाठी डॉ. धर्माधिकारी यांच्या प्रबोधनामुळे आमूलाग्र बदल घडून आला.

६) श्रीमत् दासबोधाच्या व मनाच्या श्लोकांच्या माध्यमाद्वारे, समाजामध्ये नम्रता, सद्सद्विवेकबुद्धी, सत्कर्मावर श्रद्धा, परदुःख जाणून घेण्याची क्षमता, सहिष्णुता, दुसऱ्याप्रति आदर भावना बाळगणे इत्यादी सद्गुण रुजविणे, हा डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या प्रबोधनकार्याचा उद्देश होता.

७) प्रबोधनाद्वारे समाजातील अंधश्रद्धा दूर करून निखळ वैज्ञानिक दृष्टिकोन जनमानसात दृढ करणे हा त्यांचा मुख्य उद्देश होता.

८) डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांचे प्रवचन व निरूपण इत्यादी माध्यमांतून समाजप्रबोधन करणे हे तंत्र यशस्वी व फलद्रूप ठरले.

१.२.३ : संशोधनाची व्याप्ती

रायगड जिल्ह्यांतर्गत येणारी विविध गावे आणि तालुके



ठाणे जिल्ह्यांतर्गत येणारी विविध गावे आणि तालुके



२०११ च्या जनगणनेनुसार ठाणे आणि रायगड जिल्ह्यांतील लोकसंख्या

Population and no. of Villages & Towns in Raigad district

District - Raigad-Alibag

Sr. No.	Tahasil	Rural/ Urban	House holds (in thousand)	Population			Literacy Rate	No. of Villages		Towns	No. of Village Panchyats
				Persons	Male	Female		inhabited	uninhabited		
1	2	3	4	5	6	7	8	9	10	11	12
1	Uran	Total	31004	140351	73028	67323	82.69	53	9	2	33
		Rural	23998	109177	56442	52735	80.63	53	9	0	33
		Urban	7006	31174	16586	14588	89.75	0	0	2	--
2	Panvel	Total	90008	422522	224560	197962	80.50	160	2	4	88
		Rural	44138	218186	113545	104641	74.74	160	2	0	88
		Urban	45870	204336	111015	93321	86.56	0	0	4	--
3	Karjat	Total	36467	184420	94724	89696	71.97	175	1	3	49
		Rural	26800	139011	70988	68023	68.19	175	1	0	49
		Urban	9667	45409	23736	21673	83.13	0	0	3	--
4	Khalapur	Total	39187	183604	98220	85384	77.99	119	1	3	42
		Rural	22775	109407	58423	50984	72.84	119	1	0	42
		Urban	16412	74197	39797	34400	85.50	0	0	3	--
5	Pen	Total	39028	176681	90853	85828	72.79	153	17	1	64
		Rural	32165	146480	75009	71471	69.14	153	17	0	64
		Urban	6863	30201	15844	14357	90.06	0	0	1	--
6	Alibag	Total	50455	221661	112327	109334	81.52	189	26	1	62
		Rural	46110	202165	102190	99975	80.91	189	26	0	62
		Urban	4345	19496	10137	9359	87.80	0	0	1	--
7	Murud	Total	15262	72046	34958	37088	78.36	72	1	1	24
		Rural	12662	59494	28895	30599	76.06	72	1	0	24
		Urban	2600	12552	6063	6489	88.95	0	0	1	--
8	Roha	Total	35696	161750	82535	79215	77.26	168	0	3	62
		Rural	28133	127405	64466	62939	73.80	168	0	0	62
		Urban	7563	34345	18069	16276	89.88	0	0	3	--
9	Sudhagad	Total	13909	62852	31634	31218	65.59	97	1	1	34
		Rural	12061	54680	27459	27221	62.09	97	1	0	34
		Urban	1848	8172	4175	3997	88.37	0	0	1	--
10	Mangaon	Total	32743	152270	73563	78707	74.29	184	0	2	74
		Rural	29657	138111	66362	71749	72.87	184	0	0	74
		Urban	3086	14159	7201	6958	88.01	0	0	2	--
11	Tala	Total	9963	42869	18851	24018	67.89	62	0	0	26
		Rural	9963	42869	18851	24018	67.89	62	0	0	26
		Urban	0	0	0	0	0.00	0	0	0	--
12	Shriwardhan	Total	18537	85071	38924	46147	76.81	79	0	1	43
		Rural	15332	69885	31524	38361	75.35	79	0	0	43
		Urban	3205	15186	7400	7786	83.34	0	0	1	--

13	Mhasla	Total	13880	61010	26585	34425	74.99	80	2	1	40
		Rural	12067	52247	22320	29927	73.22	80	2	0	40
		Urban	1813	8763	4265	4498	85.44	0	0	1	--
14	Mahad	Total	40508	186521	91642	94879	78.13	182	0	2	134
		Rural	33473	154973	74924	80049	75.40	182	0	0	134
		Urban	7035	31548	16718	14830	91.31	0	0	2	--
15	Poladpur	Total	12286	54301	25224	29077	68.51	86	0	1	43
		Rural	11064	49004	22567	26437	66.62	86	0	0	43
		Urban	1222	5297	2657	2640	85.69	0	0	1	--
Total Raigad District		Total	478933	2207929	1117628	1090301	77.03	1859	60	26	818
		Rural	360398	1673094	833965	839129	73.78	1859	60	0	818
		Urban	118535	534835	283663	251172	87.06	0	0	26	0
Source - Population Census 2001(Provisional)											

Top of Page Home

Thane District : Census 2011 data

Thane District Overview

An official Census 2011 detail of Thane, a district of Maharashtra has been released by Directorate of Census Operations in Maharashtra. Enumeration of key persons was also done by census officials in Thane District of Maharashtra.

Thane District Population 2011

In 2011, Thane had population of 11,060,148 of which male and female were 5,865,078 and 5,195,070 respectively. In 2001 census, Thane had a population of 8,131,849 of which males were 4,377,747 and remaining 3,754,102 were females. Thane District population constituted 9.84 percent of total Maharashtra population. In 2001 census, this figure for Thane District was at 8.39 percent of Maharashtra population.

Thane District Population Growth Rate

There was change of 36.01 percent in the population compared to population as per 2001. In the previous census of India 2001, Thane District recorded increase of 54.92 percent to its population compared to 1991.

Thane District Density 2011

The initial provisional data released by census India 2011, shows that density of Thane district for 2011 is 1,157 people per sq. km. In 2001, Thane district density was at 851 people per sq. km. Thane district administers 9,558 square kilometers of areas.

Thane Literacy Rate 2011

Average literacy rate of Thane in 2011 were 84.53 compared to 80.66 of 2001. If things are looked out at gender wise, male and female literacy were 88.72 and 79.77 respectively. For 2001 census, same figures stood at 87.06 and 73.10 in Thane District. Total literate in Thane District were 8,227,161 of which male and female were 4,591,396 and 3,635,765 respectively. In 2001, Thane District had 5,635,799 in its district.

Thane Sex Ratio 2011

With regards to Sex Ratio in Thane, it stood at 886 per 1000 male compared to 2001 census figure of 858. The average national sex ratio in India is 940 as per latest reports of Census 2011 Directorate. In 2011 census, child sex ratio is 924 girls per 1000 boys compared to figure of 931 girls per 1000 boys of 2001 census data.

Thane Child Population 2011

In census enumeration, data regarding child under 0-6 age were also collected for all districts including Thane. There were total 1,327,146 children under age of 0-6 against 1,144,896 of 2001 census. Of total 1,327,146 male and female were 689,665 and 637,481 respectively. Child Sex Ratio as per census 2011 was 924 compared to 931 of census 2001. In 2011, Children under 0-6 formed 12.00 percent of Thane District compared to 14.08 percent of 2001. There was net change of -2.08 percent in this compared to previous census of India.

Description	2011	2001
Actual Population	11,060,148	8,131,849
Male	5,865,078	4,377,747
Female	5,195,070	3,754,102
Population Growth	36.01%	54.92%
Area Sq. Km	9,558	9,558
Density/km2	1,157	851
Proportion to Maharashtra Population	9.34%	8.39%
Sex Ratio (Per 1000)	886	858
Child Sex Ratio (0-6 Age)	924	931
Average Literacy	84.53	80.66
Male Literacy	88.72	87.06
Female Literacy	79.77	73.10
Total Child Population (0-6 Age)	1,327,146	1,144,896
Male Population (0-6 Age)	689,665	592,830
Female Population (0-6 Age)	637.481	552,066
Literates	8,227,161	5,635,799
Male Literates	4,591,396	3,295,251
Female Literates	3,635,765	2,340,548
Child Proportion (0-6 Age)	12.00%	14.08%
Boys Proportion (0-6 Age)	11.76%	13.54%
Girls Proportion (0-6 Age)	12.27%	14.71%

Description	Rural	Urban
Population (%)	23.01 %	76.99 %
Total Population	2,545,470	8,514,678
Male Population	1,300,136	4,564,942
Female Population	1,245,334	3,949,736
Sex Ratio	958	865
Child Sex Ratio (0-6)	961	911
Child Population (0-6)	364,206	962,940
Male Child(0-6)	185,687	503,978
Female Child(0-6)	178,519	458,962
Child Percentage (0-6)	14.31 %	11.31 %
Male Child Percentage	14.28 %	11.04 %
Female Child Percentage	14.34 %	11.62 %
Literates	1,539,885	6,687,276
Male Literates	883,410	3,707,986
Female Literates	656,475	2,979,290
Average Literacy	70.60 %	88.55 %
Male Literacy	79.27 %	91.31 %
Female Literacy	61.54 %	85.35 %

Thane district. Literacy rate in rural areas of Thane district is 70.60 % as per census data 2011. Gender wise, male and female literacy stood at 79.27 and 61.54 percent respectively. In total, 1,539,885 people were literate of which males and females were 883,410 and 656,475 respectively.

All details regarding Thane District have been processed by us after receiving from Govt. of India. We are not responsible for errors to population census details of Thane District.

Urban Agglomerations inside Thane District	Population	Male	Female
Bhiwandi (Urban Agglomeration)	**737,411**	434,975	302,436

Cities inside Thane District	Population	Male	Female
Thane (Municipal Corporation)	**1,818,872**	966,293	852,579
Kalyan and Dombivali (Municipal Corporation)	**1,246,381**	650,075	596,306
Vasai Virar (Municipal Corporation)	**1,221,233**	649,535	571,698
Navi Mumbai (Municipal Corporation)	**1,119,477**	611,501	507,976
Mira and Bhayander (Municipal Corporation)	**814,655**	434,330	380,325
Bhiwandi (Municipal Corporation)	**711,329**	418,478	292,851
Ulhasnagar (Municipal Corporation)	**506,937**	270,373	236,564
Ambernath (Municipal Council)	**254,003**	133,006	120,997
Badalapur (Municipal Council)	**175,516**	91,695	83,821

संत परंपरा मिळायला फार मोठे भाग्य लागते. त्या सर्व संतांच्या कार्याचा आढावा घेता असे लक्षात येते की, काही संत प्रवृत्तीपर, तसेच काही निवृत्तीपर होते... (आता वृत्ती म्हणजे वागण्याचा–वर्तणुकीचा कल, प्रवृत्ती म्हणजे प्रत्यक्ष केले जाणारे कर्म आणि निवृत्ती म्हणजे अलिप्तता.)

संत नामदेव, संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत तुकाराम, संत रामदासस्वामी ह्या सर्वांनी जनजागृतीकरिता आणि जनहिताकरिता आपले सर्व आयुष्य वेचले.

संत रामदासस्वामी हे प्रवृत्तीपर संत होते, त्यांची शिकवणच ही होती की, 'आधी प्रपंच. करावा नेटका मग घ्यावे परमार्थ विवेका।।' इथे समर्थांना प्रपंच म्हणजे देह प्रपंच (ज्ञानेंद्रिय+कर्मेंद्रिय) असे अभिप्रेत आहे आणि ह्या शतकातले आधुनिक संत डॉ. नानासाहेब धर्माधिकारी हेही प्रवृत्तीपर होत. दासबोधाची शिकवण, 'क्रियेविण वाचाळता व्यर्थ आहे' त्यांनी अंगीकारली. आधी केले आणि मग सांगितले ही तत्त्वे त्यांनी निरूपणातून लोकांपर्यंत पोहोचवली.

पूर्वी शिक्षित किंवा उच्चशिक्षित लोकांमध्ये अध्यात्माच्या अभ्यासाचं आकर्षण जास्त होतं. परंतु ज्यांना खरी गरज आहे अशा तळागाळातल्या लोकांपर्यंत डॉ. नानासाहेबांनी ही शिकवण नेली, ह्या लोकांची सामाजिक नीतिमत्ता आणि शिस्तबद्धता आध्यात्माच्या आधाराने वळवणे हा नानासाहेबांच्या कार्याचा महत्त्वाचा उद्देश होता.

डॉ. नानासाहेब निरूपणाद्वारे समाजप्रबोधनाचे कार्य गेली अनेक वर्ष सातत्याने करत आले. त्यांच्या हयातीतच त्यांचे ज्येष्ठ सुपुत्र श्री. दत्तात्रेय (आप्पासाहेब) धर्माधिकारी आणि आप्पासाहेबांचे सुपुत्र श्री. सचिनदादा धर्माधिकारी यांनी हे कार्य पुढे चालू ठेवले आहे.

डॉ. नानासाहेबांचे कार्य अद्यापपर्यंत अनेक ठिकाणी बैठकींतून, निरूपणाच्या माध्यमातून चालू आहे. अडीच तासांची ही बैठक असते. बैठकीला येणाऱ्या सदस्यांची संख्या लाखोंनी आहे. बैठकींची संख्या म्हणाल तर, खरं तर नक्की आकडा सांगता येणार नाही, कारण दर सप्ताहात कुठे तरी नवीन बैठक सुरू होते. दर रविवारी लहान मुलांकरिता दीड तास बालसंस्कार मार्गदर्शन असते.

एवढ्या मोठ्या कार्यावर संशोधन करणे शक्य नसल्यामुळे, संशोधिकेने रायगड आणि ठाणे जिल्ह्याची मर्यादा निश्चित केलेली आहे. अभ्यासाचा कालखंड जन्मसाल १९२२ ते मृत्युसाल

२००८ असा आहे. म्हणून संशोधिकेने आपल्या संशोधनात महाराष्ट्रात जेथे जेथे डॉ. श्री. नानासाहेबांनी निरूपणे केली व पुढेही त्यांचे सदस्य ही परंपरा चालू ठेवीत आहेत, तेथे तेथे जाऊन जनमानसावर ह्या निरूपणांचा होणारा परिणाम पडताळून बघणे, त्याचा अभ्यास करणे आणि निरीक्षण करणे अशी ह्या संशोधनाची व्याप्ती आहे. संशोधिकेने प्रत्यक्षदर्शी पुरावा म्हणून जेथे जेथे जाण्याचे ठरविले आहे, ती महाराष्ट्राच्या नकाशात अधोरेखित केली आहेत. संशोधन करताना मुलाखती, प्रश्नावल्या, ध्वनिचित्रफिती आदींचा उपयोग करून संशोधिका आपले संशोधन पुढे नेणार आहे.

व्याप्ती : महाराष्ट्रातील रायगड जिल्हा आणि ठाणे जिल्हा. खरे तर डॉ. नानासाहेबांचे समाजप्रबोधनाचे कार्य अथांग सागरासारखे आहे. फक्त महाराष्ट्रातच नव्हे तर, संपूर्ण देशभर त्यांनी कार्य सुरू केले. मात्र प्रामुख्याने या दोन जिल्ह्यांतून त्याचा प्रारंभ झाला आहे.

संशोधनाच्या मर्यादा : ठाणे आणि रायगड जिल्ह्यांत आदिवासी, ग्रामीण आणि शहरी ह्या तीन विभागांत वर्गीकरण होते. काही काही ठिकाणी अति दुर्गम आदिवासी भाग असल्यामुळे त्या लोकांपर्यंत पोहोचण्याच्या व त्यांच्यात झालेले बदल जाणून घेण्याकरिता मर्यादा येण्याची शक्यता वाटते.

१.२.४ : सैद्धान्तिक पार्श्वभूमी

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून इतिहासाचे अध्ययन ही संकल्पना इतिहास लेखनाच्या क्षेत्रात बरीच अलीकडे, म्हणजे गेल्या सुमारे दीडशे वर्षांत उदयाला आल्याचे निदर्शनास येते.

कॉम्त याने मानवी विकासाच्या शास्त्रीय पद्धतीने अभ्यास हा विचार मांडला, आणि त्याने इतिहास व समाजशास्त्र यांची निकटता प्रस्थापित केली.

मानवी समाजाचा इतिहास ध्यानात घेता, समाजाची वाटचाल प्रगतीच्या दिशेने होते, हा सिद्धान्त वेबर मान्य करीत नाही. विज्ञानाची प्रगती म्हणजे समाजाची प्रगती नसून समाजाच्या अधोगतीचे ते कारण आहे, क्षुद्र साध्यासाठी बुद्धीचा व विज्ञानाचा वापर केला जात आहे, केवळ बुद्धिसामर्थ्य हे चांगल्या माणसाचे लक्षण नाही, आजचा माणूस वाढते औद्योगिकीकरण, भौतिकवाद व नोकरशाहीच्या सापळ्यात अडकलेला आहे. धनप्राप्तीपलीकडे त्याला उद्दिष्ट उरलेले नाही. संस्कृतीला अर्थ उरलेला नाही. समाज आतून कुजतो आहे. अशी वैफल्याची भावना वेबर

व्यक्त करतात. ह्या ऱ्हासाच्या स्थितीतून समाजाला बाहेर काढणारा एक आशेचा किरण डॉ. नानासाहेब दाखवतात, तो म्हणजे एखाद्या प्रेषिताचा किंवा आदर्श विचारप्रणालीचा उदय हा होय.

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधिकेने ऐतिहासिक पद्धती (स्थानिक, त्यातला सामाजिक इतिहास, तसेच वंचितांचा इतिहास) निरीक्षण पद्धती तर काही ठिकाणी व्यक्तिचरित्र व विश्लेषणात्मक अशा शोध पद्धती, यांचे उपयोग केले आहेत.

सबाल्टर्न ह्या संज्ञेने प्रसिद्धीस असलेला इतिहासलेखन प्रवाह भारतात विसाव्या शतकाच्या अखेरीच्या वीस वर्षांत प्रचलित झाला. डॉ. रणजित गुहा यांनी पुरस्कृत केलेल्या सबाल्टर्न प्रवाहाचा तात्त्विक आधार अन्तोनिओ ग्रामची ह्या इटालियन मार्क्सवादी विचारवंताच्या लिखाणात आढळून येतो. ग्रामची असा युक्तिवाद करतात की, आर्थिक व्यवहार सामाजिक जीवनाला आधारभूत असले तरी त्यावरील सांस्कृतिक इमलादेखील तितकाच महत्त्वाचा असतो. सामाजिक परिवर्तनाला संस्कृती गती देते व दिशा देते.

भिन्न समाजगटांतील सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक संकेतांचा, त्यांच्यामधील सत्ताकेंद्रांचा व भिन्न सत्ताकेंद्रातील परस्परसंबंधांचा, क्रिया–प्रतिक्रियांचा मार्मिक ऊहापोह ह्या लिखाणात आढळतो. वंचित गटांच्या जाणिवांचे वास्तव रूप काय आहे? त्यांची मानसिकता कशी तयार होते? त्यांच्या जाणिवा समान असतात की भिन्न? त्यांत परिवर्तन घडून येते का? परिवर्तन होत असल्यास त्यामागील कारणे कोणती? परिवर्तनात काळ व स्थळ यांचा किती संबंध असतो? असे नानाविध प्रश्न ह्या सबाल्टर्न इतिहासलेखनप्रवाहाने चर्चिले आहेत.

एखाद्या विशिष्ट प्रदेशाच्या अध्ययनामागील मुख्य हेतू त्या प्रदेशाची सखोल व सर्वांगीण माहिती करून घेणे हा असतो. एखाद्या प्रदेशात वास्तव्य करणारे लोक, तेथील भिन्न समाजगट, त्यांची जीवनपद्धती, उदरनिर्वाहाची साधने, व्यापार–उद्योग, धार्मिक व राजकीय धारणा, संस्था, कला, स्थापत्य ह्या सर्वच बाबींचा अंतर्भाव प्रादेशिक इतिहासात होतो.

प्रादेशिक इतिहासाच्या अभ्यासकाला केवळ ग्रंथालयांमध्ये अगर अभिलेखागारांत काम करून भागत नाही. तो प्रदेश पायांखाली घालून प्रत्यक्ष माहिती गोळा करावी लागते. यासाठी सर्वेक्षण पद्धतीचा वापर करून माहिती गोळा करता येते.

स्थानिक इतिहास हा प्रादेशिक इतिहासाचा अधिक सूक्ष्म प्रकार म्हणता येईल.

संशोधिकेने निवडलेला विषय ह्या दोन्ही पद्धतींशी निगडित आहे. म्हणून त्या संशोधन पद्धतींचा वापर करणार आहे.

१.२.५ : संशोधनासाठी अवलंबिण्यात येणारे पद्धतिशास्त्र आणि रचनातंत्रे प्रणाली

प्रस्तुत संशोधनासाठी व्यक्तिचरित्र संशोधन पद्धती व काही ठिकाणी विश्लेषणात्मक अशा शोध पद्धतीचा उपयोग केला आहे.

रचनातंत्रे प्रणाली

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधिका पुढील रचनातंत्रे प्रणालींचा उपयोग करणार आहे.

प्राथमिक साधने

१) **निरीक्षण पद्धती** – या तंत्रामध्ये संशोधनकर्ती अध्ययनांतर्गत आलेल्या समूहाच्या दैनंदिन जीवनात सहभागी होऊन आणि त्यापासून थोडे अलिप्त राहून त्याच्या सामाजिक आणि व्यक्तिगत व्यवहाराचे स्वतः दृष्टिनिरीक्षण करणे.

२) **मुलाखती** : मुलाखत ही सामाजिक प्रक्रिया आहे. सामाजिक विषयाच्या संदर्भात व्यक्तींच्या मनातील भावना, विचार, प्रवृत्ती, संवेग इत्यादी प्रत्यक्ष चर्चा आणि संवाद करून जाणून घेण्याचे मुलाखत हे एक तंत्र आहे. या तंत्रामध्ये संशोधिका प्रत्यक्ष संबंधित व्यक्तीशी भेटून त्याच्याशी चर्चा करणार आहे. त्यामुळे सामाजिक विषयाबाबत तथ्य संकलन करण्याचे हे एक अतिशय महत्त्वाचे तंत्र आहे.

३) **प्रश्नावली** : प्रश्नावली ही विशेष प्रकारच्या प्रश्नांची अनुसूची असून अध्ययन विषयाच्या संबंधित प्राथमिक तथ्यांना एकत्रित करण्यासाठी नमुन्यात निवड केलेल्या लोकांकडे पोस्टाद्वारा पाठविली जाते. प्रश्नावलीसोबत एक विनंती पत्र पाठवून प्रश्नावलीतील उत्तरे स्वतः लिहून पाठविण्याची विनंती केली जाते. जेव्हा उत्तरदाते विस्तृत क्षेत्रात मोठ्या संख्येने पसरलेले असतात, तेव्हा त्यांच्याशी व्यक्तिगत संपर्क करणे संशोधनकर्त्याला अशक्य असते. म्हणून संशोधिका प्रश्नावली पद्धतीचा उपयोग करणार आहे.

प्रश्नाच्या स्वरूपात प्रश्नावलीचे दोन प्रकार पडतात.

अ. संरचित प्रश्नावली : या प्रकारच्या प्रश्नावलीत संशोधकाने आपल्या अभ्यासाच्या विषयानुसार हेतू, व्याप्ती व खोली यांचा विचार करून प्रश्न विचारायचे ते कोणत्या क्रमाने विचारायचे हे ठरविलेले असते.

ब. असंरचित प्रश्नावली : काही प्रश्नांच्या संदर्भात संशोधकाला उत्तरदात्यांची मते जाणून घ्यावयाची असतात. या प्रश्नांच्या संदर्भात लिहिताना मांडणीचे स्वातंत्र्य उत्तर देणाऱ्याला असते.

४) **ध्वनिमुद्रक** : प्रस्तुत संशोधनासाठी संशोधिकेने ध्वनिमुद्रकाचा उपयोग केला आहे. त्यामुळे, डॉ. नानासाहेबांनी वेळोवेळी झालेल्या सत्कारप्रसंगी केलेल्या भाषणांतून, निरूपणांतून जाणवलेले बारकावे, शब्दोच्चारण नंतर ऐकता येते व संकलनासाठी ध्वनिमुद्रक उपयुक्त ठरतो.

५) **व्हिडिओ कॅमेरा** : व्हिडिओ कॅमेऱ्याचा उपयोग करून एखाद्या प्रसंगाचे चित्रण करून ठेवले तर संशोधन कार्यात त्याचा उपयोग करता येतो. तसेच त्याद्वारे बारीकसारीक गोष्टींच्या नोंदी करणे सहज शक्य होते.

६) **छायाचित्रे** : प्रस्तुत संशोधनासाठी छायाचित्रांचा वापरही आवश्यक ठरला.

७) **आलेखन** : आलेखनामुळे जनमताची सरासरी एक दृष्टिक्षेपात लक्षात येऊ शकते.

८) **पॉवर पॉईंटद्वारे सादरीकरण** : काही ठिकाणी आपला मुद्दा थोडक्यात, पण स्पष्टपणे मांडण्यासाठी संधोधिकेने पॉवर पॉईंटद्वारे सादरीकरणाचा उपयोग केला आहे.

९) **नकाशे** : एका दृष्टिक्षेपात संशोधिकेच्या संशोधनाची व्याप्ती लक्षात यावी अशा पद्धतीने नकाशाचा वापर संशोधिकेने संशोधनात केलेला आहे.

१०) **संदर्भग्रंथ** : संदर्भग्रंथांमुळे विविध उपविषयांवर प्रकाश पडतो. प्रस्तुत संशोधनात विषयाशी संबंधित माहिती मिळविण्यासाठी संदर्भग्रंथांचा वापर केला आहे.

११) **ध्वनिचित्रफीत व ध्वनिफीत** : ध्वनिचित्रफीत यांचे श्रवण आणि अवलोकन संशोधिकेस प्रस्तुत संशोधनात उपयुक्त ठरले आहे.

१२) **संगणक** : प्रस्तुत संशोधनास गोळा केलेली माहिती संकलित स्वरूपात ठेवून विशिष्ट वेळी त्याचा उपयोग करता यावा यासाठी व संपूर्ण प्रबंध पूर्णत्वास नेण्यास संगणक उपयुक्त ठरला.

अशाप्रकारे वरील सर्व साधनांचा उपयोग करून माहिती संकलन करण्यात आले.

प्रस्तुत संशोधनासाठी वापरण्यात आलेली संशोधन साधने



१.२.५

मुलाखतीसाठी नमुना प्रश्नावली

१) डॉ. नानासाहेबांच्या बैठकींना जाण्याचा कालावधी?

२) निरूपणाकडे आपण कसे वळलात?

३) संधी कशी मिळाली?

४) श्रवणाच्या वेळचे काही विशिष्ट अनुभव सांगावे.

५) निरूपण करताना काही अडचणी येतात का?

६) श्रवणानंतर व्यक्तीत कसा बदल घडून येतो? एखादे विशिष्ट उदाहरण सांगू शकाल का?

७) जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला का?

८) व्यसनमुक्ती श्रवणामुळे होते असे मी ऐकून आहे, पण ही तात्कालिक होते की कायमची? आणि होत असल्यास श्रवण, निरूपण आणि वैद्यकीय उपचारांचा त्यात अंतर्भाव असतो का? की फक्त श्रवणाचाच?

९) विकास वैयक्तिक की सामूहिक?

दुय्यम साधने :

वृत्तपत्रे व विविध नियतकालिकांमध्ये वेळोवेळी आलेले लेख.

ठाणे आणि रायगड जिल्ह्यांतील आदिवासी व इतर समाजाविषयी प्रकाशित झालेले ग्रंथ

सांस्कृतिक कोश, विश्वकोश, समाजविज्ञान कोश, संशोधन पद्धतीवरील विविध ग्रंथ, इत्यादी.

प्रकरण दुसरे

डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी यांचे चरित्र (जन्म ते मृत्यू) आणि कार्य

प्रकरण दुसरे डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी यांचे चरित्र आणि कार्य (जन्म ते मृत्यू) ३३–७३

विभाग	शीर्षक	पृष्ठ क्रमांक
२.१	कौटुंबिक पार्श्वभूमी	३३
२.१.१	जन्म	३३
२.१.२.	व्यक्तिमत्त्वाची जडणघडण : पिंड, ध्येय आणि कारकीर्द	३४
२.१.३	व्यक्तिमत्त्वाचे पैलू	३७
२.२	आध्यात्मिक जडणघडण	४४
२.३	ज्योतिषी	४६
२.४	कार्याचे प्रत्यक्ष योगदान	४८
२.४.१	समाजसुधारक ते सत्पुरुष	४८
२.४.२	पर्यावरण	५०
२.४.३	प्रौढ साक्षरता	५३
२.४.४	समाजात जागृत केलेली एकात्मता	५४
२.४.५	अंधश्रद्धा आणि अज्ञान निर्मूलन	५५
२.४.६	स्त्रियांना आत्मसन्मान	५६
२.४.७	हुंडा निर्मूलनाचे कार्य	५६
२.४.८	एड्स निर्मूलन	५७
२.४.९	बाल संस्कार केंद्र	५७
२.४.१०	स्त्री–पुरुष समानतेचा अधिकार	५९
२.५	मानवी धर्माचा उद्धार करून उन्नतीप्रत नेणारे शिल्पकार	६४
२.६	मनन–चिंतन मीमांसा : डॉ. नानासाहेबांनी केलेलं विवेचन	६६
२.७	अस्मितेच्या नवोन्मेषा! मानवतेच्या नीलाकांक्षा। त्रिवार वंदन तुला।।	६८
२.७.१	धर्मसंकल्पना	७०
२.८	समकालीन समाजसुधारक	७१

प्रकरण दुसरे

डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी यांचे चरित्र (जन्म ते मृत्यू) आणि कार्य

चरित्र : २.१ : कौटुंबिक पार्श्वभूमी

२.१.१ जन्म – डॉ. नानासाहेब धर्माधिकारी ह्यांचा जन्म १ मार्च १९२२ रोजी होळीच्या दिवशी जिल्हा – रायगड येथे झाला.

तात्पर्य – अवगुणांची –अज्ञान, दुःख, भ्रांती, विषयवासनांची होळी करून, समाजप्रबोधन कार्य व उपासना कळसाला पोहोचविण्यासाठी जणू त्यांचा जन्म होळीच्या दिवशी झाला असे म्हणावेसे वाटते. तसेच मराठी वर्षाचा शेवट फाल्गुन महिन्यात होतो. मग नवीन संवत्सराला सुरुवात होते. संकेत असा की, आता धर्मजागृतीचे–उपासनेचे नवीन पर्व सुरू होणार आहे. त्यांचे पूर्ण नाव, डॉ. नारायण विष्णु तथा नानासाहेब धर्माधिकारी असे होते. त्यांना दोन भाऊ व एक बहीण होती.

१३.५.१९९३ रोजी अलिबाग येथे जिल्हापरिषदेच्या सभागृहात मंत्रिमहोदय तथा जिल्ह्याचे पालकमंत्री मा. ना. आप्पासाहेब धारकर यांच्या विशेष उपस्थितीत, मा. श्री. विलासराव देशमुख महसूल राज्यमंत्री यांच्या हस्ते ती. नानांचा हजारोंच्या साक्षीने १०१ श्रीमत् दासबोध ग्रंथ, शाल, श्रीफळ व रायगड पुरस्कार सन्मानपूर्वक प्रदान करून गौरव करण्यात आला. या सत्कारप्रसंगी ती. नानासाहेबांनी आपल्या वंशावळीचा उल्लेख केला तो असा,

मूळ पुरुष धुंडिराज, पुढील परंपरा अशी :

१) श्री. धुंडिराज, २) श्री. चिंतामण, ३) श्री. गोविंद चिंतामण, ४) श्री. नारायण गोविंद, ५) श्री. विष्णु नारायण, ६) श्री. अनंत विष्णु, ७) श्री. नारायण विष्णु धर्माधिकारी, ८) श्री. दत्तात्रेय नारायण धर्माधिकारी, ९) श्री. सचिन दत्तात्रय धर्माधिकारी.



श्री. विष्णुपंत धर्माधिकारी
२.१.१.



श्री. नारायण विष्णु धर्माधिकारी
२.१.२

त्यांची ५ ते ७ एकर जमीन होती. त्यांचे मोठे बंधू शेतीच करीत होते. ७ मे १९४३ साली श्रीमती शारदामाता ह्यांच्याशी त्यांचे लग्न झाले. आयुष्यभर श्रीमती शारदामाता त्यांच्या मागे सावलीसारख्या सतत उभ्या होत्या.



२.१.३

श्री. नारायण विष्णु धर्माधिकारी ह्यांना दोन मुलं आणि तीन मुली असा त्यांचा परिवार आहे.

मुरुड हे नानासाहेबांचे आजोळ. त्यांच्या आईच्या वडलांचे नाव, श्री. वासुदेव जोशी हे होते. डॉ. नानासाहेब मूळचे देशावरचे–देशस्थ.

२.१.२ व्यक्तिमत्त्वाची जडणघडण : – पिंड, ध्येय आणि कारकीर्द :–

डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांचे शिक्षण व संस्कार आणि त्यावरील वडलांचा प्रभाव– त्यांचे प्राथमिक शिक्षण रेवदंडा येथील शाळेत झाले. ते ११वी पास होते. त्यांचे काही शिक्षण मुंबईला झाले. लहान असताना त्यांचे आवडते खेळ विटी–दांडू, आट्यापाट्या, पोहणे हे होते. त्यांची आवड संत–साहित्य वाचन, व्यायाम, प्रवचने निरूपणातून प्रबोधन ही होती. लहानपणापासूनच त्यांचा स्वभाव अतिशय समंजस होता. बालवयातच ते समर्थ रामदास स्वामींचे मनाचे श्लोक तोंडपाठ म्हणू लागले. मुलाचे पाय पाळण्यात दिसतात हे नानासाहेबांच्या बाबतीत यथार्थ ठरले. रामदास स्वामीकृत मारुती स्तोत्र, रामचरित्र त्यांना त्या वयात मुखोद्‌गत होते, परिणामी त्यांची

वाणी उपकृत झाली. समर्थांच्या स्वधर्म आणि स्वदेव या शिकवणींची ओळख झाल्याने प्रयत्न, प्रबोध, प्रचिती, निरूपण हे अध्यात्म–पैलू त्यांच्यात विकसित झाले.

पिता विष्णू अनंत धर्माधिकारी हेच त्यांचे सद्‌गुरू आणि प्रेरणास्थान होते. त्यामुळे त्यांच्याकडील बुद्धिमत्ता, नीतिमत्ता हे गुण त्यांच्यात आले. त्याचबरोबर त्यांचे वडील विविध विषयांचे जाणकार असल्याने, त्यांचे बहुमोल मार्गदर्शन नानासाहेबांना घरातच लाभले. निरूपण परंपरेचा पिढीजात वारसा डॉ. नानासाहेबांनी अखेरपर्यंत अथक परिश्रमाने आणि निःस्वार्थी भावनेने अखंड जोपासला.

नानासाहेब यांचे मूळ आडनाव शांडिल्य (शेंडे) असे होते. त्यांच्या सातव्या पिढीतील पूर्वज श्री. गोविंद चिंतामण शांडिल्य हे प्रवचन व कीर्तन यांच्या माध्यमातून धर्मजागृतीसाठी प्रबोधन करीत असत. प्रवचनकार व कीर्तनकार म्हणूनच ते नावाजलेले होते. त्या काळात उत्तम समाज प्रबोधनाचे कार्य त्यांनी चालविल्याने त्यांना 'सरखेल कान्होजीराजे आंग्रे' यांनी 'धर्माधिकारी' अशी सनद मानपत्रासह बहाल करून त्यांचा गौरव केला. येथे सरखेल कान्होजी आंग्रे यांची थोडी माहिती देणे अस्थानी होणार नाही.

सरखेल कान्होजी (तुकोजी) आंग्रे (जन्म : इ.स. १६६९, मृत्यू : १७२९)[१]

कान्होजी आंग्रे एक आदर्श नौसेनानी म्हणून नाविक दलातील जवानांना आदरणीय आहेत. भारतीय नौसेनेने त्यांचा गौरव केला आहे. खांदेरी बेट व दीपगृहास त्यांचे नाव दिल्याने कान्होजी हे आंग्रे हे नाव आंतरराष्ट्रीय नकाशावर स्थिर झाले आहे. शिवाजी महाराजांनी किनारपट्टीच्या रक्षणासाठी आरमाराची उभारणी केली. पश्चिम किनाऱ्यावरील आरमाराचे अधिपती म्हणून 'सरखेल' या पदवीसह सुभ्याच्या सनदा व अन्य सन्मान छत्रपती शाहू महाराजांनी दिले. निधड्या, शूर कान्होजींनी आपल्या पराक्रमाने मराठी आरमाराचे पर्यायाने पश्चिम सागरी किनाऱ्याचे रक्षण केले.

अशा या सरखेल कान्होजी आंग्रे यांजकडून 'धर्माधिकारी' ही पदवी प्राप्त झालेल्या घराण्यातील डॉ. नानासाहेब हे आठवे पुरुष.

---

१. सरखेल कान्होजी आंग्रे : मराठा आरमार, ले. डॉ. द. रा. केतकर, मृण्मयी ऋग्वेदी प्रकाशन, ठाणे, प्रथमावृत्ती १९९७, पृ. १५, ३० व ५९

तेव्हापासून आजपर्यंत नानासाहेबांचे घराणे धर्माधिकारी हेच नाव धारण करीत आले आहे. ती. नानासाहेबांचे वडील श्री. विष्णू अनंत धर्माधिकारी हे देखील ख्यातकीर्त प्रवचनकार होते. व्याकरण, वेद आणि ज्योतिषशास्त्राचा त्यांचा गाढा अभ्यास होता. तोच वसा डॉ. नानासाहेबांनी पुढे चालविला. शालेय विश्वात असताना चौल–रेवदंड्यात वाद–विवाद स्पर्धांमध्ये नानासाहेबांनी दाखविलेली विद्वत्तेची चुणूक त्यांच्या सामाजिक प्रबोधनातील अद्‌भुत क्रांतीच ठरली आहे. या क्रांतीचा पाया त्यांनी १९४३मध्ये त्यांच्या वयाच्या २३व्या वर्षी रचला. चार समविचारी व्यक्तींना बरोबर घेऊन विजयादशमीच्या दिवशी या कार्याची मुहूर्तमेढ रोवली.

लहान असताना, त्यांची मुंज झाल्यानंतर नानासाहेब एकदा आजोळी गेले होते. तेथे त्यांना पूजा करायला सांगितली तेव्हा देवघरात लाल वस्त्रात बांधलेले ग्रंथ बघितल्यानंतर त्यांची उत्सुकता वाढली. त्याचा खुलासा त्यांना तिथे न मिळाल्यामुळे त्यांनी घरी येऊन वडलांना विचारला. त्याच्यानंतर त्यांनी जेव्हा समाजकार्याला सुरुवात केली, तेव्हा स्त्री–पुरुष सर्वांना देवघरातील लाल वस्त्रात गुंडाळलेले ग्रंथ खुले करून दिले. ह्या कार्याकरिता त्यांना घरातून कुणाचीही साथ नव्हती. फक्त वडलांनी त्यांना साथ दिली. मुंबईला जाऊन त्यांनी ज्योतिषशास्त्राचा अभ्यास केला. कर्मकांडापासून दूर असल्यामुळे लोकांनी त्यांना विरोध केला. समाजसुधारणा व्हायला लागली, त्यामुळे ज्यांच्या–ज्यांच्या पोटावर पाय यायला लागला, त्यांनी त्यांनी विरोध केला.

डॉ. नानासाहेबांना त्यांच्या वडलांनीच विवरणाची सर्व अंगे, आध्यात्मिक निरूपणाची सर्व अंगे शिकवून निरीक्षक केलं.

फोडून शब्दांचे अंतर,
वस्तू दाखवी निजसार,
तेच सद्‌गुरू माहेर,
अनाथांचे।

(दशक–१५, समास–५, ओवी–२)

या नियमानुसार सनाथ केले.

केवळ श्रीमत् दासबोध व सद्‌गुरू चरित्रच नव्हे तर एकनाथी भागवत, तुकाराम गाथा,

रामायण, भागवत इत्यादी अनेक धर्मग्रंथांतील निरूपण शिकवलं. त्यांच्याकडूनच हे सर्वज्ञान त्यांनी आत्मसात केलं. वडलांशिवाय अन्य कोणी गुरू त्यांनी केला नाही, कारण त्यांच्या परंपरेला समाज–प्रबोधनाचं वरदानच होतं. ज्योतिष, अध्यात्म, समाजप्रबोधन हे परंपरागत आहे.

२.१.३. व्यक्तिमत्त्वाचे पैलू

आध्यात्मिक जडणघडण : धर्म व अध्यात्म यामधील मूलभूत फरक म्हणजे, अध्यात्म अथवा आध्यात्मिक म्हणजे मानवी नीतिमूल्यांची जोपासना अथवा जपणूक होय. जन्माला येताना मनुष्य धर्म सांगतो का? तशा खुणा असतात का? मरताना तरी माणूस कुठं धर्म सांगतो? मला जाळा किंवा पुरा असं कुठं म्हणतो? म्हणजे हे सारं नंतर आलंय, सोयीसाठी केलंय. म्हणजे मानवता धर्म हाच एक मुख्य धर्म, श्रेष्ठ धर्म.

धर्म स्पर्धेतून निर्माण झाले. वेगवेगळ्या धर्माची निर्मिती मनुष्याच्या बुद्धीतून झाली आहे. कारण त्या त्या धर्माचे संस्थापक आपणास ज्ञात आहेत, पण हिंदू धर्माचा संस्थापक सांगता येत नाही. एवढा तो सनातन आहे, तसे ती. नानासाहेबांचे विचार होते.

अनेक पिढ्यांपासून त्यांच्या घराण्यात अध्यात्माचा वारसा चालत आलेला आहे. डॉ. नानासाहेब धर्माधिकारी हे या परंपरेतील आठवे पुरुष. गोविंद चिंतामण शांडिल्य हे त्यांच्या घराण्यातील मूळ पुरुष.

व्याख्या

अध्यात्म – मानवी नीतिमूल्यांची जोपासना.

धर्म – धर्म म्हणजे धारणा व त्या धारणेनुसार झालेली आचार–विचार पद्धती.

संस्कृती – जीवनात जे जे अपूर्ण आहे त्याला पूर्णत्व देण्याचा प्रयत्न म्हणजे संस्कार. संस्कारामुळे समृद्ध झालेलं जीवन किंवा जीवनशैली म्हणजे संस्कृती.

धर्म हा शब्द 'धृ' (धारण करणे, आधार देणे अथवा पोषण करणे.) ह्या धातूपासून बनलेला आहे. म्हणून समाजाची धारणा ज्याने होते, समाजाचे सातत्य ज्याने अबाधित राहते, तो धर्म होय. धर्म ह्या शब्दाचा हाच व्यापक अर्थ समाजशास्त्राला अभिप्रेत आहे. समाजशास्त्राच्या दृष्टीने धर्म ही एक सामाजिक संस्था आहे.

जेथे माणसाचे आकलन अपुरे पडते तेथे माणसाला अलौकिक शक्तींचा आणि दैवबाधांचा आधार मानावा लागतो. मानव आणि अलौकिक शक्ती ह्यांच्या परस्परसंबंधाची कल्पना म्हणजे धर्म–संकल्पना होय.

संस्कृती म्हणजे एका विशिष्ट सामाजिक समूहातील सर्वमान्य विचार व व्यवहार व नीती ह्यांचे संक्रमण एक पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे होते. ह्या जीवनपद्धतीमध्ये ज्ञान, श्रद्धा, रूढी व कौशल्यांचा समावेश होतो. डॉ. इरावती कर्वे ह्यांच्या मते संस्कारपूर्ण व संस्कारमय जीवन जगण्याची देशकालानुसार असलेली रीत व जीवनमूल्य म्हणजे संस्कृती.

डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी यांना मिळालेले गौरव पुरस्कार

१३ मे १९९३ – रायगड जिल्हा परिषदेतर्फे **'रायगड मित्र पुरस्कार'**

२९ जून १९९७ – महाराष्ट्र राज्य शासनातर्फे **'महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक पुरस्कार'**

१८ डिसेंबर १९९८ – सात ग्रामपंचायतींतर्फे सत्कार.

१६ मे १९९९ – राष्ट्रीय एकात्मता क्षेत्रातील कार्याबद्दल सिरॉक इंडिया ठाणे तर्फे **'सिरॉक इंडिया पुरस्कार'**

१८ मे १९९९ – समाजप्रबोधन क्षेत्रात श्रीसमर्थ रामदास स्वामी भूषण म्हणून **'समर्थ रामदास पुरस्कार'**

१५ नोव्हेंबर १९९९ – समर्थ व्यासपीठ, पुणे तर्फे **'शिवसमर्थ पुरस्कार'**

३० एप्रिल २००० – महाराष्ट्र युवा प्रतिष्ठानतर्फे **'महाराष्ट्र गौरव'**

१७ नोव्हेंबर २००० – **'गुजराथी महाजन भूषण पुरस्कार'**

१७ डिसेंबर २००० – संतकृपा प्रतिष्ठान, पुणे यांचा **'संतश्री ज्ञानेश्वर पुरस्कार'**

२८ डिसेंबर २००० – बहिणाबाई प्रतिष्ठान, पुणे यांचा **'बहिणाबाई प्रतिष्ठान पुरस्कार'**

०१ मार्च २००२ – हिरवळ प्रतिष्ठान महाडतर्फे **'समाजभूषण पुरस्कार'**

३१ जानेवारी २००३ – शिवराज प्रतिष्ठान नागोठणेतर्फे **'शिवराज प्रतिष्ठान पुरस्कार'**

१२ मे २००३ – पिंपरी–चिंचवड महापालिकेतर्फे समाजप्रबोधनाच्या लोक–कल्याणकारी व अलौकिक कार्याबद्दल मानपत्र.

०७ फेब्रुवारी २००४ – टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे तर्फे **डी.लिट्. पदवी.**

२८ जानेवारी २००५ – पुणे महापालिकेतर्फे समाजप्रबोधन कार्याबद्दल मानपत्र.


११ डिसेंबर २००७ – महर्षी व्यास प्रतिष्ठान पुणे यांचेतर्फे खोपोली येथे **'महर्षी व्यास पुरस्कार'**

३० एप्रिल २००८ – महाराष्ट्र राज्य शासनाचा **'महाराष्ट्र भूषण पुरस्कार'** जाहीर झाला.



'महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक पुरस्कार'

२.१.४



TILAK MAHARASHTRA VIDYAPEETH

(Deemed University)

PUNE

We, the Chancellor, the Vice-chancellor, the Members of the Board of Management and the Academic Council of the Tilak Maharashtra Vidyapeeth, hereby confer the Honorary Degree of

DOCTOR OF LETTERS

on Hon'ble Shri. N. V. alias Nanasaheb Dharmadhikari at Pune, at the Convocation Ceremony held today, on the 7th day of the month of February in the year Two Thousand and Four.


In testimony thereof is set the seal of the Vidyapeeth.

February 7th, 2004

Chancellor

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे तर्फे
डी.लिट्. पदवी

२.१.५



टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

(अभिमत विद्यापीठ)

थोर समाजसेवक श्री. नारायण विष्णू धर्माधिकारी यांस

सन्मानपर 'डॉक्टर ऑफ लेटर्स' पदवी प्रदान

आदरणीय श्री. नारायण विष्णू उपाख्य नानासाहेब धर्माधिकारी,

निःस्वार्थ, निरपेक्ष समाजसेवा ही ज्या घराण्यातील अनेक पिढ्यांची परंपरा आहे, त्या घराण्यातील समाजसेवेच्या वारसा पेलत्या आपण उत्तमरित्या सांभाळले आहे.

अजाताशत्रू म्हणून ओळखले जाणारे सर्वश्रेष्ठ व्यक्तींची अशी यादी, सुमारे १०० - १५० वर्षांपूर्वी, आपल्या महाराष्ट्र विद्यापीठात पूर्वीच्या श्री. गोविंद त्रिंबक दाभोळकर (डोंबे) सर, त्यांच्या समाजकार्याच्या कार्यामुळे अल्पावधीतच ''धर्माधिकारी'' ही पदवी मिळाली. पुढे सातेरीतल्या सरपंच, सबजज्ज म्हणून आपल्या पुढारीपणी, राजर्षीपुत्र, ती सब म्हणून स्वीकारली, ती केवळ भूषण म्हणून नव्हे तर ज्ञान म्हणून!

खरोखर सर्व थरांना अभिप्रेत असलेला समाजधर्म, राजकारणधर्म, ग्रामेद्योगी सांगोपा विकासधर्म म्हणून तत्परतेने कार्यरत राहिलेले आपले पूर्वज आणि आपण यांनी ''धर्माधिकारी'' या नावाला, शोभा, औज्वल्य, सौंदर्य इतपत कसून दिलेलेले.

आपण स्वतः सर्वार्थ राष्ट्रहितासाठी आपल्यापेक्षा वरिष्ठ पातळीवरील सर्व शासकीय अधिकारी यांना सोबत घेऊन, सर्वसामान्यांच्या पायाभूत सुविधांच्या निर्माण कामात समाजाला आणि व्यक्तीजीवनाला निर्भय करण्याचे व स्वकीय देण्याची जबाबदारत क्रियाशीलता त्यांनी आचरण शक्तिली ! संपत्ति लोकबलाहून ही एक मोठी सामाजिक शक्ती असते, असा तरुणवयातल्यापासून प्रत्येक व्यक्ती निर्भयपणे जीवन जगते हे आपणही जाणता. त्यानुसार त्या त्या व्यक्तींशी आपला संबंध येतो, त्या त्या व्यक्तींना नि:स्वार्थी प्रेम करून त्यांच्या आपलेपणी संबंध साध्यपणे आणि अशा व्यक्तींचा त्यांच्या संघटनेला सक्षम निर्माण करण्याचे कार्य मोठे कार्य आपण करीत आहात. २१ लाखाहून जास्त सदस्यांचा असलेला आपला ही परिवार आपल्या कार्याची साक्ष देतो.

आपण स्वतः संतांपासून परिचितांना करून त्यांचित सत्य विचारांतून तुडुंबलेले विचारात हे आपले तुलनात्मने सगळ्या पिढ्या केलेल. आपल्या श्री वैकुंठवासी, शाळा-महाविद्यालये यात ते शिक्षण मिळत नाही, ते साध्यांचीच्या अहंतारी लोकांना आपण विचारांतून दिले आणि कल्याणकारक्या मार्ग शाश्वितात. आपल्या 'शाश्वोध' विचारांच्या कल्याला लाखोंच्या संख्येने येणारा जिल्हाबद्द जनसमुदाय पाहून आपल्या शब्दांकामध्यांचा प्रत्यय देतो.

मान्यवरांची कमत असलेल्या आपल्या मनात ''विधाने अर्ज'' प्रकटल्याने, प्रतिष्ठितांतल्यातून राहून, आपले अखिल सेवाकार्य गावागावातून, तालुक्यातालुक्यापर, जिल्ह्याजिल्ह्यापर पोचले आहे. अहंत, दुःख, भीती, कुचंबी, कुविचार, अनिष्ट चाली दूर करून भलती, श्रद्धा, उपासना यांच्यातून चांगल्या सद्भावना अंतरी असलेल्या देशाची त्याला जागीच करून देण्यासाठी, त्याच्याशिवाय तालुक्यांची जोगायला कल्याणासाठी ग्रीड शासनाला वर्ग, शासनस्कर वर्ग आपण व आपले अनुयायी चालविला. गोविंद विरंगणाद्वारे तालगावातील जनसेना सत्यत्व करणे, देवेघरनिवियेपीये अज्ञान, अंधश्रद्धा दूर करणे, स्वदेश, स्वदेव आणि स्वधर्म याबाबत जागृती पदयिर्ये यात्राही नियमित, नित्यबद्ध श्री वैठकांचे आयोजन हा आपल्या कार्यक्रमातील महत्त्वाचा भाग असतो.

समाजातील जातीयता दूर करून राष्ट्रीय एकात्मतेस पोषक विचारांचा प्रसार करण्याचे महत्त्वाचे कार्य आपण विहेले चालविले आहे. आपण अनेकांना आपल्या सेवाभावी कार्याद्वारे जीवन सुसह्यपणे व समाधानाने जगण्याचा मार्ग साधविला आहे. अनेकांच्या नैराश्यमय जीवनात अर्थ प्राप्त करून दिला आहे. नागासाठीच, आपली विस्तारी दृष्टिने, असामान्य, दूरदर्शिता, अभिनिव दिव्यशक्तीतील सूत्र समता व सामर्थ्य जागृत करतात.

आपण समर्थकांना. सन्मार्थिका,

सामर्थ्य आहे चळवळीचे। जो जे करील तयाचे।
परंतु तेथे भानसाचे। अधिष्ठान पाहिजे॥

या ओवीनुसार आपल्या लोकशिक्षणाच्या चळवळीला भानसांचे गीता सांगितलेल्या कर्म, उपासना, ज्ञान या प्रणीचे आणि भानसांकरीत ग्रंथांचे दृढ अधिष्ठान आहे. या अधिष्ठानास उभ्या असलेल्या चळवळीना ग्रीड शासना, सामाजिक एकात्मता, मानसांकरण, अंधश्रद्धा व अज्ञान निर्मूलन, स्त्री-सन्मान, हुंडा-प्रथा निर्मूलन, एडस् निर्मूलन, व्यसनमुक्ती, आदिवासी उद्धारण आणि विस्तार, अनेक शाखा - पतुव - परंपरा असलेल्या घटकुबाप्रणाले होऊन, लाखो लोकांना आसरा देत आहे.

आजच्या मागुद सन्मतीत, विसवतीत, सन्मर्गी जाऊन, त्यातून सुखी जीवन जगता यावे यासाठी आपण ''पिंडा करिते विश्वाची'' या समर्थांच्या उक्तीनुसार प्रत्यक्षातील आपला, स्वतःकेंद्रभ रमले-गांजलेले, भयग्रस्त, चिंताग्रस्त इतकेच नव्हे तर दुसऱ्यांनुसुद्धा आपल्या सहवासात येऊन स्वतः च्या अंतरात्म्याच्या अतितत्वाची, सामर्थ्याची ओळख करून घेऊन सुप्त कृतिशील सोबत्यांचा अनुभव घेऊ शकतात. ते करण्यासाठीच तुम्हाला दिलेली, स्वसंपन्नतूर्ण अपोहरणीय असत भागू आहे.

श्री समर्थांचा महंत हा आध्यात्मिक क्षेत्रातील लोकनेता असतो.

'राखो जाणे नीतिन्याये। न करी न करवी अन्याये।
कदीना उपरणी उपाये। कर जाणे॥
ऐसा पुरुष पाहतेचा। तोचि आधार महतांचा।
याम म्हणे राघवाचा। पुरु भावा॥''

असा 'महतांचा आधार' असलाऱ्या राजदासी संतांचे नि:स्पृहता, अलिप्तपणा, निष्कामता, नि:स्वार्थीपणा आणि सेवाभाव हे गुण म्हणजे पंचप्राण असतात. जनसेवा आणि त्याचबरोबर निर्विकल्प उपासना करणारा महंत सोडा उद्योगशील आणि परोपकारासाठी धंदानाम्ने झिजणारा असली. नानासाहेब, महंतांची ही लक्षणे आपल्या ठिकाणी समर्थपणे प्रकट झाली आहेत. ही समर्थांना अभिप्रेत असलेले कार्य आपण समर्थपणे करीत आहात. हे करीत असतानाच प्रपंच आणि परमार्थ, अध्यात्म आणि व्यवहार, उपासना आणि उपकार याचा सुरेख संगम आपल्या जीवनव्यवहारात दिसतो.

आपल्या कार्याची व्याप्ती विशाल आहे. ते कुणा एका धर्मापि, जातिपंथाचे, संप्रदायाचे नाही. तेअखिल मानवजातीच्या शाश्वत, चिरंतनाची कल्याणाचे आहे.

अखिलभारतीच्या साध्यस्तरावर समाजाचे मनोबल वाढविण्याचे आपण गेली ६२ वर्षे चालविलेले हे कार्य सोपे नाही. अनेकांना ठेच, अनेकजणांची निंदा, टोपणनावे ठेवून, शारीरिक हालअपेष्टा सोसत, आपण हे चालू ठेवले आहे. अन्नत्र, अध्यात्म, ब्रह्मपान, भेदाचा वारे हवाहत बनव शाळा, संस्थापनी, बागबन, कर्तव्यदक्ष समाजसेवा त्यात करण्याचे आपले काम केवळ महाराष्ट्रापुरते मर्यादित नाही. गुजरात, मध्यप्रदेश, गोवा, कर्नाटक, सिक्किम, तिळाई. राज्यात सर्वत्र परिचितांती ते चालू आहे.

आपल्या कार्यामुळे आपल्याला अनेक मान-सन्मान प्राप्त झाले आहेत, त्यांचे हे मान-सन्मान आपल्यामुळे सन्मानित झाले आहेत. १९९६ साली 'राष्ट्रभूषण पुरस्कार', १९९६ साली 'महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक पुरस्कार', १९९८ साली 'श्री सदगुरु ताराबाई स्मारणी पुरस्कार', १९९९ साली दिल्ली इंडिया या राष्ट्रीय स्वातंत्र्यवीर संस्थेचे मिळालेला 'विशेष राष्ट्रीय एकात्मता पुरस्कार' यासोबत 'वीरविक्रमार्क पुरस्कार' (१९९९), 'संत श्री ज्ञानेश्वर पुरस्कार' (२०००), 'जीवनव्रती प्रतिष्ठान पुरस्कार' (२०००), 'गुजरायी महाराज पुरस्कार' (२०००), 'महाराष्ट्र गौरव पुरस्कार' (२०००), 'समाजभूषण पुरस्कार' (२००१), 'शिवराज प्रतिष्ठान पुरस्कार' (२००३), पिंपरी-चिंचवड महापालिका महापुरस्कार (२००३) इ. त्यातील काही पुरस्कार आहेत. आपल्या या लोकोत्तर जीवित कार्याचा गौरव व्हावा म्हणून, तसेच संस्थान परिवारांची आपली तळमळ, आपली पवित्र आणि त्यातून उभी राहिलेली लोकबलाढ्यता पाहून पंढरपूर येथे, आपल्या सामाजिक अलौकिक प्रसादाचे व्यापी संस्थेचे हेतूने, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ आपल्याला डी. लिट्. या पदवीने सन्मानित करीत आहे.

आदरणीय नानासाहेब, आपल्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वामागे आपली उत्तमतम आहेत. आपण शतायुषी व्हावे आणि आपल्या मार्गदर्शनाचा परिसस्पर्श लाभून भविष्यातही अनेकांचे जीवन उजळून निघावे, हीच परमेश्वर चरणी प्रार्थना!

पुणे
७ फेब्रुवारी २००४

(शंकरराव चव्हाण)
कुलपती

२.१.६


टिळक मह
मा. डॉ. राम ताकवले

२.१.७


विद्या बोधकरी यशः शुद्धकरी
विद्या गुरूणां गुरुः
TILAK MAHARASHTRA VIDYAPEETH
PUNE
DEEMED UNIVERSITY
ESTD:1921
◆ दि. ७ फेब्रुवारी २००४ ◆
मा.श्री. ना. वि. तथा नानासाहेब धर्माधिकारी

२.१.८



महाराष्ट्र शासनाच्या वतीने परमपूज्य तीर्थरूप श्री. नाना,
अभिनेत्री जया बच्चन यांच्या शुभहस्ते पुरस्कार स्वीकारतांना.
...कायम लक्षात ठेवण्याजोगा एक सुवर्णक्षण!

२.१.९

डॉ. नानासाहेबांनी अशा सर्वांच्या हृदयांतील भावना जपण्यासाठी हे सत्कार व पुरस्कार विनम्रपणे नको असतानाही स्वीकारले. पण प्रत्येक प्रसंगी अत्यंत नम्रतापूर्वक आवर्जून डॉ. नानासाहेब म्हणत, **'असे सत्कार व्हावेत किंवा पुरस्कार मिळावेत म्हणून मी हे कार्य उभे केलेले नाही, तर अनेक दुःखीकष्टी, रंजल्या-गांजल्या व उपेक्षित लोकांना सन्मानाने व समाधानाने जगण्याचा सुखाचा मार्ग दिसावा यासाठीच माझ्या कार्याचा हा प्रपंच उभा केला आहे.'**

२.२ आध्यात्मिक जडणघडण – रेवदंडा (जि. रायगड) येथे 'श्रीसमर्थ प्रासादिक आध्यात्मिक सेवा समिती'ची ८ ऑक्टोबर १९८३ साली स्थापना करून त्यांनी आपल्या कार्याला प्रारंभ केला. म्हणजे शके १९६५ सुभानुनाम संवत्सर, श्रवण नक्षत्रावर, आश्विनशुद्ध विजयादशमीस, शुक्रवारी 'आध्यात्मिक सेवा' या शब्दाचा अर्थ, आज अनेक प्रकारची सेवा जगात उपलब्ध आहे. अध्यात्म सांगणारे- शिकवणारेही आहेत. मात्र समर्थांचा दास होऊन आध्यात्मिक सेवा करणारे, म्हणजे लाखोंना आत्मिक बळ प्राप्त करून देण्यासाठी तन-मन झिजविले, अशी सेवा करणारे नानासाहेब होत.

'समिती' या शब्दांतील अर्थ असा, सम + इति. इति म्हणजे इति श्री = शेवट. मात्र नानासाहेब असे म्हणतात की, इति-श्री म्हणजे शेवटातून पुन्हा सुरुवात. शेवट किंवा अंत नव्हे. मनुष्यप्राणी जिवंत असेपर्यंत श्रवण सतत घडले पाहिजे. त्या श्रवणाला अंत असता नये. म्हणून 'इति' नंतर श्री म्हणजे पुनरारंभ. अभेद भक्तीतून ईश्वराशी समरस एकजीव व्हावा अशी तळमळ. अवघ्या पाच समर्थ सेवकांच्या सहयोगातून समितीच्या माध्यमातून, दासबोधाच्या निरूपणाच्या बैठका नानासाहेबांनी गावोगावी सुरू केल्या. पाहता-पाहता डॉ. नानासाहेबांच्या वाणीने संपूर्ण महाराष्ट्र आपल्या निरूपणाद्वारे पिंजून काढला. गावागावांतील माणसामाणसांत मानवतेचा चैतन्यविचार जागृत होत गेला. आज महाराष्ट्रातील खेडे, गाव, वाडी, वस्त्यांमधून श्री समर्थांच्या हजारो बैठका सुरू आहेत. कर्नाटक, गुजरात, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, दिल्ली या राज्यात तर अमेरिका, ऑस्ट्रेलिया, दुबई आदी परदेशांत अशा बैठकांच्या माध्यमातून नानासाहेबांचे कार्य निरपेक्ष भावनेने (१४-०३-२०१३ पर्यंतची आकडेवारी *९५० स्त्रिया व *१२५० पुरुष) निरूपणकारांच्या द्वारे सुरू असून समर्थ सदस्य जगभर पसरलेले आहेत. वयाच्या तेविसाव्या वर्षी नानासाहेबांनी सुरू केलेल्या या कार्यामुळे, अनेकांच्या जीवनातील अंधार, दुःख, निराशा, अज्ञान दूर झाले. त्यांचे जीवन प्रकाशमय करण्यात ते यशस्वी झाले.

अनेक प्रकारचे संतवाङ्मय उपलब्ध असताना, केवळ सर्वांना कळेल, आकलन होण्यास अडचण राहणार नाही याच हेतूने त्यांनी 'दासबोध' या ग्रंथाची निवड निरूपणासाठी केली. धर्मविरहित समभावासाठी सामान्य माणसाला समजण्यास सोपा आणि तरीही अर्थवाही असा 'दासबोध' हा ग्रंथ महत्त्वाचा वाटल्याने त्याची निवड त्यांनी केली. धर्म, काम, मोक्ष याचा नेमका अर्थ सर्वसामान्यांच्या मनात रुजविण्यासाठी 'ज्ञानेश्वरी'चे निरूपण त्यांनी केले. मानवता हा धर्म, मनुष्य हा देव आणि श्रद्धा ही उपासना हे व्रत मानून मानसिक उत्कर्ष करणे, हा उद्देश साधण्याच्या हेतूनेच दासबोध, ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत हे ग्रंथ मांडले.

दासबोध आणि श्रीसद्गुरुचरित्राची सुरुवात श्रीमंगलाचरणाने केली आहे. दोन्हींमध्ये गुरु–शिष्य संवाद आहे. तसेच ग्रंथात मुख्यतः पुढील सात भाग आहेत.

१) सामाजिक प्रबोधनाचे सामर्थ्य

२) मानवी नीतिमूल्यांची जोपासना करण्याची शिकवण

३) राजकारण, धर्मकारण, अर्थकारण

४) ज्ञान, कर्म, उपासना यांची शिकवण

५) स्वदेश, स्वधर्म, स्वदेव याची ओळख

६) 'आता श्रवण केलियाचे फळ। क्रिया पालटे तात्काळ' या नियमाने श्रवणाचे महत्त्व या ग्रंथांमध्ये विशद केले आहे. कर्मकांडात अडकून न राहता मनुष्य श्रवणाकडे वळावा हा उदात्त हेतू यामध्ये आहे.

७) या ग्रंथांच्या श्रवणाने मनुष्य निरीक्षक बनतो, दैववादी राहत नाही. सुज्ञ होतो, विवेकी, नम्र होतो.

विश्वाला गवसणी घालून अखिल मानव जातीचे कल्याण करणारे हे ग्रंथ आहेत. दासबोधात प्रपंच व परमार्थ यांचे सर्वांगीण विवरण आहे, तर श्रीसद्गुरू चरित्रात संसार–प्रपंच–परमार्थ यांतील विवरण आहे. विश्वाला सुखी–समाधानी करणारे हे ग्रंथ आहेत, म्हणून हे ग्रंथ निरूपणासाठी निवडावे अशी डॉ. नानासाहेबांची धारणा होती.

२.३ ज्योतिषी :– डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांनी मुंबईला येऊन ज्योतिषशास्त्राचा अभ्यास केला होता. ज्योतिष हा त्यांचा व्यवसाय होता, अजूनही त्यांच्या कुटुंबीयांत तो चालू आहे.

* एका मुलाखतीत डॉ. नानासाहेब म्हणतात, ''ज्योतिष हा आमचा व्यवसाय आहे, पण त्याआधारे आम्ही कोणाला घाबरवत नाही, उलट धीर देतो. शनीची साडेसाती आहे असे सांगत नाही, तर साडेसाती म्हणजे शनीचं ऑडिट, या ऑडिटमुळे जीवनातल्या चुका कळतील. सुधारणा करता येईल.' साडेसाती आहे म्हणजे शनिवारी शनीला तेल ओतत राहा असे सांगत नाही. ते म्हणतात, 'आम्ही सर्वांना सांगतो, मानव म्हटला म्हणजे रात्रंदिवस युद्धाचा प्रसंग आहेच. आत्मविश्वास डळमळीत न करता उभे रहा, निर्बल होऊ नका, कारण मानवयोनी किती श्रेष्ठ आहे! ते पुढे म्हणतात, 'मला जे पटत नाही ते मी पटवूनही घेत नाही. गणपती दूध पितो हे मी कबूलच करणार नाही. कारण ज्याला देह, इंद्रिय, प्राण नाही अशी निर्जीव वस्तू खाऊपिऊ शकतच नाही. हे त्रिकालबाधित सत्य आहे.' दासबोधात समर्थांचे एक वचन आहे.

नासे अज्ञान दुःख भ्रांती।

शीघ्रची येथे ज्ञानप्राप्ती।

ऐसी आहे फलश्रुती।

इये ग्रंथी।। (दशक–१, समास–१, ओवी–३०)

दुःख कशामुळे होते तर अज्ञानामुळे, मग कुणीतरी बुवा शोधावा लागतोच. ते म्हणतात, 'आम्ही अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य करीत नाही. कारण ते पिंडातलं अज्ञान आहे आणि ते श्रवणातून नाहीसे करता येते. म्हणजे अंधश्रद्धेचा प्रश्नच येत नाही. भोंदू बाबांच्या मागे माणसांनी का जावे? एकाला दुसरा धरून नेतो, निर्जीव वस्तू कधी आपलं रक्षण करते का? घरात काठी आहे, पण साप मारायचा कसा, हे माहीत असायला पाहिजे.

कोयनेचा भूकंप झाला, तेव्हा सर्व नगरी हलली. शेकडो लोक सकाळीच त्यांना विचारायला आले तेव्हा त्यांनी त्यांना इतकेच सांगितले, 'मालकच जर दुरुस्ती करण्यासाठी आला असेल

---

* 'दैनिक कृषिवल' मुलाखत – संपादक : एस्. एम. देशमुख (१५ मार्च १९९९).

तर कोण काय करणार?' हे कधी थांबेल असे विचारले असता ते म्हणाले, 'आपण तळ्यात दगड टाकला तर कंपने निर्माण होतात आणि हळूहळू कमी होत बंद होतात. तसे ते आहे. जपानमध्ये रोज भूकंप होतात, इथे एकदा झाल्यानं भयभीत कां होता? मालक (परमेश्वर) दुरुस्ती करताना दगड हलवितो. त्याचा दगड किती प्रचंड असणार? या चैतन्यशक्तीचं ते कार्य आहे. दुसरी एक पिशाच्चशक्ती आहे, म्हणजे भुतेखेते नव्हेत तर अष्ट शत्रू हीच आठ भुते.'

ती. नानांनी कधीही पौरोहित्य केले नाही. ते म्हणत, 'भटजींचं काम मी करत नाही. मी कर्मकांडाच्या विरोधात आहे. होम कर, शांती कर असं मी सांगणार नाही.'

'अंधश्रद्धा' हा शब्दच त्यांना आवडत नसे,

शुभं करोति कल्याणं। आरोग्यं धन संपदा।

शत्रुबुद्धी विनाशाय। दीप ज्योती नमोस्तुते।

या श्लोकाद्वारे नानांनी एक महान संदेश दिला. तो असा – अंतरीचा विवेकरूपी दीप प्रज्वलित झाल्याशिवाय, शत्रुबुद्धी, म्हणजे आठ शत्रू (अष्ट–विकार) कमी होणार नाहीत. ते कमी झाल्याशिवाय आरोग्य म्हणजे उत्तमस्थिती, धनसंपदा म्हणजे नम्रता, सहनशीलता, संयम, शांती, समाधान प्राप्त होणार नाही आणि हे जोपर्यंत जुळून येत नाही, तोपर्यंत शुभंकरोती म्हणजे मनुष्य सत्कर्म करणार नाही आणि मानवजातीचं कल्याण होणार नाही.

निष्कर्ष : ह्यावरून असे लक्षात येते की, डॉ. नानासाहेबांचा ९९% विश्वास प्रयत्नवादावर, व एक टक्का नशिबावर होता. आपला व्यवसायही ते सचोटीने करीत होते. इतर कोणाकडे गेल्यावर साडेसाती वगैरे सांगितले की, माणूस तिथेच अर्धा खलास होतो. आपण बुद्धिनिष्ठ निरीक्षक झालो म्हणजे कळेल.

त्यांचे कार्य, **अज्ञानमूल हरणं। जन्म कर्म निवारणं।** असे आहे.

२.४ कार्याचे प्रत्यक्ष योगदान :

२.४.१ समाजसुधारक ते सत्पुरुष

मानवास भक्त करणाऱ्या आणि त्याला त्याचे मानवी जीवन असह्य करणाऱ्या समस्या या अन्य कुणी निर्माण केलेल्या नाहीत तर, त्या सर्व समस्या मानवानेच निर्माण केल्या आहेत. एका मानवाची समस्या ही दुसऱ्या मानवाचे अस्तित्व अबाधित राखण्यासाठी कारणीभूत ठरत असते. हा निसर्गनियमच आहे. जोवर मानवतावादी दृष्टिकोनाचा समतोल असतो, तोपर्यंत सारे कसे सुरळीत असते. पण जेव्हा यामध्ये असमतोल निर्माण होतो त्यावेळी मानवी मूल्यांच्या अस्तित्वाचाच प्रश्न निर्माण होतो.

आधुनिक संदर्भात दासबोधाच्या सोप्या मौखिक निरूपणातून विकारी मनांची मशागत करून, निर्व्यसनी समर्थ समाजाचे स्वप्न सत्यात उतरविण्यात यशस्वी झालेले ज्येष्ठ निरूपणकार, डॉ. नानासाहेब धर्माधिकारी अनेकांसाठी कल्पवृक्ष ठरले.

मनाच्या सुसंस्कारातून मानवी समस्या कायमस्वरूपी दूर करण्यासाठी मानवी मनास आवश्यक वैचारिक ताकद समर्थ रामदासस्वामींनी चार शतकांपूर्वीच मानवास दिली, परंतु त्याचा आधुनिक काळातील मानवी मनास विसर पडला. आपल्याच संतांचे विस्मृतीत गेलेले ते अमर विचार, सोप्या भाषेत सर्वसामान्य मानवास सांगण्याचा आपण प्रयत्न केला. वेगळे असे काहीच केले नाही, असे ज्येष्ठ निरूपणाकार नानासाहेब खुल्या दिलाने सांगत असत. परंतु या विचारांतून ज्यांच्या आयुष्यात आमूलाग्र बदल झाला अशा लाखो कुटुंबांसाठी नानासाहेब सत्पुरुषच ठरले, तर सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेचे ते आधुनिक यशस्वी सूत्र बनले.

धर्माची संकल्पना : नानासाहेबांनी स्वधर्म, स्वदेश व स्वदेव ह्यांची शिकवण दिली. 'स्वदेश' म्हणजे आपल्या आईच्या उदरात घडविला गेलेला आपलाच देह होय. 'स्वदेव' बाबतची शिकवण देताना ते सांगतात, 'आपल्या संपूर्ण देहाला जी आंतरिक चैतन्यशक्ती चालवते ती शक्ती म्हणजेच आपला स्वदेव होय. 'आज मनुष्य देहसुख व भौतिक सुखांच्या मागे धावतो आहे. ही सुखे आवश्यक नसली तरी या धावपळीत त्यात संतुलन व समन्वय साधणाऱ्या विवेकाची प्रत्येक माणसाला गरज आहे, हे विचार नानांनीच निरूपणातून दिले.

मानवता धर्माचे संस्कार घडविण्याचे सामर्थ्य या श्रवणभक्तीत आहे. आपले अंतरंग आमूलाग्र

बदलविण्याचे सामर्थ्य या श्रवणात आहे. सहजगुणांचा नाश करून सद्गुणांचे रोपण करणारी ही माती आहे. या श्रवणाच्या भक्तीतूनच आपली चंचल वृत्ती निश्चल व संथ होते. विषयवासनांचे काहूर थंडावते. अनेक समस्यांचे मूळ आपल्या मनोव्यापारामध्ये आहे. श्रवणातून बेलगाम व नाठाळ मनाला लगाम घातला जातो, असे विश्लेषण श्री समर्थांनीच केले आहे. म्हणून श्रवणाच्या माध्यमातून माणसाची वृत्ती व मनाची घडण निकोप व निरोगी होते. आंतरिक श्रीमंती वाढून आपले मन हे 'श्रीमन' होते. श्रवण माध्यमातून मानसिकता निकोप झाली की, आंतरिक समाधान व तृप्तता अनुभवता येते. अर्थात समर्थ श्रवण देणारी व्यक्ती अत्यंत निरपेक्ष, निष्काम व निःस्पृह भूमिकेत असणे आवश्यक आहे. तसेच श्रवण करणारी व्यक्ती श्रवण संस्काराखाली राहणे आवश्यक आहे. श्री समर्थ या श्रवणभक्तीचे महत्त्व विशद करताना म्हणतात की, आपल्या महद्भाग्याने संतपरंपरेचे श्रवण मिळते आहे. ते अतिशय नम्रतेने, आदराने, सावधतेने व कृतज्ञतेने अविरत करणे आवश्यक आहे. श्री समर्थांनी दाखविलेल्या प्रक्रियेचा व मार्गाचा अवलंब नानासाहेबांनी समाजप्रबोधनासाठी श्रवणभक्तीच्या माध्यमातून केला. १९४३पासून संतवाङ्मयाच्या श्रवणातून समाजाचे प्रबोधन करता करता आज संपूर्ण समाजमन घडविले. अत्यंत निष्काम व निरपेक्ष भूमिकेत त्यांनी हे कार्य केले आहे.

अर्थात श्रवणसंस्कार घडवायचे तर ते एका दिवसाचे काम नाही. काही विशिष्ट कालावधीपुरतेसुद्धा हे कार्य मर्यादित ठेवता येत नाही. हे अखंडपणे चालले पाहिजे. म्हणून श्रवणातूनच संस्कार घडविणारी कायमस्वरूपी व्यवस्था असली पाहिजे. ही व्यवस्था म्हणजे श्री समर्थ बैठक. दर आठवड्यात ठरलेल्या निश्चित वारी व वेळेत सर्व श्री सदस्य एकत्र येतात व श्रवण करतात. यालाच श्री समर्थ बैठक म्हटले जाते. श्री समर्थ बैठक ही निरूपणातून श्रवण, मनन व निजध्यासाचे प्रभावी माध्यम आहे. यातूनच मानवाला ज्ञान, वैराग्य व सामर्थ्याची प्राप्ती होऊन प्रचितीतून अंतःकरण निर्मळ होते. यासाठी नियमित वेळापत्रक असते. पुरुष, महिला व बालवर्ग अशा तीन श्री समर्थ बैठका त्यांच्या सोयीनुसार स्वतंत्ररीत्या करण्यात आल्या आहेत. श्री समर्थ बैठकीत जसे नियोजित वेळेवर श्रवणसंस्कार सुरू होतात. तसेच ते नियोजित वेळेवर आटोपतील असा कटाक्ष पाळला जातो. बैठकीतील हे श्रवणसंस्कार विनामूल्य असले तरी शिस्तीबाबत मात्र कोणतीही तडजोड करण्यात येत नाही. अर्थात ही शिस्त लादलीदेखील जात नाही. प्रत्येक श्री सदस्याला आपले हित कळते म्हणून प्रत्येकाने ही शिस्त स्वेच्छेने व शांतपणे स्वीकारली आहे. या बैठकीमध्ये बसून श्रवण केल्यावर प्रत्येकाच्या अंतरी मानवताधर्माची व

मानवी नीतिमूल्यांची बैठक घातली जाते. मनुष्य खऱ्या अर्थाने जागा होतो. त्याचे मन जागे होते. तो स्वतःशीच प्रथम प्रामाणिक होतो आणि त्याला मानवधर्माच्या आचरणाचा ध्यास लागतो. या निरूपण बैठकांमध्ये समर्थ विचारांसोबतच दैनंदिन सामाजिक समस्यांचा ऊहापोह देखील जाणीवपूर्वक करण्यात येतो. यामध्ये व्यसनमुक्ती, पर्यावरण, महिला अत्याचार, भ्रूणहत्या, शिक्षण, सामाजिक आरोग्य आदी विषयांचा समावेश असतो.

२.४.२ : पर्यावरण :

पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपण करणे अत्यावश्यक आहे. हा विचार जागतिक पातळीवर मान्य केला गेला परंतु त्यास जनसामान्यांचा जो प्रतिसाद अपेक्षित होता, तो मात्र मिळत नव्हता. मानवाच्या मनाने एखादा विचार प्रामाणिकपणे स्वीकारला तर तो वास्तवात उतरण्यास वेळ लागत नाही, याची प्रचिती गेल्या दहा वर्षांपूर्वी याच रायगड जिल्ह्यात पाहायला मिळाली. रायगडचे तत्कालीन जिल्हाधिकारी भास्कर वानखेडे यांनी हाती घेतलेल्या वृक्षारोपण मोहिमेचा स्वीकार श्री समर्थ बैठकीत मांडला गेला. वृक्षारोपण करून ते वृद्धिंगत करणे हे मानवाच्या अस्तित्वासाठी अत्यावश्यक आहे, अशी भूमिका नानासाहेबांनी मांडली. या वृक्षारोपण मोहिमेचा शुभारंभ जिल्हाधिकारी वानखेडे यांच्यासमवेत स्वतः एक झाड रेवदंडा येथे लावून करून दिला. रायगड जिल्हा प्रशासनास ५० हजार विभागांच्या माध्यमातून जिल्हाभर अशी अपेक्षा होती. त्याकरिता ५० हजार वृक्षरोपे सामाजिक वनीकरण विभागाच्या माध्यमातून जिल्हाभर तयार ठेवण्यात आली होती. जिल्ह्यातील हजारो श्री सदस्य या वृक्षारोपण मोहिमेत सहभागी झाले. आणि काय! ही ५० हजार रोपे सकाळच्या एका तासातच लावून झाली. रायगड जिल्हा प्रशासनासमोर मोठा प्रश्न उभा राहिला. अखेर शेजारच्या ठाणे आणि रत्नागिरी या जिल्ह्यातून ट्रक मागवले. रोपे अन्य जिल्ह्यांतून आणून रोपणासाठी उपलब्ध करून देण्यात आली. दिवसभर रायगड जिल्ह्यात सुरू असलेल्या वृक्षारोपण मोहिमेच्या प्रतिसादाचे वृत्त ठाणे, रत्नागिरी, सातारा, सांगली आदी जिल्ह्यांत पोहोचले आणि तेथेही श्री सदस्यांनी तात्काळ वृक्षारोपणाची मोहीम हाती घेतली. संध्याकाळ झाली, जिल्हाधिकारी वानखेडे थकूनभागून आपल्या कार्यालयात आले. जिल्ह्यातील सर्व तहसीलदारांकडून आजच्या वृक्षारोपणाचा अहवाल मागविण्यास त्यांनी सांगितले. एक एक तहसीलदार फॅक्सवर अहवाल पाठवू लागला. जिल्ह्यातील सर्व म्हणजे १५ तहसीलदारांचे अहवाल प्राप्त झाले. वृक्षारोपणांच्या आकड्यांची बेरीज झाली. बेरजेच्या आकड्यांवर जिल्हाधिकाऱ्यांसह कुणाचा विश्वास बसेना, कारण तो बेरजेचा आकडा होता १३ लाख. पुन्हा फोनाफोनी झाली आणि

आकडा १३ लाखच असल्याची खातरजमा झाली. एका दिवसात १३ लाख वृक्षलागवडीचा हा विक्रम, संपूर्ण राज्यातील पहिला विक्रम झाला. माणसाने मनापासून ठरवले आणि त्यास श्री समर्थ बैठकीसारखे माध्यम गवसले तर काय घडू शकते याचे हे मूर्तिमंत उदाहरणच म्हणावे लागेल. एक वर्षानंतर या १३ लाख वृक्षलागवडीचे काय झाले, याचा लेखाजोखा जिल्हा प्रशासनाने घेतला असता, त्यांपैकी ९० टक्के झाडे सुस्थितीत असून वृद्धिंगत होत असल्याचा अहवाल प्राप्त झाला. ह्या प्रत्येक वृक्षामध्ये आपल्या सद्गुरूंच्या स्मृती असल्याने वृक्ष निश्चितपणे वाढला पाहिजे, याची काळजी श्री सदस्यांनी घेतली.

आज समाजाच्या खंडप्राय अवस्थेचे प्रमुख कारण मानवनिर्मित भेद हे आहे. धर्म, वर्ण, जाती, पंथ, समुदाय, प्रांत, भाषा अशा अनेक प्रकारांनी मानवी समाजाचे विघटन केले आहे. काही विशिष्ट कारणांसाठी व विशिष्ट वेळी हे आवश्यक असले तरी भेदाभेद अमंगल! या भेदांमुळे मतभेद विकोपाला गेले आहेत. म्हणून प्रत्यक्षात भांडण, तंटे, मारामाऱ्या, दंगली, लढाया, जाळपोळ, परस्परांमध्ये भेदभाव, द्वेष, मत्सर, तिरस्कार इत्यादी बाबींचा अतिरेक झालेला दिसतो. आपल्याकडे सामाजिक एकतेबाबत अनेक उपाय सांगितले जातात. यावर चर्चासुद्धा होतात. तथापि सामाजिक ऐक्याचा खरा अर्थ कोणाला कळलेला नाही, ही वस्तुस्थिती आहे. माणसा–



२.४.२

माणसांमधील भेद मिटवून टाकण्यासाठी उपचारात्मक उपाय एकच आहे. तो म्हणजे संतवाङ्मयाचे श्रवण. या श्रवणाच्या माध्यमातून प्रत्येक मनुष्याच्या लक्षात येते की, सर्वांची शरीररचना एकसारखीच आहे. या शरीरात वाहणारे रक्तसुद्धा सारखेच आहे. मानवता धर्माची शिकवण अंतरी रुजली की, बाह्य भेदांवर सहजपणे मात होते आणि साहजिकच आपापसांत प्रेमभाव, जिव्हाळा, आपलेपणा हे उत्तम गुण जोपासले जातात. व्यक्तिपरत्वे मनुष्याच्या क्षमतांमध्ये फरक होऊ शकतो, परंतु मानव म्हणून जगण्याचा प्रत्येकाला सारखाच अधिकार आहे, ही जाणीव वाढीस लागते. हा विचार समर्थ बैठकांच्या माध्यमातून सांगितला जातो. रायगड जिल्हा, 'महात्मा गांधी तंटामुक्त गाव' मोहिमेत राज्यात सर्वप्रथम आहे. त्याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे या मोहिमेस नानासाहेबांचे सामर्थ्य लाभले आहे. तंटामुक्ती संदर्भातील निरूपण या समर्थ बैठकांमधून हजारो जनसामान्यांना लाभले, परिणामी तंटामुक्तीच्या विचारास मोठी सकारात्मकता रायगड जिल्ह्यातील गावागावांत प्राप्त झाली. ग्रामस्तर ते जिल्हास्तरापर्यंतच्या तंटामुक्त समित्यांचे अनेक श्री सदस्य आज सक्रिय सदस्य बनले आहेत. त्याच्या माध्यमातून तंट्यांतील सामोपचार आणि समेट मोठ्या प्रमाणात घडून आल्याचे रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक प्रताप दिघावकर सांगतात, 'तंटामुक्त गाव समित्यांच्या माध्यमातून रायगडमधील सुमारे ८०० गावे गावठी दारूमुक्त झाली. यामागे बैठकांमध्ये व्यसनमुक्ती संदर्भात होणारे निरूपण महत्त्वपूर्ण ठरले. जनसामान्यांमध्ये बैठकांच्या माध्यमांतून जे परिवर्तन झाले आहे. त्यामध्ये आत्मशिस्तीचा प्रथम क्रमांक आहे. नानासाहेबांचे निरूपण, व्याख्यान व सत्कारसोहळे ज्या ज्या वेळी झाले, त्यावेळी कधीही पोलिसांना कोणताही ताण सोसावा लागला नाही. १०–१० लाखांचा जमाव असतो, परंतु कधीही कायदा व सुव्यवस्था बिघडल्याचा प्रसंग संपूर्ण राज्यात कुठेही घडला नाही. अत्यंत शिस्तीने, मानवतावादी दृष्टिकोनातून श्री सदस्यच पोलिसांची भूमिका बजावताना नेहमी दिसून येतात. कार्यक्रमांपूर्वी आठवडाभर आधीपासून स्वेच्छेने श्रमदान करण्यासाठी हजारोंच्या संख्येने श्री सदस्य पोहोचतात.

केलेल्या पुण्यप्रद कामाचा हिशेब ठेवायचा नाही, या सूत्रामुळे बैठकांच्या माध्यमातून व्यसनमुक्त झालेल्या लाखो जनसामान्यांची आकडेवारी उपलब्ध नाही, मात्र व्यसनमुक्तीमुळे गावांतील क्षुल्लक तंट्यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात कमी झाल्याची आकडेवारी रायगड पोलिसांकडे उपलब्ध आहे. अशाचप्रकारे कौटुंबिक वादांमध्ये देखील समेट झाल्याची उदाहरणे शेकड्याने आहेत. समाज–परिवर्तनासाठी शासन कोट्यवधी रुपये खर्च करून हजारो योजना राबवते, परंतु त्यास अपेक्षित असे यश येत नाही. कारण ती योजना माणसांपर्यंत पोहोचतच नाही, त्यांना ती आपलीशी वाटत नाही, ही त्रुटी त्यामध्ये राहते.

याच पार्श्वभूमीवर ज्येष्ठ निरूपणकार नानासाहेब यांच्या या अजोड कार्याची जाणीवपूर्वक दखल घेऊन, राज्य शासनाने त्यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान करण्याचा निर्णय १ मे २००८ रोजी घेतला. सुमारे चारशे वर्षांपूर्वी धर्माधिकारी घराण्याच्या आठव्या पिढीत जन्मास आलेल्या संत शिकवणीच्या, निरूपणातून समाजप्रबोधन या अनन्यसाधारण अशा परंपरेचाच हा गौरव आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. पुरस्कार ज्यांना दिला जातो त्याचा सन्मान वृद्धिंगत होतो असे म्हटले जाते. परंतु ज्येष्ठ निरूपणकार नानासाहेब धर्माधिकारी यांनी गेल्या ६४ वर्षांत (१९४३ ते २००८) संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत तुकाराम, संत रामदास यांच्या शिकवणीच्या निरूपणातून जे समाजप्रबोधन केले आणि त्यायोगे खऱ्या अर्थाने जे समाजपरिवर्तन दृश्य स्वरूपात दिसून आले, त्याचा विचार करता येथे पुरस्काराचाच सन्मान वृद्धिंगत झाला आहे असेच म्हणावे लागेल.

२.४.३. : प्रौढ साक्षरता :

श्री बैठकीस येणाऱ्या लाखो श्री सदस्यांना आत्मारामाची उपासना (श्रीनामस्मरण, श्रीमत् दासबोध, श्री मनाचे श्लोक आणि श्री सद्गुरू चरित्र वाचन) दिली गेल्याने, घरोघरी रोज सकाळ–संध्याकाळ प्रत्येक जण स्वतःची नोकरी–धंदा व प्रापंचिक कर्तव्ये पार पाडून, शिवाय समाजातील हिंसक व विघातक गोष्टींपासून दूर राहून ही उपासना नित्यनेमाने करत असतो. निरूपण आणि श्रवणास येणाऱ्या अनेक अशिक्षित सदस्यांना आपल्याला वाचता आले असते तर



२.४.३



२.४.४

किती बरे झाले असते, असे वाटायला लागले. त्यांची ती तळमळ पाहून श्री समर्थ प्रासादिक आध्यात्मिक सेवा समिती रेवदंडा, या समितीच्यावतीने खेडोपाडी आदिवासी वाड्यांवर साक्षरता केंद्रे सुरू करण्यात आली. या साक्षरता वर्गामुळे प्रौढ साक्षरतेचे उद्दिष्ट साध्य करण्यात मोठ्या प्रमाणावर हातभार लागला आहे. या साक्षरता वर्गामुळे अज्ञान नष्ट झाले आणि अंधश्रद्धेवर विश्वास न ठेवता अशिक्षित माणूस शिक्षित होऊन निरीक्षक आणि बुद्धिवादी होत चालला आहे, जगातील घडामोडी त्याला कळू लागल्या आहेत. आणि त्याला समाजात विशिष्ट मान प्राप्त होत आहे.

२.४.४ : समाजात जागृत केलेली एकात्मता

समाजात एकात्मता निर्माण करण्याचे कामही नाना धर्माधिकारी यांनी चालविले. एकात्मता म्हणजे मानवाच्या अंतरी असलेल्या अंतरात्म्याची त्याला ज्ञानबोधातून जाणीव करून देणे. एकमेकांविषयी वैरभाव, मत्सर, तिरस्कार, अहंकार वगैरे काढून सर्व मानवजात ही एकाच परमात्म्याची लेकरे आहेत. एकमेकांविषयी प्रेम व आपुलकी निर्माण करणे म्हणजेच एकात्मता होय. हेच कार्य नाना धर्माधिकारी यांनी चालवले.

'जगी दो दिसांचा पाहुणा, प्राण्या चालू नको उताणा' या उक्तीनुसार मानवाला सर्व भेदांपासून सोडवून प्रत्येकाच्या मनात सहनशीलता, एकमेकांविषयी आदराची, आपुलकीची आणि प्रेमभावनेची जाणीव निर्माण केली जात असल्यामुळे हिंदू, शीख, मुस्लीम, बौद्ध, पारशी इत्यादी

धर्मांतील आणि जातींतील माणसे श्री बैठक श्रवणास नित्यनेमाने येत असतात आणि आपापले रीतिरिवाज पाळून सर्वांशी बंधुभावाने वर्तन व सत्कर्म आचरताना दिसून येत आहेत.

२.४.५ : अंधश्रद्धा आणि अज्ञान निर्मूलन

१९५०–६०च्या दशकात देश मोठ्या स्थित्यंतरातून जात होता. जमीन सुधारणा कायद्याच्या अंमलबजावणीचा हा कालावधी होता. औद्योगिकीकरण नुकतेच सुरू झाल्याने रोजगार–निर्मिती मोठ्या प्रमाणात नव्हती. खेडोपाडी बेकारी आणि प्रचंड दारिद्र्याने कुटुंबेच्या कुटुंबे पिचली होती. सावकार, जमीनदारांच्या कर्जफेडीच्या तगाद्यांनी सामान्य माणूस सन्मानाने जगूही शकला नव्हता. अनारोग्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणात होत्या आणि मानवसमाज अंधश्रद्धेच्या विळख्यात अडकलेला दिसून येत होता. कोणत्याही प्रकारचा शारीरिक आजार किंवा कठीण प्रसंग आल्यावर आपल्याकडून कदाचित देवाचे कार्य राहून गेले असावे आणि त्यामुळे देवाचा कोप झाला असावा आणि कुणीतरी आपल्यावर देव उठवला असावा, करणी केली असावी किंवा मूठ मारली असावी म्हणूनच असा प्रसंग ओढवला असे माणून मानतो आणि याच भ्रमातून पुढे तो भगत, भगतीण, देवदेवस्की, नवससायास, अंगारे–धुपारे, गंडे, ताईत, कौल लावणे इत्यादींच्या आहारी जाऊन जवळील पैसा, दागदागिने, शेतीवाडी गमावून कर्जबाजारी होतो. यातून अनेकांचे संसार उद्ध्वस्त होतात. अज्ञानाचा फायदा घेऊन अनेक भोंदू–स्वार्थी, ढोंगी माणसे बुवाबाजी करून आपला स्वार्थ साधून घेत समाजाला बुडवत आहेत. अशा वेळी हे कार्य निपटून काढण्यासाठी, कशाचीही तमा न बाळगता नाना धर्माधिकारी यांनी हाती घेतले.

भवाच्या भये काय भीतोस लंडी।

धरी रे मना धीर धाकास सांडी।।

रघुनायकासारखा स्वामी शिरी।

नुपेक्षी कदा कोपल्या दंडधारी।। ('मनाचे श्लोक' क्र. २७)

या पंक्तीनुसार आत्मबल देऊन समाजाला अंधश्रद्धेच्या गर्तेतून बाहेर काढण्याचे कार्य नाना धर्माधिकारी यांनी केलं.

तात्पर्य : श्रद्धा आणि अंधश्रद्धा यामध्ये अतिशय धूसर पडदा आहे, परंतु तो त्यांनी कधीही ओलांडला नाही. येथे कोठेही अंधश्रद्धेला वाव नाही. म्हणजेच माणसामध्ये असलेल्या सद्शक्तीला सतत आवाहन.

२.४.६ : स्त्रियांना आत्मसन्मान

स्वतःचे कूळ, गोत्र, आई–वडील, घर, गाव इत्यादी सर्व प्रकारचा त्याग करून नंतरच स्त्री ही पत्नीच्या नात्याने पतीच्या घरात येते. म्हणूनच स्त्री ही त्यागाची मूर्ती, मांगल्य आणि पावित्र्याची प्रतिमा, संयम, ममता आणि सहनशीलतेचे जिवंत प्रतीक आहे. स्त्रियांमधले हे गुण जगामध्ये अन्यत्र कुठेही दिसत नसून हे भारतीय स्त्रियांच्यात आहेत. यासाठी स्त्रियांचा सन्मान आणि आदर होणे आवश्यक आहे. परंतु, त्यांच्याकडे पाहण्याचा पूर्वापार दुष्टिकोन दूषित असल्याने त्या अबला आहेत; म्हणून त्यांना असुरक्षित, परावलंबी, मानहानीचे जीवन जगावे लागत आहे. ही जाणीव ठेवून त्यांचा आत्मविश्वास वाढविण्यासाठी तसेच त्या सबला, समर्थ आहेत हे त्यांच्या मनावर बिंबवण्यासाठी आणि संसाराचा भार पेलण्याचे सामर्थ्य यावे, संयम सहनशीलता या गुणांची वाढ होऊन घर संसार, समाज, राष्ट्र सुखी व समाधानी व्हावा, यासाठी त्यांना श्रीमत् दासबोध व श्रीमनाचे श्लोक यांवर आठवड्याचे सातही वार महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेर ठिकठिकाणी दुपारच्या वेळेत श्री बैठकांद्वारे प्रासादिक आध्यात्मिक निरूपण आजतागायत दिले जात आहे. यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढून त्या सबला झाल्या. शरीराने आणि मनाने कणखर तसेच शुद्ध, पवित्र, आचार विचारांच्या बनल्या आहेत. भोळ्याभाबड्या कल्पनांना बळी न पडता कर्तव्यदक्ष होऊन पती, सासू, सासरे, इतर वडीलधारी माणसं व आप्तेष्टांबरोबर आदर, प्रेम ठेवून वागू लागल्या आहेत. घरात, समाजात सन्मानाने जगू लागल्या आहेत.

२.४.७ : हुंडा निर्मूलनाचे कार्य

समाजाचे विचारप्रवाह बदलताना समाजातच अंतर्गत विरोध होतो. ह्या कार्यासाठी समाजातील संबंधित व्यक्तीची मानसिकता किंवा प्रतिकूल बदल ह्यांवर कार्याच्या महत्त्वाचे व यशाचे मूल्यमापन करता येईल. केवळ एका विशिष्ट काळासाठी ह्याचे मूल्यमापन न करता, अनेक वर्षांच्या कार्यक्रमात वैयक्तिक मताचा आणि सामाजिक मतप्रणालीचा कल किंवा आलेख कोणत्या दिशेने आहे हे पाहावे लागेल. हे कल–पृथक्करण किमान पाच वर्षे व त्याच्या पुढचे असले पाहिजे. या विषयीचे प्रबोधन १९४३पासून आजतागायत म्हणजेच ६० वर्षे चालू आहे. यावरून असे

म्हणता येईल की, कामाचे सातत्य अनेक वर्षे राखले गेले आहे व त्याचा मागोवा घेऊन प्रत्येक वर्षी प्रबोधनाचे प्रयत्न अखंडपणे चालू आहेत.

हुंड्याची प्रथा बंद करण्यासाठी अनेक संस्था कार्य करत असूनही हे प्रकार प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष चालूच आहेत. हे बंद होण्यासाठी माणसाच्या अंतरातील परधनाबद्दल असलेल्या अपेक्षा/लोभ हे दूर होणे आवश्यक आहे. तसेच मानव कर्तव्याकडे वळून तो स्वावलंबी बनणे आवश्यक आहे. हेच कार्य नाना धर्माधिकारी यांनी, परधन–पाप, याचे उत्तम संस्कार श्रवणातून पुरुषांच्या अंतरी बिंबवले आणि त्यांना कर्तव्याची जाणीव करून दिली. त्यामुळे हुंडा मागणी व त्यासाठी केला जाणारा जाच या गोष्टींना बळी न पडता, लाखो स्त्रिया आनंदाने व सुखाने संसार करत असल्याचे दिसून येत आहे.

२.४.८ : एड्स निर्मूलन

आज संपूर्ण विश्वच एडस्सारख्या महाभयानक आणि जीवघेण्या अशा रोगाच्या भतीने ग्रस्त झालेले आहे. नाना धर्माधिकारी यांनी परस्त्री माता–भगिनीसमान व परपुरुष/पिता व बंधुसमान असा विचार आपल्या निरूपणातून दिला आहे. परपुरुष/परस्त्री पाप आणि पापाचे फळ ते दुःख म्हणजेच कर्मघातक व जीवघेणे असल्याचे त्यांनी आपल्या निरूपणातून स्पष्ट केलं. त्याचे काटेकोर पालन करण्याचा दंडक आहे. जेणेकरून एड्सचा संसर्गच होऊ शकणार नाही. ही शिकवण संतपरंपरेने कृत, त्रेता, द्वापार आणि कलियुगात दिलेली आहे. गेली अनेक वर्षे नानासाहेब धर्माधिकारी यांनी हीच शिकवण स्त्री–पुरुषांस दिली. त्यांची ही शिकवण पुढेही चालू ठेवण्यात आली आहे.

२.४.९ : बाल संस्कार केंद्र

या देशाची खरी संपत्ती व देशाचा खरा कणा असेल तर ती मुले होत. बालकांना अमूल्य धन संबोधले जाते. मानव ज्या वेळेस जन्मास येतो, त्यावेळी अनेक ऋणे–म्हणजे मातृऋण, पितृऋण, कुळाचे ऋण, आप्तेष्टांचे ऋण, देशाचे, समाजाचे, मातृभूमीचे ऋण अशी कित्येक ऋणे बरोबर घेऊन येतो आणि ती याच मनुष्यजन्मी फेडावयाची पात्रताही हवी. आणि मुख्यतः यासाठी ज्ञान, कर्म, उपासना या त्रिवेणी संगमावर नित्य स्नान घडावयास हवे. बालमन हे लवचीक असते, त्यावर आपण जे संस्कार करू ते संस्कार त्याचा भावी काळ ठरवत असतात. याकरिता



२.४.९

बालभक्ती मार्गदर्शनाची नितांत गरज आहे. या शिकवणुकीतून देवाविषयी सादर समर्पणाची भूमिका बालपणापासून निर्माण झाल्यानंतर तो बालक मोठा झाला की आई–वडिलांना आदरपूर्वक वागवील. गुरुजनांना व वडीलधाऱ्या माणसांना तो प्रेमाने वागवील आणि खऱ्या अर्थाने त्याची विचारसरणी उच्च श्रेणीतील राहील; आणि तो अंधश्रद्धा, अज्ञान अशा गोष्टींवर मात करील. त्याचबरोबर मानवी धर्माच्या नीतिमूल्यांची जागृती व जोपासना झाल्याने शारीरिकदृष्ट्या बलवान होईल. राष्ट्रीय एकात्मता टिकावी आणि आत्मिक बळाची उन्नती व्हावी यासाठी तो सातत्याने झटेल. मानवी इतिकर्तव्याचे पालन करेल. लोकांना समजावेल. तेव्हाच या देशात अंधश्रद्धा, अज्ञान, महिलांवर होणारे अत्याचार, समाजातील भेद, मानवी मनातील अज्ञान नष्ट होईल. आचरणात मांगल्य, पावित्र्य येण्यासाठी व आंतरशुद्धी होण्यासाठी उत्तम संस्कार व ज्ञानाची गरज आहे. कारण 'जाता जायचे अज्ञान। संस्कारे ज्ञान उच्चते।।' तसेच 'बी' उत्तम असल्यास फळेही रसाळ होतात. म्हणजेच 'शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी।।' म्हणून मुलांची जोपासना ही राष्ट्राची जोपासना आहे, हे समजून नाना धर्माधिकारी यांच्या या सामाजिक प्रबोधनाद्वारे, बालभक्ती मार्गदर्शन कार्याचे उद्दिष्ट म्हणजे खऱ्या अर्थाने राष्ट्राचे आधारस्तंभ घडविणे, तसेच

त्याचा भावीकाळ ऐश्वर्यसंपन्न, नीतिसंपन्न व चारित्र्यसंपन्न व्हावा, तो सदाचारी व सद्‌गुणी होऊन आपल्या देशाचा उत्तम नागरिक तयार व्हावा; या उदात्त तळमळीतून त्यांचे व्रत अखंड चालू आहे.

अशाप्रकारे भक्तिमार्गातून प्रपंच साधून परमार्थ कसा करावा, हे लाखो समर्थ श्री सदस्यांना मौखिक निरूपणाद्वारे श्रीमत् दासबोध, श्री मनाचे श्लोक, सद्‌गुरू चरित्र यांद्वारे त्यतील गर्भितार्थ समजावून दिले, सदस्यांचे अज्ञान दूर करण्याचे यशस्वी कार्य नानासाहेबांनी अखंडपणे केले. प्रकृती अस्वास्थ्यानंतरही त्यांच्याकडे येणाऱ्यांना त्यांनी योग्य मार्ग दाखविला आहे. समर्थ उक्तीनुसार अज्ञान, कुसंग, कुकर्म, कुविचार यांचा अंतःकरणातील मन, बुद्धी, चित्त यावरील पगडा झुगारून रंजल्या–गांजल्यांना जवळ करण्याचे, त्यांना धीर देण्याचे, त्यांचा डळमळीत झालेला आत्मविश्वास पुन्हा उभा करण्याचे कार्य, तेवढ्याच निष्काम भूमिकेतून नानासाहेबांनी आयुष्यभर अखंडपणे केले. त्यामुळे सर्वत्र सत्कर्म, सद्‌विचार, सुखशांती, समाधान लाखो कुटुंबांत नांदत आहे. समाजातील मागास जमातीत केवळ श्रवणातून जीवन–परिवर्तन घडवून आणण्याचे अनन्यसाधारण कार्य, नानासाहेबांनी वास्तवात आणून दाखविले आहे. समाजसुधारणेबरोबरच दारूबंदी, व्यसनमुक्तीसारखे प्रयोगदेखील त्यांनी यशस्वीपणे राबविले आहेत.

२.४.१० : स्त्री–पुरुष समानतेचा अधिकार :

मनुष्यजातीमध्ये जन्मतः पुरुष व स्त्री असे दोन निसर्गदत्त व परस्परांस पूरक भाग आहेत. कार्यकारणासाठी हे दोन भाग असले तरी कुटुंब व्यवस्थेमध्ये व समाज घडविण्यामध्ये या दोघांचेही योगदान सारखेच आहे. त्याचप्रमाणे जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात स्त्रियांचे कर्तृत्व व सहभाग पुरुषांच्या बरोबरीचाच आहे. वैदिक काळातही स्त्रीपुरुष समानता सांभाळली गेली होती, हे आपण निश्चितपणे म्हणू शकतो. शिवशक्ती, प्रकृतिपुरुष, अर्धनारीनटेश्वर या व अशा संकल्पनांचा तसेच गार्गी, मैत्रेयी, कात्यायनी या नेतृत्वक्षम स्त्रियांचाही उल्लेख तत्कालीन समाजात जागोजागी आढळतो. परंतु नंतरच्या काळात समाजरचना पुरुषप्रधान होत गेली. साहजिकच स्त्रियांना बरोबरीचे सन्मानाचे स्थान न मिळता गौण आणि दुय्यम दर्जाचे स्थान मिळाले. चूल आणि मूल यांपुरतेच तिचे कर्तृत्व व स्थान मर्यादित केले गेले. तिने समाजाचे नेतृत्व करणे ही संकल्पनासुद्धा सहन करण्यासारखी राहिली नव्हती.

वास्तविक, स्त्रियांच्या सर्वांगीण विकासात स्त्रीत्व, सामाजिक बंधने व शोषणांची जाणीव, समर्पण, कौटुंबिक जबाबदारी, स्त्री–संवर्धन ही अपेक्षित अंगे आहेत.

यातील स्त्रीत्व व स्त्रीसंवर्धन हे दोन्ही भाग कायम उपेक्षितच राहिले. कौटुंबिक व सामाजिक जबाबदाऱ्या सांभाळताना व त्या पार पाडण्यासाठी बंधने पाळताना तिला अनेक प्रकारे शोषणाला बळी पडावे लागते. समर्पणासारखा अत्यंत उच्च प्रतीचा भाव तिच्याजवळ मूलतःच आहे.[१]

हे अगदी खरे आहे. स्त्री आपलं नाव–गाव, नाती–गोती, सगळं सोडून लग्न झाल्यानंतर सासरी येते. नवीन गाव, नाव, नाती–गोती स्वीकारते. एका वेळेस ती किती आघाड्या सांभाळते. नवरा दुपारी फोन करून सांगतो, 'संध्याकाळी माझ्याबरोबर चार मित्र जेवायला येणार आहेत.' आपण काही बोलायच्या आत फोन धाडकन खाली ठेवला जातो. मग आपली बडबड सुरू होते. 'ह्यांचं नेहमीचंच फोन केला की झालं! मला काय दहा दहा हात आहेत का? मी एकटी काय काय करू?' एकीकडे ती बडबड करत असते, एकीकडे कामाला लागते. कणीक भिजवते, भाजी फोडणीला टाकते, मध्येच हॉल नीटनेटका करते आणि हे सगळं करता करता पाळण्याची दोरी पण हलवत असते. कुठून आले हे दहा हात?

घरी असणाऱ्या स्त्रियांना कधी कुठल्या सुट्ट्या मिळतात? पेड लीव्ह, सीक लीव्ह, कॅज्युअल लीव्ह? कुठलं प्रमोशन? आधी ज्युनिअर वाइफ, मग सीनिअर वाइफ, नंतर डेप्युटी जनरल वाइफ?... तुम्ही म्हणाल, मिळतं की! आधी ती पत्नी होती, नंतर आई झाली, मग सासू... हल्ली सासू हे तर सगळ्यांत मोठे डिमोशन आहे. पण तरी ती सगळ्या आघाड्या सांभाळते. कुठल्या बळावर? फक्त समर्पण भाव. मग ती कुठल्याही जातिधर्माची स्त्री असो. तिला हे बाळकडू दिलेले असते. 'मैं डोंली में बैठके आई थी। अरथी पे लेटके जाऊँगी।[२]

या सर्व विचारपद्धती व त्यावर आधारलेल्या जीवनशैलीचे मूलभूत तत्त्व हे आहे की, पितृत्व हा अंदाज असू शकतो परंतु मातृत्व हे विश्वातले अंतिम सत्य आहे. अवतारी पुरुषांचेही अस्तित्व व कार्य स्त्रीशक्तीच्या सहकार्याशिवाय शक्य नाही. हे मूलभूत सत्य सर्वांना माहिती असूनही त्या सत्याचा अनादर केला जातो. पुरुषाच्या व्यावहारिक सत्तेपेक्षा स्त्रीची प्रेमसत्ता ही सर्वांत सामर्थ्यशील आहे. आज स्त्री कुठल्या क्षेत्रात नाही? सर्व क्षेत्रे तिने पादाक्रांत केली आहेत. नानासाहेबांनी २१ व्या युगाला साजेशा व जीवनाच्या सर्वांगांना स्पर्श करणाऱ्या आपल्या लोकोत्तर

---

१. लेख : दैनिक मुंबई लक्षद्वीप– शनिवार दि. १ मार्च २००८ लेखिका : सौ. विजया वि. पिसाळ.

२. हे विवेचन संशोधिकेच्या ''स्वभाव आणि वागणूक यातील सकारात्मक बदल प्रशिक्षण'' ह्या अभ्यासक्रमातील प्रशिक्षक म्हणून प्रत्यक्ष अनुभवावर आधारलेले आहे.

समाजप्रबोधनाच्या कार्याला आरंभ केला, तेव्हा समाजात पसरलेले अज्ञान, अंधश्रद्धा, राष्ट्रीय एकात्मतेचा अभाव, व्यसनाधीनता, हुंडाप्रथेचा प्रभाव, निरक्षरता याबरोबर समाजाच्या अर्ध्या भागाच्या नशिबी आलेले उपेक्षित जिणे त्यांच्या चाणाक्ष नजरेतून सुटले नाही. समाजाचा हा अर्धा हिस्सा असंख्य कष्टात व कर्मकांडात पिचत असलेला त्यांनी बघितला. वैचारिक विषमता, आर्थिकदृष्ट्या परावलंबन, सामाजिक, कौटुंबिक व सांस्कृतिक असुरक्षितता हे सांसारिक ताप तर स्त्री जातीच्या पाचवीलाच पूजलेले त्यांनी बघितले. हे सर्व ताप सोसताना पतिव्रताधर्माचे पालन, असंतुलित कौटुंबिक जबाबदाऱ्या, व्यसनाधीन व अकर्मण्य पुरुषाची भागीदारी व यासाठी आवश्यक मानसिक व शारीरिक सामर्थ्याची उणीव; यांसारखे असंख्य प्रश्न घेऊन ती उभी असल्याचे त्यांच्या प्रकर्षाने निदर्शनास आले.

प्रपंचातील सर्व समस्यांना समर्थपणे तोंड देण्याचे स्त्रीचे सामर्थ्य म्हणजे तिची सहिष्णुता होय. परंतु या सहिष्णुतेची परीक्षा तिची अवहेलना व उपेक्षा करून पुरुषप्रधान संस्कृती घेत असते.

नानासाहेबांनी पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये व समाजामध्ये स्त्रियांना सन्मानाचे स्थान मिळवून देण्यासाठी आपल्या प्रबोधनातून सर्वांच्या अंतरी समाज घडविण्यामध्ये स्त्रियांचा सहभाग व त्यांचे कर्तृत्व, दातृत्व व त्याग पुरुषांएवढेच महत्त्वाचे व मोलाचे आहे, हे ठासून बिंबवले. जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगास उद्धारी' हे सूत्र समाजरचनेत पुनर्स्थापित व कार्यान्वित करण्यासाठी त्यांनी आजपर्यंत घेतलेले कष्ट अवर्णनीय आहेत.

आज स्त्रीने जरी सगळी क्षेत्रे पादाक्रांत केली असली तरी आपल्या समाजाची मानसिकताच अशी आहे की, स्त्रियांना नेहमी गौण किंवा दुय्यम स्थान मिळाले पाहिजे. कुटुंब, समाज, किंवा राष्ट्र या सर्वांमध्ये कोणतीही स्त्री उल्लेखनीय कार्य करताना आढळली, तर ती एकतर महत्त्वाकांक्षी समजली जाते किंवा तिच्या अकलेबाबत हीनभाव अथवा तिरस्कार व्यक्त केला जातो. एकीकडे रूढीवादी परंपरा तिचे स्थान संसार, घर, स्वयंपाक मुलांचे संगोपन एवढ्यापुरतेच मर्यादित करतात, तिच्यातील समर्पणाचा वाट्टेल तसा उपयोग करतात व उपभोग घेतात, तर दुसरीकडे पुरुषाने स्त्रीला स्वातंत्र्य दिल्याचा आविर्भाव आणतात व तिला चक्क अर्थार्जन, स्वैराचार, विविध स्तरांवर प्रदर्शनाचे साधन बनवितात. म्हणजेच ही उच्छृंखल, भोगवादी व मुक्तपणाचा दंभ आणणारी नवी परंपरा, तिचे रूढीवादी परंपरेसारखेच शोषण करते. अशाप्रकारे दोन्ही परंपरा

स्त्रियांबाबत अन्यायाच्या भूमिकेत उभ्या राहिलेल्या दिसतात व त्यांनी स्त्रीजातीला कायम उपेक्षित ठेवलेले व अपमानित केलेले दिसते. स्त्रियांकडे बघण्याचा परंपरागत दृष्टिकोन दूषित आहे. याविरुद्ध बंड करणाऱ्या स्त्रियांच्या चारित्र्यावर शिंतोडे उडविण्याससुद्धा समाज मागेपुढे बघत नाही. स्त्रियांना अशा सर्वांगीण शोषणांतून मुक्त करण्यासाठी अत्यंत प्रामाणिकपणे प्रयत्न करणाऱ्यांचासुद्धा एक वर्ग समाजात आढळतो. त्यांच्या प्रयत्नाचे मर्यादित यश म्हणजे आज स्त्रियांच्या हक्कांबाबत तयार झालेले कायदे हे होय. तथापि, कायदे होऊनही आणि स्त्री मुक्ती आंदोलने उभी करूनही समाजाची मानसिकता बदलत नाही, ही दारुण वस्तुस्थिती आहे. यासाठी समस्येच्या मूळावरच कठोरघात करणे आवश्यक आहे. व यासाठी योग्य मार्गदर्शकही आवश्यक आहे.

अशी ही 'स्त्री जन्मा तुझी कहाणी' आपल्यासमोर असताना, नानासाहेबांनी आपल्या निरूपणांमधून 'स्त्री जन्मा ही तुझी कहाणी' याबाबत संपूर्ण समाजाला विचार करण्यासाठी अंतर्मुख केले आहे. आपल्या समाजप्रबोधनातून त्यांनी स्त्रियांच्या कुटुंबातील व पर्यायाने समाजातील सन्मानाचेच पुनर्स्थापन केले आहे. त्यांनी स्त्री ही अनंत काळाची माता हा विचार अत्यंत प्रभावीपणे आपल्या निरूपणातून सर्वांच्या गळी उतरवला आहे. आपल्या संस्कारांची सुरुवात 'मातृदेवा भव'पासून होते. अनेक नररत्ने तयार करणारी खाण त्याची माताच असते. अवतारकार्यासाठी व सुसंस्कारांसाठी युगपुरुषालासुद्धा मातेचाच आधार घ्यावा लागला आहे. केवळ मातेने केलेल्या संस्कारामुळे व तिच्या वात्सल्यामुळेच त्यांना यश, कीर्ती व पराक्रम साध्य करता आले. म्हणजेच अप्रत्यक्षपणे या मातांचाच समाज घडविण्यात सिंहाचा वाटा आहे हे मान्य केलेच पाहिजे. कारण मुलगा बिघडला की लगेच आईला दोष दिला जातो. पुरुषप्रधान संस्कृतीने व समाजाने अत्यंत संकुचित व स्वार्थी विचारांमधून घरातील अथवा समाजातील सर्व समस्यांचे मूळ स्त्रियाच आहेत हा अपसमज जाणीवपूर्वक पसरवला. या मानसिकतेची विकृती म्हणजे जन्माला येणारे मूल जर मुलगी असेल, तर भ्रूणहत्या करण्यासाठीसुद्धा मागेपुढे बघितले जात नाही. या गैरव्यवस्थेचा दुष्परिणाम म्हणजे आज समाजात पुरुष व स्त्रियांच्या संख्येच्या गुणोत्तरात आलेली आहे.

म्हणूनच नानासाहेबांनी स्त्रीचे कुटुंबातील महत्त्वाचे स्थान विशद करताना सांगितले की, घराचे घरपण व वैभव सांभाळणारी व घराचे मंदिरात रूपांतर करणारी स्त्री ही अन्नपूर्णा आहे. तसेच ती तेजस्विनी आहे. ती आदिशक्तीचे पृथ्वीवर उमटलेले प्रतिबिंब आहे. अवघ्या विश्वाचे

मंदिर करण्याचे सामर्थ्य तिच्यात सामावलेले आहे. म्हणून कुटुंबातील प्रत्येकाचे कर्तव्य आहे की, घरातील स्त्रियांचा कधीही, कोठेही व कोणाकडूनही अपमान होता कामा नये.

स्त्रियांकडून अनेक गोष्टी शिकण्यासारख्या असतात. Place for everything, everything is on its place. घरातली स्त्री जर गावाला गेली तर पुरुषांना एक कप चहा नाही करता येत, पण ती मात्र दोनशे कि.मी. वरून सांगते, 'साखरेचा डबा वरून तिसरी लाइन, डाव्या बाजूने दुसरा डबा.' संपूर्ण कुटुंबव्यवस्था ज्या आधारबिंदूवर उभी आहे, जी संपूर्ण कुटुंबामध्ये समन्वयाच्या भूमिकेत राहून कुटुंबाची धुरा वाहत आहे, अशा स्त्रीला सन्मान प्राप्त झाल्याशिवाय कुटुंब, समाज व राष्ट्राची सर्वांगीण व निकोप वाढ अशक्य आहे. स्वतःचे कुळ, गोत्र, आई–वडील, घर इत्यादींचा सर्वप्रकारे त्याग करूनच स्त्री ही पत्नीच्या नात्याने पतीच्या घरी प्रवेश करते. म्हणूनच ती त्यागाची मूर्ती असून मांगल्य, पावित्र्य, संयम, ममता व सहनशीलता यांचे जिवंत प्रतीक आहे. याच कारणाने तिच्यातील लवचीकतेपोटी ती सर्व प्रसंगांमध्ये कुटुंबाचे अप्रत्यक्ष, पण कणखरपणे नेतृत्व करू शकते.

अशा या कुटुंबसंस्थेची धुरा व आधारबिंदू असलेलया स्त्रीला सक्षम व मजबूत करण्यासाठी तिला कुटुंबातच सन्मानपूर्वक वागणूक मिळाली पाहिजे, यावर त्यांनी कटाक्ष ठेवला. यासाठी त्यांनी निश्चयात्मक भूमिकेतून स्त्रियांसाठी पुरुषांच्या बरोबरीने, परंतु स्वतंत्र बैठकींचे नियमित रूपाने आयोजन केले. निश्चयात्मक भूमिका म्हणजे 'च' चं महत्त्व. 'मी पैठणी घेणारच' हे आपल्याला बरोबर कळते, मात्र 'च' ची जागा चुकता कामा नये, हे सांगायला ते विसरले नाहीत. स्त्रियांना सामर्थ्याने उभे करण्यासाठी व कुटुंबामध्ये त्यांना त्यांची भूमिका अधिक तत्परतेने, सक्षमतेने पार पाडता यावी यासाठी त्यांच्यावरील जबाबदारीची त्यांना जाणीव करून दिली. त्या अबला नसून सबला आहेत. ही अंतःकरणावर बिंबविणारी शिकवण ते आठवड्यातील सातही दिवस बैठकींमधून देत आले आहेत. याचा दृश्य परिणाम म्हणजे स्त्रियांचा आत्मविश्वास वाढलेला आढळतो. यातून त्यांचा संयम व सहनशीलता वाढलेली आढळते. त्यांच्यात त्यागाची व समर्पणाची भूमिका निसर्गदत्तच आहे. म्हणूनच संपूर्ण कुटुंबामध्ये समन्वयात्मक व समजुतीचे वातावरण उभे करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. घरातील वडीलधाऱ्या मंडळींशी सन्मानपूर्वक व आदरपूर्वक वागून कुटुंबातील परस्पर नात्यांची त्या अत्यंत जाणीवेने जपणूक करताना दिसतात. घरातील बालकांवर त्या उत्तमातील उत्तम संस्कार घडवून आणून समाजाला व पर्यायाने राष्ट्राला नवरत्नांची देणगी प्रदान करीत आहेत. घरातील व कुटुंबातील प्रसंगांमध्ये आपली स्वतंत्र मते त्या परखडपणे,

परंतु नम्रतेने प्रतिपादन करून, या मतांचा पाठपुरावा करून कुटुंबामध्ये कोणत्याही प्रकारचा वाद निर्माण होणार नाही, याची दक्षता बाळगतात. यासाठी त्यांची मते सामंजस्याची असून, सर्वांचे हित सांभाळणारी आहेत, हे प्रत्येक घटकाला पटवून देण्यात त्या यशस्वी झालेल्या दिसतात. म्हणूनच कुटुंबाचा प्रत्येक घटक आनंदाने आपल्या स्वार्थाच्या भूमिकेतून बाहेर पडून कुटुंबसौख्यासाठी थोडाफार त्याग करायला शिकतो आहे.

स्त्रीशक्तीबद्दलचे नानासाहेबांनी केलेले निरूपण व त्यातून मिळणारा बोध, स्त्रीशक्तीची अवहेलना टाळू शकतो व स्त्रियांच्या उपेक्षेमुळे विनाश व दारिद्र्याकडे होत असणारी समाजाची चाल थांबवू शकतो. संतपुरुषांच्या अधिकारवाणीने केलेल्या प्रबोधनाचा डोळस वापर हा सामाजिक पुनरुत्थानाचा पाया आहे.

२.५ : मानवी धर्माचा उद्धार करून उन्नतीप्रत नेणारे शिल्पकार[१]

मानवी समाज आपल्याच कर्माने उद्‌भवलेल्या वादळवाऱ्यामध्ये उद्‌ध्वस्त झालेला पाहून ते कमालीचे व्यथित झाले. यातून मनुष्याला सोडविलेच पाहिजे, असा ठाम निश्चय त्यांनी प्रारंभींच केला. सामाजिक प्रबोधनातून अतिशय सोप्या, सरळ व सर्वांना समजेल अशा भाषेतून मानवता धर्म प्रस्थापित करणारे विचार प्रभावीपणे मांडले. अवघ्या समाजाचे तेजस्वी वैचारिक नेतृत्व केले आणि मनुष्याकडून अपेक्षित अशा आचरणाबाबत प्रत्येकाला प्रेरित केले. याचा परिणाम असा की, जे जे म्हणून त्यांच्या संपर्कात आले आणि त्यांच्या सान्निध्यात राहिले. ते सर्वजण उत्तम आचरणाने आपल्याच गुंत्यातून आपण निश्चितपणे सुटू शकतो, असा आत्मविश्वास अंगी बाणवू शकले. निष्काम कर्मयोग्याच्या भूमिकेतून लोकशिक्षणाचे महाकार्य त्यांनी केले आणि नंतर समाजाचे उद्‌बोधन केले. हे कार्य अखंडपणे करीत असताना ती. डॉ. श्री. नानासाहेब फक्त एकाच ध्येयाने प्रेरित होते. ते म्हणजे नवनिर्मित समाज हा सदाचरणी व सद्‌विचारांनी संपन्न व पौरुषयुक्त व्हायला हवा. आपल्या अमृतमय वाणीला त्यांनी कृतिशीलतेची अमूल्य जोड दिली. सातत्याने शिकवण देता देता प्रथम मानव व नंतर आदर्श मानवी समाजाची जडणघडण करणारी क्रांतिकारी किमया त्यांनी साधली आहे.

त्यांनी आपल्या प्रबोधनातून मानवी समाजाची घडी पुन्हा बसविण्याआधी ही घडी कां विस्कटली, हे प्रत्येकाच्या निदर्शनास आणून दिले. आपल्यावर ओढवलेल्या संकटांना आणि

---

१. दैनिक कुलाबा–दर्पण (राजमान्यता मिळालेले कोकण विभागातील पहिले वृत्तपत्र) लेख : अखिल जगाच्या वंद्य पुरुषा, १ मार्च २००८, लेखक : श्री दत्तात्रय नारायण तथा आप्पासाहेब धर्माधिकारी.

प्रसंगांना बाहेरील कोणीही जबाबदार नाही. या सर्वांसाठी नशिबावर दोष ढकलून दैववादी बनलो तर आपण आपली फसवणूक करतो आहोत हे प्रत्येकाच्या अंतरी ठामपणे बिंबवले. म्हणून आपल्या गुंत्यामधून बाहेर निघण्याचे सूत्र आपल्याच हाती आहे. यासाठी प्रथम आपल्या कर्माचा लेखाजोखा सुधारायला हवा, हे प्रत्येकाला पटवून दिले. अंतरीचे वैभव वाढविण्याशिवाय आपल्याजवळ दुसरा पर्याय नाही. आपल्या विषयवासनांच्या खेळांमुळे दररोज आपल्यासमोर नवीन संकटे उभी राहतात. आपल्याच आयुष्याचा खेळखंडोबा होऊन आपण आपल्या विनाशाकडे जातो. या सर्वांमधून मोकळे व्हायचे असेल तर मनुष्याचे अंतरंग सामर्थ्याने परिपूर्ण असायला हवे.

ती. श्री. डॉ. नानासाहेब हे नक्की जाणून होते की हे बोलणे सोपे आहे, पण प्रत्यक्षात हे कसे घडून येईल? म्हणून आपल्या शिकवणीतून त्यांनी प्रत्येकाला जाणवून दिले की, अंतरंग समृद्ध करण्यासाठी परतीच्या वाटा बंद व्हायलाच हव्यात. यासाठी मनुष्याने काही पथ्ये सांभाळायला हवीत.

'परधन पापाय', 'परस्त्री माता–भगिनीसमान' ही पथ्ये आचरणात उतरलेली दिसावी. कोणाचाही हेवा, तिरस्कार, मत्सर करून दुसऱ्याचे काही कमी होत नाही आणि आपले काही वाढत नाही. उलट आपल्या अंतरंगातील सामर्थ्याची घट होते. म्हणजे नुकसान पुन्हा आपलेच होते. म्हणून 'ठेविले अनंते तैसेचि रहावे' हे प्रत्येकाच्या जीवनाचे अविभाज्य अंग म्हणून स्वीकारायला लावण्यात ते यशस्वी झाले.'

'ठेविले अनंते तैसेची रहावे...' ह्याचा शब्दशः अर्थ अभिप्रेत नाहीये. कारण मनुष्य मुळातच रजोगुणी, त्यामुळे आपल्या फायद्याचं असेल ते पटकन घेतो. म्हणजे हातपाय हलवायचेच नाहीत. नोकरी–धंद्यात प्रगतीच करायची असा होत नाही. आपल्याला प्रगती करायचीच आहे, पण कुठे थांबायचे हे कळले पाहिजे. हौसेला मोल नसते. हव्यास तरी किती? अधिकृतरीत्या कोणतेही धन मिळवणे ठीक, पण वाममार्गाने पैसा मिळविण्याची इच्छा धरणे म्हणजे तो भ्रष्टाचारच होतो.

माणसाचे मनुष्यत्व जपण्यासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य खर्ची घातलेले आहे. ते सातत्याने शिकवतात की, मनुष्याचे बाहेर कुणीच शत्रू नाहीत. आपल्याच विषयवासनांचा अतिरेक आणि अवगुण आपल्याला आतून नासवीत असतात व मनुष्याला माणूस म्हणून जीवन जगू द्यायला तयार नसतात, म्हणूनच प्रत्येकाला अंतरंग शांत, स्वस्थ, स्वदेव व स्वधर्म यांची ओळख

करून देत आहेत. परिणामस्वरूप आज उद्ध्वस्त झालेली असंख्य कुटुंबे पुन्हा स्थिरस्थावर झालेली आढळतात.

खवळलेल्या सागरामध्ये हेलकावणारे तारू दिशा ठरविते तेव्हा त्याला दिशा दाखविण्याचे कार्य दीपस्तंभ करतो. अशाच विषयांच्या वादळवाऱ्यांमध्ये रस्ता विसरून गेलेल्या असंख्य व्यक्तींसाठी ती डॉ. श्री. नानासाहेबांची शिकवण विचाररूपी दीपस्तंभाचे कार्य करीत आहे. म्हणून ती. डॉ. श्री. नानासाहेबांचे व्यक्तिमत्त्व हे सत्पुरुषाचेच आहे.

२.६ : मनन–चिंतन मीमांसा : डॉ. नानासाहेबांनी केलेले विवेचन

'अधिकारासारखे घ्यायचे असेल तर अभिमान टाकायलाच हवा' चिंतन आणि मनन ह्यातला फरक सांगताना ती. नाना म्हणतात, चिंतन हे कार्य बाह्य मनाचे आहे व मनन हे अंतर्मनाचे आहे. चिंतन म्हणजे निराळी–वेगळी कल्पना, म्हणून चिंतन नकोच! ती एक उपाधीच आहे!! त्यापेक्षा श्रवण–मनन निजध्यास उत्तम. उपाधीतून मोकळे व्हायचे असेल तर श्रवण करा. पहिला धडा श्रवण म्हणजे शब्द. त्याचा जर बोध झाला तरच ना अंतःकरणात बोध होईल? बोधाचे रूप उभे राहील! असे होत राहिले. तरच परमार्थाची सत्कर्माची गोडी (रस) निर्माण होईल, असा रस घेतल्याशिवाय निजध्यासाचा गंध येणार नाही, प्रचिती–प्रबोधाचा गंध येणार नाही.'

आता उलटी खूण सांगतो. सूक्ष्मदृष्टीने पाहिले तर गंध आधी व रस शेवटी आहे. दुसरा दृष्टान्त सांगतो, कुणाचा द्वेष येण्यापूर्वी त्या व्यक्तीचे नाव (शब्द) घ्यावे किंवा आठवावे लागते. त्याशिवाय द्वेष करताच येत नाही. नाव घेतले की, ऐकणाऱ्याला स्पर्श होतो. नंतरच त्याच्यासमोर रूप उभे राहते. मग सांगणाऱ्याला–ऐकणाऱ्याला द्वेषाचा–मत्सराचा गंध येऊ लागतो. त्या गंधात ते दोघे तासभर रंगतात, हा रस! असे नसेल तर यात कुणी कशाला रस घेईल?

'कुणी म्हणतो मला या गोष्टीत रसच नाही, कारण ज्या गोष्टीचा गंधच नाही त्यात रस वाटत नाही. पूर्वीचा गंध असेल तर केवळ स्मरण–कल्पना यांतून रस घेता येतो. तसे नसल्यास काहीच घडत नाही, म्हणून रस शेवट!'

चिंतन म्हटले की बाह्यात्कारी बऱ्याच भानगडी आल्या. त्यातून मनाची ओढाताण, खेचाखेच होते. या उपाधीवर मात करणारा सोपा मंत्र म्हणजे श्रवण!

एका सद्‌गृहस्थाने नानांना विचारले, 'नाना, 'राखावी बहुतांची अंतरे' या नियमाने मी वागतो, त्याबाबत तुमचे विचार सांगा,' नाना म्हणाले, 'सातारा–अलिबाग प्रवासात अशी सूचना अनेक वाहनांवर वाचली असेल की, सुरक्षित अंतर ठेवायला हवे. ते कसे? 'एक मुख्य परमेश्वर, की जो कुणाला ताप देत नाही, कोपत नाही, तो सोडून उरलेले जे कुणी बहुत आहेत त्यांना अंतरात ठेवा. बहुत म्हणजे विषयवासना! त्यांच्यापासून जो दूर अंतरावर राहतो त्याला भाग्य प्राप्त होते. सुख–शांती–समाधान प्राप्त होते.'

नानासाहेबांचे विचार : एका ठिकाणी कीर्तनाच्या कार्यक्रमासाठी शेकडो लोक जमले, पण बुवा न आल्याने कार्यक्रम झाला नाही. कीर्तन बंद! असे कां झाले? याचे उत्तर असे, त्या बुवाने आपल्यासारखे कुणाला होऊच दिले नाही. याची उलटी खूण आहे, निरूपणासाठी कुठेही मला स्वतः जावे लागत नाही. कारण काही हातचे न राखता हजारोंना आज आपणासारखे केले आहे. एक वक्ता नसेल तर दुसरा, तिसरा–शेकडोजण तयार! भंगलेली देवळे बांधल्याचा हाच प्रत्यक्ष पुरावा.

नाना म्हणाले, 'हल्ली मी निरूपण करीत नाही. सतत श्रवणच करीत असतो. आज वयाची सत्तरी गाठलीय, पण शक्ती आहे तोपर्यंत हे करूच! कारण श्रवणातून प्राप्त होणारा जो आनंद व समाधान आहे, ते दुर्मिळ व अवर्णनीय आहे.

पूर्वी लोकांनी आमच्यावर धोंडे मारले, वाळीत टाकण्याचा खूप प्रयत्न केला. तेव्हा लोक सांगायचे नानांकडे कुणीही जाऊ नका, त्यांच्यापासून दूर रहा, कारण ते स्वतः ब्राह्मण असूनही खालच्या जातीच्या लोकांना नेहमीच जवळ करतात, कुणबी–कोळ्यांत वावरतात, ब्राह्मणाचे पावित्र्य ते सांभाळीत नाहीत म्हणून त्यांच्याकडे कुणी ब्राह्मण जात नाही. असा अनेक प्रकारे ताप दिला. निंदा, छळ केला, पण मी कुणाला कधी काहीही बोललो नाही. कारण लोक जे बघतात ते शब्दशः खरे आहे. ''आम्ही लोकांचे नाहीच! लोकांपेक्षा वेगळेच आहोत, म्हणून लोक हो, तुम्ही आमच्या वाट्याला येऊच नका!! कुणी अंत्यज असला म्हणून काय झाले? लहानपणी शरीर अस्वच्छ–मलीन असते, विष्ठा–मूत्रांत लोळते. माती, काड्या, कागद, काहीही खात असते. म्हणून आपल्याला कुणी टाकलं का? म्हणूनच रंजल्या–गांजल्यांना, मलीन असणाऱ्यांना आपण जवळ घेतलेच पाहिजे. हा भेद आपल्याकडे मुळीच नको. ''मलीन मनुष्य जेव्हा स्वच्छ होण्यासाठी गंगेजवळ जातो, त्याला गंगा कधी दूर लोटते का? ज्याला स्वच्छ व्हायचे आहे तो तीर्थ शोधीत येणारच.''

मनुष्याचा आदर जाणीवेतूनच प्रगट होतो. कारण आदर मुळात जाणीवेतून निर्माण होतो. याबाबत एक दृष्टान्त नाना सांगतात, '२६ जानेवारी, १५ ऑगस्ट या दोन्ही दिवशी झेंडावदन असते, शंभरजण जमतात, जिलेबी खातात, चहा पितात, घरी जातात. ध्वजाला मानवंदना देताना फक्त सकाळी हे चित्र असते. पण संध्याकाळी काय? ध्वजाला खाली उतरविताना कोण असते? फक्त एक शिपाई किंवा चौकीदार! मी एका मंत्री महोदयास विचारले, 'संध्याकाळी शिपाई ध्वज उतरविताना कोणत्या भावनेतून उतरवितो? तो मनात म्हणत असेल, 'आज सुट्टी, सर्वजण घरी आराम–मौजमजा करीत असतील, माझी मात्र इथे ड्युटी लावली. प्रत्येक वेळी हे मलाच करायला लावतात,' इत्यादी. अशी जर त्याची भूमिका असेल तर देशप्रेम–देशाभिमान किती असेल?

झेंडा हे केवळ प्रतीक नसून राष्ट्राचे पवित्र अधिष्ठान आहे. राष्ट्रच आहे, झेंड्यासाठी हजारो प्राण अर्पण झालेले आहेत, तो देशाचा देव आहे. ही जाणीव असेल तर आदर–निष्ठा–प्रेम येईल.'

निष्कर्ष : साध्या भाषेत बोलून लोकांना सत्प्रवृत्त करणे, लोभ आहे. या अपप्रवृतींचा निषेध आणि त्यामुळे माणसांचे होणारे नुकसान यांचे सोदाहरण स्पष्टीकरण. अवघड गोष्टी सोप्या करून सांगण्याची कला त्यांच्याकडे होती.

२.७ : अस्मितेच्या नवोन्मेषा! मानवतेच्या नीलाकांक्षा। त्रिवार वंदन तुला।।

आधुनिक युग हे माहितीचे व तंत्रज्ञानाचे युग म्हणून ओळखले जाते. आजची दळणवळणाची साधने व त्यांचे जाळे जगभर पसरले आहे. या साधनांच्या आधारे आज क्षणामध्ये जगातील कोणत्याही दोन ठिकाणांमध्ये विविध प्रकारची देवाणघेवाण होते. कृत्रिम उपग्रहाद्वारे मनुष्याने कल्पनातीत प्रगती केली आहे. विज्ञानाद्वारे घडून येणाऱ्या सुधारणा या कृत्रिम उपग्रहाद्वारे अति शीघ्रतेने जगभर पसरतात. अगदी खेडोपाडी, दुर्गम स्थळी इंटरनेटने, मोबाइल फोनने क्षणार्धात संपर्क साधता येतो. थोडक्यात, सर्वसामान्य मनुष्याच्या जीवनात विज्ञानाने घडवून आणलेली ही भौतिक क्रांती व समृद्धी, नेत्रदीपक, स्तुत्य व वंदनीय आहे. तथापि मनुष्याचे अंतरंग सर्वार्थाने समृद्ध करण्यात हे भौतिक ज्ञान, माहिती अथवा तंत्रज्ञान फारसे उपयुक्त होताना दिसत नाही, कारण त्याला मर्यादा पडतात. मनुष्याचे अंतरंग दुबळे असते. म्हणून भीती, शंका–आशंका, संशय–चिंता, अशा अनेक विषयवासनांचा शिरकाव त्याच्या अंतरंगात होतो. एखाद्या गंभीर समस्येला अथवा कठीण प्रसंगाला मनुष्य धैर्याने तोंड देण्याऐवजी माघार घेतो, नैराश्यात येतो

व प्रसंगी आत्माघातसही प्रवृत्त होतो. ह्याची अनेक उदाहरणे आपण आपल्या आजूबाजूला बघतो, पेपरमध्ये वाचतो.

मनुष्य जरी बाहेरून कितीही वैभवसंपन्न असला तरी अंतरीच्या सामर्थ्यहीनतेमुळे त्याचे सोन्यासारखे आयुष्य मातीमोल होते. असा मनुष्य असाहाय्य अवस्थेत परिस्थितीला शरण जातो. मग आपले संपूर्ण आयुष्य निराशेत व अगतिकतेत घालवितो. समाजप्रबोधनातून माणसाला आंतरिक सामर्थ्यामध्ये उभे करायचे असेल तर आयुष्याच्या सुरुवातीपासूनच त्याला योग्य वळण देणे जास्त लाभदायक व हितकारी ठरते.

अर्थात हे घडून आणायचे तर बाल्यावस्थेपासूनच सुसंस्कारांची आवश्यकता आहे. मला वाटतं, म्हणूनच नानासाहेबांनी, बालवयातच संस्कारांसाठी शाश्वत स्वरूपाची शिकवण देण्यासाठी बालसंस्कार केंद्रांचे आयोजन केलेले आहे. असे म्हणतात की, माती ओली असतानाच तिला योग्य आकार देऊन त्यातून अपेक्षित मूर्ती घडविता येते. म्हणूनच त्यांनी समाजप्रबोधन कार्याचा गाभा बालसंस्कार केंद्रावर आधारित ठेवला आहे. त्यांनी या बालसंस्कार केंद्रांमध्ये लहान मुलांना रुचेल, पटेल, समजेल व त्यांच्यामध्ये कायमस्वरूपी रुजेल अशा भाषेत संतपरंपरेची शाश्वत शिकवण सुयोग्य पद्धतीने देऊन, त्याचा सातत्याने पाठपुरावा केलेला आहे. बालसंस्कार केंद्रांना संचालित करण्यामागे आणखी एक उद्देश असा की, शालेय अभ्यासक्रमाद्वारे बालकांमध्ये वेगवेगळ्या प्रकारची कौशल्ये विकसित केली जातात. त्यांना भावी आयुष्यात नोकरी करता यावी अथवा उद्योगधंदा चालविता यावा याचे उपयुक्त ज्ञान त्यांना शाळेतच प्राप्त होते. विद्यार्थीदशेत उत्तम अभ्यास करून भावी आयुष्यात त्यांनी उत्तम यश प्राप्त करावे हे तर अभिप्रेतच आहे. तथापि शालेय अभ्यासक्रमामुळे चारित्र्यसंपन्नता, नीतिमत्ता, विनयशीलता व इतर उत्तम गुणांचे संवर्धन घडून येत नाही. कारण शालेय अभ्यासक्रमाला मर्यादा असतात. यासाठी संतवाङ्मयाचा शालेय अभ्यासक्रमात अंतर्भाव होणे आवश्यक आहे. म्हणून शालेय अभ्यासक्रमाला सक्षमपणे पूरक शिकवण देणे ही काळाची गरज आहे आणि या जाणिवेतूनच त्यांनी बालसंस्कार केंद्राची उभारणी केलेली आहे. या कारणाने नानासाहेबांनी शाळेच्या दिवसांच्या व वेळेच्या व्यतिरिक्त बालकांच्या सोईच्या दिवशी व सोईच्या वेळामध्ये ही केंद्रे चालविली आहेत. अर्थात या केंद्रांमध्ये बालकांचे भावी आयुष्य चारित्र्यवान व नीतिसंपन्न व्हावे याचा पाया घातला जातो. संस्कारमय जडणघडणीतून अंतरंग सामर्थ्यवान होते व भावी आयुष्यामध्ये सर्व प्रश्नांना व समस्यांना ते न घाबरता अगदी कणखरपणे सामोरे जाऊ शकतात. नानासाहेब नेहमी म्हणायचे की, ही बालके

त्यांना मिळालेल्या या शिकवण्याच्या आधारे विघातक कृत्यापासून दूर राहून आपापल्या कुटुंबामध्ये तसेच समाजामध्ये अत्यंत नम्रतेने व सामंजस्याने समर्थपणे उभी राहू शकतील. त्यांच्यामध्ये रुजविलेल्या सुसंस्कारांमुळे ही मुले आपल्या घरातील, कुटुंबातील समाजातील सर्व ज्येष्ठ व श्रेष्ठ व्यक्तींशी आदराने वागतील, त्यांचा योग्य तो सन्मान करतील.

गुरुजन, शिक्षक, आचार्य, अतिथी, पाहुणे या सर्वांशी नम्रतेने वागतील व त्यांच्या मानमर्यादा सांभाळतील. कारण हल्ली आपण असे पाहतो की, मुलांना आपल्या शिक्षकांबद्दल अजिबात आदर नसतो. पूर्वी गुरुकुलं होती, गुरु–शिष्य परंपरा, तेव्हा गुरुवर्य संबोधले जायचे. नंतर गुरुजी, मास्तर, सर आणि आता तर जरा अतिशयोक्ती वाटते, पण प्रत्यक्ष कानांवर पडलेला एक संवाद : एक मुलगा कॉलेजला गेला नव्हता म्हणून तो मित्राला विचारत होता, 'अरे, आज कुणाचा पीरियड होता?' तो म्हणतो, 'अरे, त्या टकल्याचा...'

मात्र बालभक्ती मार्गदर्शनाला जाणारी मुले, आयुष्यात पुढे आपल्या सहकाऱ्यांना आपल्या वागणुकीने जिंकून घेतील व असे सत्प्रवृत्त जीवन जगण्यात जीवनाची सार्थकता आहे हेच पटवून देतील. थोडक्यात, सुसंस्कारांमुळे ही बालके राष्ट्राचे खऱ्याखुऱ्या अर्थाने आदर्श नागरिक बनतील. सक्षम मार्गदर्शकाच्या भूमिकेत स्वतःला उभे करू शकतील.

२.७.१ धर्मसंकल्पना :

आपण पाहिले की, जेथे माणसाचे आकलन अपुरे पडते तेथे माणसाला अलौकिक शक्तीचा, आणि देवबाधांचा आधार मानावा लागतो. मानव आणि अलौकिक शक्ती ह्यांच्या परस्पर–संबंधाची कल्पना म्हणजे धर्मसंकल्पना होय. ह्यातूनच देव, देवता, देवदूत इत्यादी अलौकिक शक्तींची प्रतीके मानली जातात. ही प्रतीके अलौकिक शक्तीबद्दलची अतूट श्रद्धा आणि दैववाद ह्यांच्या संमिश्रणातून मानवाचे असे धार्मिक भावविश्व निर्माण होते.[१]

म्हणजेच सामाजिक संघटन (बांधीलकी). वाईट गोष्टींचा त्याग करून चांगल्या गोष्टी आत्मसात करण्याकरिता घालून दिलेले बंधन.

भक्तिमार्गातून प्रपंच साधून परमार्थ कसा करावा, हे लाखो समर्थ–सदस्यांना मौखिक निरूपणाद्वारे श्रीमत् दासबोध, श्री मनाचे श्लोक, सद्गुरू चरित्र यांद्वारे त्यातील गर्भितार्थ समजावून देऊन, सदस्यांचे अज्ञान दूर करण्याचे यशस्वी कार्य डॉ. नानासाहेबांनी अखंडपणे केले.

---

१. समाजशास्त्राची ओळख (प्रथम वर्ष) विषय – एस. जी. १, प्रकाशक–कार्यवाहक–टी. म. वि समाजविज्ञान कोष, सांस्कृतिक कोष– आवृत्ती २००८ पान क्र.–५६

प्रकृती अस्वास्थ्यानंतरही त्यांच्याकडे येणाऱ्यांना त्यांनी योग्य मार्ग दाखविला आहे. समर्थ उक्तीनुसार अज्ञान, कुसंग, कुकर्म, कुविचार यांचा अंतःकरणातील मन, बुद्धी, चित्त यावरील पगडा झुगारून रंजल्या–गांजल्यांना जवळ करण्याचे, त्यांना धीर देण्याचे, त्यांचा डळमळीत झालेला आत्मविश्वास पुन्हा उभा करण्याचे कार्य, तेवढ्याच निष्काम भूमिकेतून डॉ. नानासाहेबांनी आयुष्यभर अखंडपणे केले. त्यामुळे सर्वत्र सत्कर्म, सद्विचार, सुखशांती आणि समाधान लाखो कुटुंबांत नांदते आहे. समाजातील आदिवासींसारखी मागास जमात; मात्र केवळ श्रवणातून त्यांच्यात जीवन परिवर्तन घडवून आणण्याचे अनन्यसाधारण कार्य डॉ. नानासाहेबांनी वास्तवात आणून दाखविले आहे. समाज सुधारणेबरोबरच दारूबंदी, व्यसनमुक्तीसारखे प्रयोगदेखील यशस्वीपणे राबविले आहेत.

माणसाला माणसाप्रमाणे जीवन जगण्याची ज्यांनी शिकवण दिली त्या निरुपणकार नानासाहेब धर्माधिकारी यांनी, जनमानसासाठी अहोरात्र काम केले. मानवी आयुष्यातील विविध पैलूंचा त्यांनी अभ्यास केला. अशा या युगपुरुषाचे केवळ असणेच अनेकांसाठी खूप मोठा आधार होता. ८ जुलै, २००८ रोजी सायंकाळी डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांना देवाज्ञा झाली. समाजामध्ये कधीही भरून न निघणारी एक पोकळी निर्माण झाली.

देशाचा उद्धार करायला हवा; समाजाचा उद्धार करायला हवा आणि समाजाच्या उद्धारासाठी प्रत्येक घराचा आणि घरातील प्रत्येकाचा उद्धार व्हायला हवा हे नानासाहेबांचे धोरण होते. संपूर्ण समाजातील शांतताप्रिय जनता अशीच निरंतर समृद्ध जीवनाची वाटचाल करीत राहिली, तर डॉ. नानासाहेबांना हीच खऱ्या अर्थाने श्रद्धांजली ठरेल.

२.८ 'समकालीन समाजसुधारक'

ज्या समकालीनांनी जनजागृती आणि समाज सुधारण्याचे कार्य सामान्य लोकांपर्यंत पोहोचवले, त्यांच्या कार्याचा थोडक्यात आढावा पुढे दिला आहे.

१) पांडुरंगशास्त्री आठवले[१] :

वेदविद्यासंपन्न पांडुरंगपंत हे पांडुरंगशास्त्रींचे खापरपणजोबा, परशुरामपंत पणजोबा, लक्ष्मणशास्त्री हे आजोबा आणि वैजनाथशास्त्री आठवले हे दादांचे वडील. अशा या वेदविद्यासंपन्न

१. 'भक्तिकोश' तृतीय खंड 'भारतीय संप्रदाय' लेखक व संपादक– 'शंकर अभ्यंकर' पृष्ठ क्र. १५२९. 'वसंत श्री' (आध्यात्मिक विशेषांक) दिवाळी २००२ संपादक, वसंत तावडे पृष्ठ क्र. ११९.

पाच पिढ्यांच्या परंपरेत पांडुरंगशास्त्री आठवले याचा जन्म अश्विनशुद्ध सप्तमीस दि. १९ ऑक्टोबर १९२० रोजी 'रोहा' येथे झाला. वडलांनीच सुरू केलेल्या 'रोहा' येथील 'सरस्वती संस्कृत पाठशाळेत' त्यांचे प्रारंभिक अध्ययन झाले. शास्त्र, न्याय, व्याकरण, तर्कशास्त्र, इंग्रजी भाषा आदींचा त्यांनी सखोल अभ्यास केला. या सर्वांबरोबरच त्यांनी 'पाश्चिमात्य संस्कृती' आणि 'तत्त्वज्ञान' यांचाही सांगोपांग अभ्यास केला.

मोहमयी जगात वावरणाऱ्या माणसाला योग्य मार्गाने नेण्यासाठी विचारवंतांच्या मार्गदर्शनाची गरज असते. 'समाजसेवा' ही धर्म म्हणून करायला हवी असा एक विचार शास्त्रीजींच्या मनात येऊ लागला. त्यातून 'स्वाध्याय' ही संकल्पना आकारली आणि साकारली.

१९५८च्या १४ एप्रिलला पांडुरंगशास्त्रींनी ठाण्यात तत्त्वज्ञान विद्यापीठाची स्थापना केली. कोळीसमाजातील व्यसनाधीन मंडळींना एकत्र आणून भक्तीच्या माध्यमातून त्यांना सहकाराचे महत्त्व पटवून दिले. 'मत्स्यगंधा' प्रयोगाने सागरपुत्रांचे आयुष्यच बदलून गेले. शेतकऱ्यांकरिता 'योगेश्वरकृषी' हा अभिनव प्रयोग यशस्वी करून दाखविला. नवीन वृक्षांची लागवड जितकी महत्त्वाची असते तेवढीच उभी असलेली झाडे टिकवून ठेवणे महत्त्वाचे असते, हा वृक्षमंदिराचा नवा उपक्रम यशस्वी केला.

जपानमध्ये टोकियोतील सिमिझू गावात भरलेल्या विश्व तत्त्वज्ञान परिषदेचं प्रतिनिधित्व पांडुरंगशास्त्री आठवले यांनी केले.

अशा प्रकारे त्यांनी केलेलं 'सामाजिक कार्य'अचंबित करणारे आहे.

२) श्री. बाबामहाराज सातारकर[१] :

महाराजांचे जन्मस्थान सातारा हे आहे. त्यांचे मूळ नाव 'नीळकंठ ज्ञानेश्वर मोरे' त्यांच्या कुळात १२५ वर्षांची वारकरी–परंपरा चालू आहे. सद्गुरू श्री. दादामहाराज सातारकर हे बाबामहाराजांचे आजोबा व पारमार्थिक सद्गुरू. पारमार्थिक संस्कार व कीर्तन प्रवचनाचे शिक्षण त्यांना घरातच मिळाले.

आध्यात्मिक व सामाजिक कार्य जोमाने करण्याच्या दृष्टीने बाबामहाराजांनी १९८३मध्ये श्री चैतन्य आध्यात्मिक ज्ञानप्रसार संस्था स्थापन केली. नेत्रशिबिरे, मोफत चष्मे वाटप, प्रतिवर्षी

१. 'वसंत श्री' (आध्यात्मिक विशेषांक) दिवाळी २००२, संपादक – वसंत तावडे, पृष्ठ क्र. १५८.

६० ते ७० हजार भाविकांची विनामूल्य तपासणी व औषध–सेवा, वारीच्या वाटेने रोज दोनशे भाविकांना अनुदान तसेच १९९४पासून 'बाबामहाराज सातारकर ज्ञानपीठ प्रतिष्ठान'तर्फे दर आषाढी वारीला तीनशे वारकऱ्यांची विनामूल्य सोय; हे बाबामहाराजांचे थोडक्यात सांगता येईल असे अनमोल समाजकार्य!

वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून त्यांनी 'व्यसनमुक्ती' कार्यक्रम हाती घेतला आणि सुमारे बारा वर्षांत तीन लक्ष पन्नास हजार व्यक्तींना या संप्रदायात सामील करून घेतले. आज या मंडळींच्या वैयक्तिक व कौटुंबिक जीवनात परिवर्तन घडले असून, ही मंडळी सन्मार्गाला लागली आहेत, हे सत्य आहे!

३) सद्‌गुरू श्री. वामनराव पै[१] :

'श्री. वामनराव पै यांचा जन्म २१ ऑक्टोबर १९२३ रोजी झाला व मृत्यू २९ मे २०१२ रोजी झाला. 'श्री वामनराव पै खऱ्या अर्थाने विज्ञानाधारित जीवनविद्येचे शिल्पकार आहेत आणि विश्वाला सुखी करण्याचा वसा घेतलेला हा 'भोई' गेली ६५ वर्षे सातत्याने, निरपेक्षपणे जनसामान्यात मिसळून प्रबोधनाचे कार्य करीत होता. अंधश्रद्धा, निराशवाद, दैववाद आणि अज्ञान यांच्या विळख्यातून प्रत्येकाला मुक्त करण्यासाठी जीवनविद्या मिशनच्या माध्यमातून व नामसंप्रदाय मंडळातर्फे प्रवचने, ग्रंथनिर्मिती, व्याख्याने, ध्वनिफीत, दूरदर्शनवरील कार्यक्रम इत्यादीं द्वारा वामनराव पै यांचे ठोस विचार लक्षावधी माणसांना चांगला अनुभव देत आहेत.

'तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार' हे त्यांच्या तत्त्वज्ञानाचे सार आहे! विद्यार्थ्यांना मार्गदर्शनासाठी वामनराव पै यांचे विचार अतिशय उपयुक्त ठरले आहेत. अनेक शाळांमधून जीवनविद्येचे मार्गदर्शन (विनामूल्य) करणारे कार्यक्रम आयोजित केले जात आहेत. हे त्यांचे बोधवाक्य प्रत्येक सामान्य माणसाचा आत्मविश्वास वाढविणारे आहे. त्यांचे हे कार्य प्रतिबंधात्मक (प्रिव्हेन्टिव्ह), उपचारक (क्युरेटिव्ह) असे दोन्ही प्रकारचे आहे. त्याचे थोडक्यात स्वरूप खालीलप्रमाणे.

१) स्त्री–मुक्ती नव्हे, तर स्त्री–सन्मान. २) युवा पिढीवर सुसंस्कार. ३) कामावर प्रेम (Love work) इत्यादी.

समाजपरिवर्तनाचे कार्य हे वैचारिक क्रांतीमधून व्हावे ही श्री. वामनराव पै ह्यांची इच्छा आहे, असे दिसून येते.

---

१. 'वसंत श्री' (आध्यात्मिक विशेषांक) दिवाळी २००२, संपादक – वसंत तावडे पृष्ठ क्र. १४५–१४७ जीवनविद्या समज–गैरसमज (पान १९) प्र. १८, १९.

प्रकरण तिसरे

समाजपरिवर्तनाचे कार्य

प्रकरण तिसरे	समाजपरिवर्तनाचे कार्य	७५–८८

विभाग	शीर्षक	पृष्ठ क्रमांक
३.१	संत बहिणाबाई पुरस्काराच्या निमित्ताने केलेले प्रवचन व साधलेला सुसंवाद	७५
३.२	प्रवचनकार – एक प्रातिनिधिक प्रवचन	८३

प्रकरण तिसरे

समाजपरिवर्तनाचे कार्य

समाज जागृतीसाठी डॉ. नानासाहेबांनी ठिकठिकाणी प्रवचने दिली. त्यांतील ही दोन उदाहरणादाखल देत आहे.

३.१ : संत बहिणाबाई पुरस्काराच्या निमित्ताने केलेले प्रवचन व साधलेला सुसंवाद–

जे त्रैलोकी नाही दान। ते करिती संतसज्जन।

तया संतांचे महिमान। काय म्हणुनी वर्णावे।

त्याचं आता आपण किती वर्णन करणार, की जे त्रैलोकी दान कोणी देऊ शकत नाही, मिळत नाही. त्रैलोकी म्हणजे ब्रह्मा, विष्णु, महेश तिन्ही देव देऊ शकत नाही, ते दान बहिणाबाईंनी आपल्याला दिलेलं आहे आणि हे संतांचे महिमान, आता किती वर्णन करू, आपले शब्द फार कमी पडतील किंवा आपली जिव्हा आपले शब्दच बंद पाडतील असं त्यांनी अत्यंत मोठं कार्य करून ठेवलेलं आहे.

अरे संसार संसार, जसा तवा चुल्ह्यावर।

आधी हाताला चटके, तेव्हा मिळते भाकर।

बरोबर आहे, संसार हा मोठा विचित्र आहे. कारण काय आहे, माणसाला प्रपंच आणि संसार ह्यातला फरक कळला पाहिजे. 'प्रपंच' मी आहे, तो आपल्याजवळ आहे. प्रपंच घेऊनच आज आपण इथे आलेलो आहोत.

आपला जो संसार आहे तो, आपल्या गावी आहे, घरी संसार आहे! आणि संसारामध्ये नाना तऱ्हेने त्रास निर्माण होतात. त्रास फक्त गरिबाला होतो अशातला भाग नाही, श्रीमंताला होत नाही असा त्याचा अर्थ नाही. श्रीमंतालापण खूप चिंता असतात, श्रीमंतालासुद्धा त्रास होतो; गरिबालाही होतो. तर हा त्रासाचा जो भाग आहे, तो बहिणाबाई या साध्वी स्त्रीने भोगलेला आहे. पण या त्रासातून तिने एकच घेतलं, 'श्रीरामाचे नाव.'

तिथे रामाचेही मंदिर आहे असं मला कळलं, रामासमोर बसून ती सगळ्या गोष्टी करायची आणि रामावर तिचा पूर्ण विश्वास होता. तर ही परंपरा कुणाची? ही परंपरा समर्थ रामदासांची आहे आणि अशा बहिणाबाईंचा मला पुरस्कार मिळाला, ह्याचा मला अत्यंत आनंद होतोय, माझ्या डोळ्यांतून आनंदाश्रू येत आहेत.

जे वस्तु परम दुर्लभ। जयेचा अलभ्य लाभ।

तेची होय सुलभ। संत संगे करूनी।।

एवढा मोठा लाभ आपल्याला देऊन ठेवलेला आहे की, खरोखर संसारामध्ये नानातऱ्हेने माणसाला त्रास होतो. भाकरी खायला मिळते. मिळत नाही, असं नाही; पण हाताला चटके बसतात, तेव्हा ती भाकर मिळते आपल्याला. मग हे चटके कुणाला बसतात? जास्तीत जास्त स्त्रियांना याचा त्रास होतो, म्हणजे मायेला. तशी ही सुद्धा माया चटके खाते. आता त्रिगुण म्हणजे काय? ब्रह्मा, विष्णु, महेश–सत्त्व, रज तमोगुण. तिन्ही गुण आपल्या अंगामध्ये आहेत.

त्यातला एक द्वाड गुण जो आहे, तो रजोगुण आणि एक तमोगुण. सत्त्वगुण जो आहे तो व्यवस्थित चालायला शिकवतो, पण आपण ऐकत नाही. म्हणून आता तिन्ही गुणांवर हा जो तवा ठेवलेला आहे, तो तवा कोणता?

अरे, हा देह तवा. तो सारखा अग्नीमध्ये पडलेला आहे, आणि त्याच्यावर भाकर भाजायची! खरोखर अत्यंत श्रेष्ठ कविता आहे ती. जे काही दिलेलं आहे ते उत्तमच आहे.

संसार मुळीच नासका। विवेके करावा नेटका।

संसार फाटकातुटका होत जात आहे, असं आपल्याला समर्थांनी शिकवलेलं आहे. धर्म, अर्थ, काम, मोक्ष हे चारही पुरुषार्थ मानवधर्माला लागू आहेत. पशुपक्ष्यांना नाहीत. परंतु जास्त लोक 'अर्था'ला आकर्षित होतात. फायदा कुठे मिळेल, लाभ कुठे मिळेल याच्यामागे असतात. कर्तव्यात मागे असतात. भावनेमध्ये जे दोन भाग आहेत ते माणसाला खातात. अर्थ आणि काम भावनेतला भाग आहे. जर कर्तव्यात आले तर त्यांना स्वधर्म मिळाला. धर्माची जर महती कळली तर ते त्या अर्थाकडे व कामाकडे अजिबात वळणार नाहीत.

वळणार नाहीत म्हणजे काय! अर्थही कार्यकारण आहे आणि कामही कार्यकारण आहे. पण कार्यकारणच अति नाही. मोक्ष म्हटलं म्हणजे आज माणसाची कल्पना फार विचित्र आहे.

आपलं अज्ञान, श्रद्धा आहे, म्हणून म्हणतो, मेल्यावर आपण गाय दान दिली की, त्या गाईचं शेपूट धरून तो प्राण जात असतो; असा आपला समज आहे. अर्थात ती शेपटी आता हातात धरून चालणार नाही, जिवंतपणी शेपटी धरली पाहिजे. गाय म्हणजे काय तर नामस्मरण.

म्हणूनी समर्थांनी सांगितलंय.

पहिले ते हरिकथा निरूपण, दुसरे ते राजकारण।

तिसरे ते सावधपण, सर्वाविषयी। (श्रीदासबोध, दशक–११, समास–७, ओवी–४)

१) आता पहिले ते हरिकथा निरूपण म्हणजे काय? हरिकथेवर आपल्याला विवरण मिळायला पाहिजे, तर आपल्याला त्याचा लाभ होईल.

२) दुसरे ते राजकारण, आता राजकारण म्हणजे काय? राजकारण कुणाचं आहे. राजकारण भावनेतून चाललंय.

काम, क्रोध, मद, मत्सर, लोभ, दंभ, संशय आणि चिंता तिथे बसलेले असतात. जो तो एकमेकांच्या तंगड्या ओढायला सुरुवात करतो. कोण कुणाला धरतो, कोण कुणावर आरोप करतो, असं सारखं चालू असलं म्हणजे समजावं, इथे भावनेतून खेळ चालू आहे. हा खेळ आपल्या शरीरातच आहे. ते गुण वैखरीमध्ये उमटतात. तर आता वैखरीमध्ये आपल्या दोन तऱ्हा आहेत. अशा कुठेही तुम्हांला बघायला मिळणार नाहीत. एका वेळेला दोन तऱ्हा राहत नाहीत असं म्हणतात, ही गोष्ट खरी आहे, पण आपल्याकडे दोन तलवारी आहेत.

स्फुरे विषयी कल्पना ते अविद्या। स्फुरे ब्रह्म रे जाण माया सुविद्या। (मनाचे श्लोक)

म्हणजे सद्विद्या आणि अविद्या एकाच ठिकाणी आपल्याकडे आहेत. इतक्या गहन परिस्थितीत आपल्याला दिवस काढायचे असतात. अविद्या चटकन येते. ती शिकवावी लागत नाही किंवा अविद्येकरिता मी अजून तरी कुठं बघितलं नाही की, कॉलेज आहे, शिकवणी आहे.

मात्र सद्‌विद्या शिकण्याकरिता बैठकीला बसायला पाहिजे. बैठकीला जर बसला तरच तो सद्‌विद्याच्या मागे लागेल किंवा सद्‌विद्या त्याला कळेल.

नाहीतर अविद्या ठाम माझ्या पाठीशी उभी राहील आणि अशा अवस्थेमध्ये संसार–संसार सांगितला तो हा संसार.

आणि प्रपंच म्हणजे काय? मघाशी सांगायचं राहिलं, आता सांगून टाकतो. काम, क्रोध... हे आठ आहेत. त्यांचा प्रपंच, आता इथपर्यंत आपण घेऊन आलेलो आहोत. मरेपर्यंत तो प्रपंच आपल्याकडे राहील.

तेव्हा परमेश्वराने मानवाला उत्तम प्रकारे मोठमोठे ठेवे दिलेले आहेत. खूप मोठ्या देणग्या दिलेल्या आहेत; की संबंध जगाचं कल्याण मनुष्य करू शकेल. तो सामर्थ्याने उभा राहू शकेल आणि अशी माणसं आपल्याकडे होऊन गेलेली आहेत. हा मुख्य भाग लक्षात यायला पाहिजे की, कोणता ठेवा आपल्याला दिलेला आहे. तो ठेवा आपण कसा बिघडवतो? आता बिघडवण्याचं कारण काय? भावनेत आपण गुंतून राहतो.

अज्ञानमूल हरणम्। जन्मतः जायते अज्ञान। संस्कारे ज्ञान उच्चते।

माणसाला जन्माला आल्यानंतर अज्ञान तर आहेच. ज्ञान मिळवण्याकरिता आपल्याला प्रयत्न करायला पाहिजे. प्रयत्नांशिवाय ते मिळणार नाही.

प्रयत्न, प्रबोध आणि प्रचिती. प्रचिती घेतली पाहिजे.

नासे अज्ञान दुःख भ्रांती। शीघ्रची येथे ज्ञानप्राप्ती। आजच्या परिस्थितीत अशीच अवस्था झालेली आहे. माणसाला खरं काही कळत नाही. तो विषयांमध्ये लपेटलेला आहे.

आता लोक म्हणतात, आपलं सरकारपण म्हणतं, लोक दारिद्र्यरेषेखाली आहेत. मला मोठं कौतुक वाटतं, दारिद्र्यरेषेखाली तळाला दरिद्रीच आहेत. खाली आणखीन कुठे न्यायचे? ते दरिद्रीच आहेत. ज्या ज्या गोष्टी आपल्याला अप्रिय आहेत, त्या गोष्टी मानवाला वर्ज्य आहेत. त्याच गोष्टी आपण करतो. म्हणजे आपण दरिद्रीच. आपलं कधीही पोट भरणार नाही. याच्यावर एक गोष्ट सांगतो– तुम्हांला–

एक चांगला मनुष्य होता, म्हणजे रजोगुणी होता. त्यानं देवाला सांगितलं, 'देवा, मला मोहोरा दे.' त्याने झोळी घेतली आणि देवाकडे मोहोरा मागण्याकरिता गेला. देवाने त्याच्या झोळीत मोहोरा टाकायला सुरुवात केली. पाच टाकल्या, पंचवीस-पन्नास टाकल्या, देवाने आधी त्याला सांगितलं, 'बघ, तू जास्ती हाव करू नकोस, जर लोभ केलास तर होईल काय, झोळी फाटेल आणि झोळी फाटल्यावर मातीत मोहोरा पडल्या की मोहोरांची माती होईल.' तर तो मनुष्य म्हणाला, 'देवा, टाक रे तू अजून, तुझ्याकडे काय, चिकार आहेत.''वरपर्यंत झोळी भरली. आता एक जरी टाकली तरी झोळी फाटेल. तेव्हा आता तू मागू नकोस' तेव्हा तो देवाला बोलला, 'देवा, तुला लोभ झालाय म्हणून तू मला देत नाहीस.' म्हणजे देवाची स्थिती आपण कशी करतो! त्याने एक मोहोर टाकल्यानंतर अक्षरशः झोळी फाटली आणि त्या फाटलेल्या झोळीतील सगळ्या मोहोरांची माती झाली.

अशा तऱ्हेने माणसाला लोभ कसा फसवतो पाहा. एक लाखाचे दोन लाख कसे होतील, दहा लाखांचे वीस लाख कसे होतील, असा सारखा तो मागे लागत असतो. विषयांची आसक्ती हेच दारिद्र्य आहे. आणखीन दारिद्र्य दुसरं कोणतं नाही. आपल्याला समर्थांनी शिकविलेलं आहे.

नासे अज्ञान दुःख भ्रांती। शिघ्रची येथे ज्ञानप्राप्ती। (दासबोध, दशक-१, समास-१, ओवी-२०)

३१ सप्टेंबर १९९५. त्या दिवशी फार मोठी गोष्ट घडलेली आहे. सबंध जगामध्ये म्हणजे माणसाचं किती अज्ञान असतं, याच्याबद्दल आपल्याला खुलासा द्यायचा आहे. हे वेळोवेळी सांगितलं पाहिजे. काही लोक म्हणतात तुम्ही नेहमी कां सांगता? एकदा सांगितलं की, आपण विसरून जाऊ म्हणून. आपल्याला आठवण दिली पाहिजे. त्या दिवशी गणपती दूध प्यायला. फार मोठी गोष्ट आहे. त्या दिवशी गुरुवार होता. सकाळी ६ वाजल्यापासून रात्री १०-११ वाजेपर्यंत हे चालू होते.

मला पुष्कळ फोन आले. ते म्हणाले, 'काहीतरी सांगा आम्हांला याच्याबद्दल. अहो, गणपती दूध प्यायला म्हणजे काय? चमत्कार आहे.

मी म्हटलं, 'याला चमत्कार म्हणत नाहीत.'

'मग काय आहे ते?'

तर म्हटलं, 'अगदी सोपी, साधी गोष्ट आहे. झटकन निर्णय लागून जाईल.'

देह, इंद्रिय आणि प्राण हे तीनही असल्याशिवय कोणताही जीव जेवू, खाऊ, पिऊ शकत नाही. त्या गणपतीत देह, इंद्रिय, प्राण आहेत का? पार्थिव आहे तो. मग तो कसा काय दूध पिणार? हाऊ इज धीस पॉसिबल? शक्यच नाही हे!

म्हणजे माणसाची द्विधा अवस्था कशी होते, याला अज्ञान, श्रद्धा म्हणतात. याला मी नाव ठेवलंय आता, 'अंधश्रद्धा'. अज्ञानावर श्रद्धा बसलेली आहे. ज्या वेळेला त्याला ज्ञान येईल त्या वेळेला तो अशी गोष्ट करणार नाही आणि आमच्यापैकी कुणीही माणसाने हे केले नाही हे मला ठाऊक आहे.

अशाप्रकारे अज्ञान हा जो भाग आहे, तो काळोखातला आहे. ज्ञान म्हणजे उजेड. ज्ञान ईश्वरी आहे. ज्ञानाला नेहमी ज्ञानेश्वरीच म्हणतात.

आपल्या सर्वांना दासबोधाच्या आणि गुरुचरित्राच्या विवरणातून पुष्कळ निरूपणं ऐकायला मिळालेली आहेत. आपण ऐकतो आणि बरोबर त्याप्रमाणे वागण्याचा प्रयत्न करीत असतो. आणि तसं वागायला आपण शिकलो हे अत्यंत महत्त्वाचं आहे. आज आत्ता पुण्यामध्ये सुद्धा आपल्या शिस्तीबद्दल पुष्कळ लोकांनी प्रशंसा केली. आपलीच मंडळी होती पुण्याला, दुसरं कोण नव्हतं. ते म्हणाले, खरोखर अतिआनंद वाटला आम्हांला. या पुण्यामध्ये आतापर्यंत असं कधी झालं नव्हतं. पुष्कळशा सभा झाल्या. पण एवढी मोठी सभा पाहिली नाही. रेकॉर्ड ब्रेक झाला. पण माणसाची शिस्त आणि शांतता व नम्रता ही फार श्रेष्ठ आहे. नम्रता दुर्बलाकडे कधीच राहत नाही.

आता हात जोडले म्हणजे माणूस आपल्याला बावळट समजतो. मला कळलं ते. तो नमस्कार नाही करत. तो म्हणतो बावळट आहे हा, म्हणून हात जोडतो. पण मनुष्य बावळट कधी नसतो. नमस्कार करणारा मनुष्य फार शहाणा असतो. अहो, नमस्कार हे सोपं औषध आहे. कुणालाही नमस्कार करावा. परमेश्वरालाच करावा, असं म्हणून कसं चालेल? प्रत्येक माणसाला आपण नमस्कार केला पाहिजे. प्रत्येक ठिकाणी परमेश्वर आहे, त्याला स्वदेव म्हणतात. त्याला काय म्हणतात, 'स्वदेव'.

हा स्वदेव बघा सकाळी आपल्याला लवकर उठवतो. आपल्या अंगावरची चादर कोण काढतं? अहो, परमेश्वर स्वतः काढतो. ज्या दिवशी निघून जाईल त्या दिवशी चादर कोण काढील, हे सांगा.

मला काय म्हणायचं आहे, स्वदेवाची ओळख घ्या. हा आपलाच देश आहे. पण हा देश कशावर चालेल?

आपला देश आपल्या स्वदेवावर, स्वदेशावर आणि स्वधर्मावर चालेल. आपणच चालविणारे आहोत. जर आपण असं वेडवाकडं केलं तर आपल्या देशावर महान संकट येईल.

आपण देशाकरिता काहीही करीत नाही हल्ली. काय करतो, सांगा तुम्ही मला! आता आम्ही हे सारं देशासाठी कार्य केलंय. एवढा हा देह तुमच्यासमोर उभा आहे. जिद्द ठेवून मी काम केलेलं आहे. मला खूप त्रास झाला आणि अजूनही त्रास होईल, पण मी काम सोडणार नाही. प्रत्येकाने कणभरतरी आपल्या देशासाठी करावं अशी माझी नम्र विनंती सगळ्यांना आहे. वेळ मिळत नसेल तर वेळ काढा. शेती लावा, धान्य पिकवा. हे देशाचं कार्य आहे.

आपण कोणतीही गोष्ट करताना देशाकरिता करावी. देशाला काळिमा लागेल अशी कोणतीही गोष्ट करू नये. याचा आपण प्रयत्न, प्रबोध, प्रचितीतून अनुभव घेतला पाहिजे. आपण सारखं त्याच्या मागे लागायला पाहिजे.

स्वदेश, स्वदेव आणि स्वधर्म या तीन अत्यंत महत्त्वाच्या गोष्टी आहेत. यांची ज्याला जाणीव झाली तो खरा.

आता पुष्कळशा गोष्टी आपल्याला कळलेल्या आहेत. परत-परत त्याच सांगितल्या अशातला भाग नाही. या परत-परत सांगाव्याच लागतात. चांगली गोष्ट नेहमी सांगायला लागते. नाहीतर आपल्या घरात होत नाही. मघाशी कुणीतरी भाषणात सांगितले की,

शुभंकरोति कल्याणम्।

आरोग्यम् धनसंपदा।

शत्रुबुद्धी विनाशाय।

सूर्यकोटी समप्रभ।।

खरं आहे हे; हे आपल्या धर्माचं ब्रीद आहे. आता आपले हे दिवे आले म्हणून सोडून द्या, तरी शुभंकरोती म्हणायला हरकत नाही. प्रत्येकानं म्हणावं आणि आपल्या बालभक्ती-मार्गदर्शनातून

मुलांना शिकवतो आपण. आणि मुले म्हणतात आपली. देवासमोर नमस्कार करायचा आहे. जाणीव घ्यायची आहे. देव म्हणजे काय? हे कळले पाहिजे आपल्याला.

अरे, देव–देव ज्याने दिलं तो देव. जो देतो तो देव. ज्याने दिलेलं आहे तो देव. पुष्कळ दिलेलं आहे देवानं.

आता देवाकडे आपल्याला काय मागायचं आहे? देवाकडे काहीही मागू नका. देवाला एवढंच सांगा, मला सद्‌बुद्धी दे. बाकी काही देऊ नको.

निर्गुण, निर्मळ, कदा

न फुटो नारायणा।

आता मज ऐसे करी।

तुझे पाय चित्ती धरी।

देव म्हणतो, तुला दिलेलं असताना मागतोस काय माझ्याकडे? नवस काय करतो, सायास काय करतो? आं? असं करू नको. बुद्धी शुद्ध ठेव. देहबुद्धीत राहू नकोस. आत्मबुद्धीकडे ये. सतत उपासना कर.

उपासनेचा मोठा आश्रयो। उपासनेविण निराश्रयो।

उदंड केले तरी जयो। प्राप्त नाही।।

समर्थांची नाही पाटी, त्याला भलताच कुटी।

हे लोक त्याला कुटतात.

आपण सर्व मंडळी इथे एकत्रित येऊन बसलो. कारण आपल्याला एकात्मता शिकवलेली आहे. एकात्मता हा नुसता शब्द आपण दाखविलेला. आता आपल्याकडे लोक काय म्हणतात? एकात्मता झाली पाहिजे. ती करण्याकरिता एकात्मतेची जी काही शक्ती आहे, तीच त्याची एकात्मता करू शकते. ती शक्ती म्हणजे प्रबोधन–शक्ती. याचा आज स्वानुभाव आहे. एवढे बोलून मी आता थांबतो.''

निष्कर्ष : डॉ. नानासाहेबांनी दिलेल्या प्रवचनावरून संशोधिकेला असे वाटते की, महाराष्ट्रातील संत–परंपरेने आपल्याला उत्तम शिकवण दिली आहे. 'आधी हाताला चटके, तेव्हा मिळते भाकर।' खरंच, सध्याच्या कलियुगातला काळ अतिशय कठीण आहे. तेव्हा प्रत्येक क्षणाला आपण सावध राहिले पाहिजे.

अज्ञानमूल हरणम्। जन्म कर्म निवारणं।

जिवंतपणी माणसांनी माणसाशी माणसासारखं वागलं पाहिजे. संसार–प्रपंच करायचा म्हणजे नोकरी–धंदा केलाच पाहिजे. अधिकृत किंवा सरळमार्गाने धन मिळवणे ठीक. पण वाममार्गाने पैसा मिळविण्याची इच्छा धरणे म्हणजे तो भ्रष्टाचारच होतो.

अंधश्रद्धेलाच नानासाहेब अज्ञानश्रद्धा म्हणतात. पिंडातले अज्ञानच माणसाला नको त्या गोष्टींवर विश्वास ठेवायला पाडते. जाता–जाता नानासाहेबांनी सगळ्यांना एक उत्तम संदेश दिला, तो म्हणजे एकात्मता आणि राष्ट्रप्रेम. प्रत्येकाने आपल्या देशाकरिता काहीतरी चांगलं केलं पाहिजे.

प्रवचनातील आशयाचे मर्म : ह्या प्रवचनातून जे समाजप्रबोधन घडले आहे. त्या प्रबोधनातन व्यक्तीची, कुटुंबाची धारणा, प्रपंच नेटका होऊन व्यक्तीची व कुटुंबाची समृद्धी आणि स्वास्थ्य वाढवण्यासाठी हे प्रवचन योग्य ते संस्कार करते आहे व सामाजिक पुनरुत्थानासाठी त्याचा उपयोग होऊ शकतो असे म्हणता येईल. कारण प्रवचनकर्त्याची भूमिका नुसती भावनिक व कल्पनाविलासावर आधारलेली नसून ती बुद्धिवादी, वास्तवाचे भान ठेवणारी आणि व्यावहारिक आहे.

३.२ : प्रवचनकार – एक प्रातिनिधिक प्रवचन

''आता आपल्या सगळ्यांना सांगायला काय! सकाळ–दुपारपासून तुम्ही सर्व आनंदाने आलेले आहात; तुमच्या अंगामध्ये चैतन्य आलेलं आहे.

आता 'दासबोध'म्हणजे नेमकं काय? हा सगळ्यांपुढे महत्त्वाचा प्रश्न आहे. ३५० वर्षांपूर्वी आपल्या देशावर फार मोठी आपत्ती आलेली होती. यवनांकडून आक्रमण होत होतं. आपल्या स्त्रिया पळवल्या जात होत्या. गाई, धान्यही पळवून नेत होते. त्यावेळेची परिस्थिती अशी होती.

म्हणजे शिवाजी महाराजांच्या जन्माचा पूर्वकाळ आहे तो. त्यावेळेस समर्थांनी सबंध

हिंदुस्थानमध्ये प्रवास केला. सगळीकडे काय चाललं आहे तेव्हा त्यांच्या हातात काही वैराग्य सामर्थ्य नव्हते. तर त्यांनी स्वतः पट तयार करून दासबोधाप्रमाणे सर्वांना ज्ञान देऊन उभे केले. प्रत्येक ठिकाणी माणसे तयार केली. तसेच त्यांचे शिष्यही तयार झाले. अशी खूप मोठी कार्ये त्यांनी केलेली आहेत. त्यावेळेला त्यांनी सांगितलं.

गनिमांच्या देखता फौजा। रणशुरांच्या फुर्फुरती भुजा।

ऐसा पाहिजे की राजा कैपक्षी –परमार्थी।

गनिमांकडे फौजा असतातच. मग राजा कसा पाहिजे, त्याने कुणाचाही पक्ष घेता कामा नये. तरच आपले चांगले दिवस येतील. अशा राजाला दुर्जन घाबरतात आणि आता मात्र आमच्या राजाजवळ दुर्जन बसतात. उलटाच काळ चाललाय आज. तेव्हा असा राजा नको.

आपण आज इथे बसलेलो आहोत. समर्थांच्या त्यावेळेस शिवाजीराजे आले नसते तर आपलं काय झालं असतं, हे मी सांगण्याची गरज नाही. फार वाईट परिस्थिती झाली असती आपली.

आणि हे सगळं दासबोधातील मार्गदर्शनानुसार त्यांनी करून घेतलं. हे जे दासबोधाचं कार्य आहे, ते अत्यंत श्रेष्ठ आहे. त्याने हृदयपरिवर्तन होतं. हे कार्य अगदी ५६–५७ वर्षे चालू आहे. प्रत्येक निरूपणातून, बैठकीतून आपल्याकडे अज्ञान नष्ट होतं.

जन्मतः जायते अज्ञान! संस्कारे ज्ञान उच्चते।

जर संस्कार उत्तम झाले, तर ज्ञानाला सामर्थ्य मिळेल आणि ज्ञान कायम टिकेल. मानवी नीतिमूल्यांची जोपासना कशी करावयाची आणि त्याची सूत्रे काय हे समर्थांनी आपल्याला शिकवलेलं आहे. मलासुद्धा माहिती नव्हतं. मी शिकलो तेव्हा मला यायला लागलं.

पहिला समास 'मंगलाचरणाचा' जो आहे, तो अत्यंत महत्त्वाचा समास आहे. काही लोक असं म्हणतात, 'मंगलाचरण' समास किती दिवस?' पण आपल्याला नेहमी हा पहिला समास ऐकलाच पाहिजे. ऐकलेची ऐकावे पुन्हा पुन्हा। कारण कुठचीही वाईट गोष्ट माणसाला लवकर येते. पण चांगलं शिकावं लागतं. म्हणून समर्थांनी सांगितलं याच्यावर, ऐकण्याशिवाय आणि शिकल्याशिवाय शहाणपण आले, ऐसे ऐकिले ना देखिले भूमंडळी. हे सूत्र आहे समर्थांचं.

आता त्यातसुद्धा आणखी तीन प्रश्न आहेत. समर्थांची तीन सूत्रे आहेत. ऐकले, कळले आणि वळले. ऐकायचं आपण, ऐकून सोडून द्यायचं. आता नाना बोलले काय! बोलले असतील काहीतरी, दिलं सोडून. गेलं! पण ऐकल्यानंतर जर त्याला कळलं, तरी पण तो ज्याअर्थी वळला नाही त्याअर्थी तो नापास झाला. वळलं पाहिजे, त्या वळणातून तो उतरला पाहिजे. ऐकले, कळले आणि वळले.

तसं आपण जे ऐकतो तसं आपण श्रवण, मनन, निदिध्यास ही सूत्रे लक्षात घेतली पाहिजेत.

प्रयत्न, प्रबोध आणि प्रचिती आपल्याकडे कधीही उद्‌भवल्याशिवाय राहणार नाही. कामावर गेला तर उत्तमप्रकारे कामसुद्धा करील तो. क्रियाशीलपणा आलेला असतो अंगामध्ये. श्रवणामुळे ही क्रियाशीलता येते. 'श्रवणे चुके अधोगती, मनास होय विश्रांती–समाधान'; हा समर्थांचा शब्द आहे.

माझ्याकडे चांगला सुशिक्षित माणूस काही कामानिमित्त आला होता, तो मला म्हणाला, 'आपले भाषण मी एका ठिकाणी ऐकलं आहे. तर मला तुम्ही भ्रम दाखवाल का?' मी म्हटलं, 'बघू, जमलं तर दाखवीन मी.' तर म्हणाला, 'नाही. तुम्ही मला दाखवायलाच पाहिजे.' म्हटलं, 'असं कसं तुम्ही बोलता हो, मी काय सर्वज्ञ आहे का? तुम्ही माझ्याबरोबर येता का?' दमानं विचारलं त्याला.

आमचं घर असं समुद्रकिनाऱ्याला आहे. त्याला घेऊन गेलो. तरुण आहे तो. मी जोराने पाऊल टाकतोय समुद्रकिनाऱ्याकडे आणि तो तरुण माझ्याकडे असा बघतोय, की हा म्हातारा करतोय काय? कुठे नेतोय आपल्याला. त्याला सांगितलं, 'घाबरू नको. हा म्हातारा काही करणार नाही.'

मी उभं राहून त्याला विचारलं, 'समोर काय दिसतंय?' तो म्हणाला, 'समुद्र दिसतोय.' 'पुढे काय दिसतंय?' तो म्हणाला, 'आकाश दिसतंय!' 'आणखीन्?' तो म्हणाला, 'आकाश पाण्याला टेकलेलं दिसतंय.' मी त्याला म्हणालो, 'इज इट करेक्ट? तो म्हणाला, 'नाही'. 'मग दिसतं कसं?' म्हटलं.

'अरे, ज्याचं नाव क्षितिज ठेवलं त्याचं बारसं केलं. पण क्षितिज नावाची वस्तूच नाहीये. कुणी दाखवू शकेल का या नावाची वस्तू? ती दिसते मात्र. तसा भ्रम माणसाला होतो. भ्रम ही

आपली एक अर्धवट अवस्था आहे. अज्ञानातील आपली अवस्था आहे. याच्याकरिता मनुष्य विचारवंत झाला पाहिजे. विवेकी, निरीक्षक आणि बुद्धिवादी झाला पाहिजे. असं माझं तुम्हां सगळ्यांना सांगणं आहे. सर्वांनी सावध राहा. कशालाही असं फसू नका. आपल्या बुद्धीकडे मांडायचं आणि पटतंय का ते बघायचं.

अहो, साधा सर्प जर आपल्या घरामध्ये आला तर मारायला काठी आपल्याकडे असते, पण काठी आपल्याकडे येते का? आपल्याला काठीपर्यंत जावं लागतं आणि सर्प मारण्याचीसुद्धा माहिती पाहिजे. भलत्याने तो मारण्याचा प्रयत्न करू नये.

अहो, बुद्धिवादी राहा, निरीक्षक व्हा. आपला दासबोध त्याचकरता आपण ठेवलेला आहे.

तुम्हांला एक उदाहरण देतो. का, तर उदाहरणातून आपल्या शिकायला मिळतं. १९७५ साली इंदिरा गांधीच्या राज्यामध्ये एक फार मोठी ऑर्डर काढली होती. त्या ऑर्डरचं नाव आता घेत नाही मी. तुम्हांला माहिती आहे. याला पकड–त्याला पकड, याला तुरुंगात नेऊन टाक, त्याला तुरुंगात नेऊन टाक, असं चाललं होतं.

त्या वेळेला बैठका चालू असायच्या आणि त्या वेळेला बैठका रात्री साडेबारा–एकपर्यंत चालायच्या. तिथे पोलीस यायचे ऐकायला. म्हणजे ऑर्डर असायची त्यांना– 'तिथे बरीच माणसं जमलेली आहेत. तिथे काय चाललंय ते लिहून आणा. त्याचा आमच्याकडे रिपोर्ट करा.' त्यातले जे व्यसनी होते ते चांगले झाले. त्यातले काही रिटायर झाले, काही अजून सर्व्हिसला आहेत. त्यांच्या आयुष्यामध्ये त्यांना चांगले दिवस दिसले श्रवणामुळे. म्हणून सांगतो,

श्रवणे चुके अधोगती। मनास होय विश्रांती समाधान।

म्हणून आपण श्रवण करतो. कर्म, ज्ञान आणि उपासना ह्या त्रयींत सगळं आहे. एकदम साध्या–सोप्या सरळ शब्दांत आपण ऐकतो, म्हणजे आपण ज्ञानी झालो असं नव्हे, पण आपलं अज्ञान नष्ट होतं. ही महत्त्वाची गोष्ट आहे.

आपण कितीही शिकलेसवरलेले असलो, ग्रॅज्युएट झालेलो असलो तरी, त्याचा उपयोग नोकरी करिताच करतो.

एवम्, पोट भरावयाची विद्या! त्यास म्हणू नये सद्विद्या।

दुसऱ्याला आपल्याला शिकवता येत नाही, फार कठीण काम आहे ते. तेव्हा शांत राहा, बुद्धिवादी व्हा. आपल्याला जे काही शिकायचं आहे ते दासबोधातून मिळणारच आहे.

तशा अनेक अफवा उठतील. मागेही उठलेल्या आहेत. ५ जुलै १९६५ला अष्टग्रही आली होती. आठ ग्रह एका ठिकाणी आले होते. त्या वेळेला लोकांची काय घबराट उडाली होती. माझ्याकडे सगळे विचारायचे, 'काय हो, काय झाले? काय होणार आहे?' मी म्हणायचो, 'काहीही होणार नाही. अरे, अष्टग्रहही एका रेषेत आले म्हणून काय झाले. त्यांनी येऊ नये का? अरे, गणित आहे ते. गणिताप्रमाणे आले. शक्य आहे.'

आता आपण नाही कुंभमेळ्याला एका ठिकाणी जमतो? तसा ग्रहांचा कुंभमेळा असेल. आज पृथ्वीचं आयुष्य किती ते शास्त्रात कुठेतरी वाचलंय मी. ५ अब्ज वर्षे, परवाच वाचलं मी, मलापण माहिती नव्हतं. अशी पृथ्वी कधीच जाणार नाही.

तेव्हा कुणीही घाबरू नका. लक्षात ठेवा, हे शहर आहे, त्यामध्ये अफवा पिकतात, कोण काय वाटेल ते सांगतो, पेपरला पण छापून येतं ते. तसं नको आपल्याला, प्रत्येकाने बुद्धिवादी व्हा.

तेव्हा शांततेनं राहा. आपली उपासना करायची, आपण नीट राहायचं त्याप्रमाणे आपण केलं ना, तर केव्हाही आपलं चांगलं होईल. आणि चांगली झालेली माणसं आपण बघतोच डोळ्यांनी.

श्रवणाकरता तीन तास एका ठिकाणी बसलं पाहिजे. अर्धा तास तो एका जागी बसू शकत नव्हता, सारखा इकडून तिकडे करत होता. पण आता मात्र तो एका जागी बसून श्रवण करू शकतो.''

निष्कर्ष : नानासाहेबांनी केलेल्या ह्या प्रवचनावरून संशोधिकेला असे वाटते की, कुठल्याही गोष्टीची निवड आपण डोळे उघडे ठेवून आणि बुद्धी जागृत ठेवून केली पाहिजे. मग तो राजा असो की आपला पुढारी. डॉ. नानासाहेबांचा जोर श्रवणावर आहे, पण नुसतेच ऐकून चालणार नाही, तर ज्या चांगल्या गोष्टी आपण ऐकतो त्याप्रमाणे आपण आपल्यात बदल करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

कुठल्याही अफवांवर विश्वास ठेवून नका. त्याकडे डोळसपणे बघा, शहानिशा करून घ्या.

म्हणून खरे अध्यात्म हे कर्मकांडापेक्षा आत्मचिंतनावर अवलंबून आहे. चिंतन हा सुधारण्याचा पाया आहे. कारण चिंतनाने भ्रमनिरास होतो.

टीप : ती. नानासाहेब यांच्या प्रवचनात ओघात आलेल्या ओव्या श्रीदासबोधातील आहेत. मात्र त्या अर्ध्याच/एक ओळीच्या असल्याने संदर्भ दिले नाहीत.

प्रकरण चौथे

प्रवासी – प्रबोधनासाठी प्रवास

विभाग	शीर्षक	पृष्ठ क्रमांक
४.१	श्रीक्षेत्र जांब, सज्जनगड, पैठण, चाफळ, गाणगापूर तीर्थयात्रा	९०
४.२	'श्री क्षेत्र नागपूर, जबलपूर – अलाहाबाद – वाराणसी यात्रा'	९५

प्रकरण चौथे

प्रवासी

प्रबोधनासाठी प्रवास : नानांनी भारतभ्रमण केले, परंतु उदाहरणदाखल त्यांची एकदोन प्रवासवर्णने देत आहे.

४.१ : प्रवासवर्णन

श्री क्षेत्र जांब, सज्जनगड, पैठण, चाफळ, गाणगापूर तीर्थयात्रेचा वृत्तान्त. कालावधी २२/२/८९ ते २७/२/८९

साडावमार्गे प्रवास सुरू झाला. पोलादपूर–महाबळेश्वर–वाई–सातारा सज्जनगड असा प्रवास सुरू झाला. सातारला मुक्काम, नंतर चाफळ–औंदुबर नृसिंहवाडी.

नृसिंहवाडी येथे अनेक तीर्थांबद्दल एकाने विचारले असता, नानांनी बोध दिला, ''अहो, या भूमीला जो जिवंत ठेवतो तो भगवंत! जो कीर्तिवंत वरदवंत–सामर्थ्यवंत आहे. तो भगवंत बाहेर आहे तसा आतही आहे. म्हणजे बाहेर जशी तीर्थे दाखविली आहेत, तशी आतही पायापासून डोक्यापर्यंत मुख्य ९ तीर्थे आहेत. इतर असंख्य आहेत, पहिले श्रवणतीर्थ, दुसरे कीर्तन हे तीर्थ, की अशा तीर्थात स्नान केल्यानंतर पाप म्हणजे अज्ञान दूर होते.

ब्रह्मांड तयार करताना परमेश्वराने जे जे साहित्य वापरले तेच साहित्य त्याने पिंड तयार करताना वापरले. 'आईच्या उदरात पिंड तयार करताना, आईच्या ब्रह्मांडातलेच कण–कण अंश नेऊन हा पिंड तयार केला; बाहेरचे कोणतेही साहित्य घेतले नाही. याचा अर्थ देह हा उपाधीत आहे. पण त्या उपाधीत माणसाने अडकू नये व त्या उपाधीशिवाय राहूसुद्धा नये. म्हणजेच माणसाने जेवणाला कंटाळू नये व जेवल्याशिवाय राहू नये.

श्रवणाचे महत्त्व सांगताना नाना म्हणाले, ''गणित सोडवून न देता, फक्त रीत सांगावी. जर तो ठेव्यासारखाच असेल, घेणार असेल तरच घेईल. म्हणजे त्याचे आपल्या या बँकेत खाते असेल तर तो येईल. पण बँकेत खाते नसेल, जमा नसेल तर आपण दिलेला लाख रुपयांचा चेक त्याच्या खाती जमा होणार नाही आणि त्या माणसाने नुसते खाते उघडून काय उपयोग? त्याने त्याच्या खाती शिल्लकही टाकली पाहिजे आणि हेसुद्धा लक्षात ठेवा की, overdraft not allowed.''

२४ तारखेला पहाटे ६ वाजता कागवाडमार्गे निघाल्यानंतर ११.४० वाजता विजापूर येथे एका हॉटेलमध्ये चहा–कॉफी करताना थांबले. तेव्हा तिथला एक बोर्ड बघून नाना मोठ्याने तो वाचू लागले, 'बाहेरचे काही आत आणून खायचे नाही, व इथला कोणताही पदार्थ बाहेर न्यायचा नाही,' वाचल्यावर नाना म्हणाले, 'शंभर टक्के बरोबर आहे. जे खायचे ते घरातलेच व घरातल्या घरात खायचे. म्हणजे श्रीने जी चौकट आखून दिलीय त्यातच व्यवहार करायचा.' नेमका याच वेळी भरपूर चरस–गांजा ओढलेला, पांढरा फटफटीत, नशा केलेला एक हिप्पी हॉटेलात आला व टेबलाजवळ बसला. त्यावेळी नाना म्हणाले, 'अशा लोकांना बाहेर हाकलले पाहिजे.' (म्हणजे असा एखादा हिप्पी, नशेबाज बेफिकीर (विषय) आपल्या पिंडात ठाण मांडून बसला असेल त्याला बाहेर काढा.)

दि. २५/२/८६ रोजी सकाळी साडेसहा वाजता गाणगापूरहून निघाल्यानंतर उमरगा येथे दहा वाजता पेट्रोल भरत असताना नाना सहज म्हणाले, 'पेट्रोल आहे, गाडी नवीन आहे. पण चालविणाराच जर नसेल तर या गाडीचा काय उपयोग? (म्हणजे गाडी हा देह चालविणारा सद्गुरू असेल तरच...) संध्याकाळी ८.१५ वाजता जांब येथे पोहोचले.

नानांची जांबची ही चौथी भेट आहे. पहिली भेट सन १९४०मध्ये, दुसरी भेट १९४८मध्ये, तिसरी १९५६मध्ये व चौथी १९८६मध्ये. पहिल्या तिन्ही भेटींत नानांना श्री. अण्णा भागवत भेटले नव्हते.

श्री. अण्णा भागवत १९३२ साली पुण्याहून जांब येथे आले. त्यावेळी जांब– जे समर्थ रामदास स्वामींचे जन्मगाव आहे– तेथे त्यांचे मंदिर नव्हते. इथली वास्तू–जमीन इत्यादी हैद्राबादच्या निझामाच्या ताब्यात होती आणि तो असा होता की, एकवेळ मशीद बांधायला परवानगी देईल, पण मंदिर बांधायला देणार नाही. परंतु धुळ्याचे श्री श्रीकृष्ण शंकर देव यांची तिकडे ओळख होती. त्यांनी खूप खटपट केली. श्रीसमर्थकृपेने इथे हे मंदिर उभे राहिले. अशी माहिती श्री. अण्णा भागवतांनी दिली. पुढे या मंदिराची देखभाल, पूजा–अर्चा तेच करीत असत.

जांब मुक्कामी अण्णांशी गप्पा मारताना, चर्चा करताना साध्या साध्या उदाहरणातून नानांनी अनेक बोध दिले. ते खालीलप्रमाणे, ''यत्न करा म्हणजे प्रबोधशक्ती वाढेल व प्रबोधशक्तीने सामर्थ्य येईल, त्याला देशप्रेम–निष्ठा प्राप्त झालेली असेल! कारण आज मोगलाई झालेली आहे. रात्री हल्ले होत आहेत. दिवसाही होत आहेत. बलात्कार होत आहेत. तरी आमचे राज्यकर्ते

म्हणतात, आम्ही स्वतंत्र झालो! आश्चर्यच आहे. अरे, स्वतंत्र कुठे झालात? आम्ही म्हणतो अजून स्वराज्य मिळालं नाही. १५/८/१९४७ त्या दिवशी स्वराज्य मिळाले असे तुम्ही म्हणता, पण त्याच रात्री विकारांनी त्या स्वराज्याचा ताबा घेतला आहे. आज सुज्ञ नागरिकाला कळले पाहिजे की देशासाठी आपल्याला काय करायचे आहे? आणि अधिष्ठान असल्याशिवाय कार्य होत नाही. अधिष्ठान असेल–श्रवण–मनन असेल तरच हे होणार. यासाठी त्याग करण्याची तुमची (राज्यकर्ते हो!) ताकद आहे का? तुम्ही तर 'अधिकार' विकत घेता! लोकांचे घेऊ नका तर श्रींचे घ्या. आता सर्व लोकांचे बारा वाजले आहेत. एकाही पक्षाकडे अधिष्ठान नाही. मात्र यापुढील आपले हे कार्य श्री–आज्ञेने हळूहळू आकारात येईल, याबद्दल आम्हांला संदेह नाही. 'हिरकणी' रात्रभर गडावर होती व ती तरुण होती; म्हातारी तर नव्हती. आणि गडावर कुणी माणसे नव्हती? सैन्य नव्हते? पण काय बिशाद, कुणी काय करील! हेच सामर्थ्याचे लक्षण आहे. आताचे हे राज्य बरबटलेले आहे. घाण व भ्रष्टाचारी झाले आहे व त्या कार्यासाठी एक प्रकारे यांत्रिक बाहुल्या तयार करण्याचे काम चालू आहे. त्याशिवाय ही घाण कोण निपटून काढणार? असे हे फार मोठे कार्य आहे व श्री–आज्ञेने, समर्थ कृपेने हे निश्चितच पार पडेल.

काल संध्याकाळी संगमात आंघोळ केली. बऱ्याच ठिकाणी पाहिले तर काय दिसले? नऊ दिवस सकाळपासून रात्रीपर्यंत देवाला जागवितात. व हे काम पूर्ण झाले की पुढे नऊ दिवस रात्री झोपवतात, व सकाळी काकड आरतीने देवाला जागे करतात. अरे बाबांनो, देव कशाला झोपतोय? उलट देव आपल्याला झोपवतो तेव्हाच आपण झोपतो. जर त्याने झोप उडविली तर कोणी झोपू शकेल का? मग देवाला आपण कोण झोपविणारे? मात्र हे लक्षात ठेवले पाहिजे की, इतर वेळी देवाचे आपल्याला काहीच करायला मिळत नाही म्हणून तर आपण देवाचे हे कौतुक करायचे आहे. मात्र मनुष्याने हा बोध लक्षात ठेवला पाहिजे की, देवाने झोपविल्याशिवाय व त्यानेच उठविल्याशिवाय कुणी उठू शकत नाही; की झोपू शकत नाही.''

जांबला आल्यानंतर नाना अण्णांना म्हणाले, ''आज आम्ही फार फार खुशीत आहोत, समाधानात आहोत. आज आम्ही आमच्या माहेरी आलोय. कारण माहेरी आल्यावर मुलगी निश्चिंत असते, घर स्वतःचे असल्याने कुठेही ती हिंडते–फिरते. केव्हाही झोपते–केव्हाही उठते– तिला कोण बोलणार? अरे, माहेर म्हणजे काय? आपली परंपरा, मूळ ठिकाण! पुण्याईचे स्थान!! मग आपले माहेर कुठले? तर संतपरंपरा!''

अशा प्रकारे नानांच्या बोलण्यात–चालण्यात–बघण्यात–बसण्यात–उठण्यात–संकेतामध्येही अद्वैतबोध लपलेले आहेत. २६/५/८९ रोजी जांबहून २.१५ वाजता पैठणकडे प्रस्थान. तेथील धर्मशाळेत मुक्काम. २७/५/८९ रोजी पहाटे ६.३० वाजता रेवदंड्याकडे परतीचा प्रवास सुरू झाला. रात्री १.१५ वाजता मुक्कामी पोहोचले.

विवेचन : प्रत्येक मनुष्य आनंदाच्या शोधात असतो. स्त्रीसाठी तिचे आनंदनिधान म्हणजे माहेर होय. पुरुषमाणसाला देखील अशा मनमुक्त संचाराची – अर्थात माहेराची गरज असतेच आणि संतसहवास म्हणजे माहेरचा आनंद, ती. नानासाहेब वर वर्णिलेल्या प्रवासवर्णनातून मिळवितात असे दिसून येते. प्रत्येक मनुष्याप्रमाणे निरूपणकारालाही माहेराची आस असते, हेही कळून चुकले.



๔.๑.๑



๔.๑.๒

४.२ : 'श्री क्षेत्र नागपूर, जबलपूर – अलाहाबाद – वाराणसी यात्रा'

दि. ७/११/९४ रोजी व्ही.टी. स्टेशनवरून गीतांजली एक्सप्रेसने नागपूर येथे प्रयाण झाले. तत्पूर्वी दोन दिवस आधी रोज गीतांजली ७ तास उशिरा होती. पण ७ तारखेला वेळेवर होती. तेव्हा नानासाहेब म्हणाले, 'लोक गलबला करतात, रजोगुण फार वस्ताद आहे. तो भीती, संशय घट्ट करतो. जो सत्त्वगुण आहे, तो आपली मते कधीच बदलत नाही, म्हणजे लोकांचे ऐकून बदलत नाही तो सत्त्वगुण. लोकांचा गलबला ऐकून आचारविचार बदलतात तो रजोगुण व गलबला ऐकून करून बसतो तो तमोगुण.'

८/११/९४ ला नागपूर येथे मुक्काम. तेथे जेवणानंतर त्यांच्यासमोर फळे ठेवली. ती फळे पाहून नाना म्हणाले, ''यातील मोसंबी हे पथ्याचे व संत्री हे कुपथ्याचे फळ आहे. संत्रे सोलायला, फोडायला अगदी सोपे, कष्टहीन, पण मोसंबे सोलताना कण–कण साल काढून सोलावे लागते. त्यातील कापाची वीण घट्ट, मजबूत व चिवट असते.

तात्पर्य : त्यागी होणे कठीण आहे, त्याला पथ्य आहे. अज्ञानरूप प्रतिबिंबाचा नाश करायला हवा.

नागपूर मुक्कामी नानांनी आपल्या निरूपणातून (प्रवचनातून) अगदी साध्या–साध्या गोष्टींमधून प्रत्येकाला उत्तम बोध दिले.

उदा : 'उपासनेला पर्याय नाही, तेव्हा दासहो, सर्वांनी निरीक्षण करा. समोर नुसते पुस्तक घेऊन बसून उपयोग नाही. गुरुचरित्रात जशी तीन कांडे आहेत. तशी या देहात कांडे आहेत. (उदा. वासनाकांड, लोभकांड, क्रोधकांड इत्यादी) प्रत्येकाकडे फक्त तीनच कांडे असावीत. ज्ञानकांड, कर्मकांड आणि उपासनाकांड– तसे जर आपण झालो तर ठामपणे सांगता येईल, की प्रत्येक वाल्याचा वाल्मीकी होईल.

९/११/९४ला सकाळी जबलपूरकडे प्रस्थान. व्हाया रामटेक. रामटेक येथे गेले असतानाची माहिती : टेक म्हणजे प्रतिज्ञा. रामाने राक्षसांचा नायनाट करण्याची प्रतिज्ञा येथे घेतली म्हणून 'रामटेक' अशी संज्ञा आहे.

१०/११/९४ला जबलपूर मुक्कामी झालेल्या निरूपणात नानांनी सांगितले, 'मानवी इतिकर्तव्याचे महत्त्व, कर्तव्याचे पालन म्हणजेच श्री मंगलाचरण.

जन्माला येतानाच प्रत्येकजण सोबत अनेक ऋणे घेऊन आला आहे. ही ऋणे म्हणजे मातृऋण, पितृऋण, कुळाचे ऋण, समाजऋण; अशी कित्येक ऋणे डोक्यावर आहेत व ती याच जन्मी फेडायची आहेत. त्याकरिता मानवी नीतिमूल्यांची जोपासना करायला हवी. विनय–नम्रता हवी. आणि यासाठी मुख्यतः ज्ञान–कर्म–उपासना या त्रिवेणी संगमावर नित्य स्नान घडायला हवे.'

तेथे बोलत असताना स्पीकर बंद पडला, मध्येच स्पीकर रुसलेला पाहून नाना म्हणाले, 'हा उसना आवाज आहे, आपला श्रींचा आवाज आहे. उसन्या आवाजावर अवलंबून राहायला नको.'

११/११/९४ रोजी सकाळी 'बेडाघाट' येथे त्यांनी मुक्काम केला, श्री. लोखंडे यांच्या घरी. श्री. नानासाहेब म्हणाले, 'आम्ही नागपूर–जबलपूर–इलाहाबाद व वाराणसी या तीर्थक्षेत्री कां आलो; याचे कारण तुम्हां सर्वांना सांगतो, आपल्या पुण्यवान पूर्वजांचे पाय जिथे जिथे लागले, त्यांच्या पदस्पर्शांनी पावन झालेली माती तरी आमच्या कपाळाला लागू द्या, इतकीच आमची इच्छा आहे.' त्याचवेळी ती. नानांनी स्वतःच्या घरातील एक हकिगत सांगितली. ''सातशे वर्षांपूर्वी रेवदंडा येथे, सुमारे ५०० वर्षांपूर्वीपासून आमच्या खापर पणजोबांपासून वापरत असलेला रेशमी पितांबर; की जो आम्ही आजही वापरत आहोत, तो अजून जसाच्या तसा आहे. त्याची वीण (जर) इतकी उत्कृष्ट आहे की, त्यामध्ये पाणी ओतले तर थेंबसुद्धा खाली पडत नाही.'

१२/११/९४ रोजी जबलपूरहून अलाहाबाद येथे प्रस्थान. (कटनी–मेहेर मार्गे)

अलाहाबादला महाराष्ट्र सदनात जमलेल्या अनेक दासांपैकी एकाने सांगितले, ''हर घर में भूत–प्रेत पूजा हो रही थी। अब सब बंद हो गई।'' हे ऐकून ती. नाना म्हणाले, ''ही त्या समर्थांची कृपा।''

अलाहाबादला निरूपणात असा उल्लेख आला की, मनुष्य देवपूजेसाठी चांदीची उपकरणे वापरतो. हे ऐकून ती. नाना त्वरित म्हणाले, ''चांदीची उपकरणे काय, देव जरी सोन्याचे असले तरी काही उपयोग नाही, त्यापेक्षा उपासना सोन्यासारखी हवी! मनासी टाकिले मागे, गतिसी तुळणा नसे! अशी उपासना असेल तरच मार्गदर्शन होईल!''

आणखी एक आम दृष्टान्त त्यांनी सांगितला, ''आट्यापाट्यांच्या खेळात आत जाताना खेळाडू (मनुष्य) निर्विघ्नपणे टोकापर्यंत जातो. मागे मृदुंग्या (दांड्या) उभा असतो. तो परत

येताना अडवतो, अगदी पावलोपावली. म्हणजेच ज्यांना अधोगतीकडून परत फिरायचे नाही त्यांना कसलाच जाच, अडथळा, उपाधी नाही. मात्र ज्याला परत फिरायचे असेल त्याला विषय (काम–क्रोध–मद–मत्सर) पावलोपावली अडविणार.

(परा) स्वयंपाक घरात काय शिजले? हे पदार्थ जोपर्यंत ताटात वाढले जात नाहीत तोपर्यंत समजत नाही. मात्र जाणकार (सद्‌गुरू) वासावरून ओळखतात की, स्वयंपाकघरात काय 'शिजत' आहे.

मनुष्य क्रोधाची–कामाची–लोभाची सारखी डिलिव्हरी करीत असतो. प्रतिसृष्टी निर्माण करण्याची सहकारी भाषा लगेच बोलायला लागतो. उदा. – घरात वाद होऊ लागले की, कर्ता पुत्र म्हणतो, 'मी माझ्या बायकोला घेऊन वेगळाच राहतो, माझे मी बघतो.' ही प्रतिसृष्टीच. म्हणजे एकत्र कुटुंबात (मूळसृष्टी) राहायला तयार नाही. पाहिजे ते मंत्रिपद दिले नाही तर खासदार म्हणतो, 'मी वेगळा पक्ष काढतो. तुमच्या पक्षात मला किंमत नाही.' असा जिथे तिथे भेद दिसतो. हिंदुधर्मात आम्हांला स्थान नाही, आमचा वेगळा धर्म तयार करतो. इत्यादी अनेक प्रकार पाहायला मिळतात व यावेळी विश्वामित्री भाषा करणारे हे विसरतात की तू आधी कुठल्या सृष्टीवर उभा होतास? तू वाढलास–मोठा झालास ते कुठल्या सृष्टीवर? आणि आता बळ आल्यावर वेगळी सृष्टी निर्माण करण्याची भाषा करतोस?''

त्यापेक्षा सेवा करणे हा आपला धर्म आहे, हे जाणून जो निष्काम सेवा करतो त्याच्यावर 'प्रतिसृष्टी' करण्याची पाळी कधीच येत नाही.

श्री. किशोर लेले नानांना अलाहाबादहून काशीला न्यायला आले, तेव्हा त्यांची विचारपूस करताना नानांनी त्यांना 'तुम्ही काय करता?' असे विचारले, तेव्हा ते म्हणाले, 'ज्युनिअर कॉलेजमध्ये गणित शिकवतो.' हे ऐकून नाना हसत म्हणाले, 'गणित शिकविणारी माणसे फारच कमी. कारण गणितच सुटत नाहीत. याचा अद्वैत अर्थ असा, लाखो लोकांची गणिते चुकली होती, म्हणजे आयुष्याचे गणित चुकलं म्हणून उत्तर चुकलं. आयुष्यातून उठलेल्या माणसाला मानत मानत गणिताची रीत समजावून द्यायची व त्याच्याचकडून गणित सोडवून घ्यायचे.'

असं अगदी सहज सहज, बोलता बोलता साध्यासोप्या भाषेत नानासाहेब लोकांना प्रबोधन करीत.

१४/११/९४ रोजी अलाहाबादहून वाराणसीकडे प्रस्थान

१६/११/९४ रोजी परतीचा प्रवास सुरू झाला.

विवेचन : प्रत्यंतरासाठी प्रवास कां करायचा तर जीवन कसे प्रवाही आहे हे पाहण्यासाठी आणि लोकसंग्रह त्यांचे तत्त्व : गंगेत एकदाच पाय ठेवता येतो. म्हणजेच एक जीवन–अनुभव



४.२.१



४.२.२

एकदा घेतला म्हणून तोच अनुभव पुनः पुन्हा येईल असे नाही. अनुभवातील विविधता कशी आहे याचे प्रत्यंतर घेणे.

श्री. नानासाहेब हे बुद्धिप्रामाण्यवादी होते. सत्य परिस्थितीची बुद्धिनिष्ठ जाणीव करून देऊन भ्रमनिरास करण्याचे कार्य त्यांनी प्रवासात केले. चित्तातील काम, क्रोधादी मळाचा नाश करण्यासाठीच ही आध्यात्मिक निरूपणाची ज्ञानगंगा नानांनी भूतलावर आणली आहे.

प्रत्येक माणसामध्ये परमेश्वर वास करीत असतो, म्हणजेच चांगले गुण त्यांच्या अंगी असतात, परंतु त्याच्यावर मोहाची पुटे चढल्यामुळे मानव दुराचारी होतो, नानांनी हळुवारपणे आपल्या प्रबोधनातून ती पुटे (निरूपणाद्वारा) बाजूला केली.

प्रकरण पाचवे

सामाजिक प्रबोधन आणि परिवर्तन

विभाग	शीर्षक	पृष्ठ क्रमांक
५	सामाजिक प्रबोधन आणि परिवर्तन	१०१
५.१	मुलाखती–प्रश्नावली आणि विश्लेषण– डॉ. नानासाहेबांच्या घरातील काही व्यक्तींच्या मुलाखती	१०५
५.२	अनुयायी आणि भक्त त्यांच्या नजरेतून त्यांचे व्यक्तिमत्त्व	११९
५.२.१	काही निरूपणकारांच्या मुलाखती	१२१
५.३	सीमापार	१३७
५.४	ठाणे आणि रायगड जिल्ह्यातील श्रवणाला जाणाऱ्या काही व्यक्तींच्या मुलाखती	१६४
५.५	बालसंस्कार केंद्र– सहभागी मुलांच्या प्रातिनिधिक मुलाखती	१८९
५.६	प्रश्नावली (संख्याशास्त्राच्या आधारे)	२१५

प्रकरण पाचवे

सामाजिक प्रबोधन आणि परिवर्तन

दैनंदिन जीवनात मनुष्य प्राण्याला अनेकविध अडचणींना, संकटांना तोंड द्यावे लागते. माणसाचे 'मन' हे मोठे चंचल आहे. खुद्द श्रीरामदासांनीच म्हटले आहे की अचपळ मन माझे नावरे आवडिता एखादे वासरू जसे वारा प्यायल्यासारखे चौखूर उधळते तसेच मनाचेही आहे. 'मोह' हा मनाचा शत्रू आहे. काम क्रोध, मद, मत्सर, अहंकार, लोभ हे षड्विकार माणसाच्या मनाला कायम वेढून असतात. सुखाची अभिलाषा कोणाला नाही? ती सर्वांनाच असते. प्रत्येक माणसाची धडपड सुखाने जगण्यासाठीच असते. मात्र सुख मिळावे म्हणून सुखाच्या साधनांमागे धावताना माणूस खरे सुख कशात आहे, कशामुळे समाधान लागेल हेच विसरतो. सर्वसामान्य माणसाची हीच शोकांतिका असते.

'सत्यं वद। धर्मचर'या वचनाचा अर्थ आहे, प्रत्येकाने आपले विहीत कर्म–कर्तव्य पार पाडलेच पाहिजे, त्यासाठी लांडीलबाडी नको. सदाचरणाने वागल्यामुळे, दुसऱ्याचा सुखाचा विचार केल्यामुळे मनाला खरे समाधान लाभते पण स्वार्थाला बळी पडलेला माणूस असा विचार करीतच नाही. कर्तव्यापासून पलायन म्हणजे पापाचरण. गीतेत सांगितल्याप्रमाणे सुख–दुःख, लाभ–हानी, जय–पराजय हे सर्व अपरिहार्य आहे, सर्व काळात समतोल बुद्धीने वागत राहून आपले कर्तव्यकर्म करीत राहिले पाहिजे, पण वेगवेगळी प्रलोभने त्याला खुणावत असतात. सुख, संपत्तीची अभिलाषा असते आणि ती नाही मिळाली की माणसे असमाधानी, दुःखी होतात. मनावर संयम ठेवणे, विवेकनिष्ठ विचाराने वागणे त्यांना जमत नाही.

अशाप्रकारचे काही असमाधानी लोक सन्मार्गापासून भ्रष्ट होतात. मनाची बेचैनी घालवण्यासाठी सिगरेट, दारू यांसारख्या व्यसनांच्या अधीन होतात. पर्यायाने कुटुंबाची वाताहत होते. यातून मार्ग कोणता? मग काही माणसे भ्रष्टाचाराने पैसा मिळवू पाहतात. अशावेळी जीवनमार्गावरून चुकलेल्यांना, पथभ्रष्ट माणसांना सन्मार्गावर आणण्यासाठी, मार्गदर्शकाची गरज असते. श्रीरामदासस्वामींनी 'मनाचे श्लोक'मध्ये मानवी मनाचे उत्तम विवेचन केले आहे. मनासाठी तो उपदेश आहे. काय करू नये हे इतक्या सोप्या शब्दांत सांगितले आहे की, त्याप्रमाणे आचरण केले तर माणूस खरोखरच विवेकनिष्ठ होईल. सन्मार्गाने चालेल.

रणांगणावर शत्रूसैन्य धारातीर्थी पडल्यानंतर जेव्हा आपले गुरू बांधव आणि प्रियजन सामोरे आले तेव्हा धनुर्धर अर्जुन असाच भावनेच्या आहारी गेला. या प्रियजनांना मी कसं मारू, या विचाराने गलितगात्र झाला. तेव्हा प्रत्यक्ष श्रीकृष्णाने त्याला ''आपल्या कर्तव्यापासून च्युत होऊ नकोस. (म्हणजे ढळू नकोस) कारण तू एक धनुर्धर, राजवंशातला श्रेष्ठ पराक्रमी वीर आहेस. धीर सोडू नकोस. इत्यादी उपदेश केला. गीतेमध्ये आपण हे वाचतो. अर्जुनाच्या मनाला हा उपदेश होता. त्याच्या कर्तव्यकर्माला आणि समतोल बुद्धीला हे आवाहन होते. अर्जुनाला आपल्या वडिलधाऱ्यांचा, गुरूंचा, नात्यांचा मोह झाला. कृष्णाने त्याला आपल्या उपदेशपर भाषणाने कर्तव्य करण्यास प्रवृत्त केले, हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

सर्वसामान्य माणसे काय करतात? मनावर मोहाचे पटल असल्यामुळे सारासार विचार, विवेकबुद्धी गमावून बसतात. कर्तव्यापासून ढळतात.

वेगवेगळ्या वातावरणांत, अथवा वेगवेगळ्या समाजात मानसिक धारणाही विविध असतात. त्यामुळे काही माणसे, काय करावे ते न समजल्याने, विचारच न केल्यामुळे सर्व काही देवावर आणि दैवावर सोडून देतात. असे करून कसे चालेल? 'असेल माझा हरि तर देईल खाटल्यावरी' ही वृत्ती कर्तव्यभ्रष्ट आणि दैववादी माणसाची असते.

अर्थात कधी कधी निराश करणाऱ्या घटना दुःखाचे दारुण प्रसंग माणसांच्या आयुष्यात येतात. त्यामुळे भीती, ताणतणाव, नैराश्य यांचा पगडा बसतो. त्यावेळी द्विधा मनःस्थिती होते खरी. मात्र या सर्व सुखदुःखासह आपल्या जगण्याचा मार्ग चालावा लागणार आहे. याचे भान ठेवायला हवे. आपले कर्तव्यकर्म पार पाडल्याशिवाय कोणत्याच गोष्टीत यश येणार नाही, त्यासाठी आपल्या मनात म्हणजेच विचारात सुधारणा करण्याची, उन्नतीकडे जाणाऱ्या मार्गाची जाणीव करून देणे म्हणजेच समाजाचे परिवर्तन करणे होय.

'मना वासना दुष्ट कामा न ये रे। मना सर्वथा पाप बुद्धी नको रे' असे आवाहन खुद्द रामदास स्वामीनीच केले आहे. आपल्या या जगात एक जग असेही आहे. ते म्हणजे बेबंद, स्वैर, अनियंत्रित विकार–वासनांचं, व्यसनाधीनतेचं सगळं दुःख, निराशा, अपयश, ताणतणाव यासाठी याचा विसर पडण्यासाठी व्यसनाधीन होणे. त्यामुळे मन अधिकच चंचल होते. अस्थिर होत असते हे त्या व्यसनी माणसाला कळत नाही. तो अज्ञानी असतो. योग्य दिशेने विचार करू शकत नाही. अनिर्बंध मन विकारग्रस्त होत असते. सुखाची तीव्र लालसा, दुःखाकडे वाटचाल करते. या

अनिर्बंध मनामुळे गैर, अनुचित कर्म करण्याकडे माणसाची वृत्ती वाढते आणि माणूस दुःखात अधिकच बुडत जातो. स्वतःचे हे दुःख विसरण्यासाठी सुरुवातीला दुःखावर औषध म्हणून दारू घेतली किंवा अतिश्रमावर औषध म्हणून अफू, गांजा, चरस यांसारखे मादक पदार्थ घेतले की त्या विळख्यात माणूस सापडतो. दुःखाचा चक्रव्यूहच असतो तो. मानसिक दृष्ट्या कोलमडलेला माणूस शारीरिक दृष्ट्याही दुर्बल होतो. मानसिक रोगांबरोबर शारीरिक रोगांचीही त्याला लागण होते आणि त्याच्या कुटुंबीयांनाही तो नकोसा होतो. हळूहळू तो आणि त्याचे कुटुंबच उद्ध्वस्त होत जाते. त्यासाठी मनाचे प्रबोधन आवश्यक आहे.

समजुती–गैरसमजुती, श्रद्धा–अंधश्रद्धा यांतील सीमारेषा फार पुसट आहेत. कर्मकांड व धर्माबद्दलच्या काही विकृत कल्पना आचरणाच्या बऱ्यावाईट पद्धती यात निवड करण्याची अनेकांची क्षमता नसते. योगायोगाने एखादी बरी किंवा वाईट गोष्ट घडली तर त्यातून वेगवेगळ्या समजुती तयार होतात, त्यातूनच श्रद्धा–अंधश्रद्धा जन्म घेतात. त्याच मनाच्या धारणा होतात. त्यातून सुटण्याचा केविलवाणा, हताश माणसाचा प्रयत्न म्हणजे या गोष्टींच्या चक्रात अडकून तो व्यसनाधीन होते. सुशिक्षित समाजातही या अंधश्रद्धा दिसतात, तर मग अडाणी, दुर्गम भागातील माणसांना, अभावग्रस्ततेत आयुष्य काढणाऱ्यांना, अंगारेधुपारे दैवी वा अघोरी उपाय यांच्याबाबत श्रद्धा असली तर नवल काय! सगळे मार्ग संपल्यावर माणूस वेड्या आशेने, अंधश्रद्ध होऊन असे उपाय करू लागतो.

कोणतेही परिवर्तन जादूसारखे क्षणात बदलत नाही. कोणत्याही व्यवस्थेत, रचनेत, समाजात परिवर्तन घडवायचे असेल तर प्रथम स्वतःपासून सुरुवात, स्वतःच्या कुटुंबापासून सुरुवात अशी टप्प्याटप्प्याने करावी लागते. मन बदलले, मनाचा विकास झाला तर उन्नती होते.

पूर्वी स्त्रीला गृहलक्ष्मी म्हटले जाई. आजही ती गृहलक्ष्मी आहेच. परंतु काळाबरोबर तिची वाटचाल प्रगतीकडे झाली. इतिहासप्रसिद्ध स्त्रिया– उदा. सावित्रीबाई फुले, अहिल्याबाई होळकर, जिजाऊ भोसले या काही स्वतः फार शिकलेल्या नव्हत्या. पण शिक्षणाचा जीवनसौख्याशी काय संबंध आहे ते त्या स्वतःच्या कुशाग्र बुद्धीमुळे जाणू शकल्या. स्वतःपुरता विचार न करता, दुसऱ्यांची प्रगती आणि विकास कसा होईल याचा फार दूरदर्शी विचार त्यांनी केला. काळाबरोबर बदल घडत गेले. स्त्रिया स्वतंत्रपणे विचार करू लागल्या. त्यासाठी त्यांना स्वतंत्र विचार करायला शिकण्याची, बरेवाईट समजण्याची गरज होती. परंपरांच्या कर्मकांडाचे ओझे झुगारून देऊन

स्वतःची प्रगती कशात आहे हे समजावून सांगण्याची गरज होती. यातील बऱ्याचशा गोष्टी शिक्षणाने साध्य होतात. कारण शिक्षणाने विचारांना विधायक दिशा देता येते. बऱ्यावाईटाचे भान येते. मात्र पिढ्यान् पिढ्या एकाच प्रकारचे साचेबद्ध विचार, संस्कार असणाऱ्या स्त्री–पुरुषांची मानसिकता त्यासाठी तयार करायला हवी होती. असा बदल आधी व्यक्ती, कुटुंब, एखादी आळी, गाव, अनेक गावे अशा टप्प्यांनी करायला हवा.

फक्त मानवतेचा धर्म, मानवतेची सेवा हीच पूजा मानली पाहिजे. धार्मिक गोष्टींच्या प्रत्येक प्रथेमागे विज्ञानाधिष्ठित कारणे आहेत. हिंदू धर्मातील प्रत्येक सण हा निसर्गचक्राशी निगडित आहे. त्यामुळे शारीरिक आणि मानसिक आरोग्याचे आपोआप पालन होते – ते तसे व्हावे म्हणून या सणांना धार्मिक अधिष्ठान दिले आहे. अर्थात सकारात्मक श्रद्धेने जर आपण या गोष्टी अमलात आणल्या तर मन सुदृढ होते. शरीरात चैतन्य वाढल्याची जाणीव होते. आत्मविश्वास वाढतो. भगवान श्रीकृष्णाने सांगितलेला कर्मयोग हीच माणसाने करावयाची पूजा आहे. डोळसपणे या गोष्टी पार पाडल्या तर या जगात माणूस व्यावहारिकदृष्ट्या यशस्वी होईल.

श्रीरामदास स्वामींनीही हेच मार्गदर्शन दासबोधामधून केले आहे.

समाज प्रबोधन करण्याच्या या विविध उपक्रमांचे फलित काय आहे याचा आढावा, विविध गटातल्या/स्तरांतल्या लोकांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेऊन, तर काहींना प्रश्नावली पाठवून परिवर्तन कसे व किती प्रमाणात झाले आहे याचा आढावा संशोधिकेने पुढीलप्रमाणे घेतला.

५.१ मुलाखती–प्रश्नावली आणि विश्लेषण

सदर संशोधनासाठी डॉ. नानासाहेबांच्या कुटुंबातील काही व्यक्तींच्या मुलाखती घेण्यात आल्या. त्यापैकी नमुन्यादाखल ५ मुलाखती दिल्या आहेत व त्यावरून निष्कर्ष काढण्यात आले. ते पुढीलप्रमाणे :

मुलाखत क्रमांक : १



नाव : श्री. आप्पासाहेब धर्माधिकारी

वय : ६८. गाव : रेवदंडा

प्र. १ : घरात वडील म्हणून नानासाहेब कसे होते?

उत्तर : वडील म्हणून ते वेगळे नव्हते. हां, पण वडील म्हणून अधिकार मात्र श्रेष्ठ होता. कां, कारण ते सगळ्यांचे वडील होते. कारण जो येईल त्याला ते योग्य मार्गदर्शन करीत होते. वडलांचा अधिकार गाजवणं, रागावणं असं कधी नव्हतं.

प्र. २ : परमार्थ किंवा समाजसुधारक म्हणून जरा आपण बाजूला ठेवलं, तर वडील म्हणून अशी काही खास आठवण आहे का लहानपणीची?

उत्तर : शाळेत आम्ही कधी मस्ती केली, भांडणं केली तरी कधी तक्रार केली नाही. ओरडले नाहीत. ते म्हणायचे, 'असू दे. होतं असं कधी कधी.' सामंजस्यानं मिटवून टाकायचे.

प्र. ३ : त्यांना स्वयंपाकाची आवड होती?

उत्तर : नाही, खास आवड वगैरे नव्हती. कारण ते घरातच जास्त नसायचे आणि घरात माझी आजी, आई, आत्या असा महिलावर्ग असल्यामुळे त्यांच्यावर कधी वेळच आली नाही. हां, पण त्यांना सगळा स्वयंपाक करता यायचा.

प्र. ४ : शिस्तीच्या बाबतीत ते कडक होते का?

उत्तर : आपल्याकडे शिक्षा केली म्हणजे शिस्त असं आहे. पण शिक्षा म्हणजे शिस्त नव्हे. शिस्तीचा अर्थ समजावून सांगणे. चुकल्यानंतर समजावून सांगितलं की, त्याच्या अंतःकरणात बदल होतो, ती शिस्त.

प्र. ५ : ते समाजप्रबोधन करत असल्यामुळे आपल्या वाट्याला येत नव्हते, त्यामुळे त्यांच्या कार्याचा आपल्याला राग यायचा का?

उत्तर : असं कधी वाटत नव्हतं. आजोबा होते. आई सगळं करणारी होती. फक्त प्रगतिपुस्तकावर त्यांची सही लागायची, तेव्हा सरांनाही माहिती होतं, त्यामुळे ते म्हणायचे, तुझे वडील आले की, सही आण. मग ते आल्यावर सही घेऊन द्यायचो.

प्र. ६ : मग प्रगतिपुस्तक बघितल्यावर ते कधी ओरडले नाहीत का मार्क बघून?

उत्तर : नाही, ते कधीच ओरडले नाहीत, ते म्हणायचे, 'असू दे. पुढच्या वेळेस नीट अभ्यास कर. असे प्रोत्साहन देऊन आमची प्रगती झाली. कधी खोचकपणे बोलले नाहीत, तुला हे जमणारच नाही असं कधीच नाही बोलले.

प्र. ७ : त्यांना कधी संतापलेले बघितले का? म्हणजे तुमच्यावरच असं नाही, पण इतर कुणावर?

उत्तर : कधीच नाही, आम्ही संध्याकाळी बाहेर खेळायला गेल्यानंतर यायला जर कधी उशीर झाला तर समजावून सांगायचे, संध्याकाळी बाहेर जास्त राहायचं नाही. आपल्या घरामध्ये दिवा लागतो. संध्याकाळी शुभंकरोती म्हणायचं, संध्यावंदन करायचं. आत ह्यापुढे असं करू नको. चुकीची जाणीव सौम्य शब्दांत करून द्यायचे. त्यावरूनच आम्हांला समजायचं की, इथे आपण चुकलोय, त्यांना हे आवडलेले नाही.

प्र. ८ : आजींशी– म्हणजे आपल्या आईशी कधी भांडण वगैरे?

उत्तर : छे, कधीच नाही. घरात भांडण हा प्रकार आम्हांला माहितीच नाही. ते बहुतेक बाहेर असतं. काही काही बैठका खूप लांब अंतरावर होत्या, त्यामुळे कधी–कधी घरी यायला

त्यांना उशीर व्हायचा. कायम आईच दार उघडायची, त्यांना जेवायला वाढायची. तिची कधीही तक्रार नसे.

प्र. ९ : असं कधी झालं का की, घरात एखादा कार्यक्रम आणि नाना त्याला हजर नाहीत?

उत्तर : नाही, असं कधीच झालं नाही. ते असतील तेव्हाच आम्ही कार्यक्रम ठरवत असू त्यामुळे प्रत्येक कार्यक्रमाला ते हजर असायचे.

प्र. १० : एखाद्या संकटावर मात करण्यासाठी त्यांच्या शिकवणीचा कसा उपयोग झाला?

उत्तर : नानांनी जी शिकवण दिलीय ना, ती अंतःकरणामध्ये सामर्थ्याची, सत्त्वगुणात उभं राहण्याची भूमिका दिलीय. त्यामुळे संकट हा मोठा बाऊ वाटतो लोकांना, तसं आम्हांला कधी वाटलंच नाही. आलेलं संकट कायम नसतंच, त्याचा ठरावीक कालावधी असतो. त्यात सामर्थ्यानं उभं राहिलं की संकट हे कधी संकट वाटतच नाही. त्यामुळे आम्हांला त्याचा त्रास कधी झाला नाही. म्हणजे वडील आणि समाजसुधारक असे परिपूर्ण व्यक्तिमत्त्व आम्हांला लाभलं होतं.



मुलाखत क्रमांक : २

नाव : सौ. अनिता दत्तात्रय धर्माधिकारी

वय : ६२ गाव : रेवदंडा

प्र. १ : लग्नानंतर आपण जेव्हा या घरात आलात तेव्हा सासरे म्हणून नानासाहेब कसे वाटले? कारण लग्नानंतर प्रत्येक मुलीच्या सासरबद्दल काही अपेक्षा असतात आणि नाना समाज सुधारक असल्यामुळे इकडचं वातावरण वेगळं असेल.

उत्तर : प्रेमळपणे वागायचे. रीतीरिवाज वगैरे सगळं शिकताना खूप त्रास झाला. इथे वातावरण खूप वेगळं होतं, पण त्याचा मला त्रास कधी झाला नाही. कारण मी पण जुन्या वळणात वाढलेय. रूढी-परंपरा शिकताना खूप वेगळेपण जाणवलं. बदल पण खूप जाणवला. ते माझ्याशी आई-वडलांप्रमाणेच वागायचे.

प्र. २ : एकत्र कुटुंब पद्धती लोप पावत चाललीय आणि तुमच्या घरात अजूनही तुम्ही सगळे (तीन सुना, नातवंडं) एकत्र राहताय. त्यामुळे कधी वादविवाद किंवा कुरबुरी होतात का?

उत्तर : पटत नसलं तर सोडून द्यायचं. कॉम्प्युटर युगातली मुलं आहेत, त्यांना काही पद्धती आवडत नाहीत. तेव्हा जुन्या-नव्याचा समन्वय साधायचा. सामावून घ्यायचं. मी आहे तशी जुन्या वळणात. वाढलेली. त्यांच्याप्रमाणे त्यांना करू द्यायचं, आपल्याप्रमाणे आपण करायचं. म्हणजे मतभेद होत नाहीत.

प्र. ३ : ती. नानांच्या कार्याचा सून म्हणून आपल्यावर काय प्रभाव पडला?

उत्तर : त्यांच्या कार्यात मी पण सहभागी व्हावं अशी त्यांची इच्छा होती. त्याप्रमाणे, मुलं लहान होती तेव्हा नाही, पण ती मोठी झाल्यार मी पण बैठकीला बसायला लागले. त्यामुळे माझ्यात वैयक्तिक सुधारणा, बदल पुष्कळ झाला. चुकलं तरी ते सांभाळून घ्यायचे.

प्र. ४ : ती. नानांच्या शिकवणीचा उपयोग एखाद्या संकटावर मात करण्यासाठी कसा झाला?

उत्तर : मी सहसा माहेरी जात नसे. त्यामुळे इथे तशी काही फार मोठी संकटं वगैरे आली नाहीत आणि येईल त्या प्रसंगाला, संकटाला सामोरं जाण्याची मला पहिल्यापासून सवय होती. त्यामुळे मला सोपं गेलं.

प्र. ५ : तुमचा आणि तुमच्या सासूबाईंचा किंवा ती. नानांच्या बाबतीतला एखादा प्रसंग आठवतोय का?

उत्तर : आई आणि सासू असा फरक मला कधी जाणवला नाही. आईप्रमाणेच सासूबाईंचंही बोलणं, चालणं, वागणं, सगळं अगदी तसंच होतं. त्यामुळे त्रास कधी झाला नाही. माझ्या कुठल्याही गोष्टीला पूर्ण पाठिंबा द्यायचे.

प्र. ६ : आताची पिढी स्वतंत्र विचारांची आहे, नानांच्या शिकवणीमुळे त्यांच्याशी वागताना तुम्हांला काय फरक जाणवतो?

उत्तर : हो, हे अगदी खरंय, आताची पिढी स्वतःच्या मतानुसार वागणारी आहे. मी सुनांना सांगून बघते. नाही पटलं, तर मी एक पाऊल मागे घेते. त्यामुळे वाद होत नाही. मी सोडून देते.

प्र. ७ : तुमच्या पहिल्या प्रत्येक सणाला, कार्यक्रमाला नाना हजर होते का?

उत्तर : हो, प्रत्येक कार्यक्रमाला ते हजर होते. त्यांना खूप आवड होती. अगदी हौसेने त्यांनी माझे सणसमारंभ, सगळं केलं.

प्र. ८ : आता आपण ह्या येणाऱ्या नवीन पिढीला, सुनांना आपल्यावर ह्या परमार्थामुळे जी शिकवण मिळालीय, त्यानुसार त्यांना काय संदेश द्याल?

उत्तर : आम्ही बैठकीला जायला लागल्यामुळे आम्हांला उत्तम मार्गदर्शन मिळालं, तसं तुम्हीही बैठकीला जा म्हणजे तुम्हांलाही उत्तम मार्गदर्शन मिळेल. तुमचा फायदा होईल; असं मी सांगेन.



मुलाखत क्रमांक : ३

नाव : श्री. सचिनदादा धर्माधिकारी

वय : ३६ गाव : रेवदंडा

प्र. १ : आजोबा म्हणून ती. नानासाहेब कसे होते?

उत्तर : आजोबा आणि नातू असं त्यांनी कधी वागवलंच नाही. माझ्याशीच असं नाही तर माझ्या इतर भावंडांशीसुद्धा ते अगदी मित्रत्वाच्या नात्याने वागायचे. ते आजोबा आहेत आणि मी नातू आहे असं नातं त्यांनी कधी ठेवलंच नाही.

प्र. २ : तुम्ही लहान असतांना भावंडांची भांडणं होत असतील तेव्हा आजोबा म्हणून त्यांची भूमिका कशी असायची?

उत्तर : हो, लहान असताना आमची भांडणं झाली की, ते आम्हांला समजावून सांगायचे. कोण चुकलं, कोण बरोबर हा भेदभाव त्यांनी कधीच केला नाही. भांडण करू नये, असं वागू नये, हे ते प्रेमाने सांगायचे. भावंडामध्ये कसं प्रेम हवं हे सांगायचे.

प्र. ३ : आजोबा आणि नातू अशी लहानपणीची एखादी खास आठवण सांगता येईल का?

उत्तर : खास म्हणजे सुट्टी असली की, ते आम्हांला आवर्जून बैठकीला किंवा शेतावर घेऊन जायचे. आम्हांला सुट्टी असेल तेव्हाच तीर्थक्षेत्राला घेऊन जायचे. कुठे बाहेर जाऊन आले की, तिथल्या गोष्टी सांगायचे. नकला करायचे. ते सतत आम्हांला हसवण्याचा प्रयत्न करायचे.

प्र. ४ : तुम्ही कधी चुकलात तर ते कसे समजावयाचे? त्यांची भूमिका कशी असायची?

उत्तर : प्रथम चुकाच करू नये म्हणून त्यांची शिकवण होती. त्यामुळे चुका सुधारण्याचा कधी प्रश्नच आला नाही. असा प्रसंग आमच्यावर कधी आलाच नाही.

प्र. ५ : मुळात संकट येऊच नये म्हणून काय केलं पाहिजे हे ते सांगायचे?

उत्तर : संकट येऊ नये म्हणून काय दक्षता घेतली पाहिजे, याबाबत त्यांची आम्हांला लहानपणापासून शिकवण होती.

प्र. ६ : आता जरी नानासाहेब नसले तरी त्यांच्या शिकवणीचा उपयोग आपल्याला कसा होतो?

उत्तर : समाजकार्यासाठी तसेच ते करत असताना आपल्या कुटुंबासाठी कसा वेळ देता येऊ शकतो हे ते सांगायचे, त्यामुळे घरात तक्रारीचा कधी प्रश्नच आला नाही.



मुलाखत क्रमांक : ४

नाव : सौ. (कीर्ती) उमा अशोक खळदकर

आणि **श्री. अशोकराव खळदकर**

(डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी यांची ज्येष्ठ कन्या आणि जावई.)

वय : ६४ गाव : डोंबिवली

प्र. १ : वडील म्हणून ते कसे होते? एखादी खास आठवण?

उत्तर : खरं तर सगळ्या आठवणी त्यांच्या खासच आहेत. खास म्हणजे, लग्न झाल्यानंतर जेव्हा जेव्हा ते मला घ्यायला यायचे तेव्हा तेव्हा ते माझ्याकरता गाडी घेऊन यायचे आणि माहेरहून गाडीनेच सोडायचे. एवढ्या सगळ्या व्यापातून ते वेळ काढायचे. तेव्हा फोन नव्हते, त्यामुळे चिठ्ठी यायची, 'आम्ही घ्यायला येतोय, तयार राहा.'

प्र. २ : त्यांना स्वयंपाकाची आवड होती का?

उत्तर : स्वयंपाकाची आवड अशी नव्हती. कारण आईच्या हातचं त्यांना सगळं आवडायचं. पण त्याना स्वच्छता खूप लागायची. पायाला थोडासुद्धा कचरा लागलेला त्यांना अजिबात चालत नसे. त्यामुळे ते स्वतः हातात झाडू घ्यायचे, अंगण झाडायचे. धोतर पण त्यांना कायम पांढरंशुभ्र आणि स्वच्छ लागायचं. ते आईला मदत करायचे, कपडे जर धुऊन झाले असतील तर वाळत टाकणं, चुलीवर काही शिजत ठेवलं असेल तर लक्ष ठेवणं. एवढे सगळे लोक बसले असले तरी ते आत आले की, वेळात वेळ काढून हे करणार, आत डोकावून जाणार.

प्र. ३ : शिस्तीच्या बाबतीत ते कडक होते का?

उत्तर : नाही, तसे कडक नव्हते. पण वेळेच्या बाबतीत खूप शिस्तप्रिय होते. कुणाला वाट

बघायला लावणार नाही. वेळेच्या आधी दहा मिनिटं हजर राहणार. पण ते जेवायला आत आले की, त्यांना ताट वाढून तयार लागायचं आणि ताट तयार नसेल तर ते लगेच बाहेर निघून जायचे.

प्र. ४ : काही चुकलं तर शिक्षा करायचे का?

उत्तर : नाही, कधीच नाही. प्रगतिपुस्तकावर सही फक्त आई करायची. कारण ते कधी घरी नसायचे ना! तीच सांगायची, 'मुलं पास झाली.' त्यांनी मला आणि माझ्या मैत्रिणीला सायकल शिकवली. आम्ही भाड्याने सायकल घ्यायचो आणि ते आम्हांला समुद्रावर घेऊन जायचे.

प्र. ५ : समाजप्रबोधन करत असल्यामुळे आपल्या वाट्याला येत नव्हते, त्यामुळे लहान असताना त्यांच्या कार्याचा आपल्याला राग यायचा का?

उत्तर : नाही, असं कधीच झालं नाही. कारण आमची जडणघडणच अशी झालीय की, ते जे काही कार्य करतायत ते चांगलंच करतात. त्यामुळे आम्ही कधी हट्टही केला नाही.

प्र. ६ : कधी आजींशी (आईशी) भांडायचे का? आई कधी भांडायची का?

उत्तर : नाही कधीच भांडण झालं नाही. त्यांचं एकमेकांवर खूप प्रेम होतं. फक्त ते एकमेकांना कधीतरी सूचना द्यायचे. काही कार्यक्रम असेल तर 'आज घरात राहा' असं आई सांगायची. दोघांचे विचार कायम एकच असायचे.

प्र. ७ : असं कधी झालं का, की घरात एखादा कार्यक्रम आहे आणि नाना त्याला हजर नाहीत?

उत्तर : नाही, असं कधीच झालं नाही. अगदी डोहाळजेवणापासून ते मुलींच्या बारशापर्यंत प्रत्येक कार्यक्रमाला ते हजर असायचे. त्यांना मंगळागौरीचे खेळ बघायला खूप आवडायचे. माझ्या मंगळागौरीच्या वेळेस रात्रभर जागून त्यांनी आवडीने सगळे खेळ बघितले.

प्र. ८ : एखाद्या संकटावर मात करण्यासाठी त्यांच्या शिकवणीचा कसा उपयोग झाला?

उत्तर : आत्तापर्यंत असे खूप प्रसंग येऊन गेले; लग्न झाल्यानंतर आर्थिक, मानसिक आणि शारीरिकपण. प्रत्येक वेळेला फोन केला की, ते म्हणायचे, 'काही घाबरू नको, संगळं नीट होईल.' त्यांच्या ह्या शब्दांनी खूप सामर्थ्य मिळायचं. त्यामुळे त्या प्रसंगाचं कधीही गांभीर्य वाटलं नाही. सुरुवातीला रेवदंड्यातूनच ब्राह्मण आळीतल्या लोकांकडून खूप त्रास होता, विरोध होता, पण त्याचा आम्हांला शाळेत, बाहेर फिरताना कधी त्रास झाला नाही. पण घरातलं वातावरण बिघडायचं, पण तरी आम्हांला असं कधी वाटलं नाही, की त्यांना एवढा त्रास होतोय, मग कशाला हे सगळं करतायत; उलट आम्हांला वाईट वाटायचं, की लोक असं कां वागतात!

आम्ही दूध विकत आणायला गेलो की, कधी कधी लोक आम्हांला दूध द्यायचे नाहीत; दिलं तरी पाणी घालून द्यायचे. पण नंतर एक काळ असा आला की, ज्यांनी ज्यांनी नाही म्हटलं तेच लोक आमच्याकडे ताकाकरिता लाइन लावायचे. आमची आई खूप दानशूर होती. त्यांच्यावर राग न धरता त्यांना जेवायला पण द्यायची. त्यावेळेला तर काही लोकांनी आमचयाकडचं ताक पिऊन दिवस काढलेत, पण तिनं कधी तो राग धरला नाही आणि नानांनीही कधी तिला विरोध केला नाही. तिचा शब्द अखेरचा असे. आमचे वडील दोन्ही अर्थांनी, वडील म्हणून आणि समाजसुधारक म्हणून खूप वेगळे होते. असे वडील आम्हांला मिळाले किंवा आमचा जन्म त्यांच्या पोटी झाला याचा आम्हांला कायम अभिमान आहे.

प्र. ९ : जावई आणि सासरे हे नातं कसं होतं?

उत्तर : आमच्याकडच्या (खळदकरांच्या) प्रत्येक समारंभाला ते स्वतः आवर्जून हजर राहिले. आमची जागेची अडचण होती. नवीन जागा घेण्याच्या वेळेला त्यांनी आम्हांला खूप मदत केली. मी राष्ट्रसेवा संघाचं काम करायचो. त्यांनी मला कधीच बैठकीला जात जा असं सांगितलं नाही. पण नाना मुंबईला किंवा इतर कुठे बैठकीला जायचे तेव्हा कायम मी त्यांच्याबरोबर हजर असे. मग डोंबिवलीत बैठक सुरू झाल्यानंतर नियमित बसायला लागलो. (श्री. अशोकराव खळदकर)



मुलाखत क्रमांक : ५

नाव : सौ. अमृता प्रभाकर कळमकर (बी.कॉम.)

नोकरी : स्टेट बँक ऑफ इंडिया (लालबाग)

वय : ५७ गाव : माटुंगा (पूर्व)

प्र. १ : वडील म्हणून नानासाहेब कसे होते? एखादी खास आठवण?

उत्तर : ते घरी खूप कमी असायचे. पण आम्हांला त्यांचा आदरयुक्त धाक होता. एकदा शेजारी मैत्रिणीबरोबर झोपाळ्यावर बसलेले असताना खूप जोरात झोका घेता घेता पडले, त्यामुळे रडत-रडत घरी आले. तेव्हा ते मला 'कशाला गेलीस तिकडे?' ओरडलेले आठवते.

प्र. २ : त्यांना स्वयंपाकाची आवड होती का?

उत्तर : स्वयंपाकाची आवड अशी नसावी; कारण कधी केलंलं बघितलं नाही. फारसा वेळ त्यांच्याकडे नव्हताच. पण केर रोज काढायची, कारण त्यांना पायाला कचरा लागलेला आवडायचं नाही.

प्र. ३ : शिस्तीच्या बाबतीत ते कडक होते का?

उत्तर : नाही. ते कडक नव्हते. मला शिक्षणाची आवड होती. त्यांनी सांगितलं, तुला जेवढं शिकायचं तेवढं शीक. मी कॉलेजला रेवदंड्याहून अलिबागला जायची. मैत्रिणींबरोबर कधीतरी अलिबागला सिनेमा बघायलादेखील जाऊ द्यायचे.

प्र. ४ : काही चुकलं तर शिक्षा करायचे का?

उत्तर : नाही, कधीच नाही. त्यांनी मला सायकल शिकवली. खरं तर मी नास्तिक होते म्हटलं तरी चालेल. मला मूर्तिपूजा आवडत नसे. मैत्रिणी देवळात जायच्या पण मी जात नव्हते. पण मला ते कधी रागावले नाहीत.

प्र. ५ : समाजप्रबोधन करत असल्यामुळे आपल्या वाट्याला येत नव्हते, त्यामुळे त्यांच्या कार्याचा राग यायचा का?

उत्तर : नाही, कारण आम्ही तशाच वातावरणात वाढलो आणि मी लहान होते, पण मोठी भावंडं होती. आई सगळं बघायची.

प्र. ६ : कधी आजींशी (आईशी) भांडायचे का? आई कधी भांडायची का?

उत्तर : नाही, कधीच भांडण झालं नाही. म्हणजे मला तरी तसं आठवत नाही. दोघांच्या नात्यात समजूतदारपणा होता.

प्र. ७ : असं कधी झालं का, की घरात एखादा कार्यक्रम आहे आणि नाना त्याला हजर नाहीत?

उत्तर : नाही, कारण ते प्रत्येक कार्यक्रमाला हजर असायचे. लग्नानंतर पहिल्या वर्षी प्रत्येक सणाचा कार्यकम केला तेव्हा ते आवर्जून आले होते.

प्र. ८ : बैठकीला कसं काय जायला लागलात?

उत्तर : एकदा आई म्हणाली, 'आपल्या वडलांनी काय बीज पेरलंय ते बघून ये' म्हणून मी बैठकीला गेले आणि ती जायलाच लागले. १९८४ साली लग्न झालं. १९९५पासून बैठकीला जायला लागले.

प्र. ९ : एखाद्या संकटावर मात करण्यासाठी त्यांच्या शिकवणीचा कसा उपयोग झाला?

उत्तर : पिंडात स्थिरता आल्याशिवाय, सारासार विचार करण्याची ताकद येत नाही. त्यांच्या समजावण्यातच एवढी शांतता, स्थिरता असायची की, आम्हांला धीर यायचा. माझा मुलगा शाळेत असताना अभ्यासच करायचा नाही, त्यामुळे आम्हांला खूप टेन्शन यायचं, हे त्यांना सांगितल्यावर ते म्हणाले, 'काळजी करू नको. काही मुलांना लहानपणी नाही आवडत अभ्यास, पण मोठा झाल्यावर चमकेल तो. आणि दहावीपासून थ्रू आउट त्याला फर्स्ट क्लास मिळाला. आज तो Msc (Microbiology) झालाय. आणि आता पीएच्.डी. करतोय. त्यांचे शब्द खरे झाले. एकदा ते आजारी पडले होते.

हॉस्पिटलमध्ये आय.सी.यू.त असताना, खिडकीतून मी त्यांना बघत होते, ते त्यांनी बघतिलं आणि आत गेल्यावर ते मला म्हणाले, 'मी बराय, काळजी करू नको.' कारण मी खूप हळवी आहे, हे त्यांना माहीत होतं. नंतर नानांनी जावयाला सांगितलं. 'हिला काही झालं तरी ही तुम्हांला कधीच सांगणार नाही.' हे सांगायचं कारण मला नेहमी वाटायचं, मी सगळ्यांत लहान असल्यामुळे माझ्या वडलांना माझ्याबद्दल काही माहिती आहे की नाही? पण त्यांनी हे सांगितल्याचं कळल्यानंतर मला भरून आलं. म्हणजे त्यांचं सगळ्यांवर किती लक्ष होतं! प्रत्येकाच्या स्वभावाची त्यांना कल्पना होती.

नातेवाईक

विवेचन :

१) नाना आतून बाहेरून निर्मळ होते. तुकाराम महाराज म्हणतात, 'नाही निर्मळ जीवन...'

२) जगावर प्रेम करणारी माणसे कुटुंबाला निराधार करतात असा जो समज आहे, तो नानासाहेब धर्माधिकारी यांनी खोटा ठरवला. कुटुंब आणि समाज दोघांनाही त्यांनी सुखी केले.

३) रागावर नियंत्रण ठेवणं भल्याभल्यांना जमले नाही, संत पुरुषांची सारी लक्षणे अंगीकारिली (पसायदानात म्हटल्याप्रमाणे 'चंद्रमे जे अलांच्छन ..... सोयरे होतु')

४) 'लेक वाचवा अभियान' आपण आत्ता राबवतो. लेकीवर प्रेम करा अशी अपेक्षा करतो. तेव्हा लेकीला सन्मानाने माहेरी घेऊन येणारे, तिचे लाड करणारे नानासाहेब आपल्या वागणुकीतून प्रेमाचा संदेश देतात.

५) जावयाने संकटात पाठीशी उभा राहणारा देवमाणूस अशी सासऱ्यांची भलावण परस्थ व्यक्तीजवळ करणे ही नानांच्या भलेपणाची साक्ष आहे.

६) परीक्षेतील गुण म्हणजे जीवनसर्वस्व नव्हे, हे आपल्या वागणुकीतून मुलांना समजावून सांगणारे आणि अधिक प्रयत्न कर असा सल्ला देणारे नाना प्रेमाबरोबरच प्रयत्नांची कास धरण्यास प्रवृत्त करतात.

७) अंधश्रद्धेचा आधार त्यांनी कधीही घेतला नाही. रोगी औषधोपचाराने शारीरिक व्याधीतून मुक्त होतो पण कमकुवत मनाला मात्र अध्यात्मच तारते अशी त्यांची श्रद्धा होती.

म्हणून प्रेम निश्चय कौटुंबिक स्वास्थ्य, हसरी–खेळकर जीवनशैली, मुलीबद्दलचा कळवळा आणि अंतर्बाह्य निर्मळता ह्यांची प्रचिती ह्या सर्व मुलाखतींतून डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या गुणवैशिष्ट्यांवर प्रकाश टाकते.

५.२ : अनुयायी आणि भक्त ह्यांच्या नजरेतून त्यांचे व्यक्तिमत्त्व

अनुयायांच्या नजरेत त्यांची प्रतिमा पित्याचीच होती, परंतु महाराष्ट्राबाहेरील अन्य भाविकांच्या नजरेतून त्यांची प्रतिमा कशी होती ह्याचे कुतूहल संशोधिकेला असल्यामुळे काही मुलाखती.

महापुरुष कुठल्याही चौकटीपुरते मर्यादित नसतात किंवा हुतात्म्यांना चौकटच नसते आणि म्हणूनच डॉ. नानासाहेब धर्माधिकारी ह्यांचे कार्य महाराष्ट्राच्या चौकटीपुरते मर्यादित न राहता सर्वदूर आहे.

निरूपण असे करा.

निरूपण करणारे, श्रवणाला उपस्थित राहणारे आणि डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या घरातील व्यक्ती अशा काही प्रातिनिधिक मुलाखती घेतल्या. त्यामुळे निरूपणाबद्दल माहिती आवश्यक वाटते.

१) निरूपण म्हणजे काय?

निरूपण हा खरा शब्द नसून निरोपण हा आहे. सत्त्वगुणातील शब्द अंतःकरणात रुजवून आचरणात आणून देणे. निर म्हणजे शुद्धसत्त्वाची लागवड, रोपण करणे.

बैठकीत जे निरोपण असतं, त्यामुळे सत्त्वगुणाची लागवड आत केली जाते. सद्गुण, सदाचाराची शिकवण आत ठसवली जाते.

२) निरूपणाचे टप्पे कोणते?

बोलण्याची भूमिका ऐकल्याशिवाय येत नाही. म्हणून श्रवणाची भूमिका आधी. नंतर निरूपण बैठकीला गेल्याशिवाय निरूपणाचा भाग येत नाही. जिवात जीव असेपर्यंत, आयुष्य असेपर्यंत कुणीही करू शकतं.

३) निरूपण कोण करू शकते?

ज्याला व्यवस्थित श्रवण झालेलं आहे, तो स्वतःहून सांगतो, मला निरूपण करण्याची इच्छा आहे, मी व्यवस्थित बोलू शकतो, मला निरूपणाचा भाग मिळावा.

४) निरूपणाचा कालावधी काय?

निरूपणाचा कालावधी अडीच तास असतो. दासबोधातला पहिला समास एक तास असतो आणि नंतर दीड तास चालू समास असतो. आठवड्याचे सातही दिवस सगळीकडे हा चालू समासच असतो. तो दर सोमवारी बदलतो. पहिला एक तास 'मंगलाचरण'. दासबोधातला हा पहिला समास कायम तोच असतो. कारण तो दासबोधाचा गाभा आहे.

सगळे समास संपल्यानंतर समाप्ती नसतेच. इतिश्री असते. पुनर्वाचन असते.

५.२.१ काही निरूपणकारांच्या मुलाखती

सदर संशोधनासाठी निरूपणाबद्दल माहिती होणे आवश्यक वाटते म्हणून काही निरूपणकारांच्या मुलाखती घेण्यात आल्या, त्यापैकी नमुन्यादाखल पाच मुलाखती दिल्या आहेत.



मुलाखत क्रमांक : १

नाव : डॉ. किरण रामकृष्ण पाटील (एम.बी.बी.एस.)

वय : ३८ गाव : पनवेल

प्र. १ : आपण निरूपणाकडे कसे वळलात?

उत्तर : आधी आमच्या घरातून मोठा भाऊ आणि आई आमच्या शेजाऱ्यांमुळे बैठकीला जाऊ लागले. त्यांना चांगलं वाटल्यानंतर आईने मलाही यायला सांगितलं. पण माझं बारावीचं वर्ष असल्याने मी नकार दिला. आईने विचारले. परीक्षा झाल्यानंतर जाशील? मी 'हो' म्हणालो. आणि मग परीक्षा संपल्यानंतर जावं लागलं. हळूहळू थोडं फार समजायला आणि आवडायला लागलं.

प्र. २ : बैठकीला जाण्याची संधी कशी मिळाली?

उत्तर : वर सांगितल्याप्रमाणे; माझ्या आईमुळे मी बैठकीला जाऊ लागलो. (मार्च १९९४ पासून)

प्र. ३ : श्रवणाचे विशिष्ट अनुभव?

उत्तर : अस्ताव्यस्त झालेली अनेक घरे (उदा. दारूमुळे, घरातील भांडणांमुळे, अनेक प्रकारच्या व्यसनांमुळे) सुधारलेली पाहिली. अनेक आदिवासी लोकांचा उत्कर्ष झाल्याचे पाहिले. माझ्या स्वतःच्या आयुष्यातील संकटे, अडचणींना सामोरे जाण्याचा दृष्टिकोन

बदलला. आईच्या आजारपणात आई अगदी क्रिटीकल अवस्थेत असतानाही श्रवणामुळे मी मानसिकदृष्ट्या स्थिर राहून योग्य निर्णय घेऊ शकलो अन्यथा वाईटही परिणाम घडू शकले असते.

प्र. ४ : श्रवणाला जाताना अडचणी आल्या का? असल्यास कोणत्या प्रकारच्या?

उत्तर : मित्र खूप चिडवायचे; विशेषतः मेडिकल कॉलेजमध्ये रूम पार्टनर्स म्हणायचे हा जरा जास्तच करतोय. ह्याचं जास्त दिवस काही हे चालणार नाही. काही वर्षांनंतर आपोआप स्वतःच बंद करेल. उपासना करताना सकाळी माझ्यासमोर फळ किंवा सकाळचा नाश्ता ठेवायचे, नमस्कार करायचे. इ.इ. पण काही वर्षांनंतर त्यापैकी काहीजण बैठकीला बसायला लागले. त्यांपैकी एक जण एम्.डी. झाला, दुसरा एका रिसर्च कंपनीमध्ये प्रिन्सिपल इन्व्हेस्टिगेटर बनला आणि अजूनही ते सर्व बैठकीला नियमित जातात. त्यांच्याही व्यक्तिगत आयुष्यात श्रवणामुळे आमूलाग्र बदल घडला असे ते कृतज्ञतेने आणि अभिमानाने सांगतात.

प्र. ५ : श्रवणानंतर व्यक्तीत कसा बदल घडतो?

उत्तर : श्रवणामुळे व्यक्तीमध्ये अंतर्बाह्य असा बदल घडतो. सत्कर्म–दुष्कर्म, ज्ञान–अज्ञान, श्रद्धा–अंधश्रद्धा यातील फरक कळून येतो. सत्कर्म आणि दुष्कर्माचे परिणाम कळून आल्यानंतर मनुष्य आपोआपच दुष्कर्म आणि व्यसनाधीनतेपासून परावृत्त होऊन, सुखी आणि समाधानी जीवन जगू लागतो. त्याची संकटांना सामोरे जाण्याची मानसिक क्षमता वाढते आणि एक आशावादी दृष्टिकोन तयार होतो.

उदा. माझ्या बहिणीचे सासरे दारू आणि सिगरेट खूपच प्यायचे. १९८५मध्ये त्यांना दुसरा हार्ट ॲटॅक आला होता. डॉक्टरने त्यांना दारू–सिगरेट सोडायला सांगितली होती पण काही केल्या सुटत नव्हती. ते फार काळ जगणार नाहीत असेही सांगितले. योगायोगाने त्यांना त्यांच्या एका मित्राने बैठकीला नेले. बैठकीतून परत घरी आल्यानंतर त्यांनी घरातील दारूच्या बाटल्या फोडल्या, सिगरेटचे पॅकेट फेकून दिले. तेव्हापासून आजपर्यंत त्यांनी दारू आणि सिगरेटला हातही लावला नाही. अजूनही ते हयात आहेत.

प्र. ६ : व्यसनमुक्ती श्रवणामुळे होते असे ऐकून आहोत. ही तात्कालिक की कायमची असते? आणि होत असल्यास श्रवण, निरूपण व वैद्यकीय उपचारांचा त्यात अंतर्भाव असतो का? की फक्त श्रवणाचा?

उत्तर : श्रवणामुळे नक्कीच व्यसनमुक्ती होते अणि ती कायम स्वरूपाची असते. यात वैद्यकीय उपचारांचा अजिबात अंतर्भाव नसतो. फक्त श्रवणामुळेच मनुष्याच्या अंतरी व्यसन सोडण्याची प्रबळ इच्छा जागृत होते, आणि मनुष्य वैद्यकीय उपचारांशिवाय आपल्या वाढलेल्या मानसिक बळाच्या आधारेच व्यसनापासून मुक्त होतो.

प्र. ७ : विकास वैयक्तिक की सामूहिक?

उत्तर : श्रवणाने (बैठकीने) मनुष्याचा वैयक्तिक आणि पर्यायाने सामूहिकही विकास होतो.



मुलाखत क्रमांक : २

नाव : सौ. ज्योती शेट्टी

(प्रोफेसर, झुनझुनवाला कॉलेज)

वय : ४९ गाव : ठाणे.

प्र. १ : आपण किती वर्षांपासून ह्या परमार्थात आहात?

उत्तर : २७ वर्षे झाली; मी बैठकीला जाते. तारीखच सांगायची झाली तर २५ ऑक्टोबर १९८५ सालापासून जाते.

प्र. २ : इकडे कशा वळलात? कारण आपण प्रोफेसर आहात आणि त्याही रसायनशास्त्राच्या.

उत्तर : खरं तर मला पहिल्यापासून देवाची भक्ती खूप आवडायची. आणि आमच्या कॉलेजमध्ये एक ग्रुप होता, त्या ग्रुपमधील काही मुलं बैठकीला जायला लागली. तेव्हा मलाही वाटलं, सद्गुरू म्हणजे काय असतं, बैठकी म्हणजे काय अशी उत्सुकता होती, त्यामुळे मीही जायला लागले.

प्र. ३ : जरी आपण धार्मिक असलो की, अस काही कारण किंवा प्रसंग घडला का, की त्यामुळे इकडे वळलात?

उत्तर : नाही, कारण असं काही नाही, पण माझे मित्र जाताना बघून कुतूहल वाटलं, त्यांच्या वागण्यातला बदल बघून जायची इच्छा झाली.

प्र. ४ : श्रवण करता करता, निरूपणाकडे कशा वळलात?

उत्तर : वळले नाही वळवलं असं म्हणता येईल. तीन महिने श्रवणाला झाल्यानंतर मला माझ्या सद्गुरूंनी सांगितलं, तू आता निरूपणाला बस. मग मी निरूपणाकडे वळले. त्यांनी सांगितल्यामुळे माझी इच्छा प्रबळ झाली.

प्र. ५ : निरूपणाची संधी कशी मिळाली?

उत्तर : परमार्थात संधी हा शब्द नसतो. सद्गुरूंच्या इच्छेवरून मला निरूपण करायला मिळालं.

प्र. ६ : जेव्हा श्रवणाला जात होतात तेव्हाचा एखादा विशिष्ट अनुभव सांगता येईल का?

उत्तर : अगणित अनुभव आहेत, पण खास असा, माझा स्वतःचा स्वभाव एकदम फटकळ होता, एक घाव दोन तुकडे असा. पण जेव्हापासून श्रवण करायला लागलो तेव्हापासून कळायला लागलं. दुसऱ्यास लागेल धक्का ऐसी वर्तणूक करू नका! म्हणजे सद्गुरूंची शिकवण जी मिळाली, त्यामुळे हळूहळू हा स्वभाव बदलत गेला. कुणी कुणाला उद्धटासारखे बोलत असेल तर अंतःकरणाला दुःख होते. आमच्या घरात खूप बदल झाले. माझ्या आईत खूप बदल झाला. तिचे खूप उपवास असायचे. तो कडक सोमवार म्हणजे रात्रीपासून तयारी. तिला कुठलं अन्न बाजूला दिसलेलं सुद्धा चालायचं नाही. शुक्रवारचं आंबट खायचं नाही. दह्याची वाटी शेजारी दिसली तरी ती जेवायची नाही. आपल्या शरीरात पित्तरस असतो आणि तो आंबटच असतो. पण तिला श्रवण जेव्हा मिळालं तेव्हापासनं तिने सांगितलं माझं सोमवार आणि शुक्रवारचं व्रत संपलं. आता मला माझ्या सद्गुरूंच्या शिकवणीचं व्रत पाळायचं.

प्र. ७ : निरूपण करताना काही अडचणी येतात का? आणि येत असल्यास कशा प्रकारच्या?

उत्तर : नाही. निरूपण करताना मला कधीच अडचण नाही आली. अभ्यास करूनच आम्ही निरूपणाला जात असतो. आईला परमार्थ आवडायचा त्यामुळे तीच माझी तयारी करून द्यायची आणि सांगायची, लवकर जा. आणि सासरी मिस्टर पण बैठकीला जात असल्यामुळे ते मला सोडायला आणायला येतात. त्यामुळे अडचण अशी काहीच नाही येत.

प्र. ८ : श्रवणाला बसायला लागल्यानंतर व्यक्तीत कसा बदल घडून येतो हे तुम्ही एखादं उदाहरण देऊन सांगू शकाल?

उत्तर : आमच्या घरच्याबद्दलच सांगू शकते की, आम्ही छान प्रेमाने, एकोप्याने राहायला लागलो. नात्यांमधलाआदर वाढला. पतिव्रता धर्म समजावून दिला सद्गुरूंनी.

प्र. ९ : व्यसनमुक्ती श्रवणामुळे होते का?

उत्तर : तत्कालिक आणि कायमची; दोन्हीही होते. दासबोधातील पहिल्या समासात म्हटलंय, क्रिया पालटे तत्काळ म्हणज लगेच होते आणि ती कायमस्वरूपाची होते. वैद्यकीय उपचार हे देहाला आहेत आणि व्यसन ही मनाची दुर्बलता आहे, त्याला सद्गुरूंची शिकवणच हवी.

प्र. १० : श्रवणामुळे होणारा विकास हा वैयक्तिक असतो की सामूहिक असतो?

उत्तर : प्रथम वैयक्तिक बदल–विकास होतो. कारण तो स्वतःसाठी असतो. पण नंतर तो सामूहिक कसा होत जातो हे कळतच नाही.



मुलाखत क्रमांक : ३

नाव : श्री. जयंत दत्तात्रय आजगांवकर

व्यवसाय : पेपर लॅमिनेशन

वय : ६५ गाव : ठाणे (प.)

प्र. १ : आपण किती वर्षांपासून बैठकीला जाताय?

उत्तर : मी १९७८ सालापासून जातोय. मे १९७८मध्ये पनवेलच्या घराचे छत पडले त्याचे दुरुस्तीचे काम करण्यासाठी काम होईपर्यंत पनवेलला राहणे जरूर होतं. दिवसभर काम झाल्यावर रात्री मोठ्या घरात राहायला भीती वाटायची म्हणून मित्र श्री. जोशी ह्यांच्याकडे बराच वेळ काढून घरी झोपायला येत असे. गप्पा मारता श्री. जोशींनी, 'श्रीमत् दासबोधावर बैठकीच्या माध्यमातून निरूपण असते तिथे मी जातो, तू येणार तर ये' असे सांगितल्यावर मी सोमवारच्या दिवशी पनवेलमध्ये श्री. कुळकर्णी ह्यांच्याकडे श्रवणाला गेलो. बैठकीची वेळ रात्री ८.३० ते १२ होती. श्रवण झाल्यावर आनंद झाला. कारण दासबोधातील समासावर निरूपण दिले जात होते. त्या दिवसापासून समर्थ कृपेनं आजपर्यंत श्रवणाला जात आहे.

प्र.२/३ : निरूपणाकडे आपण कसे वळलात? संधी कशी मिळाली?

उत्तर : तेव्हा प्रवासाची साधने कमी होती. निरूपण करणाऱ्यांना यायला उशीर व्हायचा. १९७८ पूर्वीपासून बैठकीचा भाग फिरता असायचा त्यामुळे सोमवार, गुरुवार, शनिवार बैठका पनवेल, पेण, उरण, मुंबई महालक्ष्मी येथे होत असत. १९८२ सालात ठाणे येथे पुरुषांची बैठक सुरू झाली. त्या वेळेपासून निरूपणासाठी अलिबागवरून श्री सदस्य येत असत. प्रवास लांबचा. सदस्य कधी वेळेवर तर कधी उशिरा येत असत व कधी नाहीच आले तर म्हणून निरूपणासाठी निवेदन ठेवले. आणि १९८४पासून निरूपणाचा भाग सुरू झाला. अचानक संधी मिळाली.

प्र. ४ : श्रवणाच्या वेळचे काही विशिष्ट अनुभव आपण सांगावे.

उत्तर : १९८२ साली बैठकीला पनवेल येथे श्री. निमकरांच्या घरी जात होतो. मुलगी एक वर्षाची होती. तिला डिसेंट्री झाली होती. औषधपाणी चालू होते. त्यात पनवेलला बैठकीला निघालो. मनात सारखे विचार; पत्नी औषध द्यायला विसरणार नाही ना? जास्त झाले तर काय करेल? सारखी औषध देण्याची आठवण करून प्रवासाला सुरुवात झाली. बैठकीला जाऊन बसलो. श्रवण करता करता आजाराचा विसर पडला. रात्री झोप लागली. पहाटे ५.३० ची ठाणे लोकल पकडली आणि विचारांची सुरुवात झाली. औषध दिले असेल ना. डिसेंट्री थांबली असेल ना? अशा विचारात घरी आलो व मुलीची चौकशी केली तेव्हा ती शांत झोपलेली होती व रात्रीपासून एकदाच उलटी, शौचाला झाले. नंतर ती शांतपणे झोपली असे पत्नी म्हणाली.

प्र. ५ : निरूपण करताना काही अडचणी येतात का? आल्यास त्या कशा प्रकारच्या असतात?

उत्तर : १९३४ घोडबंदर रोडवर गायमुख येथे मंगला इंजिनिअरिंगमध्ये कामाला होतो. त्यावेळी ५–७ बसेसची तुरळक सेवा असायची. ५.३० वाजता कंपनी सुटल्यावर समोरच रिक्वेस्ट स्टॉपवर उभे राहून बस, कार, लॉरी वाहताना हात करून पुढील प्रवास करत असे. पण एक दिवस बराच वेळ गेला कुठलेच वाहन थांबत नव्हते. वेळ पुढे जात होता. कंटाळून दगडावर बसून राहिलो. रात्रीपर्यंत कळव्याला बैठकीला पोहोचायचे होते. ८.१५ वाजता एक मर्सिडीझ माझ्यापुढे येऊन उभी राहिली. ड्रायव्हरने सांगितले, 'बस.' मी कोणताही विचार न करता पुढील सीटवर बसलो. गाडी वेगात ८.४५ पर्यंत कोर्ट नाक्यावर आली. तिथे उतरून कळव्याला बैठकीला नऊच्या आत पोहोचला. अडचणी येतात, पण त्यावर विश्वासाने मात करायची असते.

प्र. ६ : श्रवणानंतर व्यक्तीत कसा बदल घडून येतो? एखादं विशिष्ट उदाहरणं सांगू शकाल का?

उत्तर : भांडुपवरून एक माळी खूप दारू पिऊन घरी आला व सांगत होता मला बैठकीला यायचे आहे त्याला सांगितले जागा नाही आहे. दारू पिण्याचा इतराना त्रास होईल म्हणून घेत नव्हतो परंतु परत परत तो विचारणा करण्यासाठी यायचा शेवटी त्याला

भांडुप येथे बैठकीला जाण्यास सांगितले. श्रवणाला नियमित जाऊन उत्तम श्रवणातून त्याची दारू सुटली व आता त्याचा संसार उत्तम चालू आहे.

कैलास पाटील म्हणून एजंट होता. पैसे भरपूर मिळायचे. त्याच्या मित्रांनी रेसकोर्सवर घोड्यांच्या शर्यतीत पैसे लावायला सुरुवात केली. आलेले सर्व पैसे संपायला लागले. दारूची सवय लागली. शेवटी त्याची पत्नी त्याला बैठकीला घेऊन आली. एक श्रवण झाल्यावर त्याच्या चुका त्याला कळल्या. त्या दिवसापासून दारू, रेस सर्व सोडून आज सुखाचा संसार करत आहे. निरूपणासाठी जाताना प्रवासाला अडचणी येतात, त्यावर नामस्मरण व विश्वासाने मात करायची.

प्र. ७ : व्यसनमुक्ती श्रवणामुळे होते असे मी ऐकून आहे. पण ही तात्कालिक होते की कायमची? आणि होत असल्यास श्रवण, निरूपण आणि वैद्यकीय उपचारांचा त्यात अंतर्भाव असतो? की फक्त श्रवणाचाच?

उत्तर : श्रवणातून समर्थ कृपेचे विचार आत्मसात केल्यामुळे चांगले काय, वाईट काय त्याची ओळख होते व तो विचार जोपर्यंत राहील तोपर्यंत बदल राहतो. त्या करता आवश्यकता आहे. विचारात बदल, आचरणात बदल, सात्त्विक आहार त्यामुळे ताणतणाव कमी. परिणामी रोगव्याधी कमी होतात. परंतु रोगव्याधी झाल्या असतील तर त्याकरता वैद्यकीय उपचार करून व्याधिमुक्त होणं जरूरीचं आहे व रोग होऊच नये म्हणून उपासनेचा, श्रवण, निरूपणाचा, संत्संगाचा नित्य आश्रय घेतला पाहिजे.

प्र. ८ : विकास वैयक्तिक की सामूहिक?

उत्तर : श्रीमत् दासबोध मनुष्यानं कसे जगावे हे शिकवतो तरी प्रत्येकानं त्या विचारांच्या माध्यमातून आपण सुखी, निरोगी जीवन जगावे हे श्री. नानासाहेब धर्माधिकारी निरूपणातून सातत्यानं शिकवत आले. त्यातून माणूस सुधारेल, समाज सुधारेल व राष्ट्र सुधारेल.



मुलाखत क्रमांक : ४

नाव : डॉ. उषा विनायक धर्म (बीएएमएस)

वय : ७८ गाव : ठाणे (प.)

प्र. १ : किती वर्षांपासून बैठकीला जाताय?

उत्तर : मी १९८३ सालापासून श्री बैठकीच्या श्रवणाला जाते.

प्र. २ : डॉक्टरीपेशा असताना अध्यात्माकडे वळण्याची इच्छा कां झाली?

उत्तर : मुळात आवड होती. परंतु त्यावेळेस असा प्रसंग आला. माझे बीपी वाढले. अंगावर सूज आली. निदान सीसीएफ. त्यामुळे मला नैराश्य आले. वाटले, मी त्यातून बरी होईन किंवा नाही. पण त्यावेळेस सद्गुरूचरण मिळाले व त्यातून मी पूर्णपणे बरी झाले. निष्ठा वाढली.

प्र. ३ : निरूपणाकडे आपण कशा वळलात?

उत्तर : अंतरीचे भाव, चलबिचल आपल्याला कळत नाही. श्रवणाची गोडी लागली. त्यातून समाधान मिळायला लागलं. मैत्रिणींच्या पुढाकाराने निवेदन दिले आणि १९९२ साली सुरुवात झाली आणि आतादेखील सद्गुरू आज्ञेने निरूपणाचा भाग चालू आहे. हे समाधान!

प्र. ४ : संधी कशी मिळाली?

उत्तर : श्री. आजगावकरांकडे पहिली संधी मिळाली. प्रथम भीती वाटली. पण मनातून निर्धार पक्का होता, की असंही निरूपण करता यायला पाहिजे. त्याप्रमाणे संधी मिळाली.

प्र. ५ : श्रवणाच्या वेळेचे काही विशिष्ट अनुभव आपण सांगावे.

उत्तर : श्रवण करताना अंतरीचे भान सुटत गेले. श्रवणातून माझे भान रागाच्या भरात बोलाचाली झाली होती. तापट स्वभाव आणि नेमके तेच मला भाग श्रवणातून

दिले गेले. डोळ्यांतून अश्रू यायला लागले. त्यातून स्वभावात परिवर्तन. अजूनही तो दिवस आठवतो.

प्र. ६ : निरूपण करताना काही अडचणी येतात का? असल्यास त्या कशा प्रकारच्या असतात?

उत्तर : अडचणी येतात ना! हा खूप गहन विषय आहे. कधीतरी अद्वैत अर्थ कळत नाही. ओव्या कठीण वाटतात. पण सामर्थ्य दिलं जातं.

प्र. ७ : श्रवणानंतर व्यक्तीत कसा बदल घडून येतो? एखादे विशिष्ट उदाहरण सांगू शकाल का?

उत्तर : एक व्यक्ती पेशंट म्हणून माझ्याकडे आली. मी श्रवणाला जाते हे ऐकल्यावर त्याने आपले अनुभव सांगायला सुरुवात केली. गुंडप्रवृत्तीचा मनुष्य लोकांना धाक दाखवून पाहिजे ते करून घेणारा. लोक त्याला घाबरायचे. पण त्याच्यात पूर्ण बदल झाला. सुऱ्याऐवजी तो सांगतो, हातात स्मरणिका, कपाळाला स्मरण (कुंकवाचा टिळा), श्रीसद्गुरूचरण मिळाले. श्रवण मिळाले. त्यांतून त्याच्यात परिवर्तन झाले.

प्र. ८ : व्यसनमुक्ती श्रवणामुळे होते असे मी ऐकून आहे. पण ही तात्कालिक होते की, कायमची? आणि होत असल्यास श्रवण, निरूपण आणि वैद्यकीय उपचारांचा त्यात अंतर्भाव असतो का? की फक्त श्रवणाचाच?

उत्तर : वैद्यकीय उपचाराचा जेव्हा उपयोग होत नाही तेव्हाच बहुतेकजण श्रवणाकडे वळतात. श्रवणांतून त्यांच्यात बदल घडतो. व्यसनमुक्ती श्रवणांतूनच घडते असे बरेच अनुभव आहेत. शारीरिक व्याधींकरता वैद्यकीय उपचारांमध्ये सातत्य ठेवावे. परंतु त्याच वेळेस मानसिक सामर्थ्य वाढविण्यासाठी मनाची आध्यात्मिक बैठक ठेवावी.

प्र. ९ : विकास वैयक्तिक की सामूहिक?

उत्तर : वैयक्तिक विकास आधी होतो. पिंडातलं अज्ञान जाऊन ज्ञान येते. मग घरात बदल होतो. नंतर सामूहिक बदल होतो. ते करण्यासाठी बैठक करावी. श्रवणाने मानसिक आधार निश्चित मिळतो असा माझा अनुभव आहे. शारीरिक व्याधी आपोआप बऱ्या होतील असा भाबडेपणा नसावा.



मुलाखत क्रमांक : ५

नाव : श्री. संदीप गजानन पाटील

इंजिनिअर

वय : ४५ गाव : हशीवारे, अलिबाग

प्र. १ : आपण निरूपणाकडे कसं वळलात?

उत्तर : निरूपणाच्या श्रवणाकडे वळविणारे माझे वडील आहेत. माझे आईवडील दोघेही शिक्षकी पेशातील आहेत. वडलांना व्यवसाय बंधूसोबत राहून थोडे फार व्यसन लागलेले होते. तसे पाहिले तर माझे आजोबा याच वळणाचे होते. नानासाहेबांचे आमच्या संपूर्ण कुटुंबावर फार मोठे उपकार आहेत. चढत्या भाजणीतल्या व्यसनांची परंपरा घराण्यात होती. माझे वडील एकदा असेच एका मित्रांसोबत श्रीबैठकीमध्ये श्रवणाला गेले. त्यांनी तेथे जे ऐकले, त्यातून आमच्या परंपरेचे वळणच बदलले. आज आमचे संपूर्ण कुटुंब कोणत्याही व्यसनात नाही. पूर्णपणे निरोगी, स्वच्छ, सुंदर व सरळ जीवन आम्ही सर्वजण जगत आहोत. अर्थात वळण लावणारे नानासाहेब आहेत व प्रथम वळलेले माझे वडील आहेत. त्यांच्यासोबत एकामागे एक सर्वजण निरूपण–श्रवणाकडे वळलो.

प्र. २ : संधी कशी मिळाली?

उत्तर : बालपणापासूनच या सामाजिक कार्यामध्ये तसेच शिकवणीमध्ये असल्याने संधी मिळाली.

प्र. ३ : निरूपण करताना अडचणी येतात का? आल्यास त्या कशा प्रकारच्या असतात?

उत्तर : छे हो! निरूपण करताना अडचणी येण्याचा प्रश्नच नाही. आमच्यापैकी प्रत्येकजण ज्या वेळी व्यासपीठावर बसतो, त्यावेळी प्रत्येकाला हे माहीत असते की, हा काही आपला प्रांत नाही. आपल्या घराण्यात याचा आधी काही अनुभव नाही. जेथे आपण आपल्या

संसार–प्रपंचाच्या, नोकरी–धंद्याच्या, आपल्या स्वतःबद्दलच्या बाबतीत अडीच तास अखंडपणे बोलू शकत नाही, तेथे परमार्थाच्या बाबतीत काय बोलू शकणार? हे सामर्थ्य त्यांनी दिलेल्या शिकवणीच्या माध्यमातूनच प्रत्येकामध्ये कार्य करते. म्हणूनच ही जाणीव ठेवून निरूपणासाठी व्यासपीठावर बसलो की, निरूपण होते.

प्र. ४ : श्रवणानंतर व्यक्तीत कसा बदल घडून येतो? एखादे उदाहरण सांगता येईल का?

उत्तर : मुख्य म्हणजे श्रवणातून बदल नक्की घडतो यावर आपला विश्वास पाहिजे. याबाबतची निष्ठा दृढ असली पाहिजे. अर्थात् पहिल्या बैठकीतील श्रवणातून हे घडत नाही. हळूहळू आपण आत्मपरीक्षण करायला शिकतो. बैठकीत बसण्यापूर्वीचे आपले विचार आणि आजचे विचार यात आपल्या बाबतीतला पडलेला फरक प्रत्येकाच्या लक्षात यायला लागतो. आपण वाईट विचारांमध्ये रममाण होणारे होतो. मुख्य म्हणजे त्याचं वैषम्यही वाटायचं नाही. प्रसंगी त्याचा अभिमानच वाटायचा. मात्र आज आपण या विचारांच्या जवळपाससुद्धा फिरकायला तयार नाही. आधी ज्यांचा अभिमान वाटायचा, त्या विचारांची आज लाज वाटते, किळस वाटते, हा व अशाप्रकारचा बदल प्रत्येकाने श्रवणानंतर अनुभवलेला आहे. जे आपल्या ध्यानीमनी नव्हते असे विचार आज लॉटरी लागल्याप्रमाणे झाले. आपल्या अंतरी फक्त कृतज्ञतेचाच भाव प्रगट होतो आणि अभावितपणे मनोमन हात जोडले जातात. एका दासाने कथन केलेला प्रत्यक्ष आपला अनुभव : सरकारी नोकरीत असलेले, अतिशय व्यसनी, पण ७२ दिवसांचा संप चालू असताना नानांकडे जाण्याचा योग आला आणि ते रोज नियमाने जाऊ लागले.

'हातात पैसा नसल्याने कित्येक दिवस जुगार खेळायला बसता आले नाही, म्हणून बेचैन, कासावीस झालो होतो. एके दिवशी इकडून–तिकडून पैशांची सोय झाली. आज खेळायला मिळेल या कल्पनेनेच आनंद होत होता, उत्साह–हुरूप आला होता. सकाळपासून ओढ लागली होती की, कधी एकदाचे पत्ते हातात येतात! रेवदंड्याला संध्याकाळी जावे की न जावे असा विकल्पही मनात आला. पण विचार केला, संध्याकाळी ८.३० नंतर क्लबवर जायचे आहे, मग दिवसभर घरी बसून तरी काय करू? त्यापेक्षा नेहमीप्रमाणे रेवदंड्यास जाऊन यावे! सकाळी रेवदंड्यास गेलो, पण नेहमीप्रमाणे सातपर्यंत न थांबता लवकरच निघावे अशी चुळबुळ चालू होती, ते

नानांच्या लक्षात आले. म्हणून त्यांनी विचारले, 'आज काय बेत?' आज हे आठवल्यावर जाणीव होते की, नाना मला चांगले ओळखून होते. माझ्याकडे पाहून अंतःकरणातील खळबळ त्यांना नक्की ऐकू येत असावी! नानांबद्दल इतकं प्रेम–आदर आत्मीयता आहे! की, जे काही मनात येईल ते त्यांना सांगायचे म्हणून मी म्हणालो, 'बरेच दिवस जुगार खेळायला मिळाला नाही. पत्ते हातात नाहीत म्हणून फार बेचैन झालो आहे. आज अलिबागमध्ये नेहमीच्या क्लबवर जायचे आहे.' हे ऐकून नानांच्या जागी इतर कुणी असता तर ओरडला असता. पण नानांच्या चेहऱ्यावर किंवा बोलण्यात यत्किंचितही फरक किंवा प्रतिक्रिया उमटली नाही. ते म्हणाले, 'अवश्य जा! पण आज वार कुठला आहे? आजची तिथी काय? मी म्हणालो, 'आज बुधवार आहे, पण तिथी माहीत नाही.' तेव्हा नानांनी विचारले, 'तुझी रास कोणती?' रास सांगताच त्यांनी पंचांग काढले. काही आकडेमोड करीत आहेत असा अभिनय करीत ते म्हणाले, 'आज तुझे ग्रह काही बरोबर नाहीत, गडबड–घोटाळा आहे. त्यामुळे काही केल्या पान लागणार नाही. खूप पैसे मात्र हरशील!' हे ऐकून मी चांगलाच विचारात पडलो. एक तर पुन्हा पैसे हातात घ्यायला मिळणार नाहीत, आता काय करावं? काही सुचत नव्हते. माझी ही अवस्था पाहून नाना म्हणाले, 'काही काळजी करू नकोस, आठ दिवसांनी फार चांगला योग आहे तेव्हा जा!' हे ऐकून मला खूप समाधान वाटले, हुरूप आला. जेव्हा नाना चांगला मुहूर्त काढून देतील त्यावेळी चांगले पान लागून खूप पैसे मिळतील, इतकी वर्षे हरलो ते पैसे कव्हर होतील. पण नानांनी काय केले? जुगारच कव्हर केला. पुढे असा बदल होत गेला, जाणीव झाली त्यामुळे कधीच जुगार खेळावा असे मनातही आले नाही. परंतु त्यांनी ही जुगारी मनोवृत्ती, व्यसन किती सहजपणे हाताळले तेही जुगार खेळणे वाईट आहे याचा उल्लेखही न करता!

प्र. ५ : व्यसनमुक्ती श्रवणातून होते, असे मी ऐकून आहे. पण ही तात्कालिक होते की कायमची? आणि होत असल्यास श्रवण, निरूपण आणि वैद्यकीय उपचारांचा त्यात अंतर्भाव असतो का? की फक्त श्रवणाचाच?

उत्तर : व्यसनमुक्ती श्रवणामुळे होते असे आपण ऐकून आहात. मात्र मघाशी सांगितल्याप्रमाणे आमचे कुटुंब व्यसनमुक्तीचे प्रत्यक्ष दाखला देण्यासारखे उदाहरण आहे. त्यांच्या वचनांमध्ये विलक्षण जादू होती. नंतर अनेकवेळा कंपनीमध्ये किंवा बाहेर कामानिमित्त

जावे लागले तर सोबतच्या सहकाऱ्यांनी एकदाच घेण्याबाबत पुष्कळ आग्रहही केला. तथापि प्रत्येकक्षणी आत शिकवण खंबीरपणे उभी राहिली. शिकवणीने आतून आलेल्या कणखरपणामुळे बाहेरच्या प्रलोभनांना बळी पडलो नाही, हे आज मोठ्या अभिमानाने सांगता येते. मला मिळालेल्या शिकवणीचा मला अभिमान आहे. असायलाच हवा. जो अभिमान मी ज्या कारणाने बाळगतो, तसाच अभिमान असंख्य व्यक्ती याच कारणाने बाळगतात. थोडक्यात, ही व्यसनमुक्तता ही तात्कालिक नाही. ही कायमस्वरूपी आहे.

आता राहिला प्रश्न तो वैद्यकीय उपचाराचा. वैद्यकीय उपचार हे व्यसनाधीन झाल्यानंतर करावे लागतात. या उपचारांना थोड्याफार मर्यादा असू शकतात. कारण व्यसनमुक्ती झालेली माणसे व्यसनांना अनुकूल परिस्थितीमध्ये पुन्हा बळी पडताना दिसतात. त्या वेळी त्यांना अडविणारे तेथे कोणी नसते. अंतरंग कमकुवत असेल तर पुन्हा व्यसनाधीनता सहज घडून येते.

तथापि नानासाहेबांना श्रवणाचा उपाय दुहेरी कार्य करतो. एकतर तो प्रतिबंधात्मक स्वरूपाचा आहे. तसेच व्यसनाधीनांसाठी तो उपचारात्मक आहे. जे केवळ श्रवणातूनच सहजपणे घडू शकते त्यासाठी वैद्यकीय उपचारांची काय आवश्यकता?

प्र. ६ : विकास वैयक्तिक की सामूहिक?

उत्तर : नानासाहेबांचा हा श्रवणातून विकास साधण्याचा उपाय हा अर्थातच व्यक्तिकेंद्रित आहे. श्रवणाला बसलेली मंडळी सामुदायिक पद्धतीने बसलेली दिसतात, परंतु आलेली प्रत्येक व्यक्ती भिन्न भिन्न प्रकृतीची असते. 'व्यक्ती तितक्या प्रकृती'. तसेच श्रवण अंतरी घेण्याची पात्रता अथवा भूमिका वेगवेगळी असते. अगदी जुळे भाऊ जरी श्रवणाला एकत्र बसले, तरी श्रवणातून दोघांमध्ये होणाऱ्या बदलाची मात्रा वेगवेगळी असते. समाज घडवायचाच आहे. पण शिकवणीचे स्वरूप मात्र 'पाहावे आपणासी आपण' असेच आहे. वैयक्तिक बदल होता होता सामूहिक बदलही होतो. म्हणून व्यक्तीतून कुटुंबे व कुटुंबांमधून समाज घडवायचा व राष्ट्रीय विकासाकडे वाटचाल करणारी ही शिकवण आहे.

विवेचन :

डॉ. नानासाहेब धर्माधिकारी ह्यांनी बैठकीद्वारे सुरू केलेल्या समाजप्रबोधनाच्या कार्याची धुरा पुढे चालवणारे हे निरूपणकर्ते. त्यांच्या मुलाखतींद्वारे असे निदर्शनास येते की,

१) सकारात्मक दृष्टिकोन

२) क्षमाशीलता

३) दुसऱ्याऱ्याचे ऐकून घेण्याची प्रवृत्ती

४) संयम

५) संभाषण कौशल्य

६) निर्णयक्षमता

७) हजरजबाबीपणा

ह्यांचा विकास होतो. 'आधी केले मग सांगितले या उक्तीनुसार,

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांस द्यावे।

शहाणे करून सोडावे, सकल जना।।

५.३ सीमापार

संशोधिकेच्या संशोधन–क्षेत्राच्या पलीकडच्या काही व्यक्तींच्या मुलाखती



मुलाखत क्रमांक : १

श्री. अजीज अब्बास मुल्ला, एरिया मॅनेजर,

युनायटेड फॉस्परस लि. (यु.पी.एल)

गाव : पुणे

प्र. १ : आपण निरूपणाकडे कसे वळलात?

उत्तर : माझे वडील शिक्षकी पेशातील आहेत. शालेय घेत असताना वडील पाहत होते की, मी मित्रांसोबत वेगळ्या वळणावर जात आहे. माझे चुलत काका हे व्यसनाधीन होते. मित्रसुद्धा व्यसनाधीन होते. व्यसनांची परंपरा घराण्याला लागेल याची वडलांना भीती होती. त्याच वेळेला डॉ. नानासाहेब यांचे अमोल मार्गदर्शन बैठकींद्वारे मला मिळाले. प्रथम मी निरूपण–श्रवणाकडे वळलो व नंतर हळूहळू परिवार निरूपण–श्रवणाकडे वळले. आज आमचे पूर्ण कुटुंब निरोगी, स्वच्छ व सुंदर जीवन जगत आहोत. आज आमचे संपूर्ण कुटुंब कोणत्याही व्यसनात नाही.

प्र. २ : संधी कशी मिळाली?

उत्तर : शाळेमध्ये असताना मला दररोज रात्री मित्रांबरोबर गप्पा मारण्यास आवडत असे. परंतु त्यातील बरेचसे मित्र बैठकीमध्ये श्रवणासाठी जात असत. शेवटी माझ्याबरोबर कोणीही मित्र गप्पा मारण्यासाठी उरला नाही. अखेर मी सुद्धा एक दिवस श्री बैठकीमध्ये श्रवणास बसलो. मनात भीती होती की आपणाला बैठकीत बसवतील का? परंतु कोणताही भेदभाव न करता पहिल्या रांगेत श्रवणाला मला बसवले.

प्र. ३ : श्रवणाच्या वेळेचे काही विशिष्ट अनुभव आपण सांगावे.

उत्तर : निरूपण–श्रवणाची पहिली बैठक म्हणजे माझ्यासाठी सर्व नवीन होते. आयुष्यात पहिल्यांदा दोन्ही हात जोडण्याचा स्वानुभव मला या बैठकीतच आला. श्रवण करताना माझ्या लक्षात आले की, माझ्या पूर्व पक्षातील सर्व गोष्टी निरूपणातून पुढे येत होत्या. मी विचार केला, आपले गुण, कर्म, ताप व दुःख हे निरूपण करणाऱ्या माणसाला कसे कळले असेल. याचा विचार करत असताना एकच उत्तर आले– सामर्थ्य!

बैठकीचा अडीच तासांचा काळ म्हणजे अंतःकरणात कोणताही अवगुण न करता, देहामध्ये मंगलाचरण क्रियेमध्ये उभा करणारा काळ.

प्र. ४ : निरूपण करताना अडचणी येतात का? आल्यास या कशा प्रकारच्या असतात?

उत्तर : छे हो! निरूपण करताना अडचणी येण्याचं प्रश्नच नाही. आमच्यापैकी प्रत्येक जण व्यासपीठावर बसतो. त्यावेळी प्रत्येकाला हे माहीत असते की, हा काही आपला प्रांत नाही. आपल्या घराण्यात या आधी असा अनुभव नाही. जेथे आपण आपल्या संसार–प्रपंचाच्या, नोकरी–धंद्याच्या आपल्या स्वतःबद्दलच्या बाबतीत अडीच तास अखंडपणे बोलू शकत नाही. तेथे परमार्थाच्या बाबतीत काय बोलू शकणार? हे सामर्थ्य त्यांनी दिलेल्या शिकवणीच्या माध्यमातून प्रत्येकामध्ये कार्य करते. म्हणूनच ही जाणीव ठेवून निरूपणासाठी व्यासपीठावर बसलो की, काही टेन्शन येत नाही.

प्र. ५ : श्रवणानंतर व्यक्तीत कसा बदल घडून येतो? एखादे उदाहरण सांगता येईल का?

उत्तर : श्रवणातून आपल्या देहात बदल होतोच, या समर्थ वचनावर आपला विश्वास हवा. श्रवण भक्तीतूनच आपण अंतर्मुख होऊन पाहू शकतो की, आपली वृत्ती, गुण व आपले विचार हे सर्व आपणाला नको त्या दैत्य कर्माकडे वळविणारे होते. श्रवणाच्या ज्ञानामृताने अंतःकरणामध्ये बदल होतोच, हा आम्हां सर्व कुटुंबीयांचा स्वानुभव आहे. आज आम्ही आमच्या संसारामध्ये जे सुख उपभोगतोय, ते म्हणजे श्रवण भक्तीतूनच प्राप्त झालेली फलश्रुती आहे.

प्र. ६ : व्यसनमुक्ती श्रवणातून होते, असे मी ऐकून आहे. पण ही तात्कालिक होते की कायमची? आणि होत असल्यास श्रवण, निरूपण आणि वैद्यकीय उपचारांचा अंतर्भाव त्यात असतो का? की फक्त श्रवणाचा?

उत्तर : व्यसनमुक्ती श्रवणामुळे होते असे आपण ऐकून आहोत. मात्र मघाशी सांगितल्याप्रमाणे आमचे कुटुंब व्यसनमुक्तीचे प्रत्यख दाखला देण्यासारखे उदाहरण आहे. डॉ. श्री. नानासाहेबांच्या अलौकिक विचारांनी आमचे संपूर्ण घराणे भारलेले होते. त्यांच्या वचनांमध्ये विलक्षण जादू होती. नंतर अनेकवेळा कंपनीमध्ये किंवा कामानिमित्त बाहेर जावे लागले. तर सोबतच्या सहकाऱ्यांनी एकदाच 'घेण्या'बाबत पुष्कह आग्रहही केला. तथापि प्रत्येकक्षणी शिकवण आत खंबीरपणे उभी राहिली. शिकवणीने आतून आलेल्या कणखरपणामुळे बाहेरच्या प्रलोभनांना बळी पडलो नाही. हे आज मोठ्या अभिमानाने सांगता येते. मला मिळालेल्या शिकवणीचा मला अभिमान आहे. असायलाच हवा. जो अभिमान मी ज्या कारणाने बाळगतो, तसाच अभिमान असंख्य व्यक्ती त्याच कारणाने बाळगतात. ही व्यसनमुक्तता तात्कालिक नाही तर कायम स्वरूपाची आहे.

आता राहिला प्रश्न तो वैद्यकीय उपचाराचा, वैद्यकीय उपचार हे व्यसनाधीन झाल्यानंतर करावे लागतात. या उपचारांना थोड्या फार मर्यादा असू शकतात. कारण व्यसनमुक्त झालेली माणसे व्यसनांना अनुकूल परिस्थितीमध्ये पुन्हा बळी पडताना दिसतात. त्यावेळी त्यांना अडविणारे कोणी नसते.

तथापि नानासाहेबांचा श्रवणाचा उपाय दुहेरी कार्य करतो. एकतर तो प्रतिबंधात्मक स्वरूपाचा आहे. तसेच व्यसनाधीनांसाठी तो उपचारात्मक आहे. जे केवळ श्रवणातून सहजपणे घडू शकते, त्याकरता वैद्यकीय उपचारांची काय आवश्यकता?

प्र. ७ : विकास वैयक्तिक की सामूहिक?

उत्तर : श्रीसमर्थ बैठकीमध्ये निरनिराळ्या पंथांतील माणसे मांडीला मांडी लावून श्रवण करत असतात. प्रत्येकाच्या आतमध्ये एकच जाणीव असते. आम्हांस सांभाळणारा एकच आहे. श्रीसमर्थ बैठकीतील शिकवणीचे स्वरूप मातृदेवो भव व पितृदेवो भव असे असल्याने कुटुंब जोडणारे आहे. याचा अर्थ प्रत्येक कुटुंबाने विश्वव्यापक शिकवण अंतःकरणात स्वीकारली तर संपूर्ण विश्व सुखी होऊ शकते.

डॉ. श्री. नानासाहेब व श्री. आप्पासाहेब यांनी व्यक्तिगतरीत्या प्रत्येक व्यक्ती घडवली. एक व्यक्ती घडली की त्याचे कुटुंब घडते व कुटुंब घडले की समाज घडतो. समाज घडला की संपूर्ण देश घडण्यास वेळ लागत नाही. तसेच नानासाहेबांनी जात, धर्म यांची सीमा ओलांडून सर्वांचा एकच धर्म–मानवता धर्म, एकच जात– मनुष्य ही जात अशा प्रकारची भावना प्रत्येकाच्या अंतःकरणात बिंबवून दिली. ही शिकवण राष्ट्रीय विकासाकडे वाटचाल करणारी आहे.



मुलाखत क्रमांक : २

श्री. दिपेश प्रदीप शर्मा

गाव : सुरत (गुजरात राज्य)

प्र. १ : डॉ. श्री नानासाहेबांच्या कार्याची ओळख आपल्यापर्यंत कशी पोहोचली?

उत्तर : आमचे घराणे पूर्वीपासूनच आर्थिकदृष्ट्या संपन्न आहे. घरी कोणालाही कसल्याही बाबींची अडचण नाही. सर्व असूनही कुटुंबामध्ये क्षुल्लक बाबींवर तंटे व्हायचे, वादावादी व्हायची. सर्व असूनही नेमके काय कमी आहे हे कळतच नव्हते. नानासाहेबांच्या बैठकीतील एका सदस्याची माझ्या सासरगृही भेट झाली. मी सहजपणे विषय काढला तेव्हा त्यांनी ताबडतोब सांगितले की, सर्व असूनही तुमच्याकडे समाधान नाही. एकदा बैठकीमध्ये श्रवण करा व पाहा, की कसा फरक पडतो! त्यांच्या म्हणण्यानुसार मी एकदा बैठकीला गेलो व खरोखरच अंतरंगात बदल घडत असल्याचे लक्षात आले. सर्वांगाने सुखी व समाधानी करणारी शिकवण घ्यायला लागल्यापासूनच नानासाहेबांच्या कार्याची ओळख झाली.

प्र. २ : डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या कार्याचा समाजावर कसा प्रभाव आहे?

उत्तर : आमच्या समाजात फार आधीपासून हुंडाप्रथा अस्तित्वात आहे. यात काही गैर आहे असे कधीच वाटत नव्हते. आम्ही बैठकीत आलो आणि कळले की, ही प्रथा अनिष्ट आहे. आपल्या कुटुंबाची जबाबदारी सांभाळणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. या शिकवणीमुळे आमच्या समाजातील बैठकीत बसणाऱ्या व्यक्ती हुंडा घेणार नाही या निश्चयात्मक भूमिकेत आल्यात. समाजपरिवर्तनाची ही फार मोठी उपलब्धी आहे असे आम्हांला वाटते.

प्र. ३ : समाजाला वळण लावण्यासाठी प्रचाराचे माध्यम म्हणून डॉ. श्री. नानासाहेबांच्या बैठका उपयुक्त ठरतात का?

उत्तर : नानासाहेबांचे समाजप्रबोधनाचे कार्य बैठकांच्या माध्यमातून सुरू आहे. तसेच ते बालसंस्कार केंद्रे, प्रौढ साक्षरता केंद्रे, वृक्षारोपण, रक्तदान शिबिरे, ग्रामस्वच्छता अभियान या माध्यमांमधून सुद्धा समाजात विस्तारित होत आहे. आम्ही सर्वजण ज्या वेळी या उपक्रमांमध्ये सहभागी होतो, त्यावेळी प्रत्येक क्षणी जाणवते की नानासाहेबांचे समाजावर किती उपकार आहेत ते! स्वतः प्रसिद्धीपराङ्मुख राहून केवळ स्वबळावर समाज संस्कारित करण्याचे कार्य त्यांनी उभारलेले आहे.

प्र. ४ : डॉ. श्री. नानासाहेबांच्या बैठकांना जाण्याचा आपला कालावधी किती आहे?

उत्तर : प्रथम दिवस आठवत नाही. तरी अंदाजे २२ वर्षे झालीत.

प्र. ५ : बैठकींमध्ये कोणत्या गोष्टी प्रभावित करतात?

उत्तर : आमच्या बैठकींमध्ये येणारी माणसे वेगवेगळ्या समुदायांची व जातींची आहेत. पण येथे शिकवण मिळाली व रुजली की, 'भेदाभेद अमंगळ.' आज आपापली जातिव्यवस्था, इत्यादी सर्व सांभाळूनही सर्वजण एकोप्याने राहतो. कोणाबद्दल द्वेष, मत्सर व तिरस्कार वाटत नाही.

प्र. ६ : व्यसनाधीनतेकडे वळलेला समाज व्यसनांपासून दूर झाला आहे का?

उत्तर : आज त्यांच्या शिकवणीमुळे अनेकजण व्यसनमुक्त झालेत किंवा होताना दिसत आहेत. बैठकांमध्ये जी शिकवण आहे ती एवढी प्रभावी आहे की, व्यसनांमधून मुक्त झालेली व्यक्ती पिंडात सतत कृतज्ञतेचा भाव बाळगून आहे. जर ही शिकवण नसती तर? आपण निश्चितपणे रोगी, कष्टमय व दरिद्री जीवनाचे मालक झालो असतो. मात्र बैठकीतील माणसे व्यसनाधीन माणसांचा दुस्वास करीत नाहीत. कारण आमच्यापैकी प्रत्येकजण हे जाणतो की, यांना शिकवण मिळाली तर हे सुद्धा निश्चित सुधारतील.

प्र. ७ : स्त्री पुरुष हत्या कमी होण्यासाठी याचा फायदा झाला आहे का?

उत्तर : मुळात हत्या हा विषय शिकवणीच्या विरुद्ध आहे. शिकवणीला बसलेल्या माणसाच्या मनातील असे विचार आले तरी त्यांचे ताबडतोब निर्मूलन होते, हा आजपर्यंतचा अनुभव आहे.

प्र. ८ : समाजातील भांडणतंटे, वादविवाद, हेवेदावे कमी होऊन शांतता प्रस्थापित झाली आहे का?

उत्तर : आम्हांला श्रवणाद्वारे निरंतरपणे हे ठसविले गेले आहे की आपण दुसऱ्याच्या घरात डोकावले की, मग तो आपल्याही घरात घुसतो. मग आपण कां बरे? या विचारांनी प्रत्येकाच्या अंतरी शुद्धता व शांतता आणलेली आहे आणि पर्यायाने संपूर्ण समाजात शांतता प्रस्थापित करण्याची क्षमता असलेली शिकवण बैठकांद्वारे दिली जात आहे.

प्र. ९ : साक्षरतेचे प्रमाण वाढले आहे का?

उत्तर : साक्षरतेमध्ये वाचणे, लिहिणे, अंकलेखन, पाढे, बेरजा, वजाबाक्या, गुणाकार, भागाकार शिकविले जातात. याचा फार मोठा फायदा आमच्याकडे बैठकीतील व्यक्तींना झाला आहे. नानासाहेबांच्या शिकवणीने आधी प्रत्येक निरक्षर व्यक्तीमध्ये साक्षरतेप्रती आस्था निर्माण केली. या प्रेरणेतूनच अनेक व्यक्ती शिकायला तयार झाल्या.



मुलाखत क्रमांक : ३

श्री. अविनाश विनायक राजहंस

सेवानिवृत्त प्राध्यापक

गाव : नागपूर

प्र. १ : आपण निरूपणाकडे कसे वळलात?

उत्तर : माझा पूर्वपक्ष व्यावसायिक होता. कॉलेजमध्ये शिकविणे आणि घरी शिकवणीवर्ग चालविणे असे याचे स्वरूप होते. मुबलक पैसा, भरपूर सुट्या, त्यातून फिरण्याची हौस, थोडीफार चंगळ असे आयुष्य होते. मात्र मधुमेहाची आनुवंशिक व्याधी शरीराला लहानपणापासून होती. आपापल्या पद्धतीचे पथ्य आणि औषधोपचार यातून तात्पुरते ठिगळ लावल्यासारखे उपचार व्हायचे. पण रोगाची व्याप्ती आतून चिंताक्रांत करायची. उद्या जर मध्येच आपण दगावलो, तर कुटुंबासाठी तरतूद व्हावी, हा फार मोठा उद्देश धनप्राप्तीचा होता. मात्र हे क्षेत्र असे होते की, कोठेही थांबता येत नव्हते. Show must go on. वाढत्या वयाच्या समस्या व भविष्याची काळजी अशा कैचीत आयुष्य असताना, अचानक एका परिचित व्यक्तीने डॉ. श्री. नानासाहेबांच्या बैठकीची माहिती दिली. पूर्णपणे नेणिवेमध्ये जगणाऱ्या व्यक्तीला स्थूल प्रचिती सांगितल्याशिवाय या कार्याचे महत्त्व पटत नाही, हे निर्विवाद आहे. अशाच इतरांच्या प्रचितीच्या गोष्टी ऐकून व आपल्या भवितव्याला सुरक्षित करण्यासाठी म्हणून प्रथम बैठक श्रवणाला आलो.

पहिल्या वेळी निरूपण ऐकत असतानाच आमचा पूर्वपक्ष (पार्श्वभूमी) व्यासपीठावरील व्यक्तीला पूर्णपणे ठाऊक आहे की काय, अशी शंका आली. आमचेच भाग तेथे निघत होते. मग ज्या ज्या वेळी श्रवणाला आलो, त्या त्या वेळी त्यातील ताजेपणा, जिवंतपणा अनुभवाला यायला लागला. कंटाळवाणे नव्हतेच; उलट दररोज उत्सुकता व उत्कंठा वाढविणारे भाग ऐकण्यात येत होते. असे म्हणतात की, वाघाच्या गुहेत जाणाऱ्या

व्यक्तीची पावले दिसतात. बाहेर येणाऱ्या व्यक्तीची पावले दिसत नाही. तसेच आमच्याबाबतीत या बैठकींमधून घडलेले आहे.

प्र. २ : संधी कशी मिळाली?

उत्तर : आमच्या घरी 'श्री' स्थापना पूजा होती. आपल्या घरी डॉ. श्री. नानासाहेबांची बैठक असावी, अशी इच्छा होती. शिकवण्या बंद केलेल्या होत्या. हॉलचा सदुपयोग व्हावा ही इच्छा हेाती. झाले तसेच. पण मग व्यासपीठाचा भाग घ्यावा लागेल असे येथील स्थानिक व्यक्तींकडून सांगण्यात आले. तसे निवेदन करायला लावले. माझी खात्री होती की, माझ्यासारख्या अवगुणी माणसाला व्यासपीठाचा भाग दिला जाणार नाही. पण डॉ. श्री. नानासाहेबांनी माझ्यावर कृपाच केली. अशाप्रकारे व्यासपीठावरून निरूपणाचा भाग (संधी) मिळाला.

प्र. ३ : श्रवणाच्या वेळेचे काही विशिष्ट अनुभवपण सांगावे.

उत्तर : दररोज श्रवण विशेषच असते. फार तर सुरुवातीला श्रवणाचे दोन–तीन भाग झाले असतील. अचानक एक दिवस भाग आला की, आपली तब्येत ही अशी आहे. जे पैसे आपण कमावतो व जे आपल्याला महिन्यासाठी लागतात, यांचे प्रमाण फार व्यस्त आहे. विचार करू या की, आपण लाख रुपये महिना कमावतो. मग या सर्व पैशाचे आपण काय करणार? गहू, तांदूळ वीतभर पोटासाठी किती लागतात? आपण म्हणतो की, मोठा आजार झाला तर हॉस्पिटलसाठी पैसे जमा करतोय. पण शेवटपर्यंत सुखी समाधान चिंतामुक्त जीवन जगलो, तर शेवटचे दिवस असे कां बरे येतील? केवळ या वाक्याने आयुष्य पालटले. आयुष्याला पूर्णपणे कलाटणी मिळाली. घरचा शिकवणीवर्ग बंद केला. पगार पुरेसा होता. महिन्याभराचे खर्च व्यवस्थित भागत होते. आता तर पेन्शनमध्ये घर चालते. म्हणून जो वेळ व्यर्थ जाणार होता तो नानासाहेबांमुळे वाचला. तोच वेळ आता परमार्थासाठी सत्कारणी व सार्थकी लागतोय.

प्र. ४ : निरूपण करताना अडचणी येतात का? आल्यास या कशा प्रकारच्या असतात?

उत्तर : अहो, अडचण काय होणार? मात्र एक गोष्ट आवर्जून सांगाविशी वाटते की, व्यासपीठावर बसताना दररोज भीती असतेच आणि ती असायला पाहिजे. या भीतीतूनच

संपूर्ण शरणागतीच्या भूमिकेत व्यासपीठावर बसता येते. नंतर मात्र व्यासपीठावर बसल्यानंतरचा अनुभव हा अवर्णनीय सुख–समाधान व शांती देणारा आहे. आपणही श्रवणातच बसलेलो असल्यामुळे अनेक भाग जे आपल्यासाठी 'न भूतो न भविष्यति' असतात, ते श्रवण करायला मिळतात. हा अनुभव विलक्षण आहे.

सर्वांत महत्त्वाचा भाग म्हणजे हे कार्य आपले नाही, याची संपूर्ण वेळ जाणीव होत असते. ओवीनुरूप आपण काय करणार? म्हणून 'बोलविता धनी वेगळाचि असे' याचा प्रत्येकक्षणी अनुभव येतो. आपण फक्त निखळ आनंद घ्यायचा. एवढे सूत्र सांभाळले की याचा ताठा, अभिमान आपल्याकडे येण्याचे काही कारण नसते.

प्र. ५ : श्रवणानंतर व्यक्तींत कसा बदल घडून येतो? एखादे उदाहरण सांगता येईल का?

उत्तर : प्रथम श्रवणप्रक्रियेचे घटक कळले पाहिजेत. श्रवणाची 'ऐकले–कळले–वळले' अशी सोपी, सरळ सुटसुटीत व्याख्या आहे. थोडक्यात, जे जे ऐकले ते ऐकून अंतर्मुख झाले पाहिजे. त्याबाबत चिंतन केले पाहिजे. नंतर त्यानुसार आचरण करण्याचा प्रयत्न घडला पाहिजे. जर 'वळले' तरच 'कळले' हे मान्य केले पाहिजे. केवळ ऐकून काय उपयोग? श्रवणामध्ये एवढी जबरदस्त ताकद आहे की, ते ऐकल्यावर मनुष्याला अंतर्मुख करून आचरणासाठी प्रेरित करते. म्हणून बदलाची प्रक्रिया ही 'शनैः शनैः' घडणारी आहे. केस जसे एका रात्रीत पांढरे होत नाहीत, पण झाले की कळते की, आता वय झाले. तसेच ही बदलाची प्रक्रिया एका दिवसाची किंवा रात्रीची नाही. ती अखंडपणे घडत असते. मुख्य म्हणजे श्रवणातून आपण जी कर्मे करतो, जर ती वाईट असतील तर त्याचे दुष्परिणाम कसे भोगावेच लागतात. हे अतिशय परिणामकारकपणे विशद केल्या जाते. म्हणून प्रत्येकात बदल घडतोच घडतो. जर घडत नसेल तर श्रवण झाले नाही असे निश्चितपणे म्हणता येते. म्हणजे फक्त ऐकून उपयोग नाही. त्यानुसार आचरणाची तयारी ज्याची त्याला करावीच लागते.

असे एखादे उदाहरण कां म्हणून विचारता? अहो, आज जर एवढ्या लक्ष, कोटी व्यक्ती श्रवणाला बसलेल्या दिसतात, त्या काही निष्कारण बसलेल्या नाहीत. प्रत्येकाने हा बदल व्यक्तिगत पातळीवर अनुभवलेला आहे. म्हणून श्रवणाने घडविलेली प्रत्येक व्यक्ती हेच त्याचे उदाहरण आहे.

प्र. ६ : व्यसनमुक्ती श्रवणातून होते. असे मी ऐकून आहे. पण ही तात्कालिक होते की कायमची? आणि होत असल्यास श्रवण, निरूपण आणि वैद्यकीय उपचारांचा त्यात अंतर्भाव असतो का? की फक्त श्रवणाचाच?

उत्तर : व्यसनमुक्ती श्रवणातून होते, ही एक ऐकण्याची बाब नाही. अर्थात श्रवणास येणारा कोणीही व्यसनमुक्तीसाठी आलेलाच नाही. याचे कारण असे आहे की, व्यसनांच्या वेढ्यामध्ये अडकलेली माणसे स्वतःहून यातून सुटू शकत नाहीत. याची कारणे अनेक आहेत. मुळात स्वतःला याबाबत असलेली आवड होय. जी गोष्ट आवडते ती मनुष्य कशी काय सोडणार? एकवेळ बाह्य उपचारांमधून स्थूलातील व्यसने सुटतीलही. पण सूक्ष्मातील व्यसनांपासून कशी सुटका होईल? मघाशी म्हटल्याप्रमाणे श्रवणात एवढी प्रचंड ताकद आहे की, मनुष्य व्यसनांच्या आहारी कितीही गेलेला असो, श्रवणामुळे त्याच्या अंतरी व्यसनाबाबत घृणा निर्माण होते. मनुष्य अवगुण, व्यसनांच्या चिखलातून बाहेर येण्यासाठी धडपडायला लागतो. एकदा बाहेर आला की, पुनः या घाणीत जायचे कारण नाही, हा मनोमन निश्चय होतो. म्हणूनच व्यसनमुक्ती ही तात्पुरती, तात्कालिक नसून ती कायमस्वरूपी आहे.

आता प्रश्न आहे तो वैद्यकीय उपचारांचा. श्रवणामध्ये एवढे प्रचंड सामर्थ्य आहे की, या बाह्य वैद्यकीय उपचारांची आवश्यकताच भासत नाही. श्रवणाबाहेरील व्यक्तींमध्ये औषधोपचाराने घडवून आणलेली व्यसनमुक्तीची यशस्विता अभ्यासाचा विषय असू शकतो. केवळ नाइलाज म्हणून व्यसनमुक्त झालेली माणसे उत्तम स्थितीत आल्यावर पुन्हा कधीही प्रसंगानुसार व्यसनांमध्ये घसरू शकतात. पण येथे मात्र तसे घडत नाही. अंतरीचा निश्चय एवढा बळकट असतो की, मनुष्य पुन्हा चुकलेल्या वाटेवर जायला आतूनच तयार नसतो. ही श्रवणाची किमया आहे.

प्र. ७ : विकास वैयक्तिक की सामूहिक?

उत्तर : आपण हे लक्षात घेतले पाहिजे की, श्रवण अंतरंगात आमूलाग्र बदल घडविते. मनुष्याचे बाह्य घटक काय बदलणार? आपण आपले आईवडील, आपली जात, धर्म, कुटुंब, समाज, आपला वर्ण, उंची, दिसणे काहीच बदलू शकत नाही. म्हणूनच डॉ. नानासाहेबांनी संतपरंपरेच्या वाङ्मयावर आधारित शिकवण समाजाला दिलेली आहे.

ही शिकवण अंतरंगात बदल घडवते. म्हणून हा विकास केवळ वैयक्तिक पातळीवर घडू शकतो. ओवी आहे की, 'सामर्थ्य आहे चळवळीचे। जो जो करील तयाचे।।' जो जेवेल त्याचेच पोट भरते. मात्र संतपरंपरेची शिकवण व्यापक व विशाल आहे. एखाद्या कुटुंबातील एक व्यक्ती बदलली की, इतर व्यक्तीही या श्रवणाकडे ओढल्या जातात. मग संपूर्ण कुटुंब बदलते. यातून समाज घडतो. मग राष्ट्राचा विकास होतो. असा हा व्यक्तीकडून समाजाकडे जाणारा प्रवास आहे.



मुलाखत क्रमांक : ४

श्री. श्रीकांत शेळके

व्यवसाय

वय : ४६ गाव : नाशिक

प्र. १ : डॉ. नानासाहेबांच्या कार्याची ओळख आपल्यापर्यंत कशी पोहोचली?

उत्तर : माझ्या ऑफिसमधील माझ्या सहकारी मित्रावर भयंकर प्रसंग ओढवला होता. त्याच्या प्रसंगाची बातमी ऐकून मीच हबकून गेलो होतो. तो मात्र एकदम शांत होता. जणू काही घडलेच नाही अशा प्रकारे वागत होता. आमच्या ऑफिसमधील प्रत्येकासाठी हे नवलच होते की, एवढ्या जीवघेण्या प्रसंगात मनुष्य एवढा शांत कसा राहू शकतो? त्याने सर्वांना एकच उत्तर दिले की, डॉ. नानासाहेबांच्या श्रीबैठकीमध्ये श्रवणातून प्रत्येकाला प्राप्त झालेली ही स्थिती आहे. म्हणूनच मी एवढा शांत आहे. बैठकीत असे काय शिकवितात पाहण्यासाठी मी बैठकीला आलो व कायम बसायला लागलो.

प्र. २ : डॉ. नानासाहेब धमाधिकारी यांच्या कार्याचा समाजावर कसा प्रभाव आहे?

उत्तर : डॉ. नानासाहेबांनी श्री बैठकींमध्ये निश्चयपूर्वक आम्हांला शिकविले की, जर कुटुंबातील प्रत्येक व्यक्ती सुधारली तर कुटुंब सुधारते. अशी सुधारलेली कुटुंबे समाजात सुधारणा घडवून आणतात. म्हणून आमच्यापैकी प्रत्येकाने समाज सुधारण्यापेक्षा स्वतःचे आचरण उत्तम करण्याचा प्रयत्न केला आहे. याचा समाजावर नक्की निश्चितपणे परिणाम झालेला आहे.

प्र. ३ : समाजाला वळण लावण्यासाठी प्रचाराचे माध्यम डॉ. नानासाहेबांच्या बैठका कशा उपयुक्त ठरतात?

उत्तर : समाजामध्ये बदल घडवायचे तर महाकर्म कठीण असते. हे सामान्य मनुष्याचे कामच

नाही. याबाबतीत डॉ. नानासाहेबांचे व्यक्तिमत्त्व असामान्यच म्हणाचे लागेल. कारण आमच्यासारख्या सामान्यातील सामान्य माणसांना त्यांनी अतिशय प्रेमाने जवळ घेऊन आमच्यामध्ये इष्ट बदल घडविले. म्हणून समाजाला उत्तम वळण देण्याचे कार्य त्यांच्या बैठकींनी केलेले आहे.

प्र. ४ : डॉ. श्री. नानासाहेबांच्या बैठकांना जाण्याचा आपला कालावधी किती आहे?

उत्तर : कॉलेजमध्ये असल्यापासून नियमितपणे गेली १२ वर्षे शिकवण घेत आहे.

प्र. ५ : बैठकींमध्ये कोणत्या गोष्टी प्रभावित करतात?

उत्तर : उत्तम मानवीसमाज निर्मितीचे एवढे अतिप्रचंड कार्य, पण एवढ्या साधेपणाने व सहजपणे घडताना दिसते. आमच्या बैठकीत अनेक जातींचे, विविध वयोगटांचे, भाषांचे, आर्थिक गटांचे तसेच अनेक स्तरांतील व्यक्ती श्रवणाला येतात. प्रत्येकजण दुसऱ्याप्रती अतिशय विनयशील व्यवहार करतो.

प्र. ६ : व्यसनाधीनतेकडे वळलेला समाज व्यसनांपासून दूर झाला आहे का?

उत्तर : सहजपणे किंवा फॅशन म्हणून किंवा प्रसंगांवर मात करण्यासाठी माणूस व्यसनाधीन होतो. हळूहळू दारिद्र्याचा विळखा स्वतःभोवती व कुटुंबाभोवती आवळला जातो. डॉ. नानासाहेबांनी आम्हांला शिकवणीतून व्यसनाधीनतेचे दुष्परिणाम सहजपणे दाखविले. हळूहळू माझ्यासारखी माणसे सिगरेटसारख्या व्यसनातून मुक्त झालीत. मुख्य म्हणजे हे व्यसनमुक्त जीवन माझ्यासाठी फारच सुखकारक आहे, असाच भाव प्रत्येकाचा आहे.

प्र. ७ : स्त्री–पुरुष हत्या कमी होण्यासाठी याचा फायदा झाला आहे का?

उत्तर : डॉ. श्री. नानासाहेबांच्या बैठकी म्हणजे उत्तम विचारांची पेरणी होय. अधम प्रवृत्तीची माणसे शिकवणींनी सुधारली हा फार मोठा आश्चर्यकारक परिणाम आहे. हुंड्यासाठी त्रास देणाऱ्या व्यक्ती श्रवणात बसल्या आणि त्यांच्या वृत्तीत फार मोठा बदल त्यांनी घडवून आणला आहे.

प्र. ८ : समाजातील भांडणतंटे, वादविवाद, हेवेदावे कमी होऊन शांतता प्रस्थापित झाली आहे का?

उत्तर : आम्हांला बैठकीमध्ये शिकविले की, दुसऱ्याचा द्वेष मत्सर केला तर त्याचे केव्हा वाईट होईल हे सांगता येत नाही. पण आपले मात्र ताबडतोब वाईट व्हायला सुरुवात होते. आपण आतून पेटून उठतो. ही शिकवण एवढी प्रभावी आहे की, भांडणतंटा, हेवेदावे यांचे मूळ आतूनच गेले व अंतरंग शुद्ध होऊन शांत झाले. आपण शांतपणे वागलो की, साहजिकच समोरचासुद्धा शांतच होतो, हा प्रत्येकाचा अनुभव आहे.

प्र. ९ : साक्षरतेचे प्रमाण वाढले आहे का?

उत्तर : मुख्य म्हणजे साक्षरता वर्गामध्ये भाषेसोबत गणिताचीसुद्धा सोय आहे. म्हणून प्रत्येकाला हिशेब करायला मदत होऊ लागली. निरक्षर मनुष्याची आता शिकून काय करायचे, अशी धारणा होती. बैठकांमधील शिकवणीने या धारणेला नष्ट केले. आता निरक्षर मनुष्यांचा साक्षर होण्यासाठी ओढा लागला.



मुलाखत क्रमांक : ५

श्री. शरद राघुजी राणे,

गाव : आसाम

प्र. १ : डॉ. नानासाहेबांच्या कार्याची ओळख आपल्यापर्यंत कशी पोहोचली?

उत्तर : आमच्या वस्तीमध्ये आग लागून माझी झोपडी पूर्णपणे जळाली. आम्ही उघड्यावर पडलो. मात्र एक व्यक्ती तत्परतेने समोर आली. माझ्यासोबत राख वगैरे आवरू लागली. त्या व्यक्तीने साफसफाईला मदत केली. मला मोठेच आश्चर्य वाटले. मी विचारले की मला मदत करावी असे तुम्हांला कसे जाणवले? ते म्हणाले की, मनुष्याने मनुष्यासारखेच जीवन जगले पाहिजे. अशी शिकवण देणारी आमची श्रीबैठक आहे. त्यांच्या या मदतीने मी एवढा प्रभावी झालो की, मी सुद्धा त्यांच्यासोबत नियमितपणे श्रवणासाठी येऊ लागलो. श्रवणातून मानवताधर्माची शिकवण देणाऱ्या कार्याची ओळख झाली.

प्र. २ : डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या कार्याचा समाजावर कसा प्रभाव आहे?

उत्तर : माझ्यासारखी माणसे बैठकीला आली तीच मुळी व्यसनाधीन होती. व्यसने सुटावी असे वाटायचे, पण सुटत नव्हती. घर–कुटुंबाची स्थिती दयनीय झालेली होती. येथे डॉ. श्री. नानासाहेबांच्या शिकवणीने उत्तम संस्कारांची बीजे पेरली. मला व माझ्यासारख्या अनेकांना आपल्या चुका कळल्या. उत्तम मार्गाने चालण्याचा निर्धार या शिकवणीने दिला. आम्ही सुधारलो. थोडक्यात, अनेकजण व्यसनमुक्त झाले.

प्र. ३ : समाजाला वळण लावण्यासाठी प्रचाराचे माध्यम म्हणून डॉ. नानासाहेबांच्या बैठका कशा ठरतात?

उत्तर : समाजाला वळण लावण्यासाठी प्रचाराचे माध्यम म्हणून डॉ. नानासाहेबांच्या बैठका

निश्चितपणे उपयुक्त आहेत. याचे कारण मुख्य म्हणजे आपल्या घरची वडील मंडळी किंवा आपणसुद्धा असे सुनियोजित वळण लावू शकत नाही. येथे मिळालेल्या सुसंस्कारांनीच आम्हांला वळण लावलेले आहे म्हणून समाजाला वळण लावण्याचे कार्य या बैठकांद्वारे होत आहे.

प्र. ४ : डॉ. श्री. नानासाहेबांच्या बैठकांना जाण्याचा आपला कालावधी किती आहे?

उत्तर : मी आधी ५ वर्षे बैठकीला गेलो होतो. नंतर चार वर्षे नोकरीनिमित्त आसामला जावे लागले. तेवढ्या कालावधीचा खंड पडला. पुन्हा नंतर आता गेल्या तीन वर्षांपासून श्री बैठकींमध्ये शिकवणीचा लाभ मिळत आहे.

प्र. ५ : बैठकींमध्ये कोणत्या गोष्टी प्रभावित करतात?

उत्तर : व्यासपीठावर शिकवण देणारी व्यक्ती आमच्यासारखी सामान्यच असते. तरीही सर्वजण मोठ्या आनंदाने, उत्साहाने, आदराने श्रवण करतात. व्यासपीठावरील व्यक्तीची पार्श्वभूमी कोणीही विचारात घेत नाही. आपल्या हिताचे बोलले जाते. म्हणून ही शिकवण इतर कोणासाठी नसून ती फक्त माझ्यासाठी आहे या भूमिकेतून प्रत्येकजण शिकवण घेतो.

प्र. ६ : व्यसनाधीनतेकडे वळलेला समाज व्यसनांपासून दूर झाला आहे का?

उत्तर : बाह्यांगाने लागलेली व्यसने मनुष्याला चटकन लागतात. वेळ झाली की ही माणसे व्यसनांसाठी कासावीस होतात. मुख्य म्हणजे बैठकांच्या वेळा रात्रीच्याच आहेत. बैठकीकडे यायला लागले की, ही वेळ चुकविली जाते. तसेच ही शिकवण आतून माणसांना व्यसनमुक्त करते. म्हणून जर शिकवण 'आत' घेतली तर संपूर्ण समाज व्यसनमुक्त होऊ शकतो, असे सामर्थ्य या शिकवणीत आहे.

प्र. ७ : स्त्री–पुरुष हत्या कमी होण्यासाठी याचा फायदा झाला आहे का?

उत्तर : ही शिकवण मिळाली तर स्त्री–पुरुष हत्यांचे प्रमाण नक्की कमी होईल. उलट प्रत्येकजण दुसऱ्याप्रती आदरभाव बाळगतो. प्रत्येकाशी विनयाने बोलतो. आपल्या आचार, विचारांवर संयम ठेवायला शिकतो.

प्र. ८ : समाजातील भांडणतंटे, वादविवाद, हेवेदावे कमी होऊन शांतता प्रस्थापित झाली आहे का?

उत्तर : भांडणतंटे, वादविवाद, हेवेदावे होण्याचे प्रमुख कारण म्हणजे प्रत्येक माणसाच्या अंतरीचा अभिमान होय. मी व माझेच खरे ही भावना माझ्यामध्येसुद्धा होती. पण शिकवण एवढी महान आहे की, हळूहळू मीपणा गळून पडला. हा प्रत्येकाचा अनुभव आहे. म्हणूनच भांडणतंटे, वादविवाद, हेवेदावे यांचे मूळच तुटून पडते. थोडक्यात, सर्वत्र शांतता नांदते.

प्र. ९ : साक्षरतेचे प्रमाण वाढले आहे का?

उत्तर : निरक्षरता हा मानवजातीचा शाप आहे असे बैठकांमध्ये ठासून बिंबविले गेले. मग मनुष्याला निरक्षरतेबाबत अपराधीपणाची भावना वाटू लागली. बैठकीतीलच साक्षर माणसे निरक्षरांचे वर्ग घेतात. साक्षरता हळूहळू वाढीस लागली.



मुलाखत क्रमांक : ६

श्री. सचिन शांडिल्य

जनरल मॅनेजर

वय : ४४ गाव : नाशिक

प्र. १ : डॉ. नानासाहेबांच्या कार्याची ओळख आपल्यापर्यंत कशी पोहोचली?

उत्तर : मी कॉलेजमध्ये असल्यापासूनच श्रीबैठकीमध्ये श्रवणासाठी बसतोय. कॉलेजमध्ये परीक्षेचा काळ आला, की सर्वजण जाम चिंतेत असायचे. या चिंतेपायी पेपरमध्ये उत्तरे लिहिताना जाम गोंधळ व्हायचा. येत असलेले आठवायचे नाही. आमच्याच ग्रुपमध्ये माझा एक मित्र होता. तो मात्र सर्वकाळ चिंतामुक्त दिसायचा. सतत हसतमुख राहायचा. त्याला विचारले की, तू एवढा चिंतामुक्त राहूच कसा शकतो? तो म्हणाला की, चिंता करून चिता होण्यापेक्षा अभ्यासाचे चिंतन केले तर शांतपणे आपण उत्तीर्ण होऊ शकतो. हे ऐकून मीसुद्धा तेव्हापासून बैठकीशी जोडला गेलो.

प्र. २ : डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या कार्याचा समाजावर कसा प्रभाव आहे?

उत्तर : डॉ. नानासाहेबांना वर्तमान युगाची पडलेली काळीकुट्ट सावली स्पष्ट दिसत होती. समाजाला यातून बाहेर काढणे आवश्यक आहे. हे ते जाणत होते. बाहेरचा बदल घडवून समाज घडत नाही. म्हणून त्यांनी या युगाची आव्हाने स्वीकारण्यासाठी अंतरंगातून प्रत्येकाला सामर्थ्ययुक्त बनविलेले आहे. मनुष्य एकदा का आतून घडविला गेला की बाहेरच्या अवगुणांची अंगे गळून पडतात हे स्वतःच्या अनुभवावरून सांगता येते. अशा सद्गुणी मनुष्यांचा समाज निश्चितच सुसंस्कारी राहील.

प्र. ३ : समाजाला वळण लावण्यासाठी प्रचाराचे माध्यम म्हणून डॉ. नानासाहेबांच्या बैठका उपयुक्त ठरतात का?

उत्तर : डॉ. नानासाहेबांना समाजपरिवर्तनाच्या बाबतीत दूरदृष्टी होती. त्यांना द्रष्टा पुरुषच म्हटले पाहिजे. कारण उद्याचा समाज संस्कारसंपन्न, बलसंपन्न व चारित्र्यसंपन्न व्हावा याची त्यांना आस लागलेली होती. यासाठी त्यांनी आमच्या मुलांसाठी अनेक ठिकाणी बालसंस्कार केंद्रांचे आयोजन केले. मुलांना बालवयातच योग्य वळण लागले तर उद्याचा भारत जगात महान होईल अशी त्यांची श्रद्धा होती. आमच्या मुलांना संस्कार देणारी एक विनाशुल्क व्यवस्था त्यांनी अस्तित्वात आणलेली आहे. उद्याच्या भारताला आजच वळण देणारी ही व्यवस्था आहे.

प्र. ४ : डॉ. श्री. नानासाहेबांच्या बैठकांना जाण्याचा आपला कालावधी किती आहे?

उत्तर : माझे लग्न सुमारे १५ वर्षांपूर्वी झाले. माझी बायको तिच्या माहेरी श्रवणाला जायची. आधी आमच्या येथे बैठक नव्हती. गेली सात वर्षे आम्ही दोघेजण नियमितपणे जात आहोत.

प्र. ५ : बैठकीमध्ये कोणत्या गोष्टी प्रभावित करतात?

उत्तर : आचरणाची पथ्ये शिकवणारी शिकवण बैठकीमध्ये शिकवली जाते. कोणीही याबाबत तक्रार करत नाही. तसेच आरडाओरडा नाही. येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची टाइमशीर नोंद ठेवली जाते. शिकवण फुकट असली तरी तिचा आदर करण्याचे प्रत्येकजण जाणतो.

प्र. ६ : व्यसनाधीनतेकडे वळलेला समाज व्यसनांपासून दूर झाला आहे का?

उत्तर : बैठकीत येतांना 'खाणारेपिणारे चालत नाहीत' असे काहीच निर्बंध नाहीत. येथे उलट अशाच माणसांचे स्वागत आहे. बैठकीत जी शिकवण मिळते त्यातील प्रत्येक शब्दामध्ये एवढे सामर्थ्य आहे की, पाहता पाहता असंख्य व्यक्ती व्यसनमुक्त झालेल्या आहेत. मुख्य म्हणजे व्यसनाधीनतेमध्ये आपण ओंगळपणे जगत होतो, हे कळतच नव्हते. आता मात्र स्वच्छ जीवनाकडे ओढा आहे, अशी या बैठकांची किमया आहे.

प्र. ७ : स्त्री–पुरुष हत्या कमी होण्यासाठी याचा फायदा झाला आहे का?

उत्तर : निश्चितच. फायदा आहेच आहे. कारण मनातून दुष्ट विचारांचा नाश होतो. प्रत्येकाला सन्मानपूर्वक जगण्याचा निसर्गदत्त अधिकार आहे, ही शिकवण बैठकांमधून प्रत्येकाला

मिळते. म्हणून कोणाचीही हत्या करण्याचा अधिकार आपल्याला नाही, हे प्रत्येकजण जाणतो. पिंडामधील उफाळलेल्या तमोगुणाने व क्रोधाने हत्या होतात. श्रीबैठकांमध्ये तमोगुणच शांत झालेला आहे. म्हणून हत्या करण्याच्या प्रवृत्तीला मुळापासूनच तोडले आहे.

प्र. ८ : समाजातील भांडणतंटे, वादविवाद, हेवेदावे कमी होऊन शांतता प्रस्थापित झाली आहे का?

उत्तर : बैठकीतील शिकवणीने प्रत्येकाच्या अंतरी एकोपा आणला. येथील प्रत्येक मनुष्य आपलेच मत दामटण्यापेक्षा दुसऱ्याच्या मताचा आदर करतो. थोडक्यात, जर बैठकींमध्ये सामंजस्याचे वातावरण तयार होऊ शकते तर, या शिकवणीमुळे समाजामध्ये निश्चितपणे शांतता नांदू शकते असे आम्हांला खात्रीपूर्वक म्हणता येते.

प्र. ९ : साक्षरतेचे प्रमाण वाढले आहे का?

उत्तर : महिलांमध्ये पूर्वापार चालत आलेला निरक्षरतेचा भाग फारच मोठ्या प्रमाणात होता. आमच्या बैठकींमध्ये महिलांनी साक्षर झाले तर संपूर्ण कुटुंबसंस्था स्वस्थ होऊ शकते हे बिंबविले गेले. म्हणून बैठकींच्या आधी साक्षरता वर्ग भरतो. अशा महिला शिकून आज बैठकींमध्ये वाचकाची भूमिकासुद्धा बजावताना दिसतात.

मुलाखत क्रमांक : ७

श्री. रवींद्र हसबनीस

गाव : बत्तीस शिराळा

प्र. १ : डॉ. नानासाहेबांच्या कार्याची ओळख आपल्यापर्यंत कशी पोहोचली?

उत्तर : पावसाळ्याचे दिवस होते. आमच्या समोरच्या मुख्य रस्त्यावर दुतर्फा वृक्षारोपणाची लगबग होताना दिसली. उत्साहामध्ये रोपे लावून त्यांना कुंपणे केलेली दिसली. समाजातील सर्व स्तरांमधील व्यक्ती सहभागी झालेल्या होत्या. चांगली लांबलचक– अर्ध्या कि.मी. अंतरापर्यंत झाडे लावल्या गेली. आश्चर्य म्हणजे नंतर ही मंडळी आळीपाळीने या झाडांना पाणी देण्यासाठी नियमितपणे येताना दिसत होती. एक दिवस न राहवून मी त्यांपैकी एकाला विचारले की, या वृक्षारोपणासाठी तुम्हांला कोणी प्रेरित केलेले आहे? त्यावेळी ते म्हणाले की, डॉ. नानासाहेबांच्या बैठकींमध्ये ही सामाजिक बांधीलकी व सामाजिक ऋणांची जाणीव आमच्यामध्ये बाणविली गेली व त्यांच्याच प्रेरणेतून आम्ही डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानातर्फे हे काम करीत आहोत. अशी निष्कामतेची शिकवण नेमकी काय हे जाणण्यासाठी मी बैठकीमध्ये यायला लागलो.

प्र. २ : डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या कार्याचा समाजावर कसा प्रभाव आहे?

उत्तर : आमच्या वस्तीत अनेक व्यक्ती–विशेषतः महिलावर्ग– अशिक्षित आहे. डॉ. नानासाहेबांच्या मार्गदर्शनाची श्रीबैठक आमच्या वस्तीत सुरू झाली. शिकवण घेता घेता अनेक वेळा भाग आला की, साक्षर झाले तर आपले जीवन अनेक प्रकारे अर्थपूर्ण होते. याचा परिणाम असा झाला की, अनेक निरक्षरांना आपल्याला लिहिता वाचता आले तर बरे होईल असे आतून वाटू लागले. याची पूर्तता करण्यासाठी आमच्या वस्तीत विनाशुल्क साक्षरता वर्ग सुरू झाला. अनेकजण साक्षर झाले. आमच्याच बैठकीमध्ये ते वाचक म्हणून बसू लागले. थोडक्यात, संतपरंपरेची शिकवण समाजात फार मोठा बदल घडवून आणू शकते.

प्र. ३ : समाजाला वळण लावण्यासाठी प्रचाराचे माध्यम म्हणून डॉ. नानासाहेबांच्या बैठका उपयुक्त ठरतात का?

उत्तर : समाज अनेक दिशांनी विखुरलेला असताना त्याला वळण देण्याचे महत्कार्य डॉ. श्री. नानासाहेबांनी बैठकांच्या माध्यमातून फार उत्तम प्रकारे केलेले आहे. आम्ही मंडळी सातत्याने त्यांच्या निष्काम समाजसेवेचा लाभ घेत आलेलो आहोत व विचाराधीन होत आहोत. आम्हा प्रत्येकासाठी ही अभूतपूर्वच घटना आहे. जर संपूर्ण समाजाने त्यांची शिकवण अंगीकारायचे ठरविले तर संपूर्ण समाजाला उत्तम विचारांची गवसणी घालण्याचे सामर्थ्य या बैठकांमध्ये आहे.

प्र. ४ : डॉ. नानासाहेबांच्या बैठकांना जाण्याचा आपला कालावधी किती आहे?

उत्तर : गेल्या चार वर्षांपासून बैठकीला जात आहे. आता आयुष्यभर हा लाभ सुटता कामा नये असा आमचा निश्चय आहे.

प्र. ५ : बैठकींमध्ये कोणत्या गोष्टी प्रभावित करतात?

उत्तर : माझ्या बाबतीत बोलायचे तर मला शिकवणीतून वागण्याची, बोलण्याची शिस्त लागली. आधी मी मनाला येईल तसे वागणारा होतो. मनाला वाटेल ते बोलायचे. आता संयम व शिस्त आली. साहजिकच याचे फायदे मिळू लागले. बैठकीमध्ये येणारी माणसे सहजपणे शिस्तीत वागताना दिसतात. मुख्य म्हणजे येथे माणसांमाणसांमधील दुरावा दूर होताना दिसतो. सर्व प्रकारच्या कृत्रिम भेदांचे उच्चाटन झालेले दिसतो.

प्र. ६ : व्यसनाधीनतेकडे वळलेला समाज व्यसनांपासून दूर झाला आहे का?

उत्तर : मनुष्य आतून खचला की व्यसनांचा आधार घेतो. बैठकीतील शिकवण आम्हांला आतूनच उभारी देते. जणू काही पुनः व्यसनांच्या अधीन न होऊ देणारे प्रतिबंधात्मक कवचच आतून देते. हा आमच्यापैकी प्रत्येकाचाच अनुभव आहे. शिवाय याचा आमच्या मुलाबाळांवर सुद्धा फार मोठा सुपरिणाम झाला आहे.

प्र. ७ : स्त्री–पुरुष हत्या कमी होण्यासाठी याचा फायदा झाला आहे का?

उत्तर : हत्या करण्याचे कारण जर वैमनस्य असेल तर शत्रूबुद्धी विनाशायची शिकवण या प्रवृत्तीला आवर घालते. अनेक गुंड प्रवृत्तीची माणसे बैठकीत बसल्यावर इतकी शांत झाली की, आज त्यांची पार्श्वभूमीच पुसली गेली.

प्र. ८ : समाजातील भांडणतंटे, वादविवाद, हेवेदावे कमी होऊन शांतता प्रस्थापित झाली आहे का?

उत्तर : बैठकींमध्ये शिकवण दिली की, भांडणतंटा कां बरे करायचा? प्रत्येकाने जे संचित आणले आहे. त्यानुसार त्याची जीवनाची वाटचाल आहे. आपण स्वतःला सुधारले पाहिजे. दुसऱ्याकडे न पाहता स्वतःकडे लक्ष दिले पाहिजे. मनुष्य अंतर्मुख झाला की भांडणतंटे इत्यादींची प्रवृत्तीच नष्ट होते.

प्र. ९ : साक्षरतेचे प्रमाण वाढले आहे का?

उत्तर : साक्षरता वाढून समाज संस्कारसंपन्न व्हावा हाच डॉ. श्री. नानासाहेबांचा संकल्प होता. हा संकल्प सिद्धीला न्यायला त्यांनी जागोजागी प्रौढ साक्षरता वर्ग निःशुल्कपणे चालविले आहेत. गावागावांतील निरक्षरांना याचा फायदा होऊन मग नंतर ते श्रवणाला बसू लागले.



मुलाखत क्रमांक : ८

श्री. पुरुषोत्तम प्रभु

गाव : मंगलोर

प्र. १ : डॉ. नानासाहेबांच्या कार्याची ओळख आपल्यापर्यंत कशी पोहोचली?

उत्तर : आमच्या शेजारच्या फ्लॅटमध्ये राहणारे माझे मित्र नियमितपणे श्री बैठकीला जातात. एक दिवस प्रसंग असा घडला की, आम्हां दोघांमध्ये मतभेद झाले असता मी जोरजोराने माझी बाजू मांडत होतो. त्यांची बाजू बरोबर असूनही ते शांतपणे बोलत होते. कालांतराने मला माझी चूक कळली. मी त्यांना म्हटले की, तुम्ही एवढे शांतपणे व नम्रपणे कसे बोलू शकता? त्यावर ते म्हणाले की, आम्हांला श्रीबैठकींमध्ये शिकवणच अशाप्रकारची आहे. म्हणून मी त्यांच्यासोबत श्री बैठकीला येऊ लागलो व हळूहळू त्यांच्या कार्याची ओळख होऊ लागली.

प्र. २ : डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या कार्यांचा समाजावर प्रभाव कसा आहे?

उत्तर : डॉ. नानासाहेबांनी समाजप्रबोधनाची अनेक अंगे हाताळली आहेत. श्रीबैठकींमध्ये शिकवणीतून त्यांनी प्रत्येकाच्या अंतःकरणाचा ठाव घेतला आहे. अंतःकरणामध्ये मानवताधर्माची बीजे पेरली. प्रत्येकजण बाहेर न पाहता स्वतःचे निरीक्षण व परीक्षण करायला शिकला. प्रत्येकाला ते अंतःकरणातून घडवितात. एक एक करता करता अशा असंख्य व्यक्तींना शिकवण देऊन समाजव्यवस्थेत उभे केलेले आहे. साहजिकच जेथे जेथे त्यांच्या शिकवणीच्या व्यक्ती असतील तेथे समाजव्यवस्थेवर निश्चितपणे उत्तम प्रभाव पडलेला आहे.

प्र. ३ : समाजाला वळण लावण्यासाठी प्रचाराचे माध्यम म्हणून डॉ. नानासाहेबांच्या बैठका उपयुक्त ठरतात का?

उत्तर : डॉ. नानासाहेबांच्या बैठकींमधील शिकवण शाश्वत स्वरूपाची आहे. ही शिकवण

मनुष्याच्या जीवनामध्ये गुणात्मक बदल घडवून आणते. आमच्या बैठकीतील अनेक माणसे अनेक अंधश्रद्धांनी बंदिस्त होती. यातून आम्ही दुःखाचे व कष्टाचे जीवन जगत होतो. पण श्री. नानासाहेबांची शिकवण मिळाली व अंधश्रद्धांच्या प्रथा आता आमच्याकडे पाळत नाहीत. थोडक्यात, आमच्या जीवनाला या शिकवणीने सुयोग्य वळण लावले आहे.

प्र. ४ : डॉ. नानासाहेबांच्या बैठकांना जाण्याचा आपला कालावधी किती आहे?

उत्तर : आजपासून सुमारे आठ वर्षांपूर्वी मी प्रथम बैठकीला गेलो. तेव्हापासून अतिशय नियमितपणे मी बैठकीला जात आहे.

प्र. ५ : बैठकींमध्ये कोणत्या गोष्टी प्रभावित करतात?

उत्तर : एक अतिशय महत्त्वाची बाब म्हणजे बैठकीच्या संचालनात असलेली शिस्त. अडीच तास म्हणजे बैठकीचा कालावधी आहे. बैठक अगदी वेळेवर सुरू होते व वेळेवरच संपते. बैठक सुरू असताना फक्त श्रवणच होत असते. आपापसात चर्चा नाही. तसेच वेळकाढूपणा नाही. कोणालाही अनुलक्षून बोलल्या जात नाही.

प्र. ६ : व्यसनाधीनतेकडे वळलेला समाज व्यसनांपासून दूर झाला आहे का?

उत्तर : होय, निश्चितपणे दूर होतोय. मात्र या संस्काराखाली सातत्याने राहणे गरजेचे आहे. आमच्या बैठकीतील काही मनुष्यांकडे परंपरेने दारू गाळण्याचा व्यवसाय होता. सहजच ही माणसे व्यसनयुक्त झालेली होती. मात्र तेथील शिकवण एवढी मोलाची आहे की, आज अनेकजण यातून सहजपणे मोकळे झालेले दिसतात. जरी ही माणसे अशाच्या संगतीत बसली तरी ती आतून मोकळी झालेली असल्याने, आम्ही दारूच्या थेंबाला स्पर्शही करत नाही, हे अभिमानाने सांगतात.

प्र. ७ : स्त्री–पुरुष हत्या कमी होण्यासाठी याचा फायदा झाला आहे का?

उत्तर : निश्चितच. फायदा आहेच आहे. कारण मनातून दुष्ट विचारांचा नाश होतो. कारण प्रत्येकाला सन्मानपूर्वक जगण्याचा निसर्गदत्त अधिकार आहे, ही शिकवण बैठकांमधून

प्रत्येकाला मिळते. म्हणून कोणाचीही हत्या करण्याचा अधिकार आपल्याला नाही, हे प्रत्येकजण जाणतो.

प्र. ८ : समाजातील भांडणतंटे, वादविवाद, हेवेदावे कमी होऊन शांतता प्रस्थापित झाली आहे का?

उत्तर : समाजात शांतता प्रस्थापित करायची असेल तर प्रत्येकाच्या पिंडातील अंतर्कलह शांत झाला पाहिजे. बैठकीत शिकवण मिळाली की, आपोआप प्रत्येकाच्या पिंडात शांतता व समाधान प्रस्थापित होते. मनुष्य शांत होणे आवश्यक आहे, तरच कुटुंबात शांतता येईल व समाजसुद्धा शांत होईल. हा माझा अनुभव आहे.

प्र. ९ : साक्षरतेचे प्रमाण वाढले आहे का?

उत्तर : हो; निश्चितपणे वाढलेले आहे. प्रौढ निरक्षर माणसांना साक्षर करण्यासाठी डॉ. नानासाहेबांनी प्रौढ साक्षरता वर्ग चालविलेले आहेत. बैठकीत मिळालेल्या शिकवणीने आपल्याला लिहिता वाचता येत नाही याची अनेक निरक्षरांना खंत वाटू लागली. साक्षर झाल्यास कोणी फसवू शकत नाही. आता न लाजता अनेक प्रौढ माणसे या वर्गामधून साक्षर होत आहेत, झालेली आहेत.

५.४ सदर संशोधनासाठी श्रवणातून काय बदल होतो हे जाणणे आवश्यक वाटते, म्हणून ठाणे आणि रायगड जिल्ह्यातील श्रवणाला जाणाऱ्या काही व्यक्तींच्या मुलाखती घेण्यात आल्या, त्यापैकी नमुन्यादाखल काही मुलाखती दिल्या आहेत.

मुलाखत क्रमांक : १



श्रीमती लता वसंत पाटील

गृहिणी, गाव : ठाणे

शिक्षण : ९वी वय : ७७

प्र. १ : श्रवणाला कधीपासून जाताय?

उत्तर : श्रवणाला १९९२ सालापासून जायला सुरुवात केली.

प्र. २ : श्रवणाला जाण्यास कां सुरुवात केली?

उत्तर : १९९० साली माझ्या पतीचे आकस्मिक निधन झाले. त्यांच्या अचानक निधनामुळे माझी मनःस्थिती खूपच बिघडली व सर्व जबाबदारी एकटीवर आली व इतर अडचणी आल्या. माझ्या बहिणीच्या सांगण्यावरून मी श्रवणाला जाण्यास सुरुवात केली.

प्र. ३ : कुटुंबात अशिक्षित माणसं किती?

उत्तर : कुटुंबात अशिक्षित कोणीही नाही. माझे शिक्षण ९वीपर्यंत झाले आहे.

प्र. ४ : आपले विभक्त की एकत्रित कुटुंब?

उत्तर : विभक्त कुटुंब.

प्र. ५ : श्रवणाला जायला लागल्यामुळे मानसिकता कशी बदलली? म्हणजे आचाराविचारांमध्ये बदल कसा झाला?

उत्तर : श्रवणास जाण्यापूर्वी मी प्रत्येक गोष्टीची चिंता करीत असे. रात्री झोप लागत नसे. श्रवणामुळे प्रत्येक गोष्टीकडे सकारात्मक दृष्टिकोनातून बघण्याची सवय लागली.

कुठल्याही गोष्टीची चिंता न करता घडलेली गोष्ट, मग ती चांगली असो अथवा वाईट, ती आपल्या प्रारब्धाप्रमाणे घडलेली आहे हे लक्षात आले. त्या प्रसंगात सामर्थ्यात उभं राहण्याची ताकद मला श्रवणाला बसल्यामुळे मिळाली.

प्र. ६ : कुटुंबातील समस्यांवर कोणते प्रबोधनपर मार्गदर्शन नानासाहेब धर्माधिकारी यांच्या उपदेशात मिळाले. त्याचा समस्या सुटण्यासाठी उपयोग झाला काय?

उत्तर : माझ्याबरोबर माझी मुलगी व तिची दोन मुले राहतात. मुलीच्या पतीचे जेव्हा निधन झाले तेव्हा तिची दोन्ही मुले लहान होती. त्यांचे शिक्षण व इतर सर्व जबाबदाऱ्या सांभाळण्याचे सामर्थ्य मला डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या बैठकीतल्या श्रवणातून मिळाले. मुलगा आणि मुलगी दोघेही श्रवणास जातात त्यामुळे त्यांना परिस्थितीची जाणीव होती की, आपल्या घरात पुरुषमाणूस कोणी नाही. आजी आणि आईला त्रास देऊ नये हे त्यांना कळले. त्यांनी सांगितलेली गोष्ट ऐकावी. हट्ट करू नये. शिक्षणामुळे जीवनात काय मान असतो. त्यामुळे शिक्षणाच्या बाबतीत त्यांना काही अडचणी आल्या नाहीत.



मुलाखत क्रमांक : २

सौ. उषा सुनिल पाटील

वय : ५० शिक्षण : बी.एस्सी.

गाव : कळाबुसरे, जिल्हा : रायगड

प्र. १ : श्रवणाला कधीपासून जाताय?

उत्तर : श्रवणाला १० जानेवारी १९९९ पासून येत आहे.

प्र. २ : श्रवणाला जाण्यास कां सुरुवात केली?

उत्तर : माझ्या लग्नाला दहा वर्षे झाली तरी मला मूल नव्हते. हे बाजूच्या बिल्डिंगमधील आजींना (कै. आक्का ओवळेकर) माहीत होते म्हणून त्यांनी मला श्रीमती पाटील–ज्या माझ्या मावस सासू आहेत–त्यांच्याकडे श्रवणाला जाण्यास सांगितले.

प्र. ३ : श्रवणाच्या वेळचे काही विशिष्ट अनुभव सांगा.

उत्तर : एका शनिवारी श्रवणाच्या दिवशी पोटात दुखत होते व ताप होता. पण मी ठरवले की, मला आजचे श्रवण मिळाले पाहिजे, मी जाणारच असे ठरवून माझी पोटदुखी मी विसरूनच गेले. मी श्रवणाला आले आणि मलाच कळले नाही की माझ्या पोटात दुखत होते ते!

प्र. ४ : डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या विचारांमुळे सामाजिक प्रबोधन घडून येते का? येत असल्यास कसे?

उत्तर : प्रबोधन घडून येते. प्रबोधनामुळे लोकांमध्ये हळूहळू सद्‌भावना, चांगले विचार, एकमेकांमधील प्रेम, आपल्यापेक्षा वयाने मोठे असलेल्यांबद्दल आदर वाटणे या भावना रुजल्या.

प्र. ५ : कुटुंबातील समस्यांवर कोणते प्रबोधनपर मार्गदर्शन नानासाहेब धर्माधिकारी यांच्या उपदेशात मिळाले. त्याचा समस्या सुटण्यासाठी उपयोग झाला काय?

उत्तर : असलेल्या परिस्थितीवर मनाच्या सामर्थ्याने मात करण्याची शक्ती मिळाली.

प्र. ६ : श्रवणाला जायला लागल्यामुळे मानसिकता कशी बदलली? म्हणजे आचाराविचारांमध्ये कसा बदल झाला?

उत्तर : श्रवणाला जायला लागल्यानंतर जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला. होकारार्थी जीवन जगण्याचे सामर्थ्य मिळाले.

प्र. ७ : श्रवणामुळे विकास वैयक्तिक की सामूहिकही असतो?

उत्तर : श्रवणामुळे होणारा विकास वैयक्तिक व सामूहिक असा दोन्ही प्रकारचा आहे.



मुलाखत क्रमांक : ३

श्री. जनार्दन महादेव पाटील

वय : ६४

शिक्षण : पदव्युत्तर (मुंबई विद्यापीठ १९७७), (एच्.आर.)

गाव : सांबरी, अलिबाग, रायगड.

प्र. १ : श्रवणाला कधीपासून जाताय?

उत्तर : श्रवणाला जून २००४ सालापासून जाण्यास सुरुवात केली.

प्र. २ : श्रवणाला जाण्यास कां सुरुवात केली?

उत्तर : एच्.आर. व्यवसायात जवळ जवळ ३० वर्षे काम करीत. नऊ भारतीय व दोन इंटरनॅशनल कंपन्यांत काम केले. काम करीत असताना अनुभवाने व कार्यशैलीमुळे उच्चपदावर पोहोचलो. ठाण्यात नोसील कंपनीत काम करीत असताना ती कंपनी बंद झाली. त्यानंतर एका जवळच्या मित्राच्या सल्ल्याप्रमाणे कन्स्ट्रक्शनच्या धंद्यात सामील झालो. ह्या धंद्याचा कोणताही अनुभव नव्हता. पार्टनरशिपमध्ये काम करीत २/३ वर्षांनंतर अत्यंत वाईट व माणुसकीविरोधी अनुभव यायला लागले. अप्रामाणिकपणा व फसवेगिरीच्या जाळ्यात अडकलो असताना पार्टनरशिप सोडून पुन्हा नोकरी करण्याचा निश्चय केला. अशावेळी सद्गुरू आप्पास्वारींची रेवदंडामध्ये भेट घेतली व सर्व समस्यांचे कथन केले. त्याचप्रमाणे माझी पत्नी श्रवणाला जात असे. माझ्या सासूच्या घरी श्रवणाची बैठक होत असे. त्यातून श्रवणाचे महत्त्व कळते व सद्गुरू आप्पास्वारींनी श्रवणास जाण्याचा सल्ला दिला व तेव्हापासून श्रवणास जाण्यास सुरुवात झाली.

प्र. ३ : श्रवणाच्या वेळचे काही विशिष्ट अनुभव सांगा.

उत्तर : श्रवणाला सुरुवात झाल्यानंतर असे बरेचसे अनुभव आले की, त्यातून माझ्या श्रवणाची वेळ, दिवस व माझ्या व्यवसायातील काम ह्यांचा ताळमेळ जमताना श्रवणाकडे जाण्याचे भाग्य मिळाले. श्रवणाचा दिवस व वेळ असताना एखाद्या कामगारांच्या युनियनबरोबर कामगारांच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मीटिंग ठरविण्याचा विचार कंपनीने केला असता, मी मात्र श्रवणाचा दिवस व वेळ बुडू नये म्हणून मीटिंग रद्द केली. सद्गुरू अप्पास्वारींनी नवीन नोकरीच्या निश्चयाचे निवेदन ठेवल्यानंतर (ऑगस्ट २००४) निवेदनाची पूर्तता होईल अशी आज्ञा झाली आणि जानेवारी २००५पासून जनरल मॅनेजरच्या पदावर रुजू झालो.

प्र. ४ : डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या विचारांमुळे सामाजिक प्रबोधन घडून येते का? येत असल्यास कसे?

उत्तर : डॉ. नानासाहेब धर्माधिकारी व आप्पास्वारी ह्यांच्या विचारातून नक्कीच सामाजिक प्रबोधन होते. समाजात अंधश्रद्धा अज्ञान व विविध समस्यांनी गाजलेले लोक असतात. देवाची ओळख मनुष्याला झालेली नसते. ती देवाची ओळख श्रवणाद्वारे होते. अशिक्षित लोक अंधश्रद्धेचे बळी असतात. अज्ञानामुळे अशा लोकांचा वापर केला जातो. फसवणूक केली जाते. ढोंगी बाबा किंवा भगत/भगतीण त्यांच्या विचारांना बळी पडतात व कर्जबाजारी होतात. तर दुष्ट प्रवृत्तींपासून दूर राहण्यासाठी ह्या श्रवणातून मांडलेल्या विचारातून, बोधातून सामाजिक प्रबोधन होते.

प्र. ५ : कुटुंबातील समस्यांवर कोणते प्रबोधनपर मार्गदर्शन नानासाहेब धर्माधिकारी यांच्या उपदेशात मिळाले. त्याचा समस्या सुटण्यासाठी उपयोग झाला काय?

उत्तर : पुरुषप्रधान कौटुंबिक व्यवस्थेत कुटुंबप्रमुख म्हटला म्हणजे 'मी सर्व करतो' हा अभिमान, गर्व होत असतो. परंतु कर्ता कोण, ह्याची जाणीव श्रवणातून झाल्यानंतर कुटुंबाच्या पलीकडे, मुलांकडे व समाजाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलतो. नोकरी करून घरी आल्यानंतर कामात झालेले वादविवाद, अपमानाचे प्रसंग, मोठ्या बॉसने दिलेला ओरडा, ह्या गोष्टी घरी घेऊन आल्यानंतर त्यांचा परिणाम कुटुंबाच्या सदस्यांवर

होतो. परंतु श्रवण केल्यानंतर व्यक्तीने हा क्रोध घरात न दर्शवता तो कसा नियंत्रित ठेवावा व तसे न केल्यास घरातील वातावरण कसे दूषित होते ह्याची जाणीव श्रवणातून केली जाते. त्यामुळे ती व्यक्ती अशा कृत्यापासून लांब राहते.

प्र. ६ : श्रवणाला जायला लागल्यामुळे मानसिकता कशी बदलली? म्हणजे आचारा–विचारांमध्ये कसा बदल झाला?

उत्तर : श्रवणातून माझ्या जीवनात नक्कीच बदल झाला आहे. सद्‌भावना, सद्‌विचार, उपासना इत्यादी मुळे मनाची शांतता व समाधान लाभले. कामक्रोधादी सहा विकारांपासून दूर कसे राहावयाचे व त्यांना मनाचा ताबा घेऊ द्यायचा नाही हा बोध झाला.

प्र. ७ : श्रवणामुळे होणारा विकास वैयक्तिक की सामूहिकही असतो?

उत्तर : श्रवणामुळे होणारा विकास हा नक्कीच वैयक्तिक असतो, परंतु तो सामूहिकही असतो. आपला विकास झाला तर आपल्याबरोबर कुटुंबाचा, कुटुंबातील सदस्यांचा विकास होतो. कुटुंबाबरोबर, समाजातील आपले नातेवाईक व इतर जणांचाही विकास होतो.



मुलाखत क्रमांक : ४

सौ. भारती उमेश बिडवे

वय : ३९ शिक्षण : ४ थी, अलिबाग

प्र. १ : श्रवणाला कधीपासून जाताय?

उत्तर : श्रवणाला २००४ सालापासून येत आहे.

प्र. २ : श्रवणाला जाण्यास कां सुरुवात केली?

उत्तर : माझे पती आधीपासूनच श्रवणाला जात होते. त्यामुळे नंतर मीही जाऊ लागले.

प्र. ३ : कुटुंबात अशिक्षित माणसं किती?

उत्तर : कुटुंबात अशिक्षित कोणी नाही. मी ४थी पर्यंत शिकले.

प्र. ४ : आपले विभक्त की एकत्रित कुटुंब?

उत्तर : विभक्त कुटुंब.

प्र. ५ : श्रवणाला जायला लागल्यामुळे मानसिकता कशी बदलली? म्हणजे आचाराविचारांमध्ये कसा बदल झाला?

उत्तर : श्रवणाला जायला लागल्यामुळे मानसिक स्थैर्य मिळाले. विचार करण्याची पद्धत बदलली.

प्र. ६ : कुटुंबातील समस्यांवर कोणते प्रबोधनपर मार्गदर्शन डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या बैठकीत मिळाले?

उत्तर : पतीचा स्वभाव खूपच रागीट होता. ते श्रवणाला जाऊ लागले आणि केवळ श्रवणामुळे त्यांच्या स्वभावात खूपच फरक झाला, त्यामुळे घरात शांतीचे वातावरण झाले.

प्र. ७ : त्याचा समस्या सोडविण्यास उपयोग झाला का?

उत्तर : होय. श्रवणामुळे पतीचा स्वभाव शांत झाला आणि त्यामुळेच येणाऱ्या समस्या सोडवणे शक्य झाले.



मुलाखत क्रमांक : ५

श्री. नितीन वि. नागले

वय : ६०

सेवानिवृत्त मॅनेजर (रेमंड लिमिटेड)

मुरुड–जंजिरा, रायगड– जिल्हा

प्र. १ : श्रवणाला कधीपासून जाताय?

उत्तर : श्रवणाला १९९६ सालापासून जायला सुरुवात केली.

प्र. २ : श्रवणाला जाण्यास कां सुरुवात केली?

उत्तर : १९९५–९६ साली रेमंड इंडिया लिमिटेड, मध्ये संप चालू झाला. कंपनीमध्ये नोकरी करत असताना साइड–बाय साइड लेबर–कॉन्ट्रॅक्टचा व्यवसाय होता. त्यामुळे, कामगार आणि युनियन, यांच्या मधल्या वादविवादावरून, नेहमी युनियनच्या बाजूने विचार मांडण्याच्या धमक्या यायच्या. रात्री–बेरात्री कधीपण घरापर्यंत येऊन धमकावले जायचे, ऑफिसमध्येही त्रास व्हायचा, त्यामुळे कौटुंबिक व मानसिक स्वास्थ्य बिघडलेले होते.

पत्नी अगोदरपासूनच श्रवणाला जायची, तिने मलाही श्रवणाला एकदा येऊन पाहा अशी विनवणी केली, तेव्हा संकटसमयी मनुष्य उत्तमांचा मार्ग शोधण्याचा प्रयत्न करतो, त्यामुळेच मी श्रवणाला जायला लागलो.

प्र. ३ : श्रणाच्या वेळेचे काही विशिष्ट अनुभव सांगा.

उत्तर : श्रवणाला आल्यापासून माझ्या मनामध्ये काही बाबतीत अंधश्रद्धा आणि कर्मकांड ह्यावर विश्वास होता. तो माझा गैरसमज दूर झाला. माणूस घडताना आचार आणि त्याचे विचार उत्तमच हवेत, ही डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांची शिकवण किती मोलाची आहे. त्याचबरोबर श्रवणातून कुटुंब, समाज आणि देश यांच्याशी असलेली आपली

बांधीलकी; त्यासाठी आपण प्रत्येकाने काय करणे गरजेचे आहे, याचे त्यांच्या निरूपणातून उत्तमाचे मार्गदर्शन झाले आणि नतमस्तक झालो.

प्र. ४ : डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या विचारांमुळे सामाजिक प्रबोधन घडून येते का? कसे?

उत्तर : नक्कीच, डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या विचारांमुळे सामाजिक प्रबोधन घडून येतेच. आजच्या कलियुगातील, २१ व्या शतकातील मानवाला, विकास ह्या शब्दाची व्याख्याच उमगली नाही. विकास म्हणजे आर्थिक स्थैर्य आणि दळणवळणाची साधने नव्हे, ज्या गोष्टींतून समाजामध्ये समता, सभ्यता, सहिष्णुता, सामंजस्य आणि समाधान देऊ शकतो, त्याला म्हणतात विकास. ह्याचेच दर्शन डॉ. नानासाहेब धर्माधिकारी ह्यांच्या विचारातून घडते.

प्र. ५ : कुटुंबातील समस्यांवर कोणते प्रबोधनपर मार्गदर्शन डॉ. नानासाहेबांच्या बैठकीत मिळाले?

उत्तर : कुटुंब म्हटलं की अनेक समस्या येतातच, कुठेही भावनेच्या आहारी न जाता, सद्सद्विवेक–बुद्धीतून निर्णय घेण्याची क्षमता श्रवणामुळे येते.

प्र. ६ : श्रवणाला जायला लागल्यामुळे मानसिकता कशी बदलली? म्हणजे आचाराविचारांमध्ये कसा बदल झाला?

उत्तर : श्रवणातून जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला. मनुष्याची धारणा, कुठल्याही चांगल्या–वाईट प्रसंगामध्ये नकारात्मकच असले. डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या विचारातून, शिकवणीतून, आत्मविश्वास, प्रामाणिक प्रयत्न, सकारात्मक दृष्टिकोन असेल, तर जीवन समृद्ध होऊ शकते, हा दृष्टिकोन मिळाला.

प्र. ७ : श्रवणामुळे होणारा विकास वैयक्तिक की सामूहिक?

उत्तर : श्रवणातून होणारा विकास वैयक्तिक आधी असतो, मग सामूहिक होतेच. डॉ. नानासाहेब धर्माधिकारी व्यक्ती, कुटुंब आणि समाज मग देश, ह्या जडण–घडणीमध्ये वैयक्तिक, आचार–विचारामध्ये बदल झाला तरच सामूहिक घडू शकतो.



मुलाखत क्रमांक : ६

श्री. धनंजय शरद तपस्वी

वय : ४६

व्यवसाय : कन्स्ट्रक्शन (बांधकाम व्यावसायिक)

प्र. १ : केव्हापासून श्रवणाला जायला सुरुवात केली?

उत्तर : मी १९९७ सालापासून श्रवणाला जायला सुरुवात केली.

प्र. २ : बैठकीला जाण्यास सुरुवात करण्याचे काय काय?

उत्तर : व्यवसायातील भागीदार आधीपासून बैठकीत जात होते. त्यांच्यातील वागणुकीतील बदलामुळे मलाही जावेसे वाटले.

प्र. ३ : श्रवणाच्या वेळचे काही विशिष्ट अनुभव सांगा.

उत्तर : दिवसभरातील आलेल्या प्रश्नांचे (समस्यांचे) व त्यापोटी उद्‌भवणाऱ्या काळजीचे निरसन होते.

प्र. ४ : डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या विचारामुळे सामाजिक प्रबोधन घडून येते का? कसे?

उत्तर : नक्कीच घडून येते. निर्विवाद. डॉ. नानासाहेबांचे समाजप्रबोधनाचे कार्य गेली ७ दशके निःस्वार्थीपणे चालू आहे व ज्यांनी याचा लाभ घेतला असे सगळे श्रीसदस्य अत्यंत समाधानाने आपले आयुष्य व्यतीत करत आहेत.

प्र. ५ : कुटुंबातील समस्यांवर कोणते प्रबोधनपर मार्गदर्शन डॉ. नानासाहेबांच्या बैठकीत मिळाले?

उत्तर : श्रवणाच्या माध्यमातून घरातील प्रत्येक व्यक्ती एक विचाराप्रत आल्याने समस्यांची तीव्रता, समस्यांचा बागुलबुवा कमी झाला.

प्र. ६ : श्रवणाला जायला लागल्यानंतर जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला का? कसा?

उत्तर : हो, नक्कीच. स्वतःचा मोठेपणा मिरवण्याचा हव्यास कमी झाला. सामाजिक बांधीलकीचे महत्त्व समजून मी 'मला'च्या जागी 'आपण' 'आपल्याला' असे शब्द आले. 'मला काय मिळेल, काय मिळाले'च्या जागी मी काय केले पाहिजे, माझ्या काय जबाबदाऱ्या आहेत याचे भान आले.

प्र. ७ : श्रवणामुळे होणारा विकास वैयक्तिक की सामूहिक असतो?

उत्तर : आधी वैयक्तिक. श्रवण हे ज्याचे त्याने करायचे आणि व्यक्तीमध्ये बदल घडला की, आपोआपच जे त्या विचारांमध्ये उभे राहतात, त्या संपूर्ण समुदायामध्ये बदल घडतो.



मुलाखत क्रमांक : ७

श्री. मारुती हरिश्चंद्र काते

वय : ६०

व्यवसाय : सेवानिवृत्त, जिल्हा ठाणे

प्र. १ : केव्हापासून श्रवणाला जायला सुरुवात केली?

उत्तर : मी १९९३ सालापासून श्रवणाला जायला सुरुवात केली.

प्र. २ : बैठकीला जाण्यास सुरुवात करण्याचे कारण काय?

उत्तर : आधी पत्नी श्रवणास गेली. तिच्यामुळेच मी स्वतःही श्रवणास जायला सुरुवात केली.

प्र. ३ : श्रवणाच्या वेळचे काही विशिष्ट अनुभव सांगा?

उत्तर : दैनंदिन आयुष्यातील न सुटणाऱ्या प्रश्नांची उकल झाली त्यामुळे समाधान प्राप्त झाले?

प्र. ४ : डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या विचारांमुळे सामाजिक प्रबोधन घडून येते का? कसे?

उत्तर : होय. नक्कीच बदल घडून येतो. अनुभवावरून सांगतो. डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांचे जे कार्य आजतागायत चालू आहे. त्यांनी दिलेल्या पारमार्थिक विचारांमुळे अज्ञान दूर झाले व प्रगती झाली.

प्र. ५ : कुटुंबातील समस्यांवर कोणते प्रबोधनपर मार्गदर्शन डॉ. नानासाहेबांच्या बैठकीत मिळाले?

उत्तर : डॉ. नानासाहेबांच्या शिकवणीमुळे कुटुंबामध्ये सलोख्याचे व शांततेचे वातावरण निर्माण झाले.

प्र. ६ : श्रवणाला जायला लागल्यानंतर जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला का? कसा?

उत्तर : होय, समाजाच्या प्रति जबाबदारीची जाणीव झाली व सामाजिक बांधीलकी जोपासण्याकरिता प्रयत्नशील झालो.

प्र. ७ : श्रवणामुळे होणारा विकास वैयक्तिक की सामूहिक असतो?

उत्तर : दोन्ही, सुरुवातीला बदल हा व्यक्तिशः असतो. नंतर तो सामाजिक व सामूहिक स्वरूप धारण करतो.



मुलाखत क्रमांक : ८

श्री. मधुकर रकमा गवारी

वय : ४२

व्यवसाय : नोकरी

गाव : अलिबाग

प्र. १ : केव्हापासून श्रवणाला जायला सुरुवात केली?

उत्तर : मी २०१२ सालापासून श्रवणाला जायला सुरुवात केली.

प्र. २ : बैठकीला जाण्यास सुरुवात करण्याचे कारण काय?

उत्तर : पत्नी प्रथम श्रवणास गेली. तिचा चांगला अनुभव ऐकला. त्यामुळे मी नंतर जाण्यास सुरुवात केली.

प्र. ३ : श्रवणाच्या वेळचे काही विशिष्ट अनुभव सांगा?

उत्तर : समाधान प्राप्त झाले. आधी प्रत्येक गोष्टीत काही ना काही कटकट–त्रास वाटे. पण हळूहळू स्वभावात बदल होत गेला. समाधानी वृत्ती बनत गेली.

प्र. ४ : डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या विचारांमुळे सामाजिक प्रबोधन घडून येते का? कसे?

उत्तर : हो. प्रबोधन घडून येते. समाजातील काही चुकीच्या विचारांत बदल झाला. त्यामुळे अज्ञान व गैरसमज दूर झाले.

प्र. ५ : कुटुंबातील समस्यांवर कोणते प्रबोधनपर मार्गदर्शन नानासाहेबांच्या बैठकीत मिळाले?

उत्तर : कुटुंबात शांतता नांदू लागली.

प्र. ६ : श्रवणाला जायला लागल्यानंतर जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला का? कसा?

उत्तर : होय, सकारात्मक दृष्टिकोन आला. प्रत्येक गोष्टीतून चांगले काय मिळेल याचा विचार करण्याची वृत्ती आली.

प्र. ७ : श्रवणामुळे होणारा विकास वैयक्तिक की सामूहिक असतो?

उत्तर : सामूहिकसुद्धा. फक्त आपलाच नव्हे.



मुलाखत क्रमांक : ९

श्रीमती हिराबाई शंकर जाधव

वय : ५७

गाव : चंदनवाडी, ठाणे

प्र. १ : केव्हापासून श्रवणाला जायला सुरुवात केली?

उत्तर : मी १९९९ सालापासून श्रवणाला जायला सुरुवात केली. आता नियमितपणे जाते.

प्र. २ : श्रवणाला जाण्यास सुरुवात कां केली?

उत्तर : श्रवणाला माझे पती व मुले प्रथम गेली. त्यानंतर त्यांच्यामधला वागण्याचा फरक बघून मी पण जायला सुरुवात केली.

प्र. ३ : कुटुंबात अशिक्षित माणसे किती?

उत्तर : नाही. कुणीच नाही. मी पण चौथीपर्यंत शिकले आहे.

प्र. ४ : आपले विभक्त की एकत्रित कुटुंब आहे?

उत्तर : आमचे एकत्रित कुटुंब आहे.

प्र. ५ : श्रवणाला जायला लागल्यामुळे मानसिकता बदलली का? म्हणजे आचारविचारांमध्ये बदल झाला का?

उत्तर : होय. समाधानी वृत्ती आली. पूर्वी वाद होत. आता त्याचे प्रमाण हळूहळू कमी झाले आहे.

प्र. ६ : कुटुंबातील समस्यांवर कोणकोणते प्रबोधनपर मार्गदर्शन डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या उपदेशातून मिळाले?

उत्तर : डॉ. नानासाहेबांच्या उपदेशातून माझ्या स्वतःच्या स्वभावात भरपूर बदल झाला. समंजसपणा आला. माझ्यातही. माझ्या पती व मुलांच्या वागणुकीतही फरक झाला.

प्र. ७ : त्याचा समस्या सोडविण्याकरिता उपयोग झाला का?

उत्तर : होय. कुटुंबातील सर्वजण एकत्र बसून समस्येवर विचार करतो. नानासाहेबांचे विचार आणि मार्गदर्शन यांच्यामुळे समस्या कशा सोडवाव्या ते कळते.



मुलाखत क्रमांक : १०

सौ. गंगाबाई गोविंद पाटील

वय : ६३

गाव : लक्ष्मी–चिरागनगर, ठाणे

प्र. १ : केव्हापासून श्रवणाला जायला सुरुवात केली?

उत्तर : मी २००२ सालापासून श्रवणाला जायला सुरुवात केली. आता दहा–अकरा वर्षे झाली. मी कायम जाते.

प्र. २ : श्रवणाला जाण्यास सुरुवात कां केली?

उत्तर : आधी बाजूवाल्यांनी सांगितल्यामुळे मी श्रवणाला जायला लागले.

प्र. ३ : कुटुंबात अशिक्षित माणसे किती?

उत्तर : मी एकटीच अशिक्षित आहे. बाकीच्यांचे थोडेफार शिक्षण झाले आहे.

प्र. ४ : आपले विभक्त की एकत्रित कुटुंब आहे?

उत्तर : आमचे एकत्रित कुटुंब आहे. कुटुंबात ६–७ माणसे आहेत.

प्र. ५ : श्रवणाला जायला लागल्यामुळे मानसिकता बदलली का? म्हणजे आचारविचारांमध्ये बदल झाला का?

उत्तर : हो. बदलली, माझा चिडखोर स्वभाव होता, तो शांत झाला. त्यामुळे घरातली भांडणे थोडी कमी झाली.

प्र. ६ : कुटुंबातील समस्यांवर कोणकोणते प्रबोधनपर मार्गदर्शन डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या उपदेशातून मिळाले?

उत्तर : घरामध्ये शांतता व जिव्हाळा निर्माण झाला. कारण माझा चिडखोरपणा कमी झाला. त्यामुळे घरातली बाकीची माणसेही आपोआप माझ्याशी मायेने वागू लागली.

प्र. ७ : त्याचा समस्या सोडविण्याकरिता उपयोग झाला का?

उत्तर : होय. मी अशिक्षित. त्यामुळे पूर्वी चिडून बोलायची. आता मी सगळ्यांचे आधी ऐकून घेते आणि मगच माझे म्हणणे सांगते.



मुलाखत क्रमांक : ११

सौ. लक्ष्मी दत्ताराम कुंभार

वय : ६५

गाव : मोखाडा

प्र. १ : केव्हापासून श्रवणाला जायला सुरुवात केली?

उत्तर : मी २००१ सालापासून श्रवणाला जायला सुरुवात केली.

प्र. २ : श्रवणाला जाण्यास सुरुवात कां केली?

उत्तर : माझ्या शेजारचे कुटुंब जायचे श्रवणाला. त्यांचं पाहून.

प्र. ३ : कुटुंबात अशिक्षित माणसे किती?

उत्तर : मी आणि पती आम्ही दोघेही अशिक्षित आहोत.

प्र. ४ : आपले विभक्त की एकत्रित कुटुंब आहे?

उत्तर : आमचे एकत्रित कुटुंब आहे. आमच्या कुटुंबात मुलं, सुना, नातवंडंही आहेत.

प्र. ५ : श्रवणाला जायला लागल्यामुळे मानसिकता बदलली का? म्हणजे आचारविचारांमध्ये बदल झाला का?

उत्तर : होय, विचारात बदल झाला, वृत्ती बदलली. बरेवाईट कळू लागले.

प्र. ६ : कुटुंबातील समस्यांवर कोणकोणते प्रबोधनपर मार्गदर्शन डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या उपदेशातून मिळाले?

उत्तर : डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांनी दिलेल्या उपदेशामुळे कुटुंबामध्ये आधी जी भांडणे होत, ती हळूहळू कमी झाली. सौजन्याचे वातावरण निर्माण झाले.

प्र. ७ : त्याचा समस्या सोडविण्याकरिता उपयोग झाला का?

उत्तर : होय. कारण नेहमी जी भांडणे होत. त्यामुळे घरात शांतता नसे. श्रवणाला गेल्यावर हळूहळू माझ्या स्वभावात बदल होत गेला आणि कुटुंबातल्या समस्या आम्ही सर्वांनी मिळून सोडवण्याचा प्रयत्न करू लागलो.



मुलाखत क्रमांक : १२

सौ. सुनिता महादेव सावंत

वय : ६१

गाव : लक्ष्मी–चिरागनगर, ठाणे.

प्र. १ : केव्हापासून श्रवणाला जायला सुरुवात केली?

उत्तर : मी २००५ सालापासून श्रवणाला जायला सुरुवात केली.

प्र. २ : श्रवणाला जाण्यास सुरुवात कां केली?

उत्तर : माझ्या शेजारी राहणाऱ्या बाई जायच्या, त्यांनी मला बैठकीबद्दल सांगितले म्हणून मी पण श्रवणाला जायला लागले.

प्र. ३ : कुटुंबात अशिक्षित माणसे किती?

उत्तर : आम्ही दोघेही अशिक्षित आहोत.

प्र. ४ : आपले विभक्त की एकत्रित कुटुंब आहे?

उत्तर : एकत्रित कुटुंब आहे.

प्र. ५ : श्रवणाला जायला लागल्यामुळे मानसिकता बदलली का? म्हणजे आचारविचारांमध्ये बदल झाला का?

उत्तर : कुटुंबामध्ये एकीची भावना निर्माण झाली.

प्र. ६ : कुटुंबातील समस्यांवर कोणकोणते प्रबोधनपर मार्गदर्शन डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या उपदेशातून मिळाले?

उत्तर : रागावर नियंत्रण, अडचणींना सामोरे जाण्याची ताकद आणि समाधानी वृत्ती हे मार्गदर्शन डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या उपदेशातून मिळाले.

प्र. ७ : त्याचा समस्या सोडविण्याकरिता उपयोग झाला का?

उत्तर : हो. नक्कीच.



मुलाखत क्रमांक : १३

सौ. पार्वतीबाई बाळू धराडे

वय : ७५

गाव : ठाणे

प्र. १ : केव्हापासून श्रवणाला जायला सुरुवात केली?

उत्तर : मी १९९९ सालापासून श्रवणाला जायला सुरुवात केली. आता दहा–अकरा वर्षे झाली. मी कायम जाते.

प्र. २ : श्रवणाला जाण्यास सुरुवात कां केली?

उत्तर : मुलगा श्रवणाला जायला लागला त्याने मला सांगितले म्हणून मी पण श्रवणाला जायला लागले.

प्र. ३ : कुटुंबात अशिक्षित माणसे किती?

उत्तर : फक्त मी सोडून बाकी सर्व शिकलेले आहेत.

प्र. ४ : आपले विभक्त की एकत्रित कुटुंब आहे?

उत्तर : आमचे एकत्रित कुटुंब आहे. मुलगा, सून, नातवंडं, मी असे आम्ही सगळे एकत्र राहतो.

प्र. ५ : श्रवणाला जायला लागल्यामुळे मानसिकता बदलली का? म्हणजे आचारविचारांमध्ये बदल झाला का?

उत्तर : माझा स्वभाव खूप चिडखोर होता. पटकन राग यायचा, पण श्रवणाला जायला लागल्यामुळे आता मी खूप शांत झाले व मन तृप्त झाले.

प्र. ६ : कुटुंबातील समस्यांवर कोणकोणते प्रबोधनपर मार्गदर्शन डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या उपदेशातून मिळाले?

उत्तर : डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी यांच्या उपदेशातून मिळालेल्या मार्गदर्शनातून कुटुंबामध्ये एकोप्याची भावना निर्माण झाली आणि घरात आनंदी वातावरण निर्माण झाले.

प्र. ७ : त्याचा समस्या सोडविण्याकरिता उपयोग झाला का?

उत्तर : समस्या सोडविण्यासाठी उपयोग म्हणजे त्या आपल्यालाच सोडवाव्या लागतात. परंतु त्या परिस्थितीत शांत राहून योग्य निर्णय घेण्याची क्षमता येते.

विवेचन :

डॉ. नानासाहेब धर्माधिकारी ह्यांनी बैठकीद्वारे सुरू केलेल्या समाजप्रबोधनाच्या कार्याची प्रचिती श्रवणाला जाणाऱ्या सदस्यांच्या मुलाखतींद्वारे असे निदर्शनास येते की, श्रवणाला जाणारी प्रत्येक व्यक्ती मग ती सुशिक्षित असो वा अशिक्षित, श्रवणामुळे त्यांचा जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन सकारात्मक होतो आणि समाधानी वृत्ती वाढीस लागते. कुठल्याही संकटाला सामोरे जाण्याकरिता विवेकातून योग्य निर्णय घेण्याची क्षमता वाढते.

५.५ बालसंस्कार केंद्र : सहभागी मुलांच्या प्रातिनिधिक मुलाखती

स्त्रीपुरुषांप्रमाणेच ती. नानासाहेबांनी किशोरवयीन मुलांसाठी बालसंस्कार केंद्रे सुरू केली. दर रविवारी होणाऱ्या या 'बालसंस्कार'साठी उपस्थित राहणाऱ्या किशोरांपैकी काही मुलांच्या प्रातिनिधिक स्वरूपाच्या मुलाखती संशोधिकेला घ्याव्याशा वाटल्या.

डॉ. नानासाहेबांनी समाजप्रबोधनाच्या अनेक वाटा लोकांना दाखवल्या. निरूपण, प्रबोधन, श्रवण इत्यादी मात्र हे सर्व प्रौढ स्त्री–पुरुषांसाठी होते–आहेही. भावी पिढी म्हणून आज जी लहान मुले आहेत. त्यांच्यावर सुद्धा सद्‌वर्तनाचे संस्कार होणे गरजेचे आहे. हे जाणून त्यांनी जी बालसंस्कार केंद्रे सुरू केली, त्याची माहिती प्रकरण ३ मध्ये आलेली आहेच. ती नानासाहेबांचा हा पैलूही लक्षणीय आहे.

दर रविवारी सकाळी ८ ते ९.३० या वेळात हे संस्कार केंद्र, ज्यांच्या घरी बैठका (श्रवण) असतात अशांपैकी काही ठिकाणी भरविण्यात येते. सर्वसाधारपणे पहिली ते आठवी इयत्तेपर्यंतची मुलं यात सहभागी केली जातात.

बालभक्तीला जाणाऱ्या काही मुलांच्या प्रातिनिधिक स्वरूपाच्या मुलाखती देत आहे.

बालसंस्कार केंद्र : सहभागी मुलांच्या प्रातिनिधिक मुलाखतींसाठी प्रश्नावली

१. बालसंस्कार केंद्रामध्ये कधीपासून येता?

२. दर रविवारी येता का?

३. यासाठी दर रविवारी सकाळी येण्याचा कंटाळा येतो का? की यायला आवडतं?

४. बालभक्ती–मार्गदर्शन पुस्तिका वाचताना (म्हणताना) काय वाटतं? बोधपर गोष्टीतून काय मिळतं?

५. या वर्गामुळे काय फायदा झाला?

६. अभ्यासात एकाग्रता वाढली का?

७. स्मरणशक्तीत वाढ झाली असं वाटतं का?

८. या वर्गाला आपल्या मित्र–मैत्रिणींना आणावंसं वाटतं का? आणता का?

९. यामुळे आपल्यात काय बदल झाला?

अ) आईवडिलांचा आदर करणे.

ब) शिक्षकांचा आदर करणे.

क) देशभक्तीची भावना.

मुलाखत क्रमांक : १



नाव : साईली कुलदीप बनप

गाव : रत्नागिरी

इयत्ता : आठवी

प्र. १ : बालसंस्कार केंद्रामध्ये कधीपासून येता?

उत्तर : मला बालभक्तीला यायला लागून पाच वर्ष झाली.

प्र. २ : दर रविवारी येता का?

उत्तर : दर रविवारी येते.

प्र. ३ : यासाठी दर रविवारी सकाळी येण्याचा कंटाळा येतो का? की यायला आवडतं?

उत्तर : मला बालभक्तीला यायला आवडतं, पण कंटाळा येतो. कारण सकाळी लवकर उठायला लागते.

प्र. ४ : बालभक्ती–मार्गदर्शन पुस्तिका वाचताना (म्हणताना) काय वाटतं? बोधपर गोष्टीतून काय मिळतं?

उत्तर : मला हे पुस्तक वाचताना प्रसन्न वाटते. बोधपर गोष्टीतून कधी कधी आपल्या चुका कळतात.

प्र. ५ : या वर्गामुळे काय फायदा झाला?

उत्तर : बालभक्तीमुळे माझ्यावर चांगले संस्कार झाले.

प्र. ६ : अभ्यासात एकाग्रता वाढली का?

उत्तर : माझ्या अभ्यासात एकाग्रता वाढली आहे.

प्र. ७ : स्मरणशक्तीत वाढ झाली असं वाटतं का?

उत्तर : माझ्या स्मरणशक्तीत खूप वाढ झाली आहे.

प्र. ८ : या वर्गाला आपल्या मित्र–मैत्रिणींना आणावंसं वाटतं का? आणता का?

उत्तर : मला आणावंसं वाटतं, एकदा मी मैत्रिणीला आणले होते. पण ती आता येत नाही.

प्र. ९ : यामुळे आपल्यात काय बदल झाला?

उत्तर : मी या बालभक्तीत गेले पाच वर्षं आहे आणि मी या बालभक्तीत आई–वडिलांचा आदर करायचा हे शिकले.

मुलाखत क्रमांक : २



नाव : सर्वेश राजेश मलबारी

गाव : पेण

इयत्ता : सातवी

प्र. १ : बालसंस्कार केंद्रामध्ये कधीपासून येता?

उत्तर : मला बालभक्तीला येऊन ७ वर्षं झाली.

प्र. २ : दर रविवारी येता का?

उत्तर : मी दर रविवारी येतो.

प्र. ३ : यासाठी दर रविवारी सकाळी येण्याचा कंटाळा येतो का? की यायला आवडतं?

उत्तर : मला दर रविवारी येण्याचा कंटाळा येत नाही. कारण इथे खूप चांगलं शिकवतात.

प्र. ४ : बालभक्ती–मार्गदर्शन पुस्तिका वाचताना (म्हणताना) काय वाटतं? बोधपर गोष्टीतून काय मिळतं?

उत्तर : मला हे पुस्तक वाचताना आनंद होतो. ज्या बोधपर गोष्टी सांगतात, त्यातून बाहेर कसं वागायचं हे कळतं.

प्र. ५ : या वर्गामुळे काय फायदा झाला?

उत्तर : यामुळे माझा फायदा झाला की, मी खूप चांगला वागायला लागलो.

प्र. ६ : अभ्यासात एकाग्रता वाढली का?

उत्तर : हो, अभ्यासात एकाग्रता वाढली.

प्र. ७ : स्मरणशक्तीत वाढ झाली असं वाटतं का?

उत्तर : स्मरणशक्तीत वाढ झाली आहे.

प्र. ८ : या वर्गाला आपल्या मित्र–मैत्रिणींना आणावंसं वाटतं का? आणता का?

उत्तर : यासाठी मला मित्रांना आणावे वाटते. माझा एक मित्र बरोबर येतो.

प्र. ९ : यामुळे आपल्यात काय बदल झाला?

उत्तर : हो. आईवडिलांचा आदर करतो. हो. शिक्षकांचा आदर करायला शिकलो.

मुलाखत क्रमांक : ३



नाव : कुमारी कल्याणी विष्णू सातपुते

गाव : टेभोंली (वाडा)

इयत्ता : आठवी

प्र. १ : बालसंस्कार केंद्रामध्ये कधीपासून येता?

उत्तर : मला बैठकीला येऊन चार वर्षे झाली.

प्र. २ : दर रविवारी येता का?

उत्तर : मी दर रविवारी बालसंस्कार बैठकीला येते.

प्र. ३ : यासाठी दर रविवारी सकाळी येण्याचा कंटाळा येतो का? की यायला आवडतं?

उत्तर : दर रविवारी मला बैठकीला यायला आवडते. स्वतःहून आवडते. कारण तेथे चांगलं सांगितलं जातं.

प्र. ४ : बालभक्ती–मार्गदर्शन पुस्तिका वाचताना (म्हणताना) काय वाटतं? बोधपर गोष्टीतून काय मिळतं?

उत्तर : हे पुस्तक वाचताना मला चांगले वाटते. जी बोधपर गोष्ट सांगितली जाते, ती आपल्याचकरता आहे असे वाटते.

प्र. ५ : या वर्गामुळे काय फायदा झाला?

उत्तर : यामुळे मला चांगली शिकवण मिळाली.

प्र. ६ : अभ्यासात एकाग्रता वाढली का?

उत्तर : अभ्यासात माझी एकाग्रता वाढली.

प्र. ७ : स्मरणशक्तीत वाढ झाली असं वाटतं का?

उत्तर : हो. माझ्या स्मरणशक्तीत वाढ झाली, असे मला वाटते.

प्र. ८ : या वर्गाला आपल्या मित्र–मैत्रिणींना आणावंसं वाटतं का? आणता का?

उत्तर : मला माझ्या मित्र व मैत्रिणीला आणावेसे वाटते. मात्र अजून आणले नाही.

प्र. ९ : यामुळे आपल्यात काय बदल झाला?

उत्तर : अ) आई व वडिलांची आज्ञा पाळायला शिकले.

ब) मी शिक्षकांचा आदर करायला लागले.

मुलाखत क्रमांक : ४



नाव : स्वराज श्रीकांत सावंत

गाव : पवारसाखरी, चिपळूण

इयत्ता : आठवी

प्र. १ : बालसंस्कार केंद्रामध्ये कधीपासून येता?

उत्तर : मला बालसंस्कार केंद्रात येऊ लागल्याला एक वर्ष झालं.

प्र. २ : दर रविवारी येता का?

उत्तर : मी दर रविवारी येतो.

प्र. ३ : यासाठी दर रविवारी सकाळी येण्याचा कंटाळा येतो का? की यायला आवडतं?

उत्तर : मला दर रविवारी येण्यास आवडते, कारण देवाची भक्ती करण्यासाठी आवडते.

प्र. ४ : बालभक्ती–मार्गदर्शन पुस्तिका वाचताना (म्हणताना) काय वाटतं? बोधपर गोष्टीतून काय मिळतं?

उत्तर : प्रसन्न वाटते व चांगले वाटते.

प्र. ५ : या वर्गामुळे काय फायदा झाला?

उत्तर : अभ्यास करायला चांगलं वाटतं व काम करायला प्रसन्न वाटतं. गोष्ट ऐकल्यामुळे कंटाळा येत नाही.

प्र. ६ : अभ्यासात एकाग्रता वाढली का?

उत्तर : एकाग्रता वाढली.

प्र. ७ : स्मरणशक्तीत वाढ झाली असं वाटतं का?

उत्तर : माझ्या स्मरणशक्तीत वाढ झाली.

प्र. ८ : या वर्गाला आपल्या मित्र–मैत्रिणींना आणावंसं वाटतं का? आणता का?

उत्तर : मी मित्राला आणलं होतं पण ते एकच दिवस आले. रविवारी सुट्टी असते म्हणून तो येत नाही.

प्र. ९ : यामुळे आपल्यात काय बदल झाला?

उत्तर : आईवडिलांचा आदर करायला शिकलो. शिक्षकांचा आदर करतो.

मुलाखत क्रमांक : ५



नाव : वेदांत ललकार सावंत

गाव : डोंबिवली, जि. ठाणे

इयत्ता : सातवी (इंग्लिश मीडियम)

प्र. १ : बालसंस्कार केंद्रामध्ये कधीपासून येता?

उत्तर : एक वर्ष झालं.

प्र. २ : दर रविवारी येता का?

उत्तर : हो. नियमित येतो.

प्र. ३ : यासाठी दर रविवारी सकाळी येण्याचा कंटाळा येतो का? की यायला आवडतं?

उत्तर : चांगली शिकवण मिळते व विद्या प्राप्त हाते. येण्याचा कंटाळा येत नाही.

प्र. ४ : बालभक्ती–मार्गदर्शन पुस्तिका वाचताना (म्हणताना) काय वाटतं? बोधपर गोष्टीतून काय मिळतं?

उत्तर : चांगलं वाटतं आणि परत परत वाचावंसं वाटतं.

प्र. ५ : या वर्गामुळे काय फायदा झाला?

उत्तर : परीक्षेच्या वेळी अभ्यास चांगला लक्षात राहतो. चांगला अभ्यास येतो.

प्र. ६ : अभ्यासात एकाग्रता वाढली का?

उत्तर : हो. आली.

प्र. ७ : स्मरणशक्तीत वाढ झाली असं वाटतं का?

उत्तर : हो. झाली.

प्र. ८ : या वर्गाला आपल्या मित्र–मैत्रिणींना आणावंसं वाटतं का? आणता का?

उत्तर : हो. मी आणले त्यांना, आणि आता ते पण नियमित येतात.

प्र. ९ : यामुळे आपल्यात काय बदल झाला?

उत्तर : आई–वडिलांचा आदर करणे.

शिक्षकांचा आदर करणे.

देशभक्ती, हे शिकलो.

मुलाखत क्रमांक : ६



नाव : प्रथमेश प्रमोद देसाई

गाव : पाली, जि. रायगड

इयत्ता : आठवी

प्र. १ : बालसंस्कार केंद्रामध्ये कधीपासून येतो?

उत्तर : मला बालसंस्कार केंद्रात यायला लागून आठ वर्ष झाली.

प्र. २ : दर रविवारी येता का?

उत्तर : दर रविवारी येतो.

प्र. ३ : यासाठी दर रविवारी सकाळी येण्याचा कंटाळा येतो का? की यायला आवडतं?

उत्तर : मला दर रविवारी यायला आवडतं. इथे शिकवण चांगली देतात व गोष्टी ऐकायला आवडतं.

प्र. ४ : बालभक्ती–मार्गदर्शन पुस्तिका वाचताना (म्हणताना) काय वाटतं? बोधपर गोष्टीतून काय मिळतं?

उत्तर : हे पुस्तक वाचताना चांगलं वाटतं. गोष्टीतनं काहीतरी शिकायला मिळतं.

प्र. ५ : या वर्गामुळे काय फायदा झाला?

उत्तर : यामुळे शिकवण चांगली मिळते, हा फायदा झाला.

प्र. ६ : अभ्यासात एकाग्रता वाढली का?

उत्तर : अभ्यासात एकाग्रता वाढली.

प्र. ७ : स्मरणशक्तीत वाढ झाली असं वाटतं का?

उत्तर : हो, स्मरणशक्तीतही थोडी वाढ झाली.

प्र. ८ : या वर्गाला आपल्या मित्र–मैत्रिणींना आणावंसं वाटतं का? आणता का?

उत्तर : वाटतं, पण मित्रांना आणलं नाही.

प्र. ९ : यामुळे आपल्यात काय बदल झाला?

उत्तर : आई–वडिलांचा आदर करणे शिकलो.

मुलाखत क्रमांक : ७

नाव : मेघना हेमकांत सोनवणे

गाव : कल्याण

इयत्ता : ७ वी

प्र. १ : बालसंस्कार केंद्रामध्ये कधीपासून येता?

उत्तर : एक वर्ष झालं.

प्र. २ : दर रविवारी येते का?

उत्तर : हो. दर रविवारी येते. फक्त गावाला गेले की बुडते.

प्र. ३ : यासाठी दर रविवारी सकाळी येण्याचा कंटाळा येतो का? की यायला आवडतं?

उत्तर : नाही. तिथे चांगली शिकवण मिळते. चांगले मित्रमैत्रिणी मिळतात. त्यामुळे कंटाळा येत नाही.

प्र. ४ : बालभक्ती–मार्गदर्शन पुस्तिका वाचताना (म्हणताना) काय वाटतं? बोधपर गोष्टीतून काय मिळतं?

उत्तर : चांगले गुण यायला पाहिजे म्हणून. बोधपर गोष्टीतून आपल्यातले वाईट गुण कळतात.

प्र. ५ : या वर्गामुळे काय फायदा झाला?

उत्तर : एकाग्रता वाढली. इथे दीड तास बसतो. त्यामुळे घरी कमीत–कमी एका जागी बसून दीड तास अभ्यास करण्याची सवय लागली.

प्र. ६ : अभ्यासात एकाग्रता वाढली का?

उत्तर : हो. बऱ्यापैकी.

प्र. ७ : स्मरणशक्तीत वाढ झाली असं वाटतं का?

उत्तर : हो. वाढ झाली.

प्र. ८ : या वर्गाला आपल्या मित्र–मैत्रिणींना आणावंसं वाटतं का? आणता का?

उत्तर : हो. मैत्रिणी येतात ना!

प्र. ९ : यामुळे आपल्यात काय बदल झाला?

उत्तर : हो. आई–वडिलांचा आदर करणे.

हो. शिक्षकांचा आदर करणे,

देशभक्तीची भावना या गोष्टी शिकले.

मुलाखत क्रमांक : ८

नाव : कु. सिद्धेश संतोष कदम

गाव : तळेघर ता. मंडणगड

इयत्ता : आठवी

प्र. १ : बालसंस्कार केंद्रामध्ये कधीपासून येतो?

उत्तर : एक वर्ष झालं.

प्र. २ : दर रविवारी येतो का?

उत्तर : येतो.

प्र. ३ : यासाठी दर रविवारी सकाळी येण्याचा कंटाळा येतो का? की यायला आवडतं?

उत्तर : यायला आवडते. मनाला प्रसन्न वाटते.

प्र. ४ : बालभक्ती–मार्गदर्शन पुस्तिका वाचताना (म्हणताना) काय वाटतं? बोधपर गोष्टीतून काय मिळतं?

उत्तर : चांगली शिकवण मिळते.

प्र. ५ : या वर्गामुळे काय फायदा झाला?

उत्तर : चांगले गुण मिळाले.

प्र. ६ : अभ्यासात एकाग्रता वाढली का?

उत्तर : हां. वाढली.

प्र. ७ : स्मरणशक्तीत वाढ झाली असं वाटतं का?

उत्तर : हो, खूपच फरक पडलाय.

प्र. ८ : या वर्गाला आपल्या मित्र–मैत्रिणींना आणावंसं वाटतं का? आणता का?

उत्तर : हो. मित्र आले होते. पण ते बंद झाले. आता येत नाहीत.

प्र. ९ : यामुळे आपल्यात काय बदल झाला?

उत्तर : आई–वडिलांचा आदर करायला शिकलो.

शिक्षकांचा आदर करणे शिकलो.

देशभक्तीची भावना आली.

मुलाखत क्रमांक : ९

नाव : भक्ती रमेश धराडे

गाव : ठाणे

इयत्ता : आठवी

प्र. १ : बालसंस्कार केंद्रामध्ये कधीपासून येता?

उत्तर : नऊ वर्षे झाली, मी येतेय.

प्र. २ : दर रविवारी येता का?

उत्तर : होय. अगदी नियमितपणे येते.

प्र. ३ : यासाठी दर रविवारी सकाळी येण्याचा कंटाळा येतो का? की यायला आवडतं?

उत्तर : अजिबात नाही, एक प्रकारचा आनंद वाटतो, चांगली शिकवण, उत्तम मार्गदर्शन मिळते.

प्र. ४ : बालभक्ती–मार्गदर्शन पुस्तिका वाचताना (म्हणताना) काय वाटतं? बोधपर गोष्टीतून काय मिळतं?

उत्तर : मनाला चांगल्या प्रकारे शिकवण मिळाल्यामुळे आमच्याकडून चांगली वर्तणूक होते.

प्र. ५ : या वर्गामुळे काय फायदा झाला?

उत्तर : परीक्षेमध्ये पाठांतर केलेला अभ्यास लक्षात राहतो.

प्र. ६ : अभ्यासात एकाग्रता वाढली का?

उत्तर : होय. नक्कीच.

प्र. ७ : स्मरणशक्तीत वाढ झाली असं वाटतं का?

उत्तर : होय. खूप फरक पडला.

प्र. ८ : या वर्गाला आपल्या मित्र–मैत्रिणींना आणावंसं वाटतं का? आणता का?

उत्तर : शाळेतील मैत्रिणींना आणावंसं वाटतं पण त्या येत नाही, त्यांना बोलावले तरी त्या येत नाही.

प्र. ९ : यामुळे आपल्यात काय बदल झाला?

उत्तर : आई–वडिलांचा आदर करायला शिकले.

शिक्षकांचा आदर करायला शिकले.

देशभक्तीची भावना वाढली.

मुलाखत क्रमांक : १०



नाव : कोमल दशरथ पोवार

गाव : अलिबाग

इयत्ता : आठवी

प्र. १ : बालसंस्कार केंद्रामध्ये कधीपासून येता?

उत्तर : मला बालभक्तीला येऊन आठ वर्षे झाली.

प्र. २ : दर रविवारी येता का?

उत्तर : दर रविवारी मी बालभक्तीला येते.

प्र. ३ : यासाठी दर रविवारी सकाळी येण्याचा कंटाळा येतो का? की यायला आवडतं?

उत्तर : दर रविवारी इथे यायला कंटाळा येत नाही. कारण इथे खूप चांगलं वाटतं.

प्र. ४ : बालभक्ती–मार्गदर्शन पुस्तिका वाचताना (म्हणताना) काय वाटते? बोधपर गोष्टीतून काय मिळतं?

उत्तर : हे पुस्तक वाचताना किंवा म्हणताना चांगले वाटे व उत्साह वाटतो. बोधपर गोष्टीतून व्यवहारचातुर्य येतं.

प्र. ५ : या वर्गामुळे काय फायदा झाला?

उत्तर : यामुळे डोक्यात चांगले विचार येतात व चांगले वाटते.

प्र. ६ : अभ्यासात एकाग्रता वाढली का?

उत्तर : अभ्यासात एकाग्रता वाढली.

प्र. ७ : स्मरणशक्तीत वाढ झाली असं वाटतं का?

उत्तर : नाही. स्मरणशक्तीत वाढ झाली नाही. अजूनही मी विसरते. वाचलेलं नीट आठवत नाही.

प्र. ८ : या वर्गाला आपल्या मित्र–मैत्रिणींना आणावंसं वाटतं का? आणता का?

उत्तर : वाटते. पण अजून कुठल्या मैत्रिणीला आणले नाही.

प्र. ९ : यामुळे आपल्यात काय बदल झाला?

उत्तर : आई–वडिलांचा आदर करणे व शिक्षकांचा आदर करणे, हे मी शिकले.

मुलाखत क्रमांक : ११



नाव : श्रेया सुनील साळवी

गाव : रत्नागिरी

इयत्ता : आठवी

प्र. १ : बालसंस्कार केंद्रामध्ये कधीपासून येतो?

उतर : तीन वर्षांपासून येतेय.

प्र. २ : दर रविवारी येता का?

उतर : नेहमी येते.

प्र. ३ : यासाठी दर रविवारी सकाळी येण्याचा कंटाळा येतो का? की यायला आवडतं?

उतर : आवडतं. इथे चांगली शिकवण दिली जाते.

प्र. ४ : बालभक्ती–मार्गदर्शन पुस्तिका वाचताना (म्हणताना) काय वाटतं? बोधपर गोष्टीतून काय मिळतं?

उतर : मनाला चांगलं वाटतं वाचताना. बोधपर गोष्ट जी सांगितली जाते, ती ऐकताना व्यवहारात कसे वागायचे हे कळते.

प्र. ५ : या वर्गामुळे काय फायदा झाला?

उतर : सगळे चांगले गुण अंगी आले.

प्र. ६ : अभ्यासात एकाग्रता वाढली का?

उतर : हो. बऱ्यापैकी एकाग्रता वाढली.

प्र. ७ : स्मरणशक्तीत वाढ झाली असं वाटतं का?

उतर : हो. नक्कीच.

प्र. ८ : या वर्गाला आपल्या मित्र–मैत्रिणींना आणावंसं वाटतं का? आणता का?

उतर : हो. आम्ही सांगतो, पण ते येत नाहीत.

प्र. ९ : यामुळे आपल्यात काय बदल झाला?

उतर : आई–वडिलांचा आदर करायला शिकले.

शिक्षकांचा आदर करायला शिकले.

देशभक्तीची भावना वाढली.

मुलाखत क्रमांक : १२

नाव : हिमांशु दिनेश खांडपेकर

गाव : मुरबाड

इयत्ता : आठवी (इंग्लिश मीडियम)

प्र. १ : बालसंस्कार केंद्रामध्ये कधीपासून येता?

उतर : एक वर्ष झाले.

प्र. २ : दर रविवारी येता का?

उतर : नाही, नियमित येत नाही.

प्र. ३ : यासाठी दर रविवारी सकाळी येण्याचा कंटाळा येतो का? की यायला आवडतं?

उतर : नाही. आवडते. चांगली शिकवण मिळते.

प्र. ४ : बालभक्ती–मार्गदर्शन पुस्तिका वाचताना (म्हणताना) काय वाटतं? बोधपर गोष्टीतून काय मिळतं?

उतर : परत वाचावं असं वाटतं. चांगले श्लोक आणि नामस्मरण असतं म्हणून. जी बोधपर गोष्ट सांगतात, ती मला आवडते.

प्र. ५ : या वर्गामुळे काय फायदा झाला?

उतर : अभ्यास करायला लागलो.

प्र. ६ : अभ्यासात एकाग्रता वाढली का?

उतर : हो. सलग दीड तास बसून अभ्यास करायला लागलो.

प्र. ७ : स्मरणशक्तीत वाढ झाली असं वाटतं का?

उतर : हो. आता वाचलेलं बऱ्यापैकी लक्षात राहतं.

प्र. ८ : या वर्गाला आपल्या मित्र–मैत्रिणींना आणावंसं वाटतं का? आणता का?

उतर : हो, मित्र काही दिवस आला आणि परत बंद झाला. कारण त्याला लवकर उठायला आवडत नाही आणि नववीला गेला म्हणून.

प्र. ९ : यामुळे आपल्यात काय बदल झाला?

उतर : आई–वडिलांचा आदर करणे,

शिक्षकांचा आदर करणे, हे शिकलो.

५.६ प्रश्नावली

नाव :

गाव : तारीख :

१) स्त्री ☐ की पुरुष ☐

२) केव्हापासून श्रवणाला जाता?

अ) १ वर्षापूर्वी ☐ ब) पाच वर्षांपूर्वी ☐

क) पाच वर्षांपेक्षा जास्त ☐

३) श्रवणाला जाण्यास कां सुरुवात केली?

अ) व्यसन लागल्यामुळे ☐ ब) निराशा ☐

क) इतरांच्या सांगण्यावरून ☐ ड) संकटग्रस्त झाल्यामुळे ☐

३) आपले शिक्षण किती झाले आहे?

अ) निरक्षर ☐ ब) पाचवीखाली ☐

क) दहावी पास ☐ ड) दहावी पास नंतर ☐

४) शैक्षणिक अर्हतेचा संबंध श्रवणाशी आहे काय? होय ☐ नाही ☐

५) श्रवणाचे फायदे

अ) निराशेवर मात झाली का – होय ☐ नाही ☐

ब) जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला का – होय ☐ नाही ☐

क) १) परिस्थिती बदलली ☐ २) मन बदलले ☐

ड) संतापावर विजय मिळवला – होय ☐ नाही ☐

इ) नम्रता आली – होय ☐ नाही ☐

६) आपल्याला निरूपणकार होण्याची इच्छा आहे का? होय ☐ नाही ☐

७) सुखाच्या शोधात सगळ्यांत महत्त्व कशाला आहे.

अ) अर्थप्राप्ती ☐ ब) मनःशांती ☐ क) मनोविकास ☐


८) श्रवण कशासाठी?

अ) श्रद्धा ☐ ब) भक्ती ☐ क) इतरांसमवेत ☐


२) केव्हापासून श्रवणाला जाता (रायगड जिल्हा–आदिवासी)

	१ वर्षापूर्वी	५ वर्षांपूर्वी	पाच वर्षांपेक्षा जास्त
स्त्री	३२	१५	५३
पुरुष	३५	१०	५५

२) केव्हापासून श्रवणाला जातात (रायगड जिल्हा–आदिवासी) स्त्री




२) केव्हापासून श्रवणाला जातात (रायगड जिल्हा आदिवासी) पुरुष




निष्कर्ष : रायगड जिल्ह्याच्या आदिवासी विभागातील स्त्रियांचा श्रवणाला जाण्याचा कालावधी पाच वर्षांपेक्षा जास्त – ५३% तर पुरुषांचा ५५% आढळतो.

३) श्रवणाला जाण्यास कां सुरुवात केली? (रायगड जिल्हा–आदिवासी स्त्रिया व पुरुष)

व्यसन लागल्यामुळे		निराशा	इतरांच्या सांगण्यावरून	ग्रस्त झाल्यामुळे
स्त्री	२	१९	२८	५१
पुरुष	१५	९	४१	३५







निष्कर्ष : रायगड जिल्हा आदिवासी विभागातील स्त्रियांमध्ये श्रवणाला जाण्यास सुरुवात करण्याचे कारण ग्रस्त झाल्यामुळे ५१% तर पुरुषांमध्ये इतरांच्या सांगण्यावरून ४१% असे आढळते.

४) आपले शिक्षण किती झाले आहे? (रायगड जिल्हा–आदिवासी स्त्रिया व पुरुष)

निरक्षर		पाचवीच्या खाली	दहावी पास	दहावी पास नंतर
स्त्री	५९	२४	०८	०९
पुरुष	३०	३२	१८	२०







निष्कर्ष : श्रवणाला जाणाऱ्या रायगड जिल्ह्यातील आदिवासी विभागातील स्त्रियांचे शिक्षण–निरक्षरतेचे प्रमाण ५९% तर पुरुषांमध्ये पाचवीच्या खाली ३२% असे आढळते.

५) शैक्षणिक अर्हतेचा संबंध श्रवणाशी आहे काय? (रायगड जिल्हा–आदिवासी स्त्रिया व पुरुष)

	होय	नाही
स्त्री	४६	५४
पुरुष	१७	८३






निष्कर्ष : रायगड जिल्हा आदिवासी स्त्रियांमध्ये शैक्षणिक अर्हतेचा संबंध श्रवणाशी नाही, याबाबतचे प्रमाण स्त्रियांमध्ये ५४% तर पुरुषांमध्ये ८३% आढळते.

६) श्रवणाचे फायदे? (स्त्रिया–रायगड जिल्हा आदिवासी)


	निराशेवर मात झाली का	जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन	परिस्थिती बदलली	मन बदलले	परिस्थिती व मन बदलले	संतापावर विजय मिळवला	नम्रता आली
होय	९६	९५	१८	५२	३०	९१	९९
नाही	०४	०५	०	०	०	९	०१



निष्कर्ष : रायगड जिल्हा आदिवासी विभागातील स्त्रियांना श्रवणामुळे ९९% नम्रता आली, हा फायदा झाला. तसेच निराशेवर मात ९६% व जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन ९५% बदलला असे आढळते.

६) श्रवणाचे फायदे? (पुरुष–रायगड जिल्हा आदिवासी)


	निराशेवर मात झाली का	जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन	परिस्थिती बदलली	मन बदलले	परिस्थिती व मन बदलले	संतापावर विजय मिळवला	नम्रता आली
होय	९९	१००	१२	४९	४९	९५	१००
नाही	०१	०	०	०	०	०५	०




निष्कर्ष : रायगड जिल्हा आदिवासी पुरुषांमध्ये जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन १००% बदलला तसेच १००% नम्रता आली असे दोन फायदे झाल्याचे आढळते.

७) आपणांस निरूपणकार होण्याची इच्छा आहे का? (रायगड जिल्हा–आदिवासी स्त्रिया व पुरुष)

	होय	नाही
स्त्री	५७	४३
पुरुष	७६	२४






निष्कर्ष : रायगड जिल्हा आदिवासी विभागतील ५७% स्त्रियांमध्ये निरूपणकार होण्याची इच्छा आढळते, तर पुरुषांमध्ये ७६% आढळते.


८) सुखाच्या शोधात सगळ्यांत महत्त्व कशाला आहे? (रायगड जिल्हा–आदिवासी स्त्रिया व पुरुष)

	अर्थप्राप्ती	मनःशक्ती	मनोविकास	अर्थप्राप्ती	मनःशक्ती व मनोविकास
स्त्री	१	५७	४२	०	०
पुरुष	०	५९	३४	६	१

सुखाच्या शोधात सगळ्यात महत्त्व कशाला आहे? (रायगड जिल्हा–आदिवासी स्त्रिया)




सुखाच्या शोधात सगळ्यात महत्त्व कशाला आहे? (रायगड जिल्हा–आदिवासी पुरुष)




निष्कर्ष : रायगड जिल्हा आदिवासी विभागातील स्त्रियांमध्ये सुखाच्या शोधात सगळ्यांत महत्त्व मनःशक्तीला. त्याचे प्रमाण स्त्रियांमध्ये ५७% तर पुरुषांमध्ये ५९% आढळते.

९) श्रवण कशासाठी? (रायगड जिल्हा–आदिवासी स्त्रिया व पुरुष)

	श्रद्धा	भक्ती	इतरांसमवेत	श्रद्धा व भक्ती	भक्ती व इतरांसमवेत असे
स्त्री	२३	७६	०	१	०
पुरुष	३५	६३	१	१	०







निष्कर्ष : रायगड जिल्हा आदिवासी विभागातील स्त्रियांचे श्रवणाला जाण्याचे कारण भक्तीमुळे ७६% तर पुरुषांमध्ये ६३% भक्तीमुळेच आढळते.

२) केव्हापासून श्रवणाला जातात (रायगड शहर)

	१ वर्षापूर्वी	५ वर्षांपूर्वी	पाच वर्षांपेक्षा जास्त
स्त्री	८	८	८४
पुरुष	४	३	९३







निष्कर्ष : रायगड शहरातील स्त्रियांचे श्रवणाला जाण्याच्या कालावधीचे प्रमाण पाच वर्षांपेक्षा जास्त ८४% आहे, तर पुरुषांचे प्रमाण ९३% आहे.

३) श्रवणाला जाण्यास कां सुरुवात केली? (रायगड शहर)

व्यसन लागल्यामुळे		निराशा	इतरांच्या सांगण्यावरून	ग्रस्त झाल्यामुळे
स्त्री	१	२	५५	४२
पुरुष	५	३	६३	२०







निष्कर्ष : रायगड शहर भागातील ५५% स्त्रिया आणि ६९% पुरुषांनी इतरेजनांच्या सांगण्यावरून श्रवणाला जाण्यास सुरुवात केली.

४) आपले शिक्षण किती झाले आहे? (रायगड शहर)

	निरक्षर	पाचवीच्या खाली	दहावी पास	दहावी पास नंतर
स्त्री	९	१०	२०	६१
पुरुष	०	६	२१	६३







निष्कर्ष : रायगड शहरातील बैठकीला जाणाऱ्या स्त्रियांची शैक्षणिक पात्रता दहावी पासनंतर ६१% आढळते, तर पुरुषांची ६३% अशी आढळते.

५) शैक्षणिक अर्हतेचा संबंध श्रवणाशी आहे काय? (रायगड शहर)

	होय	नाही
स्त्री	२५	७५
पुरुष	१८	७२







निष्कर्ष : रायगड शहरातील स्त्रियांमध्ये श्रवणाशी अर्हतेचा संबंध ''नाही'' असा ७५% तर पुरुषामध्ये ७२% दिसून येतो.

६) श्रवणाचे फायदे? (स्त्रिया–रायगड शहर)

	निराशेवर मात झाली का	जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला	परिस्थिती बदलली	मन बदलले	परिस्थिती व मन	संतापावर विजय	नम्रता आली
होय	९५	९९	१५	६०	२५	८८	९४
नाही	०५	०१	०	०	०	१२	६







निष्कर्ष : रायगड शहरातील स्त्रियांमध्ये 'श्रवणाचे फायदे' मध्ये ''जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला'' असा ९९% प्रतिसाद आढळतो.

६) श्रवणाचे फायदे? (पुरुष–रायगड शहर)

	निराशेवर मात झाली का	जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला	परिस्थिती बदलली	मन बदलले	परिस्थिती व मन	संतापावर विजय	नम्रता आली
होय	१००	१००	६	५५	३९	९५	९८
नाही	०	०	०	०	०	५	०२






निष्कर्ष : रायगड शहरातील पुरुषांमध्ये 'श्रवणाचे फायदे' मध्ये १००% निराशेवर मात झाली आणि जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन १००% बदलला असे आढळले.


७) आपणांस निरूपणकार होण्याची इच्छा आहे का? (रायगड शहर)

	होय	नाही
स्त्री	६५	३५
पुरुष	७०	३०

आपणांस निरूपणकार होण्याची इच्छा आहे का? (रायगड शहर) स्त्री




आपणांस निरूपणकार होण्याची इच्छा आहे का? (रायगड शहर) पुरुष




निष्कर्ष : रायगड शहरातील स्त्रियांमध्ये निरूपणकार होण्याची इच्छा असण्याचे प्रमाण ६५% आहे तर पुरुषांमध्ये निरूपणकार होण्याची इच्छा असण्याचं प्रमाण ७०% आहे.

८) सुखाच्या शोधात सगळ्यांत महत्त्व कशाला आहे? (रायगड शहर) स्त्रिया

	अर्थप्राप्ती	मनःशक्ती	मनोविकास	अर्थप्राप्ती	मनःशक्ती व मनोविकास
स्त्री	०१	६१	३२	०	०१
पुरुष	००	५९	२८	०	००







निष्कर्ष : सुखाच्या शोधात सगळ्यात जास्त महत्त्व मनःशक्तीला–स्त्रियांमध्ये ६१% तर पुरुषांमध्ये ५९% आढळून येते.

९) श्रवण कशासाठी? (रायगड शहर)

	श्रद्धा	भक्ती	इतरांसमवेत	श्रद्धा व भक्ती	भक्ती व इतरांसमवेत असे
स्त्री	४७	३५	१	१७	०
पुरुष	३५	४४	२	१९	०






निष्कर्ष : रायगड जिल्हा स्त्रियांमध्ये श्रवणाला येण्याचे कारण ४७% श्रद्धा, तर पुरुषांमध्ये ४४% भक्ती असे आढळते.

२) केव्हापासून श्रवणाला जातात (रायगड–ग्रामीण)

	१ वर्षापूर्वी	५ वर्षांपूर्वी	पाच वर्षांपेक्षा जास्त
स्त्री	९	१६	७५
पुरुष	३५	१०	५५

केव्हापासून श्रवणाला जातात? (रायगड–ग्रामीण)




निष्कर्ष : रायगड ग्रामीण विभागातील स्त्रियांचे श्रवणाला जाण्याच्या कालावधीचे पाच वर्षांपेक्षा जास्त प्रमाण ७५% तर पुरुषांचे प्रमाण ५५% दिसून येते.

३) श्रवणाला जाण्यास कां सुरुवात केली? (रायगड ग्रामीण)

	व्यसन लागल्यामुळे	निराशा	इतरांच्या सांगण्यावरून	ग्रस्त झाल्यामुळे
स्त्री	०१	१४	३८	४७
पुरुष	१५	०९	४१	३५

श्रवणाला जाण्यास कां सुरुवात केली? (रायगड–ग्रामीण)




निष्कर्ष : रायगड ग्रामीण विभागातील स्त्रियांमध्ये श्रवणाला जाण्यास सुरुवात करण्याचे कारण 'ग्रस्त झाल्यामुळे' ४७% तर पुरुषांमध्ये 'इतरांच्या सांगण्यावरून' ४१% आढळते. स्त्री आणि पुरुष दोघांमध्ये वेगळी कारणे आढळतात.

४) आपले शिक्षण किती झाले आहे? (रायगड–ग्रामीण)

	निरक्षर	पाचवीच्या खाली	दहावी पास	दहावी पास नंतर
स्त्री	१६	२१	२५	३८
पुरुष	३०	३२	१२	२६


केव्हापासून श्रवणाला जातात? (रायगड–ग्रामीण)



निष्कर्ष : रायगड ग्रामीण विभागातील बैठकीला जाणाऱ्या स्त्रियांची शैक्षणिक पात्रता 'दहावी पासनंतर' ३८% तर, पुरुषांची शैक्षणिक पात्रता 'पाचवीच्या खाली' ३२% अशी आढळते.

५) शैक्षणिक अर्हतेचा संबंध श्रवणाशी आहे काय? (रायगड ग्रामीण)

	होय	नाही
स्त्री	१७	८३
पुरुष	४६	५४




निष्कर्ष : रायगड ग्रामीण विभागातील स्त्रियांमध्ये 'शैक्षणिक अर्हतेचा संबंध श्रवणाशी नाही' याचे प्रमाण ८३% तर पुरुषांमध्ये ५४% आढळते.

६) श्रवणाचे फायदे? (स्त्रिया–रायगड ग्रामीण)

	निराशेवर मात झाली का	जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला का	परिस्थिती बदलली का	मन बदलले	परिस्थिती व मन बदलले का	संतापावर विजय मिळवला	नम्रता आली
होय	९९	१००	२३	३१	४६	९५	९८
नाही	०१	०	०	०	०	०५	०२


श्रवणाचे फायदे? (स्त्रिया–रायगड ग्रामीण)



निष्कर्ष : रायगड ग्रामीण विभागातील स्त्रियांमध्ये श्रवणाचा फायदा, जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन १००% बदलला असे आढळते.

६) श्रवणाचे फायदे? (पुरुष–रायगड ग्रामीण)


	निराशेवर मात झाली का	जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला का	परिस्थिती बदलली का	मन बदलले	परिस्थिती व मन बदलले का	संतापावर विजय मिळवला	नम्रता आली
होय	९६	९५	१८	५२	३०	९१	९९
नाही	०४	०५	०	०	०	०९	१



निष्कर्ष : रायगड ग्रामीण विभागातील पुरुषांमध्ये ९९% नम्रमा आली. हा श्रवणाचा फायदा झाल्याचे आढळते.

७) आपणांस निरूपणकार होण्याची इच्छा आहे का? (रायगड–ग्रामीण)


	होय	नाही
स्त्री	६८	३२
पुरुष	५७	४३



रायगड ग्रामीण विभागातील स्त्रियांमध्ये निरूपणकार होण्याची इच्छा ६८% तर पुरुषांमध्ये ५७% आढळते.

८) सुखाच्या शोधात सगळ्यांत महत्त्व कशाला आहे? (रायगड ग्रामीण)

	अर्थप्राप्ती	मनःशक्ती	मनोविकास	अर्थप्राप्ती	मनःशक्ती व मनोविकास
स्त्री	१	६४	३४	१	०
पुरुष	१	५७	४२	०	०




निष्कर्ष : रायगड ग्रामीण विभागातील स्त्रियांच्या मते, सुखाच्या शोधात सगळ्यांत महत्त्व मनःशक्तीला ६४% आढळते, तर पुरुषांमध्येही मनःशक्तीला ५७% आढळते.

९) श्रवण कशासाठी? (रायगड–ग्रामीण)

	श्रद्धा	भक्ती	इतरांसमवेत	श्रद्धा व भक्ती	भक्ती व इतरांसमवेत असे
स्त्री	३९	५७	३	१	०
पुरुष	२३	७६	०	१	०

श्रवण कशासाठी? (रायगड–ग्रामीण)




निष्कर्ष : रायगड ग्रामीण विभागातील स्त्रियांचे श्रवणाला जाण्याचे कारण स्त्रियांमध्ये ५७% भक्ती तर पुरुषांमध्येही ७६% भक्ती असे आढळते.

२) केव्हापासून श्रवणाला जातात (ठाणे ग्रामीण)

	१ वर्षापूर्वी	५ वर्षांपूर्वी	पाच वर्षांपेक्षा जास्त
स्त्री	१३	१०	७७
पुरुष	०४	१५	८२

केव्हापासून श्रवणाला जातात? (ठाणे ग्रामीण)




निष्कर्ष : ठाणे ग्रामीण विभागातील स्त्रियांचा श्रवणाला जाण्याचा कालावधी पाच वर्षांपेक्षा जास्त ७७%, तर पाच वर्षांपेक्षा जास्त पुरुषांचा ८२% आढळतो.

३) श्रवणाला जाण्यास कां सुरुवात केली? (ठाणे–ग्रामीण)

	व्यसन लागल्यामुळे	निराशा	इतरांच्या सांगण्यावरून	संकटग्रस्त झाल्यामुळे
होय	१	३४	४६	१९
नाही	७	११	७३	९


श्रवणाला जाण्यास कां सुरुवात केली? (ठाणे–ग्रामीण)



निष्कर्ष : ठाणे ग्रामीण विभागातील स्त्रियांची श्रवणाला जाण्यास सुरुवात करण्याची कारणमीमांसा 'इतरांच्या सांगण्यावरून' ४६% तर पुरुषांची देखील इतरांच्या सांगण्यावरून ७३% अशी आढळते.

४) आपले शिक्षण किती झाले आहे? (ठाणे ग्रामीण)

	निरक्षर	पाचवीच्या खाली	दहावी पास	दहावी पास नंतर
स्त्री	२४	७	१०	५९
पुरुष	७	३१	९	५२




ठाणे ग्रामीण विभागातील स्त्रियांची शैक्षणिक अर्हता दहावी पासनंतर ५९% तर पुरुषांची ५२% आढळते.

५) शैक्षणिक अर्हतेचा संबंध श्रवणाशी आहे काय? (ठाणे ग्रामीण)

	होय	नाही
स्त्री	०२	९८
पुरुष	२०	८०


शैक्षणिक अर्हतेचा संबंध श्रवणाशी आहे काय? (ठाणे ग्रामीण)



निष्कर्ष : ठाणे ग्रामीण विभागातील स्त्रियांमध्ये 'शैक्षणिक अर्हतेचा संबंध श्रवणाशी नाही' याचे प्रमाण ९८% तर पुरुषांमध्ये ते ८०% आढळते.

६) श्रवणाचे फायदे? (स्त्रिया–ठाणे ग्रामीण)


	निराशेवर मात झाली का	जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला का	परिस्थिती बदलली का	मन बदलले	परिस्थिती व मन बदलले का	संतापावर विजय मिळवला	नम्रता आली
होय	९६	१००	१६	५०	५९	५९	५९
नाही	४	०	०	०	५२	५२	५२



ठाणे ग्रामीण विभागातील स्त्रियांमध्ये श्रवणामुळे १००% जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला असे आढळते.

६) श्रवणाचे फायदे? (पुरुष–ठाणे ग्रामीण)


	निराशेवर मात झाली का	जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला का	परिस्थिती बदलली का	मन बदलले	परिस्थिती व मन बदलले का	संतापावर विजय मिळवला	नम्रता आली
होय	१००	१००	३१	५८	११	९५	१००
नाही	०	०	०	०	०	५	०



निष्कर्ष : ठाणे ग्रामीण विभागातील स्त्रियांमध्ये श्रवणामुळे १००% निराशेवर मात झाली. जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन १००% बदलला, तसेच १००% नम्रता आली असे आढळते.

७) आपणांस निरूपणकार होण्याची इच्छा आहे का? (ठाणे–ग्रामीण)


	होय	नाही
स्त्री	७७	२३
पुरुष	६७	३३



ठाणे ग्रामीण विभागातील स्त्रियांमध्ये निरूपणकार होण्याची इच्छा ७७%, तर पुरुषांमध्ये हेच प्रमाण ६७% आढळते.

८) सुखाच्या शोधात सगळ्यांत महत्त्व कशाला आहे? (ठाणे ग्रामीण)

	अर्थप्राप्ती	मनःशक्ती	मनोविकास	अर्थप्राप्ती	मनःशक्ती व मनोविकास
स्त्री	०	५८	४७	१	०
पुरुष	०	४९	५१	०	०




निष्कर्ष : सुखाच्या शोधात सगळ्यात महत्त्व, ठाणे ग्रामीण विभागातील स्त्रियांच्या मते ५८% मनःशक्तीला, तर पुरुषांमध्ये मनोविकासाला ५१% आढळते.

९) श्रवणाचे फायदे? (स्त्रिया–ठाणे ग्रामीण)

	निराशेवर मात झाली का	जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला का	परिस्थिती बदलली का	मन बदलले	परिस्थिती व मन बदलले का	संतापावर विजय मिळवला	नम्रता आली
होय	९६	१००	१६	५०	५९	५९	५९
नाही	४	०	०	०	५२	५२	५२

श्रवणाचे फायदे? (ठाणे–ग्रामीण)




निष्कर्ष : ठाणे ग्रामीण विभागातील स्त्रियांचे श्रवणाला जाण्याचे कारण ८३% श्रद्धा तर पुरुषांमध्येही ८५% श्रद्धा हे आढळते.


२) केव्हापासून श्रवणाला जातात (आदिवासी स्त्रिया व पुरुष–ठाणे जिल्हा)

	१ वर्षापूर्वी	५ वर्षांपूर्वी	पाच वर्षांपेक्षा जास्त
स्त्री	२४	१३	६३
पुरुष	२५	२९	४६

केव्हापासून श्रवणाला जातात? (आदिवासी स्त्रिया–ठाणे जिल्हा)




केव्हापासून श्रवणाला जातात (आदिवासी पुरुष–ठाणे जिल्हा)




निष्कर्ष : श्रवणाला जाणाऱ्या स्त्रियांचा कालावधी पुरुषांच्या कालावधीपेक्षा १७% अधिक आहे, असे दिसून येते. स्त्रियांमध्ये पाच वर्षांपेक्षा जास्त ६३% तर पुरुषांमध्ये हे प्रमाण ४६% आढळते.

३) श्रवणाला जाण्यास कां सुरुवात केली? (आदिवासी स्त्रिया व पुरुष–ठाणे जिल्हा)

	व्यसन लागल्यामुळे	निराशा	इतरांच्या सांगण्यावरून	ग्रस्त झाल्यामुळे
स्त्री	०	१९	२३	५८
पुरुष	२०	१७	३५	२८






निष्कर्ष : स्त्रियांमधील श्रवणाला जाण्याचे कारण 'संकटग्रस्त झाल्यामुळे' ५८% जास्त असल्याचे दिसून येते. परंतु पुरुषांचे श्रवणाला जाण्यास सुरुवात केल्याचे कारण 'इतरांच्या सांगण्यावरून' ३५% जास्त दिसून येते. कारणे वेगळी आहेत.


४) आपले शिक्षण किती झाले आहे? (आदिवासी स्त्रिया व पुरुष–ठाणे जिल्हा)

	निरक्षर	पाचवीच्या खाली	दहावी पास	दहावी पास नंतर
स्त्री	५०	६	१८	२६
पुरुष	१६	१५	१७	५२

आपले शिक्षण किती आहे? (आदिवासी स्त्रिया–ठाणे जिल्हा)




आपले शिक्षण किती झाले आहे? (आदिवासी पुरुष–ठाणे जिल्हा)




निष्कर्ष : श्रवणाला जाणाऱ्या आदिवासी स्त्रियांमध्ये निरक्षरतेचं प्रमाण ५०% दिसून येतं. परंतु श्रवणाला जाणाऱ्या आदिवासी पुरुषांचे प्रमाण दहावी पासनंतर ५२% दिसून येतं.

५) शैक्षणिक अर्हतेचा संबंध श्रवणाशी आहे काय? (आदिवासी स्त्रिया व पुरुष–ठाणे जिल्हा)

	होय	नाही
स्त्री	२१	७९
पुरुष	१०	९०






निष्कर्ष : आदिवासी स्त्री आणि पुरुषांमध्ये, शैक्षणिक अर्हतेचा संबंध श्रवणाशी नाही ह्याचे प्रमाण जास्त दिसून येते. स्त्रियांमध्ये ७९% तर पुरुषांमध्ये १०% प्रमाण आढळते.

शिक्षण व श्रवण या दोन भिन्न गोष्टी असून निरक्षर लोकही श्रवणाला जातात आणि तेथून शिकण्याची प्रेरणा घेतात, असे दिसून आले.


६) श्रवणाचे फायदे? (आदिवासी स्त्रिया–ठाणे जिल्हा)

	निराशेवर मात झाली का	जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला का	परिस्थिती बदलली का	मन बदलले	परिस्थिती व मन बदलले का	संतापावर विजय मिळवला	नम्रता आली
होय	९८	१००	१३	१८	६७	९५	९८
नाही	२	०	०	०	०	५	२



६) श्रवणाचे फायदे? (आदिवासी पुरुष–ठाणे जिल्हा)


	निराशेवर मात झाली का	जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला का	परिस्थिती बदलली का	मन बदलले	परिस्थिती व मन बदलले का	संतापावर विजय मिळवला	नम्रता आली
होय	१००	१००	२०	१६	६४	९४	९४
नाही	०	०	०	०	०	६	६




निष्कर्ष : आदिवासी स्त्रियांमध्ये श्रवणाचे फायदे, याला संमिश्र, स्वयंस्पष्ट अभिप्राय वाटतो. परंतु आदिवासी पुरुषांमध्ये मात्र श्रवणाचे फायदे–निराशेवर मात झाली आणि जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला, याबाबतीत १००% प्रतिसाद मिळालाय.

७) आपणांस निरूपणकार होण्याची इच्छा आहे का? (आदिवासी स्त्रिया व पुरुष–ठाणे जिल्हा)

	होय	नाही
स्त्री	५५	४५
पुरुष	७५	२५






निष्कर्ष : आदिवासी स्त्रियांमध्ये निरूपणकार होण्याची इच्छा ५५% तर पुरुषांमध्ये ७५% दिसून येते. विवेक, संयम लाभल्याने जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलतो.


८) सुखाच्या शोधात सगळ्यांत महत्त्व कशाला आहे? (आदिवासी स्त्रिया व पुरुष–ठाणे जिल्हा)

	अर्थप्राप्ती	मनःशक्ती	मनोविकास	अर्थप्राप्ती	मनःशक्ती व मनोविकास
स्त्री	०	६३	०	०	२७
पुरुष	०	७०	१३	०	१७

सुखाच्या शोधात सगळ्यात महत्त्व कशाला आहे? (आदिवासी स्त्रिया–ठाणे जिल्हा)




सुखाच्या शोधात सगळ्यात महत्त्व कशाला आहे? (आदिवासी पुरुष–ठाणे जिल्हा)




निष्कर्ष : आदिवासी स्त्रियांमध्ये सुखाच्या शोधात सगळ्यांत महत्त्व मनःशक्तीला ६३% दिसून येते. तर पुरुषांमध्ये ७०% मनःशक्तीला दिसून येते. ह्यात सर्वांत मनःशक्तीचा प्रभाव पडला आहे.

९) श्रवण कशासाठी? (आदिवासी स्त्रिया व पुरुष–ठाणे जिल्हा)

	श्रद्धा	भक्ती	इतरांसमवेत	श्रद्धा व भक्ती	भक्ती व इतरांसमवेत असे
स्त्री	७	४५	०	४८	०
पुरुष	५	८२	०	१३	०






निष्कर्ष : आदिवासी स्त्रियांमध्ये 'श्रवण कशासाठी–तर श्रद्धा व भक्ती दोन्हींकरिता' प्रमाण ४८% दिसून येते. आदिवासी पुरुषांमध्ये श्रवण कशासाठी–भक्ती ८२% दिसून येते.

२) केव्हापासून श्रवणाला जातात (ठाणे शहर)


	१ वर्षापूर्वी	पाच वर्षांपूर्वी	पाच वर्षांपेक्षा जास्त
स्त्री	३२	१५	५३
पुरुष	३५	१०	५५



निष्कर्ष : ठाणे शहरातील स्त्रियांचे श्रवणाला जाण्याच्या कालावधीचे प्रमाण पाच वर्षांपेक्षा जास्त– ५३% आहे, तर पुरुषांचे प्रमाण ५५% आहे.

३) श्रवणाला जाण्यास कां सुरुवात केली? (ठाणे शहर)

	व्यसन लागल्यामुळे	निराशा	इतरांच्या सांगण्यावरून	ग्रस्त झाल्यामुळे
स्त्री	२	१९	२८	५१
पुरुष	१५	९	४१	३५




निष्कर्ष : ठाणे शहरातील स्त्रियांमध्ये श्रवणाला जाण्याचे कारण –ग्रस्त झाल्यामुळे ५१% आहे, तर पुरुषांचे, इतरांच्या सांगण्यावरूनचे प्रमाण ४१% आहे. स्त्री आणि पुरुष दोघांमध्ये कारणे वेगळी आहेत.

४) आपले शिक्षण किती झाले आहे? (ठाणे शहर)

	निरक्षर	पाचवीच्या खाली	दहावी पास	दहावी पास नंतर
स्त्री	५९	२४	८	९
पुरुष	३०	३२	१८	२०

केव्हापासून श्रवणाला जातात? (ठाणे शहर)




ठाणे शहरातील बैठकीला जाणाऱ्या स्त्रियांची शैक्षणिक पात्रता ५९% निरक्षरतेची आढळते. तर पुरुषांची पाचवीच्या खाली ३२% अशी आढळते.

५) शैक्षणिक अर्हतेचा संबंध श्रवणाशी आहे काय? (ठाणे शहर)

	होय	नाही
स्त्री	४६	५४
पुरुष	१७	८३


शैक्षणिक अर्हतेचा संबंध श्रवणाशी आहे काय? (ठाणे शहर)



निष्कर्ष : ठाणे शहरातील स्त्रियांमध्ये शैक्षणिक अर्हतेचा संबंध ५४% तर पुरुषांमध्ये ८३% 'नाही' असा दिसून येतो.


६) श्रवणाचे फायदे? (स्त्रिया–ठाणे शहर)

	निराशेवर मात झाली का	जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला का	परिस्थिती बदलली का	मन बदलले	परिस्थिती व मन बदलले का	संतापावर विजय मिळवला	नम्रता आली
होय	९६	९५	१८	५२	३०	९१	९९
नाही	४	५	०	०	०	९	१



६) श्रवणाचे फायदे? (पुरुष ठाणे शहर)


	निराशेवर मात झाली का	जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला का	परिस्थिती बदलली का	मन बदलले	परिस्थिती व मन बदलले का	संतापावर विजय मिळवला	नम्रता आली
होय	९९	१००	१२	४९	४९	९५	१००
नाही	१	०	०	०	०	५	०



निष्कर्ष : ठाणे शहरातील स्त्रियांमध्ये श्रवणाचे फायदेमध्ये 'नम्रता आली' ९९% प्रतिसाद आढळतो तर पुरुषांमध्ये १००% प्रतिसाद, जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला आणि नम्रता आली या दोहोंना आढळतो.

७) आपणांस निरूपणकार होण्याची इच्छा आहे का? (ठाणे शहर)


	होय	नाही
स्त्री	५७	४३
पुरुष	७६	२४



ठाणे शहरातील स्त्रियांमध्ये निरूपणकार होण्याची इच्छा असल्याचं प्रमाण ५७% आहे, तर पुरुषांमध्ये ७६% आहे.

८) सुखाच्या शोधात सगळ्यांत महत्त्व कशाला आहे? (ठाणे शहर)

	अर्थप्राप्ती	मनःशक्ती	मनोविकास	अर्थप्राप्ती व मनःशक्ती	मनःशक्ती व मनोविकास
होय	१	५७	४२	०	०
नाही	०	५९	३४	६	१




निष्कर्ष : सुखाच्या शोधात सगळ्यांत जास्त महत्त्व स्त्रियांमध्ये मनःशक्तीला ५७% तर पुरुषांमध्ये ५९% आढळून येते.

९) श्रवण कशासाठी? (ठाणे शहर)

	श्रद्धा	भक्ती	इतरांसमवेत	श्रद्धा व भक्ती	भक्ती व इतरांसमवेत असे
स्त्री	२३	७६	०	१	०
पुरुष	३५	६३	१	१	०

आपणास निरुपणकार होण्याची इच्छा आहे का? (ठाणे शहर)



निष्कर्ष : ठाणे शहरातील स्त्रियांमध्ये श्रवणाला येण्याचे कारण ७६% भक्ती असे आहे, तर पुरुषांमध्ये ६३% भक्ती असेच आढळते.

प्रकरण सहावे

गृहीतकांचे प्रमाणीकरण आणि निष्कर्ष

विभाग	शीर्षक	पृष्ठ क्रमांक
६.१	गृहीतकांचे प्रमाणीकरण आणि निष्कर्ष	२६३
६.२	संकलित साहित्याचे विश्लेषण	२६७
६.३	संदर्भ साहित्याचा सारांश	२७०

प्रकरण सहावे

गृहीतकांचे प्रमाणीकरण आणि निष्कर्ष

६.१ : गृहीतकांचे प्रमाणीकरण आणि निष्कर्ष

ठाणे आणि रायगड जिल्ह्यांतील समाजात परिवर्तन घडविण्याच्या कार्यात डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या कार्याचे योगदान ह्या संशोधिकेने निवडलेल्या विषयाच्या संदर्भात, संशोधिकेने जी गृहीतके मांडली त्याच्या अनुषंगाने प्रत्यक्ष संशोधन कार्यात या दोन्ही जिल्ह्यांतील वेगवेगळ्या गटांतील अनेक लोकांच्या मुलाखती, ग्रामीण, शहरी आणि आदिवासी भागातील लोकांना प्रश्नावली पाठवून घेतलेला आढावा, डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या हयातीत, प्रवचन, निरूपण, त्यांचा सत्कार–समारंभ वा बैठका तसेच बालसंस्कार केंद्र, साक्षरता वर्ग, यामधून स्वतः उपस्थित राहून संशोधिकेने केलेली लोकमानसाची निरीक्षणे, त्या त्या वेळी अनेक लोकांशी संवाद साधून मिळवलेली माहिती, त्याही आधीच्या प्रवचन निरूपणाच्या ऐकलेल्या सीडीज, कॅसेट्स यांच्यातील ध्वनिमुद्रित माहिती याआधारे असे निष्कर्ष मांडता येतात की,

खरेतर डॉ. नानासाहेब यांच्या या सामाजिक परिवर्तन कार्याचा प्रसार पूर्ण भारतभर आहे. मात्र एवढा मोठा व्यापकपट यासाठी घेणे शक्य नव्हते म्हणून त्यांच्या, ठाणे आणि रायगड या दोन जिल्ह्यांतील कार्याचा येथे परामर्श घेतला आहे. कारण त्यांच्या कार्याची सुरुवात प्रथम मुंबई आणि प्रामुख्याने या दोन जिल्ह्यांमधून झाली. सामाजिक कार्य करण्याची प्रेरणा त्यांना श्रीमत् दासबोधावरून मिळाली असली, तरी जेव्हा दुःखाने, सांसारिक व्यापातापाने गांजलेली माणसे त्यांच्याकडे येऊ लागली तेव्हा नानासाहेबांच्या असे लक्षात आले की, या माणसांच्या एकूण सर्वसाधारण माणसांच्या सुखदुःखाच्या कल्पनाच चुकीच्या आहेत. सुख किंवा दुःख एकामागोमाग एक येतच असतात पण या दोन्ही स्थितींमध्ये सुखदुःखाला सामोरे कसे जायचे हे त्यांनी शिकवले. श्रवणाला जाणाऱ्यांपैकी ऐंशी टक्के लोकांमध्ये सकारात्मक दृष्टिकोन वाढला.

आता सकारात्मक दृष्टिकोन वाढला म्हणजे लोकांच्या अडचणी, संकटे दूर झाली का? तर नाही. श्रवणामुळे या लोकांच्या मानसिकतेत असा बदल झाला की या अडचणी असल्या तरी त्यांच्या मनात असा विश्वास निर्माण झाला की या अडचणींवर, संकटावर मात करू शकू. मनात कुठेतरी आशेचा किरण निर्माण झाला. त्यामुळे हा बदल झाला. संशोधिकेने अनेकांना विचारल्यावर

असे जाणवले की, अडचणी असल्या तरी त्याला सामोरे जाण्याचे बळ श्रवणातून त्यांना मिळाले आहे. मिळते आहे. जीवनाचे व्यवस्थापन कसे असावे हे जेव्हा त्यांनी श्रवणातून शिकवले तर ज्यांनी ते विचार आत्मसात केले त्यांच्यात बदल झाला. शाळेतल्या विद्यार्थ्यांचे उदाहरण येथे घेऊ. शिक्षक सर्वांना सारखेच शिकवतात. ती उत्तीर्ण होतात. दुर्लक्ष करणारे अनुत्तीर्ण होतात. जीवनाच्या शाळेतही असेच आहे. म्हणून तर एकाचा परिणाम बघून दुसरा, तिसरा असे लोक, अनेक कुटुंबे श्रवणाचा लाभ घेऊ लागली. कुठलेही कर्मकांड न करता, करायला न लावता केवळ आपल्या प्रभावशाली बोलण्यातून नानासाहेब यांनी हा बदल घडवत आणला. जवळपास ९० टक्के लोकांची मानसिकता बदलली. याचा अर्थ असा नाही की सगळेच आदर्श आहेत. मात्र वयोवृद्ध आजारी, अज्ञानी अशा व्यक्तीही भेटल्या की, ज्यांच्यात हा बदल घडला नाही. त्याचीही वेगवेगळी कारणे आहेत. मनात बदल घडवायचा तर प्रथम स्वतःवर विश्वास हवा. मन खंबीर करायला हवे, आशावादी दृष्टिकोन ठेवायला हवा. हे ज्यांना कळले, पटले आणि ज्यांनी त्या दिशेने आत्मविश्वासाने बदलायला सुरुवात केली, त्यांची कुटुंबे समाधानी झाली.

संसारात प्रत्येकालाच अडीअडचणी, सुखदुःखे, संकटे यांच्याशी सामना करावा लागतो. त्यातून नैराश्य येते. अशावेळी लोक देवाला साकडं घालतात. वेगवेगळ्या श्रद्धा, कर्मकांडे त्यातूनच निर्माण होतात. तर काही लोक दारूसारख्या व्यसनाच्या अधीन होतात. दारूची नशा संपल्यावर ती निराशा विसरण्यासाठी पुन्हा दारू पितात. व्यसनाधीन लोकांसाठी व्यसनमुक्ती केंद्रे आहेत. तेथे किंवा अन्यत्र, डॉक्टरी औषधोपचार केले जातात पण त्यामुळे व्यसन सुटतेच असे नाही. त्यासाठी डॉ. नानासाहेबांचे सांगणे असे की डॉक्टरी औषधोपचार चालूच ठेवा. पण मनावरही उपचार चालू ठेवा. मनावर संयम किंवा ताबा ठेवणे हा महत्त्वाचा संस्कार नानासाहेब यांनी आपल्या बोलण्याद्वारे केला. ज्यांना हे पटले, उमजले ते मनाने खंबीर झाले. ज्यांच्या अंतरात्म्याला हे पटले, त्यांचे व्यसन सुटले. त्यांचे कुटुंब समाधानी झाले. एकाचे पाहून दुसऱ्यातही सुधारणा होऊ शकते या न्यायाने श्रवणातून अनेक व्यसनमुक्त झाले. श्रवणाला येणाऱ्यांत व्यसनाधीन माणसांप्रमाणेच डॉक्टरही येत. त्यांनाही मनावरचे हे उपचार मौलिक वाटले. एकूणच असे आढळले की बहुसंख्य व्यसनाधीन माणसे व्यसनमुक्त झाली. खरे सुख कशात असते, तर समाधानी आणि समतोल वृत्तीत हे त्यांना पटले.

माणसाला सुखाची साधने, सोयी यांचा मोह पडतोच. शारीरिक सुखे, मोटारगाडी, बंगला, चैन अशा क्रमाक्रमाने त्यांचा लोभ वाढतो. प्रलोभनाचे आकर्षण सदैव खुणावत असते. मन हे

चंचल आणि सुखाची अभिलाषा बाळगणारे असल्यामुळे हे हवे, ते हवे अशी ही साखळी वाढत जाते, ते मिळाले नाही की माणसे दुःखी, निराश होतात हे जाणून नानासाहेब त्यांना सांगत की हौसमौज, चैन जरूर करावी पण त्याला मर्यादा हवी. सुख म्हणजे समाधान नव्हे. मनाचे खरे समाधान कशात आहे ते जाणले पाहिजे. हल्लीच्या गतिमान जगात, तीव्र स्पर्धेच्या युगातही श्रवणाला जाणाऱ्या माणसांच्या मनात संयमी वृत्ती वाढलेली आढळली आणि प्रलोभनांपासून दूर राहण्याची वृत्तीही वाढीस लागलेली दिसली. अनेकांच्या वागण्यामधून संशोधिकेला आढळले.

स्त्री हा घराचा मुख्य आधारस्तंभ. ती सुखी, समाधानी असेल तर घर शांत राहतं. सासू–सुनेचा ३६ या आकडा, भांडणे, कटकटी यामुळे कुटुंब त्रस्त होते. द्वेष, हेवा, मत्सर हे केल्यामुळे घर कायम अशांत राहते. श्रवणाला येणाऱ्या स्त्रियांची मानसिकता हळूहळू बदलत गेली आणि बऱ्याच घरात समाधानी, शांत वातावरण स्थिर झाले. डॉ. नानासाहेब, स्त्रियांना आपल्या मनाबरोबरच शरीराचे स्वास्थ्य सांभाळण्याबद्दल आस्थेने सांगत की, शरीराच्या आजारासाठी डॉक्टरी औषधोपचार जरूर करा. शरीर स्थिर असेल, आरोग्यपूर्ण असेल तर मनही स्थिर राहते. मात्र आदिवासी–कातकरी पाड्यातील स्त्रिया श्रवणाला गेल्या, त्यातून त्यांनी मानसिक बळ मिळवले. मुळात काटक असल्या तरी गरिबी व अज्ञान यामुळे काही स्त्रियांच्यात स्वतःच्या आरोग्याबद्दल अनास्था दिसते. कारण ते अंधश्रद्धेच्या आहारी जातात. नानासाहेबांना खास आस्था होती. त्यासाठी पुरुषांनी जागरूक राहण्याबद्दल त्यांनी वेळोवेळी श्रवणातून सांगितले. त्याचा प्रभावही दिसून आला.

श्रवणाला येणाऱ्या मंडळींमध्ये ज्यांच्या ज्यांच्या मानसिकतेत चांगले, सकारात्मक बदल घडले, त्यामुळे अक्षरशः लाखोंच्या संख्येत लोक डॉ. नानासाहेबांच्या प्रवचनांना, श्रवणाला येत. श्रीमत् दासबोध आणि 'मनाचे श्लोक' यांच्यातील उच्च जीवनविचारसरणीचे तत्त्वज्ञान सोप्या शब्दांत आणि अत्यंत निःस्पृहतेने त्यांनी लोकांच्या मनावर बिंबवले. परिणामी लोकांची नानासाहेबांवर श्रद्धा बसली. त्याग, परस्परसहकार्य, दुसऱ्याप्रती आदर या भावना वाढीला लागल्या, हे या असंख्य मंडळींच्या वागण्यातल्या फरकावरून संशोधिकेला जाणवले. त्याखेरीज आदिवासी, कातकरी पाडे आणि ग्रामीण भागातील लोकांचे अज्ञान पाहून डॉ. नानासाहेब यांनी प्रौढ साक्षरता वर्ग सुरू केले. नित्यनियमित बैठका यांशिवाय लहान बालकांसाठी (वय वर्षे पाचपासूनची मुले) 'बालसंस्कार केंद्रे' सुरू केली. त्यांना श्लोकांद्वारे वाणीशुद्धता आणि नम्रता, आदरभाव इत्यादीचे संस्कार देणे सुरू केले. या संस्कार केंद्रासाठी ८०% मुले नियमित येताना

संशोधिकेला आढळली. त्यांना या केंद्राची गोडी लागली. मात्र इतक्या सकाळी लवकर उठावे लागल्याने काही लहान मुले आपल्या बालसुलभ वृत्तीनुसार खोड्या करताना, दुर्लक्ष करतानाही आढळली.

श्रद्धा–अंधश्रद्धा यांमध्ये धूसर पडदा असतो. केवळ ग्रामीण भागातच नव्हे तर शहरी विभागातही अंधश्रद्धा बाळगणारे लोक असतात. आदिवासी भागात तर आजारी पडल्यावर औषधोपचार न करता, गंडेदोरे बांधणे, जारणमारण हे व असे अंधश्रद्धेचे प्रकार दिसतात. डॉ. नानासाहेबांनी या लोकांच्या मनातली अंधश्रद्धा दूर करण्यासाठी, विज्ञानाचे माध्यम वापरून व्यवहारातील विविध उदाहरणांसह पटवून दिले. उदा. सांगायचे तर गणपती दूध प्यायलाची संबंध देशभर खळबळ उडवणारी घटना जेव्हा घडून गेली तेव्हा त्यांनी म्हटले की, ज्यात चैतन्य, प्राणतत्त्व नाही तो दूध कसा पिणार? मांजर आडवे जाणे किंवा दिवा विझणे यांचा अशुभाशी संदर्भ जोडणे कसे चूक आहे हे त्यांनी उदाहरणांसह पटवून दिले. या श्रद्धांबाबतचा आढावा घेतल्यावर संशोधिकेला ग्रामीण, आदिवासी आणि शहरी भागात सुमारे ९५% लोकांच्या मनातील अंधश्रद्धा नाहिशी झाल्याचा अनुभव आला.

आजकाल आध्यात्मिक संदेश देण्यासाठी इलेक्ट्रॉनिक माध्यमे, वृत्तपत्रे, इत्यादीचा वापर केला जातो. मात्र डॉ. नानासाहेब सुरुवातीला प्रवचन, निरूपण स्वतः करीत आणि हे प्रबोधन कार्य पुढे चालू राहण्यासाठी त्यांनी श्रवणाला येणाऱ्या अनुयायांमधूनच अनेकजण तयार केले. त्यात सुशिक्षित/अशिक्षित ग्रामीण/नागरी, पुरुष/महिला अशी सर्व प्रकारची मंडळी होती. त्यामुळे समाज परिवर्तन घडवण्याचे हे प्रबोधन कार्य डॉ. नानासाहेब यांच्या हयातीनंतरही अव्याहत, अखंड चालू राहिले आहे, हे त्यांच्या लाखोंच्या संख्येत असलेल्या अनुयायांवरून दिसून आले. अत्यंत निःस्पृह राहून नानासाहेबांनी निरपेक्ष वृत्तीने विनामूल्य जे प्रबोधनकार्य केले, त्यांचे हे कार्य जनमानसात खोलवर रुजले आहे, याचा प्रत्यय संशोधिकेला आला. याखेरीज कोणताही भेदभाव न बाळगता त्यांनी जे अनुयायी प्रबोधनासाठी तयार केले त्यामुळेही समाजाशी जास्त जवळीक निर्माण झाली. नित्य बैठका, उपासना, बालसंस्कार केंद्रे, प्रौढ साक्षरता वर्ग या माध्यमातून सत्प्रवृत्तीवर, आचरणावर जास्तीत जास्त भर दिला जातो, जेणेकरून निरोगी समाज निर्माण व्हावा ही त्यामागची भावना आहे. ही फलद्रूप होताना दिसली. कारण त्यातले सातत्य प्रशंसनीय आहे.

कोणताही बदल एकदम होत नाही. तो टप्प्याटप्प्यांनी होत असतो. नियमाला अपवाद तर असतातच. विविध कारणांनी काही लोक श्रवणाला आले तरी त्यांच्यात फार हळू बदल होताना दिसतो. परंतु बऱ्याच कालावधीनंतर ते सुधारू शकतात.

यांखेरीज पर्यावरण रक्षणासाठी झाडे लावून ती वृद्धिंगत करणे (जगवणे), स्वच्छता अभियान, रक्तदान शिबिरे, आरोग्य शिबिरे यांसारखे समाजोपयोगी उपक्रम डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांनी सुरू ठेवले. त्यांच्या या दूरदृष्टीच्या प्रबोधनकार्याची आणि आजच्या विज्ञानयुगात आवश्यक असलेल्या सकारात्मक दृष्टिकोनाची तसेच सत्प्रवृत्त वृत्तीने मानवी उन्नयन घडवून आणण्याची महती पटते.

६.२ : संकलित साहित्याचे विश्लेषण

देव म्हणजे काय? देवाबद्दल प्रत्येकाच्या वेगवेगळ्या संकल्पना असतात. माणसाच्या मनातला निरनिराळ्या पण आदर्शत्वाच्या कल्पनेप्रमाणे वेगवेगळ्या देवता किंवा देवांची निर्मिती झाली.

देव म्हणजे काय, असा जर विचार केला तर सर्वसाधारणपणे असे म्हणता येईल की, मानवी गुणधर्माहून उच्च दर्जाचा उत्तम गुणांचा समुच्चय म्हणजे देव. ज्याच्याकडे काही अतिन्द्रिय शक्ती असते. जगाचा चालक असतो. जगातले सर्व चैतन्य जागवण्याचे सामर्थ्य त्याच्याकडे असते; इत्यादी अनेक कल्पना आणि त्याला अर्थातच माणसांचे बरेवाईट गुणही चिकटवलेले. मात्र हे खरे की माणसाला जगण्याकरिता जे भावनिक आधार लागतात, त्यांतील सर्वोच्च आधार म्हणजे देव. लहान मूल कसे पडल्यावर रडत रडत आईकडे जाते, आईने मारले तरी आईलाच बिलगते, कारण त्याच्या चिमुकल्या मेंदूतल्या विचारानुसार आई हाच त्याला विश्वासाचा आधार वाटतो. आईच्या कुशीत त्याला शांत आश्वस्त वाटत राहते. सर्वसामान्य माणसांचे काही प्रमाणात असेच असते. तो कुटुंबप्रमुख असला तरी त्याच्याही क्षमतेवर जेव्हा आघात होते, भावनिक दृष्ट्या तो कोलमडून पडतो, दुःखाच्या किंवा संकटाच्या काळात त्याच्यासमोर जेव्हा निराशेचा काळोखच पसरतो; तेव्हा त्याला फक्त देवाचाच आधार वाटतो. देवाची प्रार्थना–पूजा करतो, 'मला संकटातून वाचव' असे देवाला साकडे घालतो. सर्व बाजूंनी प्रापंचिक व्यापतापाने वेढलेल्या माणसाला ज्याच्यावर सर्व भिस्त ठेवावी, विश्वास ठेवावा अशी, आईप्रमाणेच आश्वस्त करणारी जागा म्हणजे देव. देव आपल्याला संकटातून बाहेर काढील. सुखाचा मार्ग दाखवील अशी त्याला आशा असते.

माणसाची वृत्ती अशी असते की दुसऱ्याला काहीतरी दिले की आपल्यालाही त्याच्याकडून काही मिळेल असे वाटते. म्हणून मग तो देवाला चांगले (म्हणजे फळे, फुले, नैवेद्य, वस्त्रे इत्यादी) अर्पण करतो, नवस करतो. आपल्या मागणीचे गाऱ्हाणे घालतो. हे सर्व कशासाठी? तर आपल्याला जगण्याचा चांगला सुखाचा मार्ग देवाने दाखवावा म्हणून. मनासारखे झाल्यावर तो देवाला त्याच्या ऐपतीप्रमाणे फळे, फुले, नैवेद्य इत्यादी अर्पण करतो, ते कृतज्ञतेपोटीच.

जी माणसे बुद्धीने वागू शकतात, विचार करू शकतात. त्यांना ह्यातला फोलपणा कळतो. निसर्गाचेच घेऊन निसर्गाला अर्पण करायचे असते. असे आपल्या धर्मात सांगितले आहे. आता धर्म म्हणजे काय, तर समाजात दुसऱ्याला त्रास न देता विविध प्रकारे एकमेकांच्या उपयोगी पडून एकजुटीने चांगल्या विचाराने चांगल्या प्रकारे जगणे ही धर्माची कल्पना आहे. पण माणसाचं मन इतके चंचल आहे की ते सैरावैरा धावत असते. माणसाच्या मताविरुद्ध एखादी गोष्ट झाली की त्याला राग येतो. कारण हे षड्रिपू माणसाच्या मनावर ताबा घेऊन बसलेले असतात. ह्यात सर्वसामान्य माणसे खूप जास्त असतात आणि विचाराने चालणारी माणसे खूप कमी असतात. जे बुद्धिनिष्ठ विचार करतात ते सहसा भावनेच्या आहारी जात नाहीत. ते असा विचार करतात की, ह्यातले योग्य किंवा अयोग्य काय! थोडक्यात काय दुसऱ्याला त्रास न देता आपण सुखात जगणे होय. आता सुखात म्हणजे काय? सुखाच्या आणि आनंदाच्या प्रत्येकाच्या कल्पना वेगळ्या आहेत. जे केल्यामुळे आपल्या मनाला संतोष वाटतो, समाधान वाटतं, ते खरे सुख असते. दुसऱ्याला मारून, त्याच्या मनाविरुद्ध एखादी गोष्ट घेणे, ह्यात कदाचित ती वस्तू मिळेल, पण तो आनंद, समाधान मिळत नाही. पण समाजात असे चांगले–वाईट लोक असतातच. याचे प्रतीक म्हणजे जसे शंभर कौरव आणि पाच पांडव. सर्वसाधारणपणे पांडवांना सद्गुणांचे पुतळे समजण्याची पद्धत आहे आणि शंभर कौरव दुष्ट प्रवृत्तीचे असे समजले जाते. म्हणजेच शंभर गोष्टी वाईट असतात तेव्हा पाच गोष्टी नक्कीच चांगल्या असतात.

खरे म्हणजे माणसाच्या जीवनासाठी आवश्यक असणाऱ्या निसर्गाबरोबरच 'बुद्धी' ही इतर प्राण्यांहूनही मोलाची गोष्ट मनुष्यप्राण्याला मिळालेली आहे. मानवी उत्क्रांतीबरोबर त्याच्या बौद्धिक आणि भावनिक क्षमतेत वाढ होत गेली. जे खरे ज्ञानी होते त्यांनी सर्वसामान्यांचे दुःख आणि त्यांचे विकारवश होणारे चंचल मन ओळखले होते. म्हणून तर रामदासस्वामीसारखा योगीपुरुषही 'अचपळ मन माझे नावरे आवरिता' असे म्हणतो. मनाच्या संयमनासाठी प्राचीन काळच्या लोकोत्तर संत–महंतानी माणसाला हितकारक असणाऱ्या, मानवी मनाला योग्य ते बंधन घालणाऱ्या

अनेक गोष्टी धर्माचे कवच घालून निर्माण केल्या. त्यातून फार चांगल्या परंपराही तयार झाल्या. पण माणसाला लालसा फार. हळूहळू या सर्वाला कर्मकांडाचे रूप येत गेले. अंधश्रद्धाही शिरल्या.

एखादी गोष्ट योगायोगाने घडली, म्हणजे जसे कावळा बसायला आणि फांदी तुटायला एकच वेळ जुळून यावी तसे घडले की त्यामुळे हळूहळू श्रद्धेचे रूप अंधश्रद्धेत होत गेले. मग लहान मुलाला ज्याप्रमाणे खाऊची लालूच दाखवून एखादे काम करून घ्यावे त्याप्रमाणे 'देवा, माझं अमुक काम कर/किंवा होऊ दे तुला अकरा नारळ देईन, पण माझं काम कर' असे म्हणणे. माणसाचा 'धर्म' कोणता, तर परस्परांना हितकारक, समाधानाने जगण्यासाठी करावयाचे योग्य आचरण. डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांनी प्रवचन–निरूपणातून ते लोकांना समजावले. लोकांची मानसिकता लक्षात घेऊन, लोकांना विश्वासात घेत, त्यांच्याशी त्यांच्याच व्यवहारातल्या भाषेत संवाद साधून वेगवेगळ्या प्रकारची उदाहरणे देऊन, ते लोकांना जगण्याच्या एकूणच योग्य अशा सन्मार्गाबद्दल सांगत. एखाद्या दगडावर एकाच जागी पाण्याची बारीकशी धार सतत पडत राहिली तर दगडालाही तिथे भोक पडते. त्याचप्रमाणे निरंतर प्रवचन, खंड न पाडता जेव्हा सातत्याने एखादी बरी किंवा वाईट गोष्ट मनावर बिंबवली जाते तेव्हा हमखास प्रभाव पडतो. चांगले विचार सातत्याने पेरीत गेल्यामुळे लोकांना त्याबद्दल गोडी निर्माण झाली. सामान्यांच्या पातळीवर संवाद साधून जेव्हा एखाद्या व्यक्तीला किंवा समूहाला त्याच्या हिताचं सांगितलं जाते, तेव्हा अशिक्षित माणसालाही आपल्या भल्यासाठीच ही तळमळ आहे हे पटते.

डॉ. नानासाहेब यांनी हे काम ज्या निःस्पृहतेने केले त्यामुळे ज्योतीने ज्योत उजळावी तसे एक कुटुंब, अनेक कुटुंबे, गावे... असे करता करता लाखोंचा जनसमुदाय मोठ्या विश्वासाने त्यांच्या मागे आला. एकाचे बघून दुसरा, तोंडातोंडी (Mouth Publicity) झालेली प्रसिद्धी, आलेले चांगले अनुभव म्हणून अनेक घरे शांत, समाधानी होऊ लागली. अनेकांची व्यसने सुटली आणि एकेक घर उजळत गेले. डॉ. नानासाहेबांच्या या निरपेक्षपणे केलेल्या प्रबोधनाचे प्रत्यंतर, परिवर्तनाचा साक्षात अनुभव, अनेकांच्या मुलाखतींमधून, लोकांना भेटल्यावर त्यांच्या बोलण्यातून जाणवत राहिला आणि असा लोकसंग्रह त्यांच्या मागे येण्याचे कारण त्यांची कार्यशैली आहे, हेही लक्षात येत गेले. विनामूल्य सेवा, लोकांचा विश्वास आणि आदर संपादन करणे, लोकांच्या हृदयात स्थान मिळवणे हे सोपे नाही. कर्मकांड नसलेल्या त्यांच्या वक्तव्याचा तो प्रभाव आहे.

समाज प्रबोधनासाठी डॉ. नानासाहेब एकातून एक मार्ग शोधत राहिले, त्यातूनच प्रौढ

साक्षरता वर्ग, बैठका, बालसंस्कार केंद्र हे प्रत्यक्ष संवादांचे, यांखेरीज पर्यावरण, रक्तदान शिबिरे, स्त्रियांना मानसन्मान, एडस् निर्मूलन, अंधश्रद्धा नाहीशी करणे इत्यादी अनेक मार्गांनी हे समाजप्रबोधन, परिवर्तनाचे काम अखंड चालू आहे. ते महाराष्ट्रापुरते किंवा भारतापुरतेच मर्यादित नाही; तर परदेशांतही त्यांचे हजारो अनुयायी आहेत, ते डॉ. नानासाहेबांनी दाखलेला सन्मार्ग अनुसरत आहेत हे त्यांचे मोठेच योगदान आहे.

६.३ संदर्भसाहित्याचा सारांश

या प्रबंधाकरिता संशोधिकेने अनेक विविध स्वरूपाचे ग्रंथ, नियतकालिके, वृत्तपत्रे, स्फुट लेखनादि लिखित साधनांचा अभ्यास व वापर केला. त्यांपैकी काही ग्रंथ, मासिके, वृत्तपत्रे यातून थेटपणे घेतलेल्या माहितीचा संपूर्ण संदर्भ वेळोवेळी, योग्य जागी प्रबंधात तळटीपांच्या रूपाने दिलेला आहेच. उदाहरणादाखल सांगायचे तर 'शोधनिबंधाची लेखनपद्धती ह्या श्री. मिलिंद मालशे यांच्या पुस्तकामुळे संशोधनाचा आराखडा कसा असावा, तळटीपा कशाप्रकारे लिहाव्यात, संदर्भसूची अकारविल्हे कशी तयार करावी इत्यादीबाबतीत मार्गदर्शन मिळाले.

विश्वकोशाचे खंड (५, ८, १३, १४, १७, १८, १९ इत्यादी) चाळले. त्यातूनच मोर्य ते शिलाहार या राजवटींचा सारांशरूपात इतिहास कळला. त्यातूनच प्रबंधाला आवश्यक असणाऱ्या माहितीची नोंद करता आली.

श्रीमत् दासबोध, तुकाराम गाथा, सार्थ श्री ज्ञानेश्वरी, श्री मनाचे श्लोक यांमधील वेळोवेळी दिलेल्या ओव्या, अभंग, इत्यादीचा संदर्भ देणे शक्य झाले. प्राचीन गीतमंजूषा, प्राचीन गीत भाण्डार ह्या ग्रंथांमधून संतवचने तसेच प्रबंधात उल्लेख असलेल्या संतांच्या जन्म–मृत्यू नोंदी यांचे संदर्भ घेतले.

ठाणे व रायगड या जिल्ह्यांच्या भौगोलिक इतिहासाकरता (पार्श्वभूमी कळण्यासाठी) 'असा हा रायगड' आणि 'असे घडले ठाणे' ह्या पुस्तकांचा खूप उपयोग झाला.

'समकालीन समाजसुधारक' या प्रकरणासाठी 'वसंत श्री' (आध्यात्मिक दिवाळी विशेषांक) या मासिकातून माहिती मिळाली.

अन्य व्यक्तीपर ग्रंथांवरूनही काही माहिती कळली.

डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांनी वेळोवेळी केलेल्या प्रवचनांच्या सीडीज उपलब्ध असल्यामुळे प्रवचनाबाबत संदर्भासह माहिती देता आली.

प्रबंधाच्या प्रास्तविकात एकूण संतपरंपरेचा जो मागोवा सारांश रूपात घेतला, त्यासाठी प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, तुकाराम, सांस्कृतिक संचित, संतांची समाजधारणा, भारुड वाङ्मयातील तत्त्वज्ञान, संत रामदासांचे व्यवस्थापनशास्त्र, ३० पुस्तके चाळली. तसेच 'साहित्य' त्रैमासिक (जुलै १४) संतसाहित्य विशेषांक वाचला आणि त्या आधारे प्रास्ताविकाची रचना केली.

प्रकरण ७

समारोप

७.१ : पुढील संशोधनाची व्याप्ती

ह्या प्रबंधासाठी डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्यासारखे ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व निवडण्यामागे महत्त्वाचे कारण आहे. आपल्या लेखणीने आणि वाणीने समाजाला सद्‌विचारांचे धन देणारी संतपरंपरा किंवा ब्रिटिश राजवटीत १९व्या शतकाच्या उत्तरार्धात स्वातंत्र्य मिळविण्याच्या हेतूने प्रेरित झालेले वाङ्मय (साहित्यातील काव्य, पोवाडे नाटके इत्यादी सर्व प्रकार), स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणाच्या प्रसारामुळे निर्माण झालेली वाङ्मयसंपदा, विविध विचारधारा, लोकशिक्षणाचा वसा घेतलेल्या थोर व्यक्ती, समाजसुधारक, ऐतिहासिक घटना, विसाव्या शतकातील दोन जागतिक महायुद्धे अशा सर्व घटनाघटितांच्या पार्श्वभूमीवर भारतीय समाजाची मानसिकता कशी होती, आत्मिक उन्नतीच्या, विकासाच्या, भौतिक सुधारणांच्या वाटेवरील अडथळे आणि त्यातून लोकोत्तर म्हटल्या गेलेल्या व्यक्तींनी शोधलेले मार्ग, सन्मार्गावर चालण्याविषयीचे समाजाला केलेले मार्गदर्शन, इत्यादी गोष्टींच्या ठळक नोंदी विचारात घेतल्या, त्या प्रामुख्याने महाराष्ट्र राज्याच्या संदर्भात. प्रबंधविषय जरी ठाणे व रायगड या दोन जिल्ह्यांपुरता मर्यादित ठेवला असला, तरी प्रबंधाच्या केंद्रस्थानी असलेल्या स्व. डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या सामाजिक परिवर्तनाच्या कार्याचे योगदान दोन जिल्ह्यांपुरतेच मर्यादित नाही, हे लक्षात घ्यायला हवे.

प्रबंधातील मुलाखतींमधून, वृत्तपत्रांतील लेखांच्या संदर्भातून, नानासाहेबांना मिळालेल्या विविध सन्मान, पुरस्कारांमधून हे विधान स्पष्ट होईलच. राज्यपातळीवरील 'महाराष्ट्र भूषण' हा सन्मान हे त्याचे बोलके उदाहरण, आहे.

आपल्या निरूपणाद्वारे कोळी, आगरी, भंडारी, आदिवासी अशा लाखोंच्या समुदायाच्या मनात नानासाहेबांनी केलेली सन्मार्गाची रुजवण असो, तसेच 'श्री समर्थ प्रासादिक आध्यात्मिक सेवा समिती' द्वारा झालेल्या आणि आजतागायत चालू असलेल्या बैठका, बालसंस्कार केंद्रे आणि देशातच नव्हे तर अमेरिका, ऑस्ट्रेलिया, दुबई असे परदेशातही हजारोंच्या संख्येत असलेले त्यांचे अनुयायी किंवा समाज कार्यकर्ते असोत; हे पाहिले, की अचंबा वाटतो. असे काय असेल त्या निरूपणात की, दहा दहा लाखांची गर्दी – तीही अत्यंत शिस्तबद्ध, त्यांच्या निरूपणाला आवर्जून

येत राहिली! सरलेल्या विसाव्या शतकातील शेवटची जवळपास सहा दशके आणि २००८मध्ये नानासाहेबांचा स्वर्गवास होईपर्यंतची ही सन्मार्गाच्या वाटचालीची, समाजाच्या परिवर्तनाच्या कळकळीने भारलेली होती. वास्तविक ठाणे जिल्ह्यातील व रायगडमधील शहरी भाग सोडला तर हे दोन्ही जिल्हे आदिवासीबहुल आहेत. अत्यंत दुर्गम भागातल्याही आदिवासींपर्यंत पोचून त्यांनाही या निरूपणांना बैठकांना यावेसे कां वाटले असेल? म्हणूनच डॉ. नानासाहेबांच्या व्यक्तिमत्त्वाचे, त्यांच्या कार्यशैलीचे पैलू तपासून पाहावेसे वाटले.

'सार्थ श्री दासबोध' आणि '२०५ मनाचे श्लोक' या दोन ग्रंथांच्या, लहानपणापासूनच्या वाचनाने, अभ्यासाने आणि मननाने नानासाहेबांच्या मनावर जबरदस्त ठसा उमटला. ज्याप्रमाणे समर्थ रामदासांनी तत्त्वज्ञान, धर्मविषयक चिंतन, आणि व्यवहारज्ञान यांची उत्तम सांगड घातली, आणि सर्वसामान्य माणसाला कसे जगावे याचे उत्तम भान दिले, ते त्यांचे विचार नानासाहेबांनी मनोभावे आत्मसात केले.

उत्तम गुण स्वयें घ्यावे। ते बहुतांस सांगावे।

वर्तल्याविण बोलावे। ते शब्द मिथ्या।।३।। (दासबोध, दशक–१२ समास–१७)

असे समर्थ म्हणतात. नानासाहेबांनीही आपल्या या गुरूप्रमाणेच स्वतःच्या अंगी ते गुण वसवले आणि उच्चार, विचार व आचार यांची एकरूपता सिद्ध केली.

स्वातंत्र्योत्तर काळाच्याही आधी म्हणजे इ. स. १९४३पासून नानासाहेबांनी रामदासांच्या याच प्रभावातून आपल्या निरूपणांना प्रारंभ केला.

विसाव्या शतकात असे समाजसेवेचे व्रत घेतलेले, जनहितार्थ तळमळीने काम केलेले काही लोकोत्तर संतमहात्मे येथे विचारात घेणे इष्ट ठरेल. तेराव्या शतकापासून ते सतराव्या शतकापर्यंतची संतपरंपरा प्रास्ताविकात, थोडक्यात विचारात घेतली आहेच; तसेच नानासाहेबांच्या समकालीन असणारी संततुल्य व्यक्तिमत्त्वेही. त्यांच्या कार्याचा, वैशिष्ट्यांचा, लोकसेवेचा मार्ग, माध्यमे यांचाही विचार केला आहेच. मात्र विसाव्या शतकाच्या पहिल्या अर्धशतकात, विशेष नोंद घेण्यासारखे दोन संत सत्पुरुष होऊन गेले. श्री गाडगेबाबा तथा गाडगे महाराज आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज. या दोन्ही महात्म्यांची थोडक्यात नोंद घेणे सयुक्तिक होईल.

१) श्री गाडगेबाबा तथा गाडगे महाराज (जन्म : १८७६, मृत्यू : १९५६)

अमरावती जिल्ह्यातील एका छोट्याशा खेडेगावात जन्मलेले श्री देबूजी जानोरकर हे धोबी समाजातील होते. गावोगाव सतत भ्रमंती करणाऱ्या, हातात ग्रामसफाईसाठी सदैव झाडू, तर मोजकेच आणि मिळेल ते अन्न घेण्यासाठी मातीच्या मडक्यांचे (गाडग्याचे) अर्धवर्तुळाकार पात्र. हाच त्यांचा जणू 'ट्रेडमार्क' ठरला. स्वच्छतेचे, समाजशुद्धीचे खरे अभियान त्यांनी चालवले. घरांची आणि गावांची साफसफाई, निराश्रितांसाठी आसरा (डोक्यावर छप्पर) गरीब, गरजू, दरिद्री माणसांना अन्न आणि पर्यावरणाचं रक्षण हे त्यांच्या जीवनाचे अखंड व्रत झाले. स्वतःच्या अत्यंत कमीत कमी गरजा ठेवून साधी राहणी आणि उच्च विचारसरणी अंगीकारून त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य समाजातल्या दुर्बल घटकांसाठी वेचले. लोकांना त्यांचा फार आधार वाटे. त्यांनी फक्त स्वच्छतेचा उपदेश नाही केला, तर 'आधी केले, मग सांगितले' अशा निष्ठेने तो अविरत चालवला.

'राष्ट्रसंत' म्हणून प्रसिद्ध असलेले संत तुकडोजी महाराज (जन्म : १९०९, मृत्यू : १९६८) एकोणिसाव्या शतकात जन्मलेल्या गाडगे बाबांप्रमाणेच होते. श्री. माणिक ना. इंगळे उपाख्य तुकडोजी महाराज हेही अमरावती जिल्ह्यातील एका खेडेगावात जन्मले होते. गाडगेबाबांप्रमाणेच सर्वसामान्य लोकांच्या मनावर शिक्षणाचे महत्त्व बिंबवणारा, स्वच्छतेची गरज अधोरेखित करणारा, अस्पृश्यता गाडून टाका असे सांगणारा, जातिभेदाची निरर्थकता जनमानसाला पटवणारा हा संत. समर्थ तुकडोजी महाराजांचे शिष्यत्व पत्करल्यावर त्यांनी इंगळे यांचे नाव 'तुकडोजी' असे ठेवले.

खंजिरीवर भजने गाऊन त्यांनी धार्मिक प्रवचने दिली. जनसमुदायावर त्यांच्या या सांगीतिक उपदेशाचा फार प्रभाव पडत असे. तो काळ म्हणजे विसाव्या शतकातील ब्रिटिश अमलाचा. स्वातंत्र्यविषयक चळवळी आणि आंदोलने चालू होती. तुकडोजी महाराजांनी गावोगाव भ्रमंती करून जी आध्यात्मिक स्वरूपाची भजनाच्या माध्यमातून प्रवचने दिली, त्याची कीर्ती सर्वदूर पसरली होती. गाडगेबाबांप्रमाणेच बहुजन समुदायात मिसळणारा हा साधासुधा माणूस होता. म. गांधींच्या निमंत्रणानुसार ते जेव्हा सेवाग्रामला गेले तेव्हा महात्मा गांधीच्या सामाजिक सेवेचा, खादी वापराचा त्यांच्यावर प्रभाव पडला.

सेवाग्रामच्या धर्तीवर त्यांनी गुरुकुल आश्रम उभारला. आज विदर्भात (वऱ्हाडात) या आश्रमाच्या अनेक शाखा कार्यरत आहेत. गांधीजींच्या प्रभावाने त्यांनी आपल्या भजनात सामाजिक

बाबींचा अंतर्भाव केला. त्यांचे हजारो अनुयायी आजही हे कार्य पुढे चालवीत आहेत. स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतल्यामुळे त्यांना तुरुंगवासही घडला.

ब्रिटिश अमलाखालील भारतात, भारतीय जनतेची जी अवनती होत होती, समाज दिशाहीन झाला होता, सत्त्व व 'स्वत्वहीन' झाला होता, त्यासाठी समाजधुरीणांनी स्वातंत्र्याच्या प्रेरणेने विधायक मार्ग निवडले. सामाजिक, राजकीय, वाङ्मय अशा क्षेत्रांत त्या त्या क्षेत्रातील थोरांनी आपापल्या कार्याद्वारे चैतन्याचे स्फुल्लिंग चेतवण्याचा प्रयत्न केला.

स्वातंत्र्योत्तर काळात गाडगेमहाराज (मृत्यू इ. स. १९५६) आणि तुकडोजी महाराज (मृत्यू इ. स. १९६८) या दोन महाराष्ट्रीयन संत व्यक्तिमत्त्वानंतर समाजपरिवर्तनाची आस ठेवून लोकांना मार्गदर्शन करण्याचे काम करण्यात नानासाहेबांचा फार मोठा वाटा आहे. स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणाचा प्रसार फार झपाट्याने झाला. ज्ञान मिळवण्याचे व त्यावर सर्वांगीण विचार करण्याचे मुख्य साधन म्हणजे ग्रंथ. ग्रंथांद्वारा ज्ञान वा माहिती जरूर मिळते. मात्र त्याच्या सुयोग्य वापरासाठी मार्गदर्शक गुरूची गरज असते.

असे लोकशिक्षक असणारे गुरू समाजाच्या उन्नतीसाठी दीपस्तंभाप्रमाणे असतात. प्रास्ताविकात आपण पाहिले की, नानासाहेबांच्या समकालीन असणारे पांडुरंगशास्त्री आठवले, बाबामहाराज सातारकर, वामनराव पै यांनीही आपल्या विचारधनाने समाजमनात उत्तम संस्कृतीची, सद्भावनेची बीजे रोवण्याची पराकाष्ठा केली. विसाव्या शतकाचे अखेरचे दशक म्हणजे साधारणपणे १९९० पासून संगणक क्रांती आली. जागतिकीकरण, उद्योगीकरण, माहिती–तंत्रज्ञान, दिवसेंदिवस होत जाणारी वैज्ञानिक प्रगती यामुळे भौतिक साधनसंपत्तीत वाढ झाली. अनेक नवीन क्षेत्रे उदयाला आली.

हे सर्व काही अपरिहार्य आणि अटळ असले तरी त्याबरोबरच पूर्वपार संस्कृतीची, मूल्यांची पडझड होऊ लागली. नवी इहवादी तत्त्वे उदयाला येऊ लागली. संगणक आणि मोबाइल यांमुळे जग अक्षरशः हातांच्या बोटांवर आले. घराघरात माहितीचे, रंजनाचे धबधबे कोसळू लागले. मात्र प्रत्येक गोष्टीला चांगल्याबरोबरच दुसरीही बाजू असते. या सुखसुविधांच्या आत्यंतिक वापरामुळे माणसे व्यापारी वृत्तीची, चंगळवादी झाली. सद्गुणांचा, मानवतेचा ऱ्हास होऊ लागला. फक्त अनावश्यक कर्मकांडे, ढोंगी मनोवृत्ती, तामसी गुणांची वाढ उरली. त्यात वाढत्या लोकसंख्येची भर! स्वातंत्र्य म्हणजे जणू काही स्वैराचारच असा बेबंद वृत्तीचा दृष्टिकोन तयार होऊ लागला.

मी, माझे, मला अशी व्यक्तिगत स्वैराचाराची राक्षसी रूपे जागोजाग दिसू लागली. स्वधर्माचा विसर पडू लागला. आपण म्हणजे समाजाचा एक मूलभूत घटक आहोत, समाजाचे आपल्यावर काही ऋण असते, त्याचे आपण देणे लागतो. ही भावनाच अस्तंगत होऊ लागली.

माणसांचे हे अधःपतन म्हणजेच आपल्या संस्कृतीचा विनाश. ओरबाडून घेणे, वापरा आणि फेका, या नव इहवादी संस्कृतीचा पाया रचला गेला. स्वतःपलीकडचा विचार माणसांना दिसेनासाच झाला. 'सत्यं वद! धर्मं चर! हे तर कुणाच्या खिजगणतीतही उरेनासे झाले. परिणामी सर्वत्र अनाचार, भ्रष्टाचार अनोगोंदी; स्वधर्म म्हणजे माणुसकीचे मूल्य ठेवून न्यायप्रियतेने 'जगा आणि जगू द्या' अशा वृत्तीने वागणे, हे जणू हद्दपारच होऊ लागले.

समाजात शंभर कौरव असले तरी पाच पांडवही असतातच. सर्वत्र विनाशकारी विध्वंसक वृत्ती दिसत असली तरी नियमाला अपवाद असावा, त्याप्रमाणे सदाचारी, पापभीरू वर्तनाचे सज्जन असतातच. डॉ. नानासाहेबांना घरातून आजोबांकडून आणि पित्याकडून जी प्रेरणा, जे उत्तेजन मिळाले त्यामुळे समर्थ रामदासांच्या–

शरीर परोपकारी लावावें। बहुतांच्या कार्यास यावें।

उणें पडों नेदावें। कोणियेकाचे।।५।। (सार्थ श्रीदासबोध, दशक–१२, समास–१०)

या वचनानुसार नानासाहेबांनी समाजकार्यार्थ आपले जीवन खर्च केले. तत्त्वज्ञान आणि व्यवहारात यांची उत्तम सांगड घालून स्वतः प्रपंच न करताही रामदासांनी जसे प्रापंचिकांचे मन जाणून घेतले आणि प्रपंच सांभाळूनही आत्मज्ञानाकडे, सन्मार्गाकडे कसे जाता येईल त्याचे मार्गदर्शन आपल्या ग्रंथांद्वारा केले; किंबहुना, सर्व भारतभर भ्रमण करून, लोकमानस जाणून घेतले, त्याचप्रमाणे नानासाहेबांनीही लोकांत मिसळून, लोकांचे मन, परिस्थिती जाणून घेऊन अत्यंत साध्या सोप्या अशा लोकजीवनाशी निगडित भाषेत जगण्याच्या वाटा सुकर करण्याचे मार्ग त्यांना सांगितले.

'बालभक्ती' हे त्यांनी संपादित केलेले छोटे पुस्तक, बालसंस्कार केंद्रात मुलांसाठी उपयोगात आणले जाते. त्याव्यतिरिक्त त्यांच्या नावावर ग्रंथ नाहीत. या प्रबंधाच्या निमित्ताने 'टिळक महाराष्ट्र विद्यापीठा'कडे पीएच.डी. सादर केलेले काही प्रबंध मी पाहिले. त्यांपैकी (उदाहरणादाखल–शांता शेळके, दुर्गा भागवत, ग. दि. माडगूळकर इत्यादी) अशांसारख्या वाङ्मयीन व्यक्तिविशेषांवर

आधारित प्रबंधांच्या बाबतीत बोलायचे तर, त्या त्या व्यक्तीच्या (त्या सर्व व्यक्ती अर्थातच महनीय आहेत.) ग्रंथसंपदेचा, वैशिष्ट्यांचा, वाङ्मयीन बारकाव्यांचा, भाषाशैली, वैचारिकता, लालित्य, काव्य इत्यादी गुणांचा आढावा घेता येतो. विवेचनासाठी ही भूमी विस्तीर्ण असते. अशावेळी नानासाहेबांसारखी सत्प्रवृत्त व्यक्ती प्रबंध विषय म्हणून निवडली तर लेखनावर एक प्रकारे मर्यादा येतात, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. मात्र नानासाहेबांच्या या प्रबोधन कार्याची प्रचिती संशोधिकेने स्वतःच घेतलेली असल्यामुळे आणि संशोधिकेच्या स्वतःच्या व्यक्तिमत्त्वात, मनोधारणांत अत्यंत सकारात्मक बदल झाल्यामुळेही असेल, लाखो लोकांची मने जिंकणारी ही व्यक्ती, कोणत्या गोष्टींमुळे प्रेरित झाली आणि निरलस मनाने एवढे मोठे कार्य करू शकली याचा मागोवा घ्यावासा वाटला.

वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन, पर्यावरण रक्षण यासंबंधीचे त्यांचे कार्य केवळ सर्वश्रुतच नव्हे, तर त्याची जिवंत साक्ष म्हणून (प्रकरण क्र. ३ मध्ये तो उल्लेख आहेच.) ही हजारो–लाखो झाडे नानासाहेबांच्या कार्याचे स्मरण देत आजही उभी आहे. (गिरगावातील जगन्नाथ शंकरशेठ मार्गावर (मुंबई क्र.४) त्यांच्या नावाच्या फलकासह असे झाड संशोधिकेने स्वतः पाहिले.) असे अनेक वृक्ष वाढत आहेत.

निरूपण, श्री समर्थ बैठकांद्वारा आजपर्यंत नियमित चालू असणाऱ्या प्रबोधनपर बैठका, बैठकांमधून मन परिवर्तन झालेल्या मंडळींनी हा वारसा पुढे चालवून, आपल्या मुलांनाही नकळत ही दीक्षा दिली. परिणामी बैठकानंतर त्याच ठिकाणी याच मंडळींनी चालवलेली बालसंस्कार केंद्रे, नानासाहेबांचा समर्थ वारसा पुढे चालवणारे त्याचे सुपुत्र अप्पासाहेब यांनी तर रक्तदान शिबिरे हेही नियमित चालू ठेवले आहे.

नानासाहेबांच्या निरूपणाला येणाऱ्यांमध्ये सुरुवातीला निरक्षर मंडळीही असत. त्यांनाही शिक्षणाचे महत्त्व पटत गेले. त्यांच्यासाठी 'प्रौढ साक्षरता वर्ग' नानासाहेबांनी चालू केले. यात महत्त्वाची बाब अशी की सामाजिक परिवर्तनाचा नानासाहेबांचा हा ध्यास प्रसिद्धीसाठी किंवा दिखावू नव्हता. ही सर्व विनामूल्य सेवा होती. त्यांच्या कळकळीमुळे, कर्मकांडाचे अवडंबर नसल्यामुळे लाखो माणसे त्यांना देवासारखे मानू लागली.

लाखोंचा जनसमुदाय आपल्याभोवती गोळा करणारे भोंदू साधू, बुवा, बाबा, या काळात नव्हते असे नाही; पण निरलस वृत्तीने, निष्काम कर्मयोगाने नानासाहेबांकडे आकृष्ट झालेला हा

लाखोंचा जनसमुदाय, त्यांच्या स्वर्गवासानंतरही त्यांच्याशी एकनिष्ठ आहे. हे कसे घडते? ही नितांत श्रद्धा कशी आली? पैकी एक बाजू अशी की त्यांच्या सुपुत्राने– अप्पासाहेब यांनीही पित्याचे हे व्रत निष्ठेने पुढे चालू ठेवले आहे, हे आहे. खेरीज विविध स्तरांतील लोकमानसाचा जेव्हा धांडोळा घेतला तेव्हा (प्रबंधातील मुलाखतींखेरीज) अनेकांनी आपले अनुभव संशोधिकेला आपणहून सांगितले.

खरे तर प्रत्येक व्यक्तीला एवढे चांगले अनुभव आलेले आहेत! प्रत्येकाचे अनुभव लिहायचे तर प्रत्येकाचं एक–एक पुस्तक होईल. म्हणूनच नाना म्हणायचे, चमत्कारात अडकू नका, प्रत्येकाने प्रचिती घ्या.

उदाहरणादाखल एका दासाने कथन केलेला त्याचा स्वतःचा अनुभव सांगू इच्छिते.

मूळ कोकणातली परंतु मुंबईमध्ये चांगल्या कंपनीत नोकरी करणारी एक व्यक्ती आपली समस्या घेऊन रेवदंड्यास गेली. ते नानांना भेटले. ते गृहस्थ म्हणाले, 'नाना, आपलं नाव बरंच मी ऐकलंय, सध्या मी खूप ग्रासलेलो आहे. आमच्या घरात सध्या एकही चांगली घटना घडत नाहीये. सतत काही ना काहीतरी वाईटच घडतंय. म्हणून मी बऱ्याच जणांकडे जाऊन हात दाखवला, पत्रिका दाखवली. मला बऱ्याच जणांनी सांगितलं, कुणीतरी तुमचे देव बांधलेत, म्हणून असं घडतंय, ते सोडवावे लागतील. नाना, माझे देव सोडवून द्या.'

हे सगळं ऐकल्यानंतर नाना म्हणाले, 'अरे बाबा, तू चुकीच्या ठिकाणी आलास, मला नाही रे देव सोडवता येत. तू बाहेर कुठे शोध घे, तुला नक्की कुणी तरी देव सोडवणारा मिळेल. हां, पण जेव्हा त्यांच्याकडे जाशील तेव्हा मला नक्की बोलव, कारण मलाही बघायचंय देव कसे सोडवतात ते.' ती व्यक्ती नाराज झाली आणि परत जायला निघाली, तेवढ्यात नानांनी त्याला थांबवले आणि सांगितले, 'हे बघ, तुझा शोध चालूच ठेव, परंतु, अशी देव सोडवणारी व्यक्ती मिळेपर्यंत मुंबईत आमच्या बैठका असतात, बघ, जमलं तर तोपर्यंत श्रवणाला जा.'

आणि नंतर ते गृहस्थ श्रवणाला (बैठकीला) गेले. त्यांना श्रवणाची एवढी गोडी लागली, की त्यांचे देव कधी सुटले हे त्यांचे त्यांनाच कळले नाही.

नानांनी किती सहज, श्रवणातून त्यांच्या पिंडातला विकल्प–संशय–अज्ञान काढले.

समाजपुरुषाला असा एखादा धुरंधर नेता मिळाला तर किती बदल घडू शकतो, किती कुटुंबे उद्ध्वस्त होण्यापासून वाचतात, जीवनाला सन्मार्गावर नेतात. स्वतः सुधारतात आणि एका

दिव्याने दुसरा दिवा उजळावा, त्याप्रमाणे अन्यांचेही जीवनमार्ग उजळत राहतात, त्याचे प्रत्यंतर या व्यक्तिमत्त्वाचा वेध घेताना आले.

ऐसा उत्तम गुणविशेष। तयास म्हणावे पुरुष

जयाच्या भजने जगदीश। तृप्त होये।।७।।

असे समर्थ वचन प्रचितीला येते.

प्रबंधासंदर्भात क्षेत्र अभ्यासातही नानासाहेबांच्या या अफाट लोकप्रियतेचे प्रत्यंतर येत राहिले. लोकांच्या अनुभवांनी, चांगल्या विचारांनी आपले मनही समृद्ध होते.

ज्यांनी समाज घडविण्यासाठी, व्यसनमुक्त करण्यासाठी, चिंतनशील करण्यासाठी आपले जीवन समर्पित केले, त्या डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्यावर आजवर प्रबंध लिहिला गेला नव्हता. त्यांना टिळक महाराष्ट्र विद्यापीठाने डि.लिट. पदवी देऊन सन्मानीत केले. हा त्यांच्या कार्याचा गौरव बघून त्यांच्यावर पीएच्.डी. करावी असे संशोधिकेच्या मनात आले आणि मग हा प्रवास सुरू झाला.

श्रवण, मनन, चिंतन ह्या पायऱ्यांवरून ज्ञानप्राप्ती करत असताना आपोआप विचारांमध्ये सकारात्मक बदल होतो; जीवनशैलीही सकारात्मक होते आणि या वळणावर सत्कृत्यांकडे व्यक्तीचे मन ओढ घेते. अशी सत्कृत्ये करणाऱ्या व्यक्तींचा एकत्रित आविष्कार समाजाला इष्ट बदलाकडे अर्थात प्रगतीकडे नेतो. हे श्रेय डॉ. नानासाहेब धर्माधिकारींसारख्या आध्यात्मिक उंचीवर असलेल्या व्यक्तींकडे निश्चित जाते. कारण ह्या व्यक्ती समष्टीचे रूप धारण करतात तेव्हा समाज वैचारिक क्रांतीच्या उंबरठ्यावर येऊन ठेपतो. आणि पर्यायाने देश आध्यात्मिक उंची गाठतो. भौतिक सुखाच्या मागे लागलेल्या सबंध जगात लोक भारताकडे कां धाव घेतात, त्याचे कारण डॉ. नानासाहेबांसारख्या संतवृत्तीच्या माणसांमधे दडलेले आहे.

आतां विश्वात्मकें देवें। येणे वाग्यज्ञें तोषावें।

तोषोनि मज द्यावें। पसायदान हें।।[१]

असे म्हणणाऱ्या संत ज्ञानेश्वरांपासून ते एकविसाव्या शतकातील डॉ. नानासाहेब धर्माधिकारी, पांडुरंगशास्त्री आठवले, बाबामहाराज सातारकर अशा विभूतींनी व्यक्तीसापेक्ष बदलांमधून समाजाची अभिवृद्धी केली आहे. ह्या कारणाने देखील वरील प्रबंधाचे महत्त्व अबाधित आहे.

---

१. सार्थ श्री ज्ञानेश्वरी, ले. बाळकृष्ण अनन्त भिडे, के. भि. ढवळे प्रकाशन, सहावी आवृत्ती, १९८६, पृ. ८८४.

संदर्भग्रंथ यादी

प्राथमिक साधने (प्रकाशित)

१) गीतारहस्य, केसरी प्रकाशन, पुणे–३०

२) दैनंदिन तुकाराम गाथा, दिवाकर अनंत घैसास, मनोरमा प्रकाशन, द्वितीयावृत्ती २००४.

३) बालभक्ती मार्गदर्शन, संपादक – श्री. नारायण विष्णू धर्माधिकारी, प्रथम प्रकाशन – नोव्हेंबर १९९४, मुद्रक – पद्मा क्वालिटी प्रिंटर्स, ठाणे.

४) भगवद्गीता – जशी आहे तशी, श्री. ए. सी. भक्तिवेदांत स्वामी, भक्तिवेदांत बुक प्रभुपाद ट्रस्ट, १९९६

५) भक्तिकोष, तृतीय खंड, भारतीय संप्रदाय, लेखक व संपादक – शंकर अभ्यंकर, पृ.क्र. १५२९.

६) श्रीमत् दासबोध, संपादक श्री. नारायण विष्णू धर्माधिकारी, प्रथम प्रकाशन – नोव्हेंबर १९९४, मुद्रक – पद्मा क्वालिटी प्रिंटर्स, ठाणे

७) संत ज्ञानेश्वर, दिवाकर अनंत घैसास, श्रीज्ञानेश्वर सेवा मंडळ, ठाणे, प्रथम आवृत्ती २०१३.

प्राथमिक साधने (प्रकाशित मासिके)

१) जीवन–विद्या, समज–गैरसमज, ले. वामनराव पै, पृ. क्र. १९

२) महामानव नानासाहेब, संपादक अशोक टिकेकर, संयम पब्लिकेशन, पुणे

३) लोकप्रभा (कल्पवृक्षाची सावली), २५ जुलै २००८

४) 'वसंत श्री' (आध्यात्मिक दिवाळी विशेषांक) २००२, संपादक – वसंत तावडे, पृ. क्र. ११९, १५८, १४५–१४७

प्राथमिक साधने (वृत्तपत्रे)

१) दर्पण, १–३–२००७

२) दैनिक कृषिवल, रायगड, ११–३–१९९९

३) पुढारी मुंबई, १७–४–२०११

४) मुंबई लक्षदीप, १–३–२००८

५) लोकसत्ता, २७–७–२००८

६) वादळवारा, ५–३–२००२

७) साप्ताहिक कुलाबा वैभव, १२–५–२००५

८) सामना, १९–१२–२०११

मानपत्र

१) टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, डी.लिट. पदवी, ७–२–२००४

२) महाराष्ट्र भूषण पुरस्कार, ३०–४–२००८

दुय्यम साधने (प्रकाशित)

१) असा हा रायगड, ले. एस. एम. देशमुख, जिल्हा परिषद प्रकाशन

२) असे घडले ठाणे, ले. डॉ. दाऊद दळवी, जिल्हा परिषद प्रकाशन

३) कोकणचा सांस्कृतिक इतिहास, डॉ. भालचंद्र आकलेकर, पृ. ८२

४) तुकाराम, म. सु. पाटील

५) प्राचीन गीत भांडार, सं. ना. ग. जोशी

६) प्राचीन गीत मंजूषा, सं. ना. ग. जोशी

७) प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, डॉ. प्र. न. जोशी

८) प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, डॉ. ह. श्री. शेणोलीकर

९) भारूड वाङ्मयातील तत्त्वज्ञान, डॉ. रामचंद्र देखणे

१०) मराठी विश्वकोश खंड–२ (पृ. ३९३), ५, १३, १४ प्रमुख संपादक – तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

११) मराठी विश्वकोश खंड–१७,१८,१९, प्रमुख संपादक – डॉ. विजया वाड

१२) महात्मा फुले गौरवग्रंथ, संपादक मंडळ – अध्यक्ष, आमदार पी. बी. साळुंखे, कोल्हापूर, सदस्य – डॉ. एम. जी. माळी, कोल्हापूर, जुलै १९८२, प्रकाशक – महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई

१३) शोधनिबंधाची लेखनपद्धती, स. गं. मालशे, संपादन – मिलिंद मालशे, मुद्रक–प्रकाशक – लोकवाङ्मय गृह, पाचवी आवृत्ती – फेब्रुवारी २०११

१४) समाज विज्ञानकोश, सांस्कृतिक कोश आवृत्ती २००८, पृ. ५६–५७

१५) सरखेल कान्होजी आंग्रे – मराठा आरमार, ले. डॉ. द. रा. केतकर, मृण्मयी ऋग्वेदी प्रकाशन, ठाणे, प्रथमावृत्ती १९९७, पृ. १५, ३० व ५९

१६) 'साहित्य' त्रैमासिकातील लेख, डॉ. प्रा. उषा मा. देशमुख, संतसाहित्य विशेषांक, जुलै २०१४.

१७) संत रामदासांचे व्यवस्थापनशास्त्र, प्रा. रमेश देशपांडे

१८) संतांची समाजधारणा, प्रा. वि. शं. चौघुले

१९) सांस्कृतिक संचित, डॉ. वि. रा. करंदीकर

दुय्यम साधने (अप्रकाशित)

१) गुट्टे तुळशीराम आदिनाथ – संत मुक्ताईंचे चरित्र, काव्य आणि तत्त्वज्ञान, पुणे विद्यापीठ

२) गोडबोले राधा मोहन, संत तुकारामविषयक मराठीतील वाङ्मयाचे सर्वांगीण समालोचन, २३–२–१९९४, पुणे विद्यापीठ

३) तांदळे ज्ञानेश्वर बाळकृष्ण, संत एकनाथ – स्फुट प्रकरणे – एक विवेचक अभ्यास, ११–१०–१९९३, पुणे विद्यापीठ

४) देवरे स्नेहल रमेश, संत बहिणाबाईंची कविता – एक अभ्यास, २५–२–२०१०, पुणे विद्यापीठ

५) भुतकर शुभांगी शशिकांत, संत निळोबा – जीवन व कार्य, २२–९–१९९०, पुणे विद्यापीठ

६) मथुरे आसावरी सुधीर, संत जनाबाई – एक चिकित्सक अभ्यास, १९८७, पुणे विद्यापीठ

७) रंधे रामराव ब., खान्देशातील आदिवासी पावरा समाजाचा सामाजिक व आर्थिक अभ्यास, २००५, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ

८) शिमटी कुसुमाकर, विनोबाजी – व्यक्ती व वाङ्मय (एक अभ्यास), १–८–१९८९

९) श्रोत्रीय पद्मावती श्रीपाद, संत चोखामेळा आणि त्यांचा परिवार – एक विवेचक अभ्यास, २०–१–१९९३, पुणे विद्यापीठ

दृकश्राव्य साधने

१) अभ्यासाच्या कालखंडातील विविध छायाचित्रे

२) प्रबोधनाच्या ध्वनिफिती आणि चित्रफिती

३) 'महाराष्ट्र भूषण पुरस्कारा'ची ध्वनी–चित्रफीत

४) संत बहिणाबाई पुरस्काराची ध्वनी–चित्रफीत

WEBSITES

1. www.google.com
2. www.ISJR.com
3. www.yahoo.com
4. www.discoverindia.com
5. thesaintsofmaharasht.tripod.com
6. www.hindupedia.com

परिशिष्ट अ – मुलाखतीसाठी प्रश्नावली

प्राथमिक साधने (अप्रकाशित)

१) डॉ. नानासाहेबांच्या कुटुंबातील काही व्यक्तींच्या मुलाखतींसाठी प्रश्नावली

प्र. १ घरात वडील म्हणून ते कसे होते?

प्र. २ परमार्थ किंवा समाजसुधारक म्हणून जर त्यांना बाजूला ठेवलं तर वडील म्हणून अशी काही खास आठवण आहे का लहानपणीची?

प्र. ३ त्यांना स्वयंपाकाची आवड होती?

प्र. ४ शिस्तीच्या बाबतीत ते कडक होते का?

प्र. ५अ) समाजप्रबोधन करत असल्यामुळे आपल्या वाट्याला येत नव्हते, त्यामुळे त्यांच्या कार्याचा आपल्याला राग यायचा का?

प्र. ५ब) मग प्रगतिपुस्तक बघितल्यावर ते कधी ओरडले नाहीत का मार्क बघून?

प्र. ६ कधी संतापलेले बघितले का? म्हणजे तुमच्यावरच असं नाही, पण इतर कुणावर?

प्र. ७ ती. आजींशी म्हणजे आपल्या आईशी कधी भांडण वगैरे?

प्र. ८ असं कधी झालं का, की घरात एखादा कार्यक्रम आणि नाना त्याला हजर नाहीत?

प्र. ९ एखाद्या संकटावर मात करण्यासाठी त्यांच्या शिकवणीचा कसा उपयोग झाला?

२) निरूपणकारांच्या मुलाखतींसाठी प्रश्नावली

प्र. १ आपण निरूपणाकडे कसे वळलात?

प्र. २ बैठकीला जाण्याची संधी कशी मिळाली?

प्र. ३ श्रवणाचे विशिष्ट अनुभव?

प्र. ४ श्रवणाला जाताना अडचणी आल्या का? असल्यास कोणत्या प्रकारच्या?

प्र. ५ श्रवणानंतर व्यक्तीत कसा बदल घडतो?

प्र. ६ व्यसनमुक्ती श्रवणामुळे होते असे ऐकून आहोत; ही तात्कालिक की कायमची असते? आणि होत असल्यास श्रवण, निरूपण व वैद्यकीय उपचारांचा त्यात अंतर्भाव असतो का? की फक्त श्रवणाचा?

प्र. ७ विकास वैयक्तिक की सामूहिक?

३) संशोधन क्षेत्राच्या पलीकडच्या काही व्यक्तींच्या मुलाखतींसाठी प्रश्नावली

प्र. १ डॉ. श्री. नानासाहेबांच्या कार्याची ओळख आपल्यापर्यंत कशी पोहोचली?

प्र. २ डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या कार्याचा समाजावर कसा प्रभाव आहे?

प्र. ३ समाजाला वळण लावण्यासाठी प्रचाराचे माध्यम म्हणून डॉ. श्री. नानासाहेबांच्या बैठका कशा उपयुक्त ठरतात?

प्र. ४ डॉ. श्री. नानासाहेबांच्या बैठकांना जाण्याचा आपला कालावधी किती आहे?

प्र. ५ बैठकींमध्ये कोणत्या गोष्टी प्रभावित करतात?

प्र. ६ व्यसनाधीनतेकडे वळलेला समाज व्यसनांपासून दूर झाला आहे का?

प्र. ७ स्त्री–पुरुष हत्या कमी होण्यासाठी याचा फायदा झाला आहे का?

प्र. ८ समाजातील भांडणतंटे, वादविवाद, हेवेदावे कमी होऊन शांतता प्रस्थापित झाली आहे का?

प्र. ९ साक्षरतेचे प्रमाण वाढले आहे का?

४) ठाणे आणि रायगड जिल्ह्यातील श्रवणाला जाणाऱ्या काही व्यक्तींच्या मुलाखतींसाठी प्रश्नावली (शहर विभाग)

प्र. १ श्रवणाला कधीपासून जाताय?

प्र. २ श्रवणाला जाण्यास कां सुरुवात केली?

प्र. ३ श्रवणाच्या वेळचे काही विशिष्ट अनुभव सांगणे.

प्र. ४ डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या विचारांमुळे सामाजिक प्रबोधन घडून येते का? येत असल्यास कसे?

प्र. ५ कुटुंबातील समस्यांवर कोणते प्रबोधनपर मार्गदर्शन नानासाहेब धर्माधिकारी यांच्या उपदेशात मिळाले. त्याचा समस्या सुटण्यासाठी उपयोग झाला काय?

प्र. ६ श्रवणाला जायला लागल्यामुळे मानसिकता कशी बदलली? म्हणजे आचाराविचारांमध्ये कसा बदल झाला?

प्र. ७ श्रवणामुळे होणारा विकास वैयक्तिक की सामूहिकही असतो?

५) ठाणे आणि रायगड जिल्ह्यातील श्रवणाला जाणाऱ्या काही व्यक्तींच्या मुलाखतींसाठी प्रश्नावली (ग्रामीण विभाग)

प्र. १ केव्हापासून श्रवणाला जायला सुरुवात केली?

प्र. २ श्रवणाला जाण्यास सुरुवात कां केली?

प्र. ३ कुटुंबात अशिक्षित माणसे किती?

प्र. ४ आपले विभक्त की एकत्रित कुटुंब आहे?

प्र. ५ श्रवणाला जायला लागल्यामुळे मानसिकता बदलली का? आचार–विचारांमध्ये कसा बदल झाला?

प्र. ६ कुटुंबातील समस्यांवर कोणकोणते प्रबोधनपर मार्गदर्शन डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या उपदेशातून मिळाले?

प्र. ७ त्याचा समस्या सोडविण्याकरिता उपयोग झाला का?

बालसंस्कार केंद्र : सहभागी मुलांच्या प्रातिनिधिक मुलाखतींसाठी प्रश्नावली

प्र १ बालसंस्कार केंद्रामध्ये कधीपासून येता?

प्र २ दर रविवारी येता का?

प्र ३ यासाठी दर रविवारी सकाळी येण्याचा कंटाळा येतो का? की यायला आवडतं?

प्र ४ बालभक्ती–मार्गदर्शन पुस्तिका वाचताना (म्हणताना) काय वाटतं? बोधपर गोष्टीतून काय मिळतं?

प्र ५ या वर्गामुळे काय फायदा झाला?

प्र ६ अभ्यासात एकाग्रता वाढली का?

प्र ७ स्मरणशक्तीत वाढ झाली असं वाटतं का?

प्र ८ या वर्गाला आपल्या मित्र–मैत्रिणींना आणावंसं वाटतं का? आणता का?

प्र ९ यामुळे आपल्यात काय बदल झाला?

अ) आईवडिलांचा आदर करणे.

ब) शिक्षकांचा आदर करणे.

क) देशभक्तीची भावना.

परिशिष्ट ब (१) प्रश्नावली

प्रश्नावली

नाव :

गाव : तारीख :

१) स्त्री ☐ की पुरुष ☐

२) केव्हापासून श्रवणाला जाता?

अ) १ वर्षापूर्वी ☐ ब) पाच वर्षांपूर्वी ☐

क) पाच वर्षांपेक्षा जास्त ☐

३) श्रवणाला जाण्यास कां सुरुवात केली?

अ) व्यसन लागल्यामुळे ☐ ब) निराशा ☐

क) इतरांच्या सांगण्यावरून ☐ ड) संकटग्रस्त झाल्यामुळे ☐

३) आपले शिक्षण किती झाले आहे?

अ) निरक्षर ☐ ब) पाचवीखाली ☐

क) दहावी पास ☐ ड) दहावी पास नंतर ☐

४) शैक्षणिक अर्हतेचा संबंध श्रवणाशी आहे काय? होय ☐ नाही ☐

५) श्रवणाचे फायदे

अ) निराशेवर मात झाली का – होय ☐ नाही ☐

ब) जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला का – होय ☐ नाही ☐

क) १) परिस्थिती बदलली ☐ २) मन बदलले ☐

ड) संतापावर विजय मिळवला – होय ☐ नाही ☐

इ) नम्रता आली – होय ☐ नाही ☐

६) आपल्याला निरूपणकार होण्याची इच्छा आहे का? होय ☐ नाही ☐

७) सुखाच्या शोधात सगळ्यांत महत्त्व कशाला आहे.

अ) अर्थप्राप्ती ☐ ब) मनःशांती ☐ क) मनोविकास ☐

८) श्रवण कशासाठी?

अ) श्रद्धा ☐ ब) भक्ती ☐ क) इतरांसमवेत ☐